प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४३ अ मधील तरतुदीनुसार वाहने उभी करून ठेवण्याचा किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे किंवा त्यासंबंधित फी किंवा शुल्क आकारण्यात येईल अशी तरतुद आहे. औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्राचे झपाट्याने नागरीकरण होत असून दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे. खाजगी वाहन खरेदी करण्याचे व पर्यायाने वाहनांच्या संख्येत वाढ होण्याचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील औरंगाबाद मधील वाहन नोंदणीची आकडेवारी पाहता दरवर्षी वाहन नोंदणीत ८ टक्के वाढ होत आहे.

सन २०१८-१९ च्या वाहन नोंदणीनुसार औरंगाबाद मधील ७१,७६१ दुचाकी, ६१२ तीनचाकी व ८७२५ कार / जीप / टॅक्सी ची संख्या असून एकुण वाहन संख्या ८१,०९८ इतकी आहे. सद्यास्थितीत महानगरपालिका क्षेत्रातील पार्किंगचे कोणतेही धोरण अस्तित्वात नाही.

त्यामुळे रस्त्यावर वाहने अस्ताव्यस्त उभी केली जातात व त्यामुळे वारंवार वाहतुकीची कोंडी होऊन वाहतुकीचा खोळंबा होतो. औरंगाबाद विशेषतः बाजारपेठा, शासकीय कार्यालये, बँका, शाळा, बागबगीचे, तलाव इत्यादी सार्वजनिक ठिकाणी जेथे लोकांचे येण्याजाण्याचे प्रमाण जास्त आहे. अशा ठिकाणी असलेले रस्ते ९ ते २४ मीटर यापेक्षा जास्त रूंदीचे नाहीत. पथकर विक्रेते इत्यादीमुळे रस्त्याची रूंदी कमी होते. दुकाने किंवा इमारतीतील किंवा खरेदीसाठी अशा ठिकाणी येणारे नागरिक त्यांचे वाहन रस्त्यावरच पार्क करतात. पार्क केलेल्या वाहनांमुळे मुळातच कमी रूंदी असलेल्या रस्त्यांची रूंदी वाहतुक वर्दळीसाठी अजुन कमी होते. परिणामी प्रवासाचा वेग (Journey Speed) कमी होऊन प्रवासात जास्त वेळ लागणे, वाहतुक कोंडी निर्माण होणे, प्रदुषण पातळीत वाढ होणे इत्यादी समस्या उदभवत आहेत. औरंगाबाद शहराच्या मध्यवर्ती भागाचा वाहतुक अभ्यास करण्यात आला आहे. तसेच औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुकीचा अभ्यास करून एकात्मिक वाहतुक आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर वाहतुक अभ्यासात / वाहतुक आराखडयात पार्किंग निश्चित करणेसाठी नगर रचना विभागाशी समन्वयक करून आवश्यकता ते नियोजन करण्यात आलेले आहे. त्यासाठी पार्किंग धोरण राबविणे आवश्यक असून त्यासाठी एजन्सी नेमुन रस्त्यावर अस्ताव्यस्त उभे राहणारे वाहन धारकांना शिस्त लागावी म्हणुन धोरण ठरविणे इत्यादी च्या अनुषंगाने वर्गवारी खालील प्रमाणे

रस्त्यांच्या वापराप्रमाणे त्यांची वर्गवारी (ग्रेड) खालील प्रमाणे

**अ वर्ग रस्ते** :- ६० मीटर ते २४ मीटर

**ब वर्ग रस्ते** :- २४ मीटर ते १८ मीटर

**क वर्ग रस्ते** :- १८ मीटर ते ०९ मीटर

सोबतच्या तक्ता-१ मध्ये महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावरील पार्किंगसाठी वाहनांच्या प्रकारानुसार पार्किंग शुल्क नमुद केली आहे. रस्त्यांच्या ग्रेटनुसार पार्किंग शुल्का बाबतचा तक्ता खालील प्रमाणे आहे. पार्किंगचे शुल्क खालील प्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

**दुचाकीसाठी पार्किंग शुल्क रचना**

| रस्त्याचा प्रकार | पार्किंग शुल्क | | |
|---|---|---|---|
| | पहिले दोन तास रुपये | दोन ते चार तास या कालावधीत अतिरिक्त रुपये प्रती तास | चार तासा पुढील प्रत्येक तासाला अतिरिक्त रुपये |
| अ वर्ग रस्ता | रु.१५/- | रु.५/- | रु.१०/- |
| ब वर्ग रस्ता | रु.१०/- | रु.५/- | रु.१०/- |
| क वर्ग रस्ता | रु.०५/- | रु.५/- | रु.१०/- |

**खाजगी चारचाकी वाहनांसाठी पार्किंग शुल्क रचना**

| रस्त्याचा प्रकार | पार्किंग शुल्क | | |
|---|---|---|---|
| | पहिले दोन तास रुपये | दोन ते चार तास या कालावधीत अतिरिक्त रुपये प्रती तास | चार तासा पुढील प्रत्येक तासाला अतिरिक्त रुपये |
| अ वर्ग रस्ता | रु.३०/- | रु.५/- | रु.१०/- |
| ब वर्ग रस्ता | रु.२०/- | रु.५/- | रु.१०/- |
| क वर्ग रस्ता | रु.१०/- | रु.५/- | रु.१०/- |

**व्यावसायिक जड वाहनांसाठी पार्किंग शुल्क रचना**

| रस्त्याचा प्रकार | पार्किंग शुल्क रात्री ९ ते सकाळी ६ वाजेपर्यंत परवानगी राहील |
|---|---|
| अ वर्ग रस्ता | ९ तास या कालावधी करिता प्रतिदिन १००/- |

काही भागात पोलीस विभाग व महानगरपालिकेने घोषित केलेल्या रिक्षा पार्किंग व्यतिरिक्त रस्त्यांवर दिर्घ कालावधीसाठी नियमित पार्किंग होत असल्याने उदा. निराला बाजार, औरंगपुरा, रेल्वेस्टेशन, गोपाल टी, क्रांतीचौक, पुंडलीक नगर, सिडको कॅनॉट प्लेस, टाऊन हॉल, टी.व्ही. सेंटर, जळगांव रोड, सिडको एन-१, महावीर चौक, एस.बी.कॉलनी, औरंगपुरा, एस.एस.सी. बोर्ड ते कोकणवाडी चौक, अदालत रोड चौक तसेच इतर अंतर्गत रस्ते येथील रात्रीचे रिक्षा व इतर व्यावसायीक तीन व चार चाकी वाहनांकरीता मासिक शुल्क रचना निर्धारित करण्यात येते.यामध्ये जड वाहनांचा समावेश राहणार नाही.

**मासिक पार्किंग शुल्क रचना –**

| रस्त्याचा प्रकार | अहोरात्र (ओव्हरनाईट) पार्किंग शुल्क | | |
|---|---|---|---|
| | तीन चाकी रिक्षा रुपये प्रती माह | चारचाकी वाहन रुपये प्रती माह | व्यावसायीक वाहन |
| अ वर्ग रस्ता | रु.५००/- | रु.५००/- | लागु नाही |
| ब वर्ग रस्ता | | | रु.१०००/- |
| क वर्ग रस्ता | | | |

उपरोक्त रस्त्यांच्या व्यतिरिक्त महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या जागा / मिळकतींवर अनुज्ञेयते नुसार पार्किंगसाठी शुल्क आकारणी करणे तसेच वरील प्रमाणे वाहतुक व औरंगाबाद शहरातील वाहनांबाबतीत झालेली पार्किंग शुल्क वसुली करणेसाठी, कर्मचारी यांची नियुक्ती करून राबविण्याच्या कार्यवाहीस काही कालावधी लागणार आहे. तो पर्यंत महानगरपालिकेस पार्किंग शुल्काची वसुली करणे शक्य होणार नाही. तथापि, सदर पार्किंग धोरणास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर पार्किंग लॉटची प्रत्यक्ष जागेवर आखणी करणे, साईन बोर्ड उभारणे, प्रस्तावित

पार्किंगनुसार कर्बस्टोनचे पेटींग करणे इत्यादी स्थापत्य कामे मुख्यालया मार्फत लगेच सुरू करण्यात येतील. जेणे करून वाहन धारकांना पार्किंगची ठिकाणे माहित होऊन त्याप्रमाणे पार्किंग करणेची सवय होईल व बेशिस्त पार्किंगला आळा बसेल.

त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४३ अ या तरतुदीनुसार वर्गवारी केलेल्या रस्त्यांवर पार्किंगचे क्षेत्र निश्चित करणे दुचाकी, तीन चाकी व चारचाकी खाजगी व व्यावसायीक वाहनांकरीता जागेच्या किंवा ठिकाणाच्या केलेल्या वापरा करीता प्रत्येक दिवसासाठी, त्यांच्या भागासाठी, दिर्घ कालावधीसाठी (अहोरात्र) करीता तास, दिवस, मासिक तत्वावर शुल्क आकारणी करणेचे धोरण निश्चित करणेसाठी प्रस्ताव सादर करणे, तसेच महानगरपालिकेकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याची बाब विचारात घेतली असता, महानगरपालिका स्तरावर कर्मचारी नेमणुक करून सदरचे शुल्क वसुल करणे शक्य होणे नसल्याने, सदर कामाकरीता खाजगी एजन्सीची नेमणुक करणे इत्यादीच्या अनुषंगाने प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव १३/२०२०:-</u>**

त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४३ अ या तरतुदीनुसार वर्गवारी केलेल्या रस्त्यांवर पार्किंगचे क्षेत्र निश्चित करणे दुचाकी, तीन चाकी व चारचाकी खाजगी व व्यावसायीक वाहनांकरीता जागेच्या किंवा ठिकाणाच्या केलेल्या वापरा करीता प्रत्येक दिवसासाठी, त्यांच्या भागासाठी, दिर्घ कालावधीसाठी (अहोरात्र) करीता तास, दिवस, मासिक तत्वावर शुल्क आकारणी करणेचे धोरण निश्चित करण्यास वर नमुद केल्याप्रमाणे शुल्क पार्कींग शुल्क आकारणी करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच महानगरपालिकेकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याची बाब विचारात घेतली असता, महानगरपालिका स्तरावर कर्मचारी नेमणुक करून सदरचे शुल्क वसुल करणे शक्य होणे नसल्याने, सदर कामाकरीता खाजगी एजन्सीची नेमणुक करणे इत्यादीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यास देखील मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक १४/२०२०:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०१.०६.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेस नगर भुमापन क्र.१७५८०/४,१७८५०/५, १७८५०/६ सिल्लेखाना येथील विकास योजना समावेक्षक आरक्षणातून सिटी भारती टेक्नो हेरिटेज एल.एल.पी.जे बिल्डींग मधील समावेक्षक आरक्षण पध्दतीने महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाच्या २५ टक्के Stilt Parking+2 Floor Only क्षेत्रांपैकी च्या बांधकामासाठी एकूण या इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ ६६५.४६ चौ.मी. (Total B/U665.46 चौ.मी.) करीता भागशः भोगवटा प्रमाणपत्र जा.क्र./मनपा/नरवि/भागशः भो.प्र./१५३/१७/२०१९-२० दि.११.०९.२०१९ अन्वये त्यास सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह भाडे रु.२,२२,२६३/- प्रमाण भाडे आकारणी नुसार पोलीस आयुक्त कार्यालयाच्या महिला कक्ष (भरोसा) यांना कार्योत्तर मान्यतेस अधिन राहून ताबा देण्यात आला आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव १४/२०२०:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेस नगर भुमापन क्र.१७५८०/४, १७८५०/५,१७८५०/६ सिल्लेखाना येथील विकास योजना समावेक्षक आरक्षणातून सिटी भारती टेक्नो हेरिटेज एल.एल.पी.जे बिल्डींग मधील समावेक्षक आरक्षण पध्दतीने महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाच्या २५ टक्के Stilt Parking+2 Floor Only क्षेत्रांपैकी च्या बांधकामासाठी एकूण या इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ ६६५.४६ चौ.मी. (Total B/U665.46 चौ.मी.) करीता भागशः भोगवटा प्रमाणपत्र जा.क्र./मनपा/नरवि/भागशः भो.प्र./१५३/१७/२०१९-२० दि.११.०९.२०१९ अन्वये त्यास सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह भाडे रु.२,२२,२६३/- प्रमाण भाडे आकारणी नुसार पोलीस आयुक्त कार्यालयाच्या महिला कक्ष (भरोसा) यांना कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १५/२०२०:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.०१.०६.२०२०)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे मालकीचे औरंगपुरा येथील नाथ सुपर मार्केटमधील दुसऱ्या मजल्या वरील हॉलसाठी जाहिर निविदा मागविण्यात आली होती. त्यामध्ये तीन निविदा प्राप्त झालेल्या आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

१. योवान गोपालदास मिठावाला, निविदा दर रू.१,४१,१०९/-
२. सचिन मदनलाल बोरा, निविदा दर रू.१,४२,७०६/-
३. आरती बुक सेंटर, निविदा दर रू.१,४६,६९७/-

वरील प्राप्त उच्च दराची निविदेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक १५/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, औरंगाबाद महानगरपालिकेचे मालकीचे औरंगपुरा येथील नाथ सुपर मार्केटमधील दुसऱ्या मजल्या वरील हॉलसाठी प्राप्त झालेल्या उच्च दराच्या निविदेच्या प्रस्तावास प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक १६/२०२०:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.०१.०६.२०२०)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गाळयांसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. उक्त निविदामध्ये उच्च दराच्या निविदेचा तपशिल खालील प्रमाणेः-

- नेहरू भवन, गाळा क्र.०८ साठी निविदा दर रु.४०४४/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **शेख शाहेदुद्दिन शेख बदरुद्दीन, निविदा दर रु.६४७०/-**
- नेहरू भवन, गाळा क्र.०९ साठी निविदा दर रु.४०४४/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **शेख इम्रान हफीज, निविदा दर रु.६५११/-**
- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गाळा क्र.A-२० साठी निविदा दर रु.३२५७/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **अहेमद अली खान, निविदा दर रु.५५३६/-**
- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गाळा क्र.A-२८ साठी निविदा दर रु.३३२४/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **शेख मेहमुद उमर, निविदा दर रु.४६५३/-**
- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गाळा क्र.B-२८ साठी निविदा दर रु.३२६०/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **शेख मेहमुद उमर, निविदा दर रु.४५६४/-**
- पिया मार्केट, गाळा क्र.०७ साठी निविदा दर रु.२६३९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **विशाल ज्ञानेश्वर मनोरे, निविदा दर रु.२७१८/-**
- पिया मार्केट, गाळा क्र.१६ साठी निविदा दर रु.२६३९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **शोभा सखाराम दुबे, निविदा दर रु.२७१८/-**
- पिया मार्केट, गाळा क्र.१७ साठी निविदा दर रु.२६३९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **सुप्रिया हरीभाऊ शेळके, निविदा दर रु.२७१८/-**
- जय टॉवर, गाळा क्र.०५ साठी निविदा दर रु.८०७३/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **लता राजु सरोदे, निविदा दर रु.१०,०९०/-**
- जय टॉवर, गाळा क्र.१३ साठी निविदा दर रु.४८१८/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **सौ.रत्नमाला सोमनाथ तिपाली, निविदा दर रु.६०६४/-**

- संजय नगर, बायजीपुरा, गाळा क्र.०५ साठी निविदा दर रु.१४३७/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **भगवान त्रिंबक पोळ, निविदा दर रु.१५८१/-**
- नुपूर अपार्टमेंट येथील मनपा व्यापारी संकुल, गाळा क्र.०३, निविदा दर रु.६३४५/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **नेहरी सईदा, निविदा दर रु.६६६२/-**

करिता वरील प्रमाणे निविदेमध्ये प्राप्त उच्च दराचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १६/२०२०:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गाळयांसाठी निविदा मागविण्यात आल्या असून प्रस्तावात नमुद असलेल्या उक्त निविदांमध्ये उच्च दराच्या निविदेच्या तपशिलास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १७/२०२०:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१०.०६.२०२०)**

शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, जागतिक पातळीवर उध्दभलेल्या कोरोना विषाणू (COVID-19) या संसर्गजन्य आजारामुळे राज्यात आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी आपत्कालीन उपाय योजना करण्यात येत असून, या अंतर्गत महानगरपालिका हद्दीत कोरोना विषाणूचा संसर्ग झालेले व संशयीतांना सामान्य नागरीकांपासून वेगळे ठेवण्यासाठी विविध ठिकाणी अलगिकरण/विलगीकरण/ कोवीड केअर सेंटर व तात्पुरते निवारागृह उभारण्यात आले आहेत.

कोरोना विषाणूचा संसर्ग झालेल्या रूग्णांच्या/व्यक्तींच्या संख्येत सातत्याने वाढ होत असून विलगीकरण करावयाच्या नागरीकांच्या संख्येमध्ये ही वाढ होत आहे. त्यासाठी अलगिकरण/ विलगीकरण/ कोवीड केअर सेंटर व तात्पुरते निवारागृह येथे शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार येथील रूग्णांना व निर्वासीत नागरिकांना चहा, नाष्टा, दुपारचे व रात्रीचे जेवण देण्यात येत आहे.

अ) अचानक उध्द्भवलेल्या महामारीची परिस्थिती पाहता यापुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम-६७ (३) (C) च्या तरतुदीनुसार मंजूरी प्राप्त झाल्यानुसार उपलब्ध अन्न पुरवठा धारकांमार्फत ही व्यवस्था करण्यात आली. आजपर्यंत यासाठी साधारणत: रु.१५ लक्ष खर्च झाला असून पुढील दहा दिवसाच्या कालावधीसाठी अंदाजे रु.५.०० लक्ष खर्च होईल. या एकूण रु. २०.०० लक्षाचा खर्चास मान्यता व्हावी.

ब) तसेच जागतिक स्तरावर कोरोना कोवीड-१९ या संसर्ग रोगाची सद्यस्थिती पहाता भविष्यात रूगणांच्या व निर्वासित नागरिकांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यासाठी अलगिकरण/ विलगीकरण/कोवीड केअर सेंटर व तात्पुरते निवारागृह येथे शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार रुगणांना सकाळचा चहा, नाष्टा, दुपारचे जेवण, संध्याकाळचा चहा व रात्रीचे जेवण पुढील तीन महिन्यांच्या कालावधीसाठी देणे अपेक्षित आहे. यापुर्वी प्राप्त झालेले सर्वात कमी दराचे दरपत्रकानुसार किमान दर रु.१५०/- अधिक ५% GST असा एकूण रु.१५७.५०/- प्रती व्यक्ती प्रती दिन असा खर्च अपेक्षित आहे. या दरानुसार दररोजचे सरासरी ५०० रूग्ण गृहीत धरल्यास १०० दिवसासाठी एकूण अंदाजे रु.८०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. वरिल बाबींसाठी ( अ+ब) नुसार एकत्रित रु.१.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी कोवीड-१९ अंतर्गत जिल्हा नियोजन समिती मार्फत प्राप्त अनुदानातून रु.१.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

वरिल बाबींसाठी झालेल्या रु.२०.०० लक्षाच्या खर्चास कार्योत्तर मान्यता व पुढी नव्वद दिवसांच्या कालावधीसाठी अन्न पुरवठा करण्याची अल्प मुदतीची निविदा मागविण्याचा प्रस्तव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १७/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अलगिकरण/विलगीकरण व तात्पुरते निवारागृह तसेच कोवीड केअर सेंटरच्या ठिकाणी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अन्न पुरवठा करणेसाठी प्राप्त शासनाच्या निधीतुन रु.१.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यातुन यापुर्वी झालेल्या रु.२०.०० लक्षाच्या खर्चास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येते व पुढील ९० दिवसाच्या कालावधीसाठी अल्पमुदतीची रु.८०.०० लक्ष किंमतीची निविदा मागविणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १८/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.११.०६.२०२०)**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०३, आनंद गाडे चौक ते कामगार चौक, नगसेन विद्यालय या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे या कामाचे ठेकेदार श्री. जागीरदार सबाउद्दीन यांचेकडून अ.प.दरापेक्षा ०.१०% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४४,५८,६९८/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.प्रशासक यांची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि. ०९/०३/२०२०.

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नाव | वार्ड अभियंता झोन क्र.०९ |
| २ | कामाचे स्वरूप | कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव?<br>अ)त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ४९,९८,७४०/-<br><br>४४६३,१६१/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-निविदेव्दारे |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत<br>ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०९ फेब्रवारी २०२०<br>११ मार्च २०२० |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०२ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर र.रु. | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/ जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री. जागीरदार सबाउद्दीन | ४४,५८,६९८/- | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.१०% कमी दराने |
| ०२. | श्री. काझी गोहर मुहीउद्दीन | ४६,१०,४४५/- | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३.३०% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावे. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | शासन अनुदान लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार |

| | | |
|---|---|---|
| | | योजना |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.जागीरदार सबाउद्दीन यांचेकडुन अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.१० % कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रु. ४४,५८,६९८/- पर्यंत करून घेणेचा व करार करणेचा निविदा मंजुरीचा प्रशासकिय प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. | |

**ठराव क्रमांक १८/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०३, आनंद गाडे चौक ते कामगार चौक, नागसेन विद्यालय रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार श्री. जागीरदार सबाउद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.१०% कमी दराने म्हणजेच निविदा र.रु.४४,५८,६९८/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १९/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१५.०६.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठीच्या स्थापन केलेल्या अलगिकरण/विलगीकरण केंद्रात गादी, उशी, बेडशीट व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी अल्प मुदतीची निविदा जा.क्र./मनपा/भांडार/०८ दि.१८/५/२०२० नुसार प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा स्विकृतीच्या अंतिम दिवशी दि.२८/५/२०२० रोजी निविदा क्र.२०२०_AMCA_५७६९९०_१ साठी चार (४) निविदा प्राप्त झाल्या. निविदा धारकांपैकी मे. व्यंकटेश सपलायर्स व यश ट्रेडींग कंपनी यांनी निविदेतील अटीची पुर्तता केली नसल्याने सदर निविदा धारकास अपात्र ठरविण्यात आले आहे.

शासन निर्णय परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दिनांक २९/१/२०१९ च्या शासन निर्णयानुसार दोन निविदा जरी पात्र झाल्या तरी आर्थिक देकार उघडून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी असे निर्देश आहेत. त्याचे अधिन राहून मे. मॅक्स इंटरप्राईजेस व मे.सुपर गादी कारखाना यांनी निविदेतील अटी शर्तीची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या पात्र निविदा उघडण्यात आल्या असून प्राप्त निविदेतील पुरवठा धारकांचे तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | साहित्याचे विवरण | मे.मॅक्स इंटरप्राईजेस यांचे दर | मे.सुपर गादी कारखाना यांचे दर |
|---|---|---|---|
| १. | गादी ६ बाय ३ (७kg) | ४९८.०० | ५००.०० |
| २. | उशी ( १.५ kg) | ८५.०० | ८७.०० |
| ३. | बेडशीट सिंगल | २३०.०० | २३३.०० |
| ४. | पिलो कव्हर | ७०.०० | ७३.०० |
| ५. | बकेट ( १० लिटर) | ६८.०० | ७०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | मग | २२.०० | २५.०० |
| ७. | कंगवा (लहान) | ०५.०० | ०७.०० |
| ८. | टुथब्रश | १८.०० | २०.०० |
| ९. | टुथपेस्ट (लहान) | १२.५० | १३.०० |
| १०. | टंगक्लिनर | १४.०० | १८.०० |
| ११. | मेडिमिक्स साबन (लहान) | ०५.०० | ०७.०० |
| १२. | पॅराशुट तेल पाऊच | २.०० | ०३.०० |
| १३. | कापडी मास्क | २२.०० | २६.०० |

सदर निविदा धारकांमध्ये मे. मॅक्स इंटरप्राईजेस यांचे दर कमी आहेत. प्राप्त दरांचा यापुर्वी उक्त साहित्य खरेदी करण्यात आलेल्या दरांशी तुलना केली असता, यापुर्वीचे दर हे उघडण्यात आलेल्या निविदेतील दरापेक्षा कमी आहे. मे. मॅक्स इंटरप्राईजेस यांचे निविदेतील दर व यापुर्वी खरेदी केलेले साहित्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचे विवरण | मे.मॅक्स इंटरप्राईजेस यांचे निविदेतील प्राप्त दर (प्रती नग) | यापुर्वी सदर साहित्य दरपत्रकाव्दारे मागविले असतांनाचे दर (प्रती नग) |
|---|---|---|---|
| १ | गादी ६ बाय ३ (७kg) | ४९८.०० | ४९५.०० |
| २ | उशी (१.५ kg) | ८५.०० | ८०.०० |
| ३ | बेडशीट सिंगल | २३०.०० | २२५.०० |
| ४ | पिलो कव्हर | ७०.०० | ६५.०० |
| ५ | बकेट (१० लिटर) | ६८.०० | ६८.०० |
| ६ | मग | २२.०० | २२.०० |
| ७ | कंगवा (लहान) | ०५.०० | ०५.०० |
| ८ | टुथब्रश | १८.०० | १७.०० |
| ९ | टुथपेस्ट (लहान) | १२.५० | १०.०० |
| १० | टंगक्लिनर | १४.०० | १४.०० |
| ११ | मेडिमिक्स साबन (लहान) | ०५.०० | ०४.०० |
| १२ | पॅराशुट तेल पाऊच (लहान) | २.०० | ०१.०० |
| १३ | कापडी मास्क | २२.०० | ०८.०० |

मे.मॅक्स इंटरप्राईजेस यांनी पुर्वीच्या खरेदी दरानुसार साहित्या पुरवठा करणे बाबत संमतीपत्र दिले असून त्यानुसार साहित्य दर निश्चितीचा प्रस्ताव व निविदा स्विक.तीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र.१९/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठीच्या स्थापन केलेल्या अलगिकरण/विलगीकरण केंद्रात गादी, उशी, बेडशीट व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी निविदा क्र. २०२०_AMCA_५७६९९०_१ दिनांक २८/०५/२०२० अन्वये मागविलेल्या अल्प मुदतीची निविदा

सुचनेनुसार प्राप्त निविदेतील सर्वात कमी दर असलेले मे.मॅक्स इंटरप्राईजेस यांनी लेखी संमती दिल्यानुसार साहित्य खरेदीसाठी खालील नमुद दरानुसार मंजूरी प्रदान करण्यात येते.

| अ.क्र. | साहित्याचे विवरण | मंजूर करण्यात आलेले दर (प्रती नग) |
|---|---|---|
| १ | गादी ६ बाय ३ (७ kg) | ४९५.०० |
| २ | उशी (१.५ kg) | ८०.०० |
| ३ | बेडशीट सिंगल | २२५.०० |
| ४ | पिलो कव्हर | ६५.०० |
| ५ | बकेट (बकेट) | ६८.०० |
| ६ | मग | २२.०० |
| ७ | कंगवा (लहान) | ०५.०० |
| ८ | टुथब्रश | १७.०० |
| ९ | टुथपेस्ट (लहान) | १०.०० |
| १० | टंगक्लिनर | १४.०० |
| ११ | मेडिमिक्स साबण (लहान) | ०४.०० |
| १२ | पॅराशुट तेल पाऊच | ०१.०० |
| १३ | कापडी मास्क | ०८.०० |

उक्त मंजूर दरानुसार मे.मॅक्स इंटरप्राईजेस यांचे वरीलप्रमाणे दर मान्य करून निविदा स्विकृतीस मंजूरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २०/२०२०:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.०७.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा पशुसंवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीत असलेले शहाबाजार पशुवधगृह लहान जनरवरांकरीता रु.१५/- प्रमाणे शेळी, मेंढी कत्तल शुल्क वसुली करण्यात येते. या विभागास सन २०२०-२०२१ करीता रुपये पंधरा लक्ष कत्तल फीस वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आलेले असून वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व सध्याचे मटनाचे दर रु.६००/- प्रती किलो लक्षात घेता, वसुल करण्यात येत असलेली कत्तल फीस कमी आहे व सन २०१५-१६ पासुन सदर दरामध्ये वाढ करण्यात आलेली नाही.

तरी खालीलप्रमाणे दरवाढ करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | जनावरांचा प्रकार | सध्याचे दर | प्रस्तावीत दर |
|---|---|---|---|
| १. | लहान जनावरे (शेळी, मेंढी) | रु.१५/- | रु.१००/- |

वरील प्रमाणे दरवाढ प्रस्ताव मंजुर केल्यास मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

करीता, प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्र.२०/२०२०:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.०७.२०२०)**

मनपा पशुसंवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीत असलेले शहाबाजार पशुवधगृह लहान जनावरां करीता रु.१५/- प्रमाणे शेळी, मेंढी कत्तल शुल्क वसुली करण्यात येते. या विभागास सन २०२०-२०२१ करीता रुपये पंधरा लक्ष कत्तल फीस वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आलेले असून वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व सध्याचे मटनाचे दर रु.६००/- प्रती किलो लक्षात घेता, वसुल करण्यात येत असलेली कत्तल फीस कमी आहे व सन २०१५-१६ पासुन सदर दरामध्ये वाढ करण्यात आलेली नाही.

तरी खालीलप्रमाणे दरवाढ करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जनावरांचा प्रकार | सध्याचे दर | प्रस्तावीत दर |
|---|---|---|---|
| १. | लहान जनावरे (शेळी, मेंढी) | रु.१५/- | रु.१००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २१/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.०७.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम राबविण्यासाठी सन २०२०-२०२१ या एका आर्थिक वर्षासाठी ई-निवीदाद्वारे तीन वेळेस निवीदा मागविण्यात आल्या असता, तिसऱ्या वेळेस डॉ.नविश कुमार नहेरा उषा इंटरप्राईजेस यांचे निविदेत खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | निवीदा दर | वाटाघाटी अंती कमी केलेले दर |
|---|---|---|---|
| १. | शहरातील मोकाट श्वान तक्रारींच्या ठिकाणाहून स्वतःच्या जागेत स्वतःच्या वाहनातून पकडून आणणे, श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे पश्चात सुश्रुषा आणि पुनर्वसन करणे. | रु.७७०/- | रु.२ टक्के |
| २. | शहरातील मोकाट श्वान तक्रारींच्या ठिकाणाहून स्वतःच्या वाहनातून पकडण्यात आलेल्या श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे पश्चात सुश्रुषा आणि पुनर्वसन करणे. | रु.७३०/- | रु.२ टक्के |
| ३. | शहरातील मोकाट श्वान तक्रारींच्या ठिकाणाहून मनपाच्या वाहनातून पथकासह पकडण्यात आलेल्या श्वानाच्या शस्त्रक्रिया पश्चात सुश्रुषा आणि पुनर्वसन करणे. | रु.५७५/- | रु.२ टक्के |
| ४. | तक्रारीच्या ठिकाणाहून धोकादायक पिसाळलेले व उपचार करून दुरुस्त न होऊ शकणारे (सीआरसीयु) च्या नियंत्रणा खाली दयामरण देणे. | रु.१९०/- | रु.२ टक्के |
| ५. | आजारी श्वान, पिल्ले तक्रारीच्या ठिकाणाहून पकडून आणणे उपचार देखभाल करून पुनर्वसन करणे. | रु.८०/- | रु.२ टक्के |

मा.अतिरीक्त आयुक्त यांच्या दालनात दि.०५.०७.२०२० रोजी निवीदाद्वारे प्राप्त दराची वाटाघाटी केली असता, वरील अ.क्र.०१ ते ०५ च्या दरामध्ये २ टक्के कमी दराने श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम काम करण्यास संबंधीताने संमती दिलेली आहे. या दरास सन २०२०-२१ या एका आर्थिक वर्षा करीता अंदाजे (१००००) श्वानांचे निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करण्यास रु.७० लक्ष एवढा खर्च होणार आहे.

करीता, सन २०२०-२१ या आर्थीक वर्षासाठी श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम वरील अ.क्र.१ ते ५ दर २ टक्के कमी दराने प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २१/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मोकाट श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम राबविण्यासाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी ई-निविदेद्वारे प्राप्त झालेल्या दराचे निविदा धारक डॉ.नविश कुमार नहेरा, उषा इंटरप्राईजेस यांच्याशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार अ.क्र.१ ते ५ च्या दरामध्ये २ टक्के कमी दराने काम करण्यास संबंधीताने संमती दिल्याने

श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रमासाठी येणाऱ्या अंदाजीत रु.७० लक्ष खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २२/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३१.०७.२०२०)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१९ -२०२० चे सुधारित व कलम ९५ नुसार सन २०२०-२०२१ चे जमा व खर्चाच्या मुळ अंदाजास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ व १०० नुसार अंतिम मान्यता देणे बाबत.

**ठराव क्रमांक २२/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जमा व खर्चाचे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तसेच अर्थसंकल्पात बांधा- वापरा व हस्तांतरीत करा (BOT) तत्वावर त्याच प्रमाणे इच्छुकांकडुन अनामत रक्कमा घेऊन विकसीत करावयाचे वाणिज्यिक व्यापारी संकुले इत्यादी बहुउद्देशिय व लोकाभिमुख प्रस्ताव जे नागरीकांचे हित लक्षात घेऊन प्रस्तावित करण्यात आलेले आहेत त्यासह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१९-२०२० चे सुधारित अंदाज जमा रु.६५७ कोटी ५४ लक्ष ५० हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु.१२२ कोटी ६१ लक्ष ५१ हजार यासह एकुण जमा रु.८८५ कोटी ८८ लक्ष ६३ हजार आणि एकूण खर्च रु.८२९ कोटी ३७ लक्ष ५७ हजार लक्षात घेता, रु.५६ कोटी ५१ लक्ष ०६ हजार शिल्लकीचे त्याच प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९५ नुसार सन २०२०-२०२१ चे जमा व खर्चाचे मुळ अंदाज यामध्ये प्रारंभीची शिल्ल्क रु.१२९ कोटी ५० लक्ष ५१ हजार व अपेक्षित जमा रु.९६३ कोटी ८५ लक्ष ३५ हजार असे एकुण रु.१०९३ कोटी ३५ लक्ष ८६ हजार आणि अपेक्षित खर्च रु.१०९२ कोटी ९७ लक्ष ७५ हजार विचारात घेता रु.३८ लक्ष ११ हजार शिल्लकीचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ व १०० नुसार तसेच प्रशासनाने एप्रिल २०२० या मध्ये होणारी महानगरपालिकेची संभाव्य निवडणुक लक्षात घेता मा.स्थायी समिती समोर सादर करण्यात आलेले दि.०१ एप्रिल २०२० ते दि.३१ जुलै २०२० पर्यंतच्या लेखानुदानास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २३/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०३.०८.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद संचलित टाऊन हॉल, कला दालन येथे दैनंदिन देखभाल व कलादालनाची कामे पार पाडण्याकरीता मानद क्युरेटर (काळजीवाहक) म्हणून श्री.हंसराज नारायण बन्सवाल यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने गुणवत्तेनुसार दि.०४.१२.२००७ रोजी नियुक्ती केलेली आहे. सदरील नियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर मा.आयुक्त महोदय आणि मा.स्थायी समितीच्या मान्यतेने दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यांना दि.१८.०२.२०१४ पासून प्रशासकीय मान्यतेने आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.८३ च्या मान्यतेने रु.१०,०००/- दरमहा एकत्रित मानधन व मुदतवाढ देऊन ते कार्यरत आहे. त्यांचे काम समाधानकारक असून ते मागील तेरा वर्षापासून मनपाच्या सेवेत आहे.

सद्यस्थितीत सबंधीतांची मुदत दि.२७.०९.२०१९ रोजी संपलेली असून त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०८.२०२० पर्यंत अकरा महिन्याकरीता मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २३/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद संचलित टाऊन हॉल, कला दालन येथे दैनंदिन देखभाल व कला दालनाची कामे पार पाडण्याकरीता मानद क्युरेटर (काळजीवाहक)

म्हणून श्री.हंसराज नारायण बन्सवाल यांना रु.१०,०००/- दरमहा एकत्रित मानधन व तीन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०८.२०२० पर्यंत अकरा महिन्याकरीता मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २४/२०२० :-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०४.०८.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-२ राबविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक ११.१.२००७ विषय क्रं.६५५/४ नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरील कार्यक्रम २००७ ते २०१२ या कालावधीकरिता होता. प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर मनपातर्फे प्रकल्पाचा भार सोसण्यास व कार्यक्रम नियमित स्वरुपात राबविण्यास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. मा.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे पत्र जा.क्रं.राकुकका/अर्बनआरसीएच/कक्ष-१७/२०१७२-४४/०७ दिनांक २६.३.२००७ प्रकल्प राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे.

वाढती लोकसंख्या, मातामृत्यू व बालमृत्यू एकूण प्रजनन दर कमी करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याचप्रमाणे गरोदर माता, बालके, किशोरवयीन मुले व मुली यांच्याकरिता विविध आरोग्य सेवा सुविधा देण्यासाठी निरनिराळे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविले जातात. मा.स्थायी समिती, महानगरपालिका औरंगाबाद दिनांक १३/२/२०२० विषय क्रमांक ६६ अन्वये आरसीएच-२ अंतर्गत कार्यरत एकूण २६ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक ४.२.२०२० ते ३१.७.२०२० या कालवधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरील मुदतवाढ दिनांक ३१.७.२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे. खालील सर्व पदे नियमित स्वरुपात न ठेवल्यास आरोग्य सेवा विस्कळीत होईल. यामुळे सर्व पदांची आवश्यकता आहे.

मा.स्थायी समिती, महानगरपालिका औरंगाबाद ठराव क्र.३३९ दि.२०.३.२०१८ नुसार आरसीएच-२ मधील अधिकारी व कर्मचारी यांना राष्ट्रीय आरोग्य अभियानातील अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रमाणे ठराविक वेतन देण्यासाठी मंजूरी देण्यात आलेली आहे. मा.आयुक्त तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र दिनांक ४.५.२०२० व सन २०२०-२०२१ मंजुर पीआयपीनुसार ठराविक वेतनावरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे निवेदन दिनांक २२.५.२०२० नुसार ठराविक वेतनामध्ये वाढ, ५ वार्षीक वेतनवाढ व ७ दिवस वैद्यकीय रजा देण्याची मागणी आहे. कार्यरत अधिकारी व कर्मचारी हे गेल्या १३ वर्षापासून कार्यरत आहेत.

सध्या कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या ठराविक वेतनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | पदनाम | सध्याचे ठराविक वेतन | राष्ट्रीय आरोग्य अभियानानुसार ठराविक वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ.वैशाली काशीनाथ मुदगडकर | वैद्यकीय अधिकारी | रु.२८३५०/- | रु.६००००/- |
| ०२ | श्रीमती जया वामनराव उघडे | स्टाफ नर्स | रु.१२०००/- | रु.२००००/- |
| ०३ | श्रीमती सुनिता गणपतराव नरवडे | स्टाफ नर्स | रु.१२०००/- | रु.२००००/- |
| ०४ | श्रीमती विद्या राजू शर्मा | स्टाफ नर्स | रु.१२०००/- | रु.२००००/- |
| ०५ | श्रीमती ज्योती रामचंद्र बनकर | स्टाफ नर्स | रु.१२०००/- | रु.२००००/- |
| ०६ | श्रीमती मेरी पाखरे | स्टाफ नर्स | रु.१२०००/- | रु.२००००/- |
| ०७ | श्रीमती ज्योती चव्हाण | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०८ | श्रीमती द्रौपदी डक | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| ०९ | श्रीमती लक्ष्मी पाटील | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| १० | श्रीमती मिनाक्षी डोंगरे | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| ११ | श्रीमती रेखा नायमाने | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| १२ | श्रीमती शिला राठोड | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| १३ | श्रीमती सोनाली पावलस भिसे | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| १४ | श्रीमती वर्षा जाधव | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| १५ | श्रीमती वर्षा महादू सोनवणे | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| १६ | श्रीमती सुनंदा नामदेव चव्हाण | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| १७ | श्रीमती सारिका मनोहर इंगळे | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| १८ | श्रीमती कविता चव्हाण | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| १९ | श्रीमती वैशाली बिन्हारे | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| २० | श्रीमती सीमा अरुण गुरव | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| २१ | श्रीमती समिनाबेगम शेख सलीम | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| २२ | श्रीमती वर्षा हरिभाऊ फुले | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| २३ | श्रीमती आरती एकनाथ वाघमारे | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| २४ | श्रीमती आश्विनी रमेशराव परळकर | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| २५ | श्रीमती प्रियंका चंद्रकांत मगरे | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |
| २६ | श्रीमती अग्नेस जे. मकासरे | एएनएम | रु.८६४०/- | रु.१७०००/- |

सध्या कार्यरत २६ अधिकारी व कर्मचारी यांना वेतनाकरिता रु.५०००००/- व वार्षिक रु.६०,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च मनपा अर्थसंकल्प माता व बाल संगोपन (आरसीएच) या घटकामध्ये करण्यात आलेली आहे. आरसीएच-२ अंतर्गत सध्या कार्यरत १ अधिकारी व २५ कर्मचारी यांना प्रस्तावित केल्यानुसार २ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन म्हणजे दिनांक ५.८.२०२० ते ३१.१.२०२१ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास व वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यास प्रस्ताव मा.प्रशासक यांच्या मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक २४/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य टप्पा-२ राबविण्यासाठी आरसीएच-२ अंतर्गत कार्यरत ठराविक वेतनावरील अ.क्र.१ ते २६ एकूण २६ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना २ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.५.८.२०२० ते दि.३१.१.२०२१ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत अधिकारी कर्मचारी यांच्या प्रमाणे ठराविक वेतन वैद्यकीय अधिकारी - रु.६००००/-, स्टाफ नर्स- रु.२००००/- व एएनएम- रु.१७०००/- प्रतिमाह ठराविक वेतन तसेच प्रतिवर्ष ५ टक्के वेतनवाढ तसेच ७ दिवस वैद्यकीय रजा देण्यास मासिक वेतनावरील रु.५०००००/- व वार्षिक खर्च रु.६०,००,०००/- या अपेक्षित खर्चास मंजूरी देण्यात येते आणि वेतनावरील खर्च मनपा फंडातून करणेसह मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २५/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०७.०८.२०२०)**

शहर अभियंता तथा विभाग प्रमुख (भांडार), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, भांडार विभागात सन २०१९-२० मध्ये निविदेव्दारे खरेदी केलेले स्वच्छता साहित्याचा साठा

संपलेला आहे. सन २०२०-२१ हे आर्थिक वर्ष सुरू झाले असून महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत सतत स्वच्छता साहित्याची मागणी होत आहे.

दरवर्षी विविध विभागांकडून मागणी नोंदवून स्वच्छता साहित्याची वर्षभरासाठी निविदा मागविण्यात येते. तथापी या वर्षी लेखानुदान चार महिण्याच्या कालावधीसाठी मंजूर करण्यात आलेले आहे. लेखानुदान २०-२१ साठीची तरतुद ही “सफाई मजूरांसाठी संरक्षण साहित्य खरेदी करणे” या लेखाशिर्षात करण्यात आली आहे. “स्वच्छता साहित्य खरेदी करणेसाठी” स्वतंत्र तरतूद करण्यात आली नाही. सफाई मजूरांसाठी संरक्षण साहित्य खरेदी करण्यासाठी रु.५०.०० लक्षची तरतूद करण्यात आली आहे. उपलब्ध तरतुदीमध्ये सातत्याने अत्यावश्यक असलेले खालील स्वच्छता साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे. सदर साहित्यात कोवीड केअर पुरविण्याच्या साहित्याचा समावेश नाही. त्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव देण्यात आला आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | सन २०२०-२१ खरेदी संख्या (माहे एप्रील २०२० ते जुलै २०२० महिन्या करिता) | प्रमाण | खुल्या बाजारातील दर | अंदाज पत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | साधे खराटे (७५०ग्रॅम) | ४००० | नग | ६५/- | २६०००० |
| २ | लांब दांडीचे खराटे (७५०ग्रॅम) | ७००० | नग | ९५/- | ६६५००० |
| ३ | फावडे दांड्यासह | ४०० | नग | २३८/- | ९५२०० |
| ४ | टिकाव दांड्यासह | १०० | नग | ३५२/- | ३५२०० |
| ५ | लहान टोपले १२ इंची | ४०० | नग | १२६/- | ५०४०० |
| ६ | मोठे टोपले १८ इंची | ३०० | नग | १६३/- | ४८९०० |
| ७ | लांब दांडीचे फावडे | १०० | नग | १७७/- | १७७०० |
| ८ | सब्बल | १० | नग | १०३५/- | १०३५० |
| ९ | लोखंडी बकेट | ५० | नग | २३५/- | ११७५० |
| १० | कुंचा झाडू | ३०० | नग | १००/- | ३०००० |
| ११ | ताडपत्री मोठी २१ बाय १२ रु.२३ प्रती चौ फु. | १० | नग | ३५६८/- | ३५६८० |
| १२ | गमबूट | ५०० | नग | ९८०/- | ४९०००० |
| १३ | पांढरे फिनेल ५ लि.कॅन | १०० | कॅन | १८३/- | १८३०० |
| १४ | काळे फिनेल २५ लि.कॅन | ४० | कॅन | १०४ (per Ltr.) | १०४००० |
| १५ | लाईफ बॉय साबण | ७००० | नग | २५ (current MRP) | १७५००० |
| १६ | रबरी हँण्ड ग्लोज | ५००० | नग | १५१/- | ७५५००० |
| १७ | फावडे दांडे | १०० | नग | ३४/- | ३४०० |
| १८ | टिकाव दांडे | १०० | नग | ३९/- | ३९०० |
| १९ | ॲसिड १ लि. कॅन | २०० | लिटर | ५७/- | ११४०० |
| २० | रबरी पाईप १/२ इंची | ५०० | फुट | ३३/- | १६५०० |
| २१ | रबरी पाईप १ इंची | ५०० | फुट | ४१/- | २०५०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२ | फ्लोअर वाईपर | ५० | नग | ३७८/- | १८९०० |
| २३ | लोखंडी पंजे | २०० | नग | ३००/- | ६०००० |
| २४ | कापडी मास्कचे सद्याचे दर (प्रती नग ८) | १५००० | नग | ८/- | १२०००० |
| २५ | फ्लोरोसेंट सेफ्टी जॅकेट प्राप्त दरा नुसार | २००० | नग | ३००/- | ६००००० |
| | | | | **एकूण** | **३६५७०८०** |

उपरोक्त साहित्याचे दर हे खुल्या बाजारातील असून त्या दरानुसार स्वच्छता साहित्य खरेदीसाठीचा अंदाजे खर्च रु.३६,५७,०८०/- (छत्तीस लाख सत्तावन्न हजार ऐंशी फक्त) इतका अपेक्षित आहे. यासाठी “सफाई मजूरांसाठी संरक्षण साहित्य खरेदी करणे” या लेखाशिर्षातून तरतुद उपलब्ध होणे व सदर साहित्य खरेदीसाठी अल्प मुदतीची निविदा मागविण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २५/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विविध वार्ड कार्यालय व विभागाच्या मागणीनुसार प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साहित्य पुरवठा करणेसाठी “सफाई मजूरांसाठी संरक्षण साहित्य खरेदी करणे” या लेखाशिर्षातून आर्थिक तरतुद रु.३६,५७,०८०/- उपलब्ध करून देणे व अल्प मुदतीची निविदा मागविणेसाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २६/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.११.०८.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत प्रभाग कार्यालय-ड मधील निवडक सेवा पुस्तकांची व वैयक्तीक नस्तीची पडताळणी केली असता,श्री.के.बी.परदेशी,वरिष्ठ लिपीक यांची कार्यालयीन आदेश क्र.आस्था-१/५९२८/८३, दि.०५/०८/१९८३ अन्वये कनिष्ठ लिपीक या पदावर रु.२६०-४९५ (सुधारीत वेतनश्रेणी ९५०-१५००) या वेतनश्रेणीत दि.०६/०८/१९८३ रोजी नियुक्ती झाली.

कार्यालयीन आदेश क्र.आस्था-१/२७३०. दि.०८/०७/१९९८ नुसार दि.०९/०६/१९९४ पासून सात वर्षाच्या नियमित सेवेनंतर समय वेतनश्रेणी १४००-२३०० ही लागू करुन रु.१४००/- इतके वेतन निश्चित केले व दि.०१/०६/१९९५ पासून पुढील वेतनवाढी मंजुर केल्या आहेत. त्यानुषंगाने पाचव्या वेतन आयोगानुसार १४००-२३०० साठी सुधारीत वेतनश्रेणी रु.४५००-१२५-७००० यामध्ये दि.०१/०१/१९९६ रोजी रु.४५००/- इतके वेतन निश्चित करुन दि.०१/०६/१९९६ पासून पुढील वेतनवाढी मंजुर केल्या आहेत.

कार्यालयीन आदेश क्र.आस्था-१/२०१०/२९७ दि.२२/०२/२०१० नुसार दि.२२/०२/२०१० पासून वरिष्ठ लिपीक या पदावर वेतनश्रेणी रु.४५००-१२५-७००० सुधारीत वेतन बॅन्ड रु.५२००-२०२०० + ग्रेड वेतन रु.२८००/- यामध्ये प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली. त्यानुसार सुधारीत कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१४/४४७. दि.०९/१०/२०१४ अन्वये दि.२०/०२/२०१० पासून खालीलप्रमाणे वेतननिश्चिती केले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र.एएमसी-१४९९/२प्र.क्र.१/नवि-२४, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२४ नोव्हेंबर १९९९ नुसार महानगरपालिका सेवाभरती नियमीत सात वर्षानंतरची पुढील वेतनश्रेणी देणेची तरतुद रद्द करुन बारा वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतुद केली आहे. यास्तव औरंगाबाद महापालिकेने राज्य शासनाच्या तरतूदीप्रमाणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी सेवाभरती नियमात तशी तरतूद करणे आवश्यक राहील, असे नमुद केले आहे. तसेच दि.२४ नोंव्हेबर १९९९ रोजीच्या शासन निर्णयातील (२) (ब) मधील तरतुद शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी देण्यात आलेली ७ वर्षाची निवडश्रेणी लागू राहील.

तसेच निवडश्रेणीमध्ये दिलेली लाभ हा पहिला लाभ समजण्यात येवून वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यावर वेतननिश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल. मात्र त्याच वेतनश्रेणीत नियमित/कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ देय होणार नाही. ही बाब लक्षात घेता,श्री.के.बी.परदेशी यांची कार्यालयीन आदेश क्र.मनपा/लेखा/२०१४/४४७.दि.०९/१०/२०१४ अन्वये दि.२०/०२/२०१० पासून केलेले वेतननिश्चिती शासन निर्णय दि.०८/०६/१९९५ व दि.२१/०७/२००१ अन्वये चुकीची ठरते.

तरी सदरची वेतन निश्चितीमुळे खालील अदा झालेले अतिप्रदानाची रक्कम वसुल होणे आवश्यक असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| दिनांक | देय वेतन | अदा केलेले वेतन | शेरा |
|---|---|---|---|
| २२/०२/२०१० | १२४१०+२८०० | १३३४०+२८००(*) | * दि.२२/२/२०१० पासुन वरीष्ठ लिपीक या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्याने रु.५२००-२०२०० + २८०० या वेतन बॅन्ड मध्ये पुनश्चः वेतन निश्चीत करुन अदा केलेले वेतन. शासन निर्णय दि.८/६/१९९५ व दि.२१/७/२००१ अन्वये अतिप्रदान रक्कम वसूल करणे योग्य राहील. |
| ०१/०७/२०१० | १२८७०+२८०० | | |
| ०१/०७/२०११ | १३३४०+२८०० | १३८३०+२८०० | |
| ०१/०७/२०१२ | १३८३०+२८०० | १४३३०+२८०० | |
| ०१/०७/२०१३ | १४३३०+२८०० | १४८५०+२८०० | |
| ०१/०७/२०१४ | १४८५०+२८०० | १५३८०+२८०० | |
| ०१/०७/२०१५ | १५३८०+२८०० | १५९३०+२८०० | |

करिता उपरोक्त बाबीचा विचार करता सदर लेखापरिच्छेद आक्षेप वगळण्याकरिता महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम-१९३० चे कलम-१० (१) मधील तरतुदीनुसार व मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,नवी मुंबई यांचे परिपत्रक क्र.स्था-१८/ब/८४७ दि.७ सप्टेंबर २०१५ व दि.२१ ऑक्टोंबर २०१६ अन्वये श्री.के.बी.परदेशी,वरिष्ठ लिपीक (सेवानिवृत) यांच्या वेतननिश्चिती संदर्भातील लेखापरिच्छेद क्र.१०१ मधील अनुपालन अहवाल सादर करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास दि.१५/०७/२०१९ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.०७ नुसार श्री.के.बी.परदेशी,वरिष्ठ लिपीक (सेवानिवृत्त) यांच्या वेतननिश्चिती संदर्भातील लेखा परिच्छेद क्र.१०१ मधील अनुपालन अहवालानुसार कार्यवाही करणेस मंजूरी दिली आहे.

करिता महानगरपालिका अधिनियमातील कलम १०७ (अ) नुसार श्री.के.बी.परदेशी,वरिष्ठ लिपीक (सेवानिवृत्त) यांच्या वेतननिश्चिती संदर्भातील लेखा परिच्छेद क्र.१०१ मधील अनुपालन अहवालानुसार कार्यवाही करणेस मा.सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मान्यतेबाबत प्रस्ताव अवलोकनास्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक २६/२०२०:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.के.बी.परदेशी यांची कार्यालयीन आदेश क्र.मनपा/लेखा/२०१४/ ४४७. दि.०९/१०/२०१४ अन्वये दि.२०/०२/२०१० पासून केलेले वेतननिश्चिती शासन निर्णय दि.०८/०६/१९९५ व दि.२१/०७/२००१ अन्वये चुकीची ठरते. सदर वेतननिश्चितीमुळे त्यांना अदा झालेली अतिप्रदानाची रक्कम वसुल करुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम-१९३० चे कलम-१० (१) मधील तरतुदीनुसार व मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,नवी मुंबई यांचे परिपत्रक क्र.स्था-१८/ब/८४७ दि.७ सप्टेंबर २०१५ व दि.२१ ऑक्टोंबर २०१६ अन्वये लेखापरिच्छेद मधील अनुपालन अहवाल सादर करणेसाठी श्री.के.बी.परदेशी,वरिष्ठ लिपीक (सेवानिवृत्त)

यांच्या वेतननिश्चिती संदर्भातील लेखा परिच्छेद क्र.१०१ मधील अनुपालन अहवालानुसार कार्यवाही करणेस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २७/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१२.०८.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.०१ अंतर्गत पडेगाव येथील कत्तलखान्या जवळील जागेवर मृत प्राण्यांची विल्हेवाट लावणेसाठी सा.बा. विभागाचे सन २०१९-२० च्या SSR नुसार र.रु.६६.११ लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील कामासाठी सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षा अंतर्गत तरतुद ठेवण्यात येणार आहे.

सदर कामाअंतर्गत विद्युत दाहीनीचे  शेडसाठी RCC कॉलम, ट्रम, परलीन व पत्रे बसविणे, जुन्या व नव्या पत्र्याच्या संरक्षित भिंतीसाठी लोखंडी गर्डर पाईप इत्यादी बसविणे, कार्यालय डिस्पेन्सरी, स्टोअर, सुरक्षा रक्षक खोली, स्वच्छतागृह ईत्यादी RCC प्रकल्पातील बांधकाम संपूर्ण फिनिशिंगसह कामे करणे, स्वच्छतागृह कामे, मुख्य रोडलगत गेट बसविणे, संपूर्ण रंगकाम करणे, पूर्व उत्तर बाजुने तार फेन्सींग करणे व १२% GST कर इत्यादीची तरतुद करण्यात आली आहे.

त्यानुसार कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. ६६.११ लक्षचे मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक २७/२०२०:-**

प्रस्तावात सादर करण्यात येतो की झोन क्र.०१ अंतर्गत पडेगाव येथील कत्तलखान्या जवळील जागेवर मृत प्राण्यांची विल्हेवाट लावणे करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.६६.११ लक्षचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २८/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१२.०८.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा पशुसंवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीत असलेले पडेगाव पशुवधगृह मोठ्या जनावरांकरीता रु.२५/- प्रमाणे म्हैस वर्गीय (म्हैस, रेडा) कत्तल शुल्क वसुली करण्यात येते. सदरचे दर २०१५-२०१६ पासूनचे असुन मागील पाच वर्षात दरवाढ केलेली नाही. या विभागास सन २०२०-२०२१ करीता रुपये पंधरा लक्ष कत्तल फीस वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आलेले असून वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व सध्याचे बीफ मटनाचे दर रु.२००/- प्रती किलो लक्षात घेता वसुली करण्यात येत असलेली कत्तल फीस कमी आहे व सन २०१५-१६ पासुन सदर दरामध्ये वाढ करण्यात आलेली नाही मनपामार्फत बीफ वाहतूक करण्यासाठी बीफ व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली असुन बीफ वाहतुक कत्तलखाना तू दुकानापर्यंत प्रती जनावर रु.२०/- प्रमाणे शुल्क आकारले जाते. या शुल्कामध्ये २०१५ नंतर वाढ करण्यात आलेली नाही. सदरचे दर रु.२०/- वरुन रु.३०/- करणे आवश्यक आहे.

तरी खालील प्रमाणे दरवाढ करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | जनावरांचा प्रकार | सध्याचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १. | म्हैस वर्गीय जनावरे (म्हैस, रेडा) | रु.२५/- | रु.१००/- |
| २. | बीफ वाहतुक प्रती जनावर | रु.२०/- | रु.३०/- |

वरीलप्रमाणे दरवाढ प्रस्तव मंजुर केल्यास मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल. करीता, प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक २८/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा पशुसंवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीत असलेले पडेगाव पशुवधगृह मोठ्या जनावरांकरीता रु.२५/- प्रमाणे म्हैस वर्गीय (म्हैस, रेडा) कत्तल शुल्क वसुली करण्यात येते. सदरचे दर २०१५-२०१६ पासूनचे असुन मागील पाच वर्षात दरवाढ केलेली नाही. या विभागास सन २०२०-२०२१ करीता रुपये पंधरा लक्ष कत्तल फीस वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आलेले असून वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व सध्याचे बीफ मटनाचे दर रु.२००/- प्रती किलो लक्षात घेता वसुली करण्यात येत असलेली कत्तल फीस कमी आहे व सन २०१५-१६ पासुन सदर दरामध्ये वाढ करण्यात आलेली नाही मनपामार्फत बीफ वाहतूक करण्यासाठी बीफ व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली असुन बीफ वाहतुक कत्तलखाना तू दुकानापर्यंत प्रती जनावर रु.२०/- प्रमाणे शुल्क आकारले जाते. या शुल्कामध्ये २०१५ नंतर वाढ करण्यात आलेली नाही. सदरचे दर रु.२०/- वरुन रु.३०/- करणे आवश्यक आहे. तरी खालील प्रमाणे दरवाढ करणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **जनावरांचा प्रकार** | **सध्याचे दर** | **प्रस्तावित दर** |
|---|---|---|---|
| १. | म्हैस वर्गीय जनावरे (म्हैस, रेडा) | रु.२५/- | रु.१००/- |
| २. | बीफ वाहतुक प्रती जनावर | रु.२०/- | रु.३०/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २९/२०२० :-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१३.०८.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा पशुसंवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीत असलेले शहाबाजार पशुवधगृह लहान जनावरांकरीता रुपये १५/- प्रमाणे शेळी, मेंढी कत्तल शुल्क वसुली करण्यात येत होती. सध्याचे मटनाचे दर रु.६००/- प्रती किलो लक्षात घेता व या कत्तलखाना पासुन सन-२०२०-२०२१ करिता रुपये पंधरा लक्ष कत्तल फिस वसुलीचे उदिष्टय देण्यात आलेले असुन वसुलीचे उदिष्टय साध्य करण्यासाठी ठराव क्र.२० दि.३०/९/२०२० नुसार कत्तल फिस रु.१००/- या प्रमाणे दर वाढ करण्यात आलेली होती. सदर दर वाढ जास्त असल्याच्या तक्रारी खाटीक समाजाच्या निवेदनाद्वारे करण्यात आल्याने मा.प्रशासक महोदय यांच्या दि.०७/०८/२०२० च्या मान्यता अन्वये वसूल करण्यात असलेली कत्तल फीस रु.१००/- वरुन कमी करुन रु.५०/- प्रमाणे दरवाढ करण्यात आली आहे. वरील प्रमाणे कत्तल फीस रु.१००/- ऐवजी रु.५०/- प्रमाणे दर वाढ प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | जनावरांचा प्रकार | सध्याचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १. | लहान जनावरे (शेळी,मेंढी) | रु.१००/- | रु.५०/- |

**<u>ठराव क्रमांक २९/२०२०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा पशुसंवर्धन विभागाअंतर्गत कार्यान्वीत असलेले शहाबाजार पशुवधगृह लहान जनावरांकरीता रुपये १५/- प्रमाणे शेळी, मेंढी कत्तल शुल्क वसुली करण्यात येत होती. सध्याचे मटनाचे दर रु.६००/- प्रती किलो लक्षात घेता व या कत्तलखाना पासुन सन-२०२०-२०२१ करिता रुपये पंधरा लक्ष कत्तल फिस वसुलीचे उदिष्टय देण्यात आलेले असुन वसुलीचे उदिष्ट साध्य करण्यासाठी ठराव क्र.२० दि.३०/९/२०२० नुसार कत्तल फिस रु.१००/- या प्रमाणे दर वाढ करण्यात आलेली होती. सदर दर वाढ जास्त असल्याच्या तक्रारी खाटीक समाजाच्या निवेदनाद्वारे करण्यात आल्याने मा.प्रशासक महोदय यांच्या दि.०७/०८/२०२० च्या मान्यता अन्वये वसूल करण्यात येत असलेली कत्तल फीस रु.१००/- वरुन कमी करुन रु.५०/- प्रमाणे दरवाढ करण्यात आली आहे.

तरी खालीलप्रमाणे दरवाढ करणेस मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जनावरांचा प्रकार | सध्याचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १. | लहान जनावरे (शेळी,मेंढी) | रु.१००/- | रु.५०/- |

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्रमांक ३०/२०२०:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.१४.०८.२०२०)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०२०-२१ या एका आर्थिक वर्षासाठी प्राणीसंग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे बीफ खाद्य खरेदी करण्यासाठी ई-टेंडर द्वारा निविदा मागविण्यात आल्या होत्या. यासाठी एकूण पाच कोरे निविदांची विक्री झाली असून पाच भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नाव | दर प्रतिकिलो |
|---|---|---|
| १. | श्री.अब्दूल हमीद कूरैशी | रु.२२०.०० |
| २. | श्री.अब्दूल हारुण अब्दूल रहीम कुरैशी | रु.२०५.०० |
| ३. | श्री.शेख समद शेख सत्तार | रु.२१७.९५ |
| ४. | श्री.फेरोज खान | रु.२१३.०० |
| ५. | श्री.मो.इम्रान कुरैशी | रु.२१४.०० |

तुलनात्मक दृष्टीने श्री.अब्दूल हारुण अब्दुल रहीम कूरैशी यांचे बीफ खरेदीचे दर रु.२०५.०० प्रती किलो हे सर्वात कमी दर आहेत. दरासंबधी करण्यात आलेल्या वाटाघाटी नंतर निविदा दर रु.२०५.०० प्रती किलो या दरामध्ये कमी करुन रु.१७८.०० प्रति किलो दरानुसार बीफ खरेदी करण्यासाठी निविदा धारकाने मान्यता दिलेली आहे.

प्राणी संग्रहालयात असलेले हिंस्त्र प्राणी वाघ, पांढरेवाघ, बिबट, तरस, कोल्हे,मगर,उदबिल्ला यांना केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे मांनकानुसार प्राण्यांना प्रतिदिनी एकूण १३९ किलो बीफ खाद्य घेण्यात येत आहे. यामधे प्राण्यांची संख्या कमी जास्त झाल्यास बीफ खरेदीचे प्रमाण कमी जास्त करण्यात येते. त्यानुसार रु.१७८.०० प्रतिकिलो दरानुसार वार्षिक एकूण खर्च रु.७७,४४,२४६.०० एवढा होणार आहे.

करीता सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी प्राणीसंग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांसाठी बीफ खरेदी प्रस्ताव मान्यतेसाठी विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ३०/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०२०-२१ या एका आर्थिक वर्षासाठी प्राणिसंग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे बीफ खाद्य खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारक श्री.अब्दुल हारुण अब्दुल रहीम कुरैशी यांच्याशी वाटाघाटी केल्यांनतर रु.१७८ प्रति किलो दराने बीफ खाद्य खरेदीस मान्यता देण्यात येते. या दरानुसार होणारा वार्षिक एकूण खर्च रु.७७,४४,२४६.०० यांस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३१/२०२०:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.१९.०८.२०२०)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे मालकीचे औरंगपुरा येथील पिया मार्केटमधील तळ मजल्यामध्ये रंगारगल्ली येथील विकास योजना रस्ता रुंदीकरणात बाधीत मिळकत धारकांचे पुनवर्सनामध्ये वार्षिक भाडे रु.६७५६/- नुसार देण्यात आले होते. त्यासाठी संबधीतांनी महानगरपालिकेकडे वेळोवेळी पुनर्वसनासंबधांने केलेली भाडे आकारणीस आक्षेप घेतलेला आहे. त्यानुसार पिया मार्केट येथील

१. सुधाकर कुलकर्णी, तळमजला, गाळा क्र.०५
२. प्रेमचंद साखला, तळमजला, गाळा क्र.१२
३. पी.व्ही.कुंठे, तळमजला, गाळा क्र.१२
४. राधेश्याम वर्मा, तळमजला, गाळा क्र.१३
५. सलुजा अजितसिंग धरमसिंग, तळमजला, गाळा क्र.१४
६. दिपक चंद्रकांत बोंबले, तळमजला, गाळा क्र. १५
७. गणेश रामचंद्र म्हस्के, तळमजला, गाळा क्र.२४
८. बाबुराव शंकर चव्हाण, तळमजला, गाळा क्र.२५
९. बालाजी गजानन आहिरे, तळमजला, गाळा क्र.२९

वरील गाळे धारकांना प्रत्येकी प्रती गाळा वार्षिक भाडे रु.७६५६/- एवढे आकारणी करुन ताबा देण्यात आलेला आहे. उक्त गाळेधारक यांनी याप्रमाणे महानगरपालिकेकडे भाडे भरणा केलेले असुन अद्याप पर्यंत करारनामा केलेला नसल्याने उक्त भाडे रक्कमेत दर ०३ वर्षांनी १० टक्के वाढ करुन ३० वर्षाच्या कालावधी करीता करारनामा करणेसाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक ३१/२०२०:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या मालकीचे औरंगपुरा येथील पिया मार्केटमधील तळ मजल्यामध्ये रंगारगल्ली येथील विकास योजना रस्ता रुंदीकरणात बाधीत मिळकत धारकांचे पुनर्वसनामध्ये वार्षिक भाडे रु.६७५६/- नुसार पिया मार्केट येथील प्रस्तावात नमुद अ.क्र.१ ते अ.क्र.९ गाळेधारकांपैकी काहीनी महानगरपालिकेकडे भाडे भरणा केलेले असुन अद्याप पर्यंत करारनामा केलेला नसल्याने उक्त भाडे रक्कमेत दर ०३ वर्षांनी १० टक्के वाढ करुन ३० वर्षांच्या कालावधी करीता करारनामा करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३२/२०२०:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२६.०८.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेची आमखास मैदानालगत न.भु.क्र.२३३९ या मिळकतीवर जुनी वस्तीगृहाची इमारत आहे. सदर वस्तीगृहाच्या इमारतीचा सद्यस्थितीत वापर होत नाही.

स्मार्ट सिटी प्रकल्प अंतर्गत महानगरपालिकेचा २५ टक्के हिस्सा टाकावा लागणार आहे. त्यानुषंगाने मा.प्रशासक यांनी दि.११.०८.२०२० रोजी मान्यता दिल्याप्रमाणे आमखास मैदानाच्या उत्तरेस डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या समोरील बाजूस यापूर्वीचे विद्यार्थी वस्तीगृहाची इमारत जी सध्या मोडकळीस आलेली आहे. त्या जागेसह मुल्यांकन करणे व ही इमारत स्मार्ट सिटीच्या कार्यालयासाठी हस्तांतरीत करणे आहे. त्यानुसार स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या कार्यालयासाठी सदर इमारतीचे हस्तांतरण करुन, त्या इमारतीची सद्यस्थितीत येणारी किंमत औरंगाबाद महानगरपालिकेच्या २५ टक्के हिश्या पैकी रक्कम म्हणून गृहीत धरण्यात येईल. औरंगाबाद महानगरपालिकेच्या अण्णाभाऊ साठे विद्यार्थी वस्तीगृहाची इमारत २५०० चौ.मी. भुखंडावर उभी असून, इमारतीचे एकूण बांधीव क्षेत्रफळ २११२ चौ.मी.आहे.

उक्त इमारतीचे भुखंडासह आजचे मुल्यांकन (Valuation) मान्यता प्राप्त व्हॅल्युअर यांचेकडून करुन घेण्यात आले असुन या इमारतीचे बाजार भावानुसार जमिनीचे मुल्य व घसारा किंमत गृहीत धरुन इमारतीच्या मुल्यासह किमान मुल्यांकनानुसार रु.२१,००,००,०००/- इतकी येते.

करीता स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत महानगरपालिकेला टाकायचा २५ टक्के हिस्सा म्हणून न.भु.क्र.२३३९ या मिळकतीवरील वस्तीगृहाची इमारत औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड कार्यालय सुरु करणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा योग्य त्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ३२/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या न.भू.क्र.२३३९ या भुखंडावरील २५०० चौ.मी.बांधीव क्षेत्रफळ असलेली अण्णाभाऊ साठे विद्यार्थी वस्तीगृहाची जुनी इमारत आहे. या इमारतीचे आजचे मूल्यांकन मान्यता प्राप्त व्हॅल्युअर यांचेकडून करुन घेण्यात आले आहे. व्हॅल्युवेशन रिपोर्ट नुसार जमिनीचे मुल्य व इमारतीचे घसारा किंमत गृहीत धरुन रु.२१,००,००,०००/- इतकी येते. या मूल्यांकना नुसार स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत महानगरपालिकेला टाकावयाचा २५ टक्के हिश्यापैकी रक्कम म्हणून सदर वस्तीगृहाची इमारत औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलमेंट कार्पोरेशन लिमिटेड यांचेकडे हस्तांतरीत करणे व या ठिकाणी औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलमेंट कार्पोरेशन लि.चे कार्यालय सूरु करणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३३/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२८.०८.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, न.भु.क्र.१६२६१ या रेखांकनातील खुल्या जागेमधील क्षेत्र ८०४.०० चौ.मी. असून त्यावर रक्कम रुपये ०५/- प्रतिचौरस प्रतिमाह वार्षिक भाडेपट्टा रु.४८,२४०/- आकारण्यात आलेला आहे. विकासकाने मार्च २०२० पर्यंतचा आगाऊ भाडेपट्टयासह आजपावेतो रक्कम रु.५,३०,६४६/- भरणा केले आहे. प्रकल्प पूर्णत्वा नंतर प्रकल्पांतर्गत विना परवानगी अतिरिक्त बांधकाम/वापर केल्यामुळे प्रकल्प २०१५ पासुन बंद करण्यात आलेला होता. सद्यस्थितीत प्रकल्पाबाबतचे प्रकरणात महानगरपालिकेने अपिल दाखल केलेले आहे. मा.जिल्हा न्यायालयात आर.सी.ए.क्र. २५४/२०१९ अन्वये समजोता (compromise Deed) करारनामा दाखल करणे, सुधारीत पुर्नकरारनामा करणे, वाढीव एफ.एस.आय.सह नियमानुसार सुधारीत बांधकाम परवानगी देणे, त्यानुसार प्रिमीयम व भाडेपट्टा वसुल करणे यासाठी मा.प्रशासक यांनी तत्वत: मंजुरी दिली. तद्नंतर फेर भाडेपट्टा करारनामा आणि compromise Deed संदर्भाने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणे बाबत आदेशित केले व त्यास संबंधीत विकासक यांनी समंती दर्शविली.

त्याअनुषंगाने प्रकरणी बी.ओ.टी. विभागाच्या आढावा बैठकीत महानगरपालिकेच्या पूर्व परवानगी शिवाय कोणताही वापर करणार नाही. तसेच भाडेपट्टा रक्कम रु.५/- प्रती चौ.मी. प्रती माह ऐवजी रक्कम रु.१५/- प्रती चौ.मी. प्रती माह वाढविणेच्या अटीवर तडजोड करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४८१ (१) मधील (ह) नुसार मा.स्थायी समितीचे न्यायालयीन प्रकरणात तडजोड करण्याचे अधिकार मा.प्रशासक यांना आहेत. करिता उक्त प्रकरणात प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक ३३/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या न.भु.क्र. १६२६१ या रेखांकनातील खूल्या जागेमधील क्षेत्र ८०४.०० चौ.मी. असून त्यावर रक्कम रुपये ०५/- प्रतिचौरस वार्षिक भाडेपट्टा रु.४८,२४०/- आकारण्यात आलेला आहे. विकासकाने मार्च २०२० पर्यंतचा आगाऊ भाडेपट्टयासह आजपावेतो रक्कम रु.५,३०,६४६/- भरणा केले आहे. प्रकल्प पूर्णत्वा नंतर प्रकल्पांतर्गत विना परवानगी अतिरिक्त बांधकाम/वापर केल्यामुळे प्रकल्प २०१५ पासून बंद करण्यात आला होता. सद्यस्थितीत प्रकल्पाबाबतचे प्रकरणात महानगरपालिकेने अपिल दाखल केलेले आहे. मा.जिल्हा न्यायालयात आर.सी.ए.क्र.२५४/२०१९ अन्वये समजोता (compromise Deed) करारनामा दाखल करणे, सुधारीत

पुर्नकरारनामा करणे, वाढीव एफ.एस.आय.सह नियमानुसार सुधारीत बांधकाम परवानगी देणे, त्यानुसार प्रिमीयम व भाडेपट्टा वसुल करणे यासाठी मा.प्रशासक यांनी तत्वतः मंजुरी दिली. तद्नंतर फेर भाडेपट्टा करारनामा आणि compromise Deed संदर्भाने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणे बाबत आदेशित केले व त्यास संबंधीत विकासक यांनी संमती दर्शविली. रुपये ०५/- प्रति चौ.मी. प्रतिमहा ऐवजी रुपये १५/- प्रति चौ.मी. वाढविणेच्या अटीवर तडजोड करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रस्ताव मंजुर. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३४/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०२.०९.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गाळयांसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. उक्त निविदामध्ये उच्च दराच्या निविदेचा तपशिल खालील प्रमाणे

- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक मनपा व्यापारी संकुल, पैठणगेट गाळा क्र.एस-३ साठी निविदा दर रु.१६४३/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च दराची निविदा श्री.अफरोज सरवर अहेमद शेख यांचे निविदा दर रु.१६५१/- प्राप्त आहे.
- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक मनपा व्यापारी संकुल, पैठणगेट गाळा क्र.एस-२ साठी निविदा दर रु.१६४३/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च दराची निविदा श्री.अफरोज सरवर अहेमद शेख यांचे निविदा दर रु.१६५१/- प्राप्त आहे.
- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक मनपा व्यापारी संकुल, पैठणगेट गाळा क्र.एस-४ साठी निविदा दर रु.१६४३/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च दराची निविदा श्री.अफरोज सरवर अहेमद शेख यांचे निविदा दर रु.१६५१/- प्राप्त आहे.
- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक मनपा व्यापारी संकुल, पैठणगेट गाळा क्र.एस-५ साठी निविदा दर रु.१६४३/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च दराची निविदा श्री.अफरोज सरवर अहेमद शेख यांचे निविदा दर रु.१६५१/- प्राप्त आहे.
- संत गाडगेबाबा महानगरपालिका व्यापारी संकुल, रेल्वेस्टेशन मधील गाळा क्र.८ साठी निविदा दर रु.३२०४/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च दराची निविदा श्री.स्वामी समर्थ एन्टरप्राईजेस यांचे निविदा दर रु.३३३२/- प्राप्त आहे.
- कबाडीपुरा महानगरपालिका व्यापारी संकुल, कबाडीपुरा मधील गाळा क्र.४ साठी निविदा दर रु.६१८९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च दराची निविदा श्री.सिध्दीकी मोहम्मद मोईनोद्दीन यांचे निविदा दर रु.६४९८/- प्राप्त आहे.
- संजय नगर महानगरपालिका व्यापारी संकुल, संजय नगर, बायजीपुरा मधील गाळा क्र.६ साठी निविदा दर रु.१४३७/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च दराची निविदा श्री.गणेश तुकाराम अवसारे यांचे निविदा दर रु.१४९४/- प्राप्त आहे.
- भोलेश्वर मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुल, गुलमंडी मधील गाळा क्र.११ साठी निविदा दर रु.२८६२/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च दराची निविदा श्री.स्वामी समर्थ एन्टरप्राईजेस यांचे निविदा दर रु.३१४८/- प्राप्त आहे.

- पिया मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुल, औरंगपुरा मधील तळ मजला गाळा क्र.११ साठी निविदा दर रु.२६९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च दराची निविदा श्री.जफ्फर खान यांचे निविदा दर रु.२७७१/- प्राप्त आहे.
- पिया मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुल, औरंगपुरा मधील पहिला मजला गाळा क्र.०१ साठी निविदा दर रु.२६३९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च दराची निविदा श्री.अनिल नामदेव शेळके यांचे निविदा दर रु.३१६७/- प्राप्त आहे.
- पिया मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुल, औरंगपुरा मधील पहिला मजला गाळा क्र.३० साठी निविदा दर रु.२६३९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये उच्च दराची निविदा श्री.संजय फकीरचंद फत्तेलष्कर यांचे निविदा दर रु.२७४५/- प्राप्त आहे.

करिता वरील प्रमाणे निविदेमध्ये प्राप्त उच्च दराचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ३४/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गाळ्यांसाठी निविदा मागविण्यात आल्या असून प्रस्तावात नमुद असलेल्या उक्त निविदामध्ये उच्च दराच्या निविदेच्या तपशिलास मंजुरी देण्यात येते. वैधाननिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३५/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०३.०९.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील क्रांतीचौक छत्रपती शिवाजी महाराज यांचा नवीन २१ फुट उंचीचा अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा उभारणे या कामाचे ठेकेदार मे.चित्रकल्पक, कंत्राटदार/शिल्पकार,गणेशवाडी,धायरी पुणे यांचे कडून निविदा र.रु.९८,२८,०००/- पर्यंत करुन घेणेस व करार करणेस मा.प्रशासक, महानगरपालिका औरंगाबाद यांची मान्यतेबाबत.

**संदर्भ:- निविदा दि.०६.०३.२०२०.**

| १. | **खात्याचे नाव** | **वॉर्ड अभियंता कार्यालय क्र.०९** |
|---|---|---|
| २. | कामाचे स्वरुप | छत्रपती शिवाजी महाराज यांचा नवीन २१ फुट उंचीचा अश्वारुढ पुर्णकृती पुतळा उभारणे |
| ३. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | १,५०,००,०००/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेची निविदा मागविण्यात आले? | १,०८,००,०००/- |
| ४. | ज्या वृत्तपत्रात निविदाची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई निविदेद्वारे |
| ५. | अ) निविदा स्विकारण्याची मुदत | १३ मार्च २०२० |
| | ब) निविदा उघडल्याचा दिनांक | २३ जुलै २०२० |
| ६. | एकुण किती निविदा आली? | ०८ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | कंत्राटदाराने सादर केलेली | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/ जास्त (Tender Amount ची कंत्राटदाराने सादर केलेल्या निविदेच्या |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | | निविदेची रक्कम रुपये | रक्कमेशी तुलनेअंती) |
| १. | CHITRAKALAPAK, GANESHWADI DHAARI, PUNE | ९८,२८,०००/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा-९.००% कमी दराने |
| २. | RAM SUTAR ART CREATIONS PVT.LTD., DELHI | १,०१,००,०००/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा-६.४८% कमी दराने |
| ३. | SHILPPAM, JAIPUR RAJASTHAN | १,०८,८१,०००/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा-०.७५% जास्त दराने |
| ४. | KALASANSKAR ART STUDIO, NHARE, PUNE | १,१५,१८,०००/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा-६.६५% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे. | नाही |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | ---- |
| ८. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्ष नमुद करावे. | पुतळे खरेदी संगोपन |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९. | सदरचे काम डिपॉझिटमधून करण्यात आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे? (डिपॉझिट रजिस्टर पान क्रमांक द्यावा) | ----- |
| १०. | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.सर्वसाधारण सभा दि.१८.०२.२०२०<br>विषय क्र.१२०३ |
| तरी विषयांकीत काम ठेकेदार मे.चित्रकल्पक, कंत्राटदार/शिल्पकार गणेशवाडी, धायरी पुणे यांच्याकडून प्राप्त निविदा रु.९८,२८,०००/-रक्कमेत (अ.प.दरापेक्षा ९% कमी दराने) करून घेणेस व करार करणेचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. | | |

**<u>ठराव क्रमांक ३५/२०२०:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील क्रांतीचौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा नवीन २१ फुट उंचीचा अश्वारुढ पुर्णकृती पुतळा उभारणे या कामासाठी प्राप्त झालेले निविदाधारक मे.चित्रकल्पक, कंत्राटदार/शिल्पकार गणेशवाडी, धायरी पुणे यांच्याकडून प्राप्त निविदा रु.९८,२८,०००/-रक्कमेत (अ.प.दरापेक्षा ९% कमी दराने) करून घेणेस व करार करणेच्या प्रशासकीय प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३६/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०४.०९.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे विविध ठिकाणी असलेले कर्मचारी निवासस्थनामध्ये वर्ग-०३ व वर्ग-०४ हे सेवानिवृत्त, मयत झालेले कर्मचारी यांचे वारसदार वास्तव्यास असून व त्यापैकी काही सेवानिवृत्त, मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांनी निवासस्थनाचा ताबा मुदतीच्या आत सोडलेला नसल्याने त्यांना शासन निर्णय क्रमांक शानिवा-२५११/प्र.क्र.२३९/११/ २३-अ, मंत्रालय, मुंबई दि.२९.०७.२०११ अन्वये प्रती चौ.फुट रु.५०/- प्रमाणे आकारणी करण्यात आलेली आहे.

परंतु प्रकरणी मा.स्थायी समिती सभा दि.२८.०३.२०१८ रोजीच्या सभेमध्ये कै.साहेबराव लक्ष्मण पगडे, पंप ऑपरेटर, जायकवाडी विभाग व कै.तात्यासाहेब प्रकाश देशपांडे, फिल्टर ऑपरेटर, जायकवाडी विभाग, फारोळा यांच्या वारसदारांनी मा.स्थायी समितीकडे विनंती प्रस्ताव सादर केलेला होता.

त्याअनुषंगाने दि.२८.०३.२०१८ रोजीच्या झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या निवासस्थनामधील सेवापिवृत्त व मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांकडून महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे भाडे वसुल करण्यात यावे. त्यानुसार खालील नमुद तक्त्यातील ०८ कर्मचाऱ्यांकडून भाडे वसुलीच्या अनुषंगानेचा प्रस्ताव

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव व निवासस्थनाचा पत्ता | शासन निर्णयानुसार दंडनिय दर रु.५०/- प्रती चौ.फुट प्रती महा दरानुसार थकीत रक्कम | घरभाडे व अनुज्ञाप्ती शुल्का सह प्रती महा रक्कम नियमीत दराने | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.पाटील नयनसिंग, पंप ऑपरेटर (मयत) शहगंज पाण्याची टाकीजवळ | रु.१२,१८,९९९/- | रु.२,००,०८९/- | सद्यस्थितीत निवासस्थान वापर चालु आहे. |
| २. | श्री.शुक्ला जगन्नाथ बिंदुप्रसाद मजुर (सेवानिवृत्त) राहुलनगर | रु.१२,२५,५४३/- | रु.२,५१,८५६/- | निवासस्थान रिक्त केले. |
| ३. | श्री.पुरी ओमकार अमर सुरक्षा रक्षक (न्यायालयीन प्रकरण होते, सेवानिवृत्त) राहुल नगर | रु.१७,५६,५५३/- | रु.३,५६,०९८/- | निवासस्थान रिक्त केले |
| ४. | श्रीमती राणी तात्यासाहेब देशपांडे (वारसदार) श्री.तात्यासाहेब देशपांडे गाळणी परिचर (मयत) फारोळा जलशुध्दीकरण केंद्र ता.पैठण | रु.४,२१,७९८/- | रु.९२,२४३/- | पेन्शन/लेखाविभाग कडुन दंडनिय दराने शासन निर्णयानुसार रकाना क्र.०३ नुसार रक्कम कपात झालेली आहे. |
| ५. | श्री.मुरलीधर माणिकराव कुलकर्णी गाळणी परिचर (सेवानिवृत्त) फारोळा जलशुध्दीकरण केंद्र ता.पैठण | रु.४,४३,३८२/ | रु.९६,९५०/ | निवासस्थान रिक्त केले |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | श्री.पवार रमेश नामदेव, मजुर, (मयत) जुब्लीपार्क, पाण्याची टाकी, भडकलगेट | रु.९,२२,५४७/- | रु.२,३६,९००/- | निवासस्थान रिक्त केले |
| ७. | श्री.सय्यद खैसरोद्दील सय्यद नुरुद्दिन पाणी पुरवठा मजुर (मयत) भडकलगेट | रु.७,५१,०१०/- | रु.१,७४,८९६/- | निवासस्थान रिक्त केले |

सदरील प्रकरण शासननिर्णयानुसार दंडनिय दराने निवासस्थान, घरभाडे रक्कम न आकरता सिध्दशिघ्र गणकाप्रमाणे आकारणी बाबत प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक ३६/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या निवास स्थानामध्ये शासन निर्णयानुसार भाडे आकारणी न करता सिध्दशिघ्र गणकाप्रमाणे होणारे भाडे वसुल करण्यासाठीच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३७/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१८.०९.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कोरोना साथरोगाचा संसर्ग राज्यात व शहरात दिर्घ कालावधी पासुन लॉकडाऊन लागु करण्या असला तरी संसर्ग नियंत्रणात ठेवणे व नागरीकांच्या जीवीताचे रक्षण होण्याच्या दृष्टीने त्यांच्या उपस्थिती मर्यादीत करण्यात आली आहे. या कारणाने मुत्युचे प्रमाणही वाढल्याने अंत्यसंस्काराच्या संख्येत वाढ झाली आहे.

अशा गंभीर परिस्थितीत, मयत रुग्णांचा अंत्यसंस्कार सत्वर पार पाडणेसाठी नव्याने एल.पी.जी.गॅसवर चालणारी शवदाहीनी बसविण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे. या ठिकाणी पुर्वी विद्युत शवदाहीनी बसविण्यात आली होती, तथापी त्याचे नियमन करण्यात मोठा मासीक विदयुत खर्च करावा लागत होता व अल्प प्रतिसाद कारणाने याचा वापर व्यवहार्य ठरत नसल्याने, या विदयुत दाहिनीचे रुपांतर साधारणत:सन २००९ मध्ये एल. पी. जी. गॅस शवदाहीनीत करण्यात आले.

या पुर्वीची गॅस शव दाहीनी पुन्हा उपयोगात आणणे शक्य आहे किंवा कसे याचा तज्ञांच्या मदतीने आढावा घेतला असता त्यासाठी मोठा खर्च अपेक्षित असल्याचे दिसून आले शिवाय दुरूस्ती नंतर, ही शव दाहीनी संपूर्ण क्षमतेने काम करील याची शास्वती नसल्याने, आवश्यक असेल तेव्हा उपयोगात आणता येणारी नवीन एल पी जी गॅस शवदाहीनी उभारण्याचा निर्णय घेत आहोत खुल्या बाजारातुन घेतलेल्या कोटेशन नुसार या नवीन एल पी जी शवदाहीनीसाठी रु.६७७३१००/- अधिक १२% GST कराची रक्कम रु.८,१२,७७२/- याशिवाय सदरची शवदाहिनी बसविणेसाठी आवश्यक असलेले स्थापत्य विषयक काम करण्यासाठी चालु सा.बा.दरसुची नुसार अंदाजे रू ४.०० लक्ष असा एकुण रू.७८.०० लक्ष पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे.

या नविन प्रसतावीत गॅस शवदाहिनी मध्ये कंट्रोल पॅनल व सेफ्टी फ्युजची सुविधा असुन, यामध्ये सिरॅमिक वुल व इन्सुलस मुळे याच्या आतील विटाना लवकर क्षती पोहचत नाही. यातील गॅस व हवेचे प्रमाण ही योग्य राखले जात असल्याने जास्तीची उष्णता निर्माण होत नाही, तसेच या शवदाहीनीचे संचलन करणे सुलभ जाते. या आधुनिक गॅस शवदाहिनी मध्ये दोन एअस ब्लोअर व स्टॅण्ड असल्याने शवदाहिनी प्रक्रियेत शवदहना दरम्यान अडथळा येत नाही या शिवाय अंत्यसंसकाराचा कालावधी कमी

होतो. या व्यतिरिक्त यामध्ये वॉटर स्क्रबरची सुविधा असल्याने प्रत्येक शवदहना नंतर, या शवदाहिनीची स्वच्छता करणे सोपे जाते व तिचे आयुष्यमान वाढते.

तरी उक्त प्रमाणे नमुद कामाचे एकुण अंदाजपत्रक रू.७८,००,०००/- यास मंजुरी प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव मा.प्रशासक यांचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर

**ठराव क्रमांक ३७/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या कैलासनगर स्मशानभुमी मध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित एल.पी.जी गॅस वर चालणारी शवदाहिनी नव्याने उभारणे व त्यासाठी आवश्यक स्थापत्य विषयक बांधकाम करण्यात यास व १२% लागु GST करा सह एकुण अपेक्षित खर्च रू ७८,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी प्रदान करण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०१.१०.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे हर्सुल सावंगी येथील खाम तलावासाठी जाहीर निविदा मागविण्यात आली होती. त्यामध्ये तीन निविदा प्राप्त झालेल्या आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | निविदेमध्ये भाग घेतलेल्या निविदा धारकांचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| १. | राजकुमार काकासाहेब पंडुरे | रू.३,३७,५००/- |
| २. | माजेद काझी मुजीब काझी | रू.३,२३,७५०/- |
| ३. | मोहम्मदीया चिकन ॲण्ड फिश सेंटर | रू.३,३२,५००/- |

उक्त निविदामध्ये उच्च दर राजकुमार काकासाहेब पंडुरे रु. रू.३,३७,५००/- प्राप्त दराचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका कलम ७९(क) नुसार मा.स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक महोदय यांच्याकडे असल्याने मा.प्रशासक यांच्याकडे मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ३८/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हर्सुल तलावासाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या असुन प्रस्तावात नमुद राजकुमार काकासाहेब पंडुरे यांचे रु.३,३७,५००/- उच्च दराची निविदा असल्याने निविदेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०१.१०.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे हर्सुल तलावासाठी जाहिर निविदा मागविण्यात आली होती. त्यामध्ये सहा निविदा प्राप्त झालेल्या आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | निविदेमध्ये भाग घेतलेल्या निविदा धारकांचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| १. | तारा फिश | रु.१५,२५,०२५/- |
| २. | विश्वनाथ विजयसिंग परदेशी | रू.१३,५१,००८ |
| ३. | मोहम्मदीया चिकन ॲण्ड फिश सेंटर | रू.१२,५८,०७४/- |
| ४. | नंदकिशोर गोकुळ देवरे | रू.१२,०१,५००/- |
| ५. | नितिन फिश शॉप | रू.१०,५३,९०० |
| ६. | ललिता सुरेश सोनवणे | रू.७,३८,०००/- |

उक्त निविदामध्ये उच्च दर तारा फिश रु.१५,२५,०२५/- निविदेमध्ये प्राप्त उच्च दराचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ३९/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हर्सुल तलावासाठी जाहिर निविदा मागविण्यात आल्या असून प्रस्तावात नमुद तारा फिश यांचे रु.१५,२५,०२५/- उच्च दराची निविदा असल्याने निविदेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०/२०२०:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.०१.१०.२०२०)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गाळ्यांसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. उक्त निविदामध्ये उच्च दराच्या निविदेचा तपशिल खालील प्रमाणे

१. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक महानगरपालिका व्यापारी संकुलासाठी गाळा क्र. ए-६ या गाळयासाठी निविदा दर रु.१६४३/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्री.मोहम्मद जावेद खान मोहम्मद सिद्दीकी यांचे निविदा रु.१७२५/- उच्च दर आहे.
२. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक महानगरपालिका व्यापारी संकुलासाठी गाळा क्र. ए-७ या गाळयासाठी निविदा दर रु.१६४३/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये ज्युपिटर मॅनेजमेंट ॲण्ड इंजिनिअरींग सोल्युशन यांचे निविदा रू.१७२५/- उच्च दर आहे.
३. एकनाथ नगर महानगरपालिका व्यापारी संकुलासाठी गाळा क्र.०३ या गाळयासाठी निविदा दर रु. १३९५/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्री.शाम सखाराम खिल्लारे यांचे निविदा रु.१४०८/- उच्च दर आहे.
४. एकनाथ नगर महानगरपालिका व्यापारी संकुलासाठी गाळा क्र.०४ या गाळयासाठी निविदा दर रु.१३९५/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्री कम्प्युटरर्स यांचे निविदा रु.१४०८/- उच्च दर आहे.
५. एकनाथ नगर महानगरपालिका व्यापारी संकुलासाठी गाळा क्र.२० या गाळयासाठी निविदा दर रु. १३९५/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्री. काकडे संतोष मच्छिंद्र यांचे निविदा रु.१४६५/- उच्च दर आहे.
६. एकनाथ नगर महानगरपालिका व्यापारी संकुलासाठी गाळा क्र.२१ या गाळयासाठी निविदा दर रु.१३९५/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्री. काकडे संतोष मच्छिंद्र यांचे निविदा रु.१५०६/- उच्च दर आहे.
७. एकनाथ नगर महानगरपालिका व्यापारी संकुलासाठी गाळा क्र.२७ या गाळयासाठी निविदा दर रु.१३९५/-प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्री.काकडे संतोष मच्छिंद्र यांचे निविदा रु.१८१३.५०/- उच्च दर आहे.
८. पिया मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुलासाठी पहिल्या मजल्यावरील गाळा क्र.०८ या गाळयासाठी निविदा दर रु.२६३९/-प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्रीमती नम्रता विनोदकुमार जैस्वाल यांचे निविदा रु.२७९५/- उच्च दर आहे.

९. पिया मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुलासाठी पहिल्या मजल्यावरील गाळा क्र.१२ या गाळयासाठी निविदा दर रु.२६३९/-प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये राज फोटो बुक्स् क्रिएशन यांचे निविदा रु.२६६५/- उच्च दर आहे.

करिता करील प्रमाणे निविदेमध्ये प्राप्त उच्च दराचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ४०/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गाळयांसाठी निविदा मागविण्यात आल्या असून प्रसतावात नमुद असलेल्या उक्त निविदामध्ये उच्च दराच्या निविदेच्या तपशिलासह मंजुरी देण्यात येते. प्रस्ताव मंजुर वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४१/२०२०:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.०५.१०.२०२०)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.जे.एस.वाघ, विद्युत लाईनमन, विद्युत विभाग, मनपा, औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या मुलाच्या नामे संदिप जनार्धन वाघ यांच्या आजारावर उपचार करण्यासाठी एकूण र.रु.२,००,९१५/- इतका खर्च केलेला आहे. त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम वजा जाता शिल्लक र.रु.१,६४,६४७/- एवढ्या रक्कमेच्या ९०% र.रु.१,४७,१८२/- एवढी अनुज्ञेय होत असून संबंधीताने धनादेश क्र.३२३११३ दि.१०/०७/२०१७ अन्वये र.रु.१,५०,०००/- चे अग्रिम घेलेले असून सदर अग्रीमाचे समायोजन संबंधीताने सादर केले आहे. उपचारापोटी केलेला एकूण खर्च र.रु.२,००,९१५/- ची ५% र.रु.१०,०४५/- मनपा फंडात जमा करून तसेच अनुज्ञेय र.रु.१,४८,१८२/- रक्कमेतून वजा करून येणारी र.रु.१,३८,१३७/- एवढी होत असून सदर रक्कमेतून अग्रिम र.रु.१,५०,०००/- वजा जाता उर्वरीत र.रु.११,८३३/- एवढी रक्कम संबंधीतांकडून मनपा फंडात भरुन घेणे आहे. मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी परि.क्र.३८ मध्ये निर्देशीत केल्यानुसार प्रकरणात मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने व सद्यस्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सदर असलेला प्रस्ताव मा.प्रशासक यांच्या मान्येतस्तव सादर.

**ठराव क्रमांक ४१/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.जे.एस.वाघ, विद्युत लाईनमन, विद्युत विभाग, मनपा, औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या मुलाच्या नामे संदिप जनार्धन वाघ यांच्या आजारावर उपचार करण्यासाठी एकूण र.रु.२,००,९१५/- इतका खर्च केलेला आहे. त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम वजा जाता शिल्लक र.रु.१,६४,६४७/- एवढ्या रक्कमेच्या ९०% र.रु.१,४७,१८२/- एवढी अनुज्ञेय होत असून संबंधीताने धनादेश क्र.३२३११३ दि.१०/०७/२०१७ अन्वये र.रु.१,५०,०००/- चे अग्रिम घेतलेले असून सदर अग्रीमाचे समायोजन संबंधीताने सादर केलेले असून उपचारासाठी केलेला एकूण खर्च र.रु.२,००,९१५/- ची ५%र.रु.१०,०४५/- मनपा फंडात जमा करून तसेच अनुज्ञेय र.रु.१,४८,१८२/- रक्कमेतून वजा करून येणारी र.रु.१,३८,१३७/- एवढी होत असून सदर रक्कमेतून अग्रिम र.रु.१,५०,०००/- वजा जाता उर्वरीत र.रु.११,८३३/- एवढी रक्कम संबंधीतांकडून मनपा फंडात भरुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२/२०२०:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.०७.१०.२०२०)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्रा करीता क्लोरीनचा पुरवठा करणे या कामाअंतर्गत विहीत निविदा कार्यवाही करून मंगल इंडस्ट्रीज, नाशिक यांना जा.क्र./मनपा/काअ/पापु/आस्था/२०१९/२८१ दि.०७.०३.२०१९ अन्वये कार्यादेश देण्यात आले होते. सदरील कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१६,५१,०००/- इतकी होती. मंजुर

दरानुसार निविदा र.रु.२४,८६,४००/- इतकी आहे. सदरील पुरवठ्यासाठी ३ महिन्याची मुदत देण्यात आली होती.

विभागाने ३ महिन्यांकरीता आवश्यक असलेल्या ६८ टनरचा पुरवठा करण्यासाठी दि.२६.०४.२०१८ रोजी सविस्तर अंदाजपत्रक र.रु.१०,२९,१००/-सादर केले होते. सदरील अंदाजपत्रक दि.१४.०६.२०१८ रोजी तत्कालीन मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. तथापि, या निविदेचा पुरवठा प्रगतीपथावर असल्याने नव्याने निविदा कार्यवाही जा.क्र.१९९/२०१९ दि.१५.०२.२०१९ अन्वये प्रथम निविदा कार्यवाही करण्यात आली. प्रथम निविदा कार्यवाही अंती नवीन पुरवठ्यासाठी एक व्यापारी निविदा प्राप्त झाली होती. निविदेस स्पर्धात्मक प्रतिसाद न मिळाल्याने दि.२८.०२.२०१९ अन्वये फेर निविदा दुसरी वेळ, दि.०२.०४.२०१९ अन्वये फेर निविदा तीसरी वेळ, दि.१८.०४.२०१९ अन्वये फेर निविदा चौथी वेळ केली असता, एक व्यापारी निविदा प्राप्त झाली. तथापि निविदा धारकाने निविदा अटी व शर्तीची पुर्तता न केल्याने दि.१३.०५.२०१९ अन्वये फेर निविदा पाचवी वेळ केली असता, निविदेस प्रतिसाद मिळाला नाही.

पाच वेळेस निविदा कार्यवाही करूनही निविदेस प्रतिसाद मिळत नसल्याने व कार्यरत निवीदेकरीता ०५ वेळेस केलेली निविदा कार्यवाही लक्षात घेता निविदा अटी व शर्तीत अंशतः बदलास मा.आयुक्त महोदय यांनी दि.०२.०८.२०१९ रोजी मान्यता प्रदान केल्यानंतर सुधारीत प्रथम निविदा कार्यवाही दि.२९.०८.२०१९ द्वितीय दि.१३.०९.२०१९, तृतीय दि.२६.०९.२०१९, चतुर्थ दि.१४.१०.२०१९ अन्वये फेर निविदा केली असता, एक व्यापारी निविदा प्राप्त झालेली असून प्राप्त निविदा दरास दर निश्चितीकरण समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते. दि.१५.०२.२०१९ पासुन नवीन क्लोरीन पुरवठ्याकरीता एकूण ९ वेळेस निविदा कार्यवाही करण्यात आलेली आहे.

नवीन पुरवठ्याकरीता एकूण ९ वेळेस निविदा कार्यवाही करुनही प्रतिसाद न मिळाल्याने जलशुध्दीकरण प्रक्रियेत खंड पडू नये व जलगुणवत्ता राखली जावी या करीता याच निविदेतून मंजुर दरानुसार म्हणजेच रु.२४,२४०/- प्रति मे.टन या दराने दि.०८.११.२०१९ पर्यंत (नवीन निविदेचे फायनानशियल बिड उघडल्यानंतर) १४९.४० मे.टन म्हणजेच निविदेत अंतर्भुत असलेल्या ९० मे.टन वगळता ५९.४० मे.टन इतका क्लोरीनचा जास्तीचा पुरवठा घेण्यात आलेला आहे. सदरील जास्तीच्या क्लोरीन पुरवठ्याचे सुधारीत अंदाजपत्रक मंजुर निविदा दरानुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय र.रु.३९,१०,०९६/- इतकी आहे. करीता वाढीव पुरवठा व पुरवठ्याचे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.३९,१०,०९६/- चे मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक ४२/२०२०:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा येथे मंजुर निविदेतून घेतलेली जास्तीचा पुरवठा व पुरवठ्याचे सुधारीत र.रु.३९,१०,०९६/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

***<u>विषय क्रमांक 43/2020:-</u>*** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०८.१०.२०२०)**

*प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा मंजूर ठराव क्र.1064 दि.13/06/2019 नुसार शहरातील विविध रस्त्यांचे कॉंक्रीट/डांबरीकरण करणे करीता प्रकल्प तयार करणे व या आधारे शासन निधीची मागणी करणे साठी महानगरपालिकेने निविदा प्रक्रियेअंती मे.यश इन्नोव्हेटीव्ह एल.एल.पी., औरंगाबाद यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी.) म्हणून नियुक्ती केली.*

*दि.09/01/2020 रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद जिल्हायातील महत्वाच्या विविध प्रश्नांबाबत संपन्न*

आढावा बैठकीच्या अनुषंगाने मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी रक्कम रु.267 कोटी रक्कमेच्या कामांचे अंदाजपत्रके तयार करून प्रस्तावास तांत्रिक मान्यता घेऊन सादर करणे बाबत कळविले आहे.

यानुसार पी.एम.सी. यांनी सर्वेक्षण करून, सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) अंदाजपत्रके तांत्रिक मान्यतेस्तव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केली असता मुख्य अभियंता, सा.बां.मंडळ, औरंगाबाद यांनी महानगरपालिकेने सादर केलेले रक्कम रु.462.08 कोटीचे ढोबळ अंदाजपत्रक तपासणीअंती रक्कम रु.462.08 कोटी किंमतीच्या सविस्तर प्रकल्प आराखडा/अंदाजपत्रकास सर्वसाधारण तांत्रिक सहमती दिलेली आहे.

दिनांक 19.02.2020 रोजी उपरोक्त सादर केलेल्या रु.462 कोटी रक्कमेच्या प्रकल्प आराखडा संदर्भाने सहयाद्री अतिथीगृह, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीमध्ये मा.मंत्री नगरविकास, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक उपक्रम तसेच मा.मंत्री उद्योग, खनिकर्म व मराठी भाषा विभाग तथा पालकमंत्री औरंगाबाद यांनी नमूद प्रकल्पातील सादर केलेल्या यादीमधील एकूण 23 रस्ते ज्यांची अंदाजपत्रकीय रक्कम रु.152.58 कोटी आहे. त्यांची परिशिष्ठ-अ नुसार निवड करून सदर कामांपैकी एम.आय.डी.सी. यांनी 07 रस्ते, एम.एस.आर.डी.सी. यांनी 07 रस्ते आणि महानगरपालिकेने 09 रस्ते असे प्रत्येकी साधारणपणे रु.50 कोटींची कामे आपापल्या यंत्रणेकडून स्वनिधीतून करून घ्यावयाचे निर्देश दिले. तसेच औरंगाबाद महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता औरंगाबाद महानगरपालिकेला ही कामे करण्यासाठी शासन निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे ठरले व निश्चित केलेल्या कार्यान्वयीन यंत्रणेने त्यांच्या करवी करावयाच्या कामांना आपापल्या सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत तांत्रिक आणि प्रशासकीय मंजूरी देऊन निविदेची कार्यवाही तात्काळ करावी असे ठरविण्यात आले होते.

परिशिष्ट-अ

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम रु. | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | रस्त्याची लांबी (मी.) |
|---|---|---|---|---|
| | **कार्यान्वयीन यंत्रणा - एम.एस.आर.डी.सी** | | | |
| 1 | जिल्हाधिकारी कार्यालय चौक ते डॉ.सलिम अली सरोवर या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. | 89835950 | 109810831 | 1200 |
| 2 | वरद गणेश मंदिर ते लक्ष्मण चावडी मार्गे सावरकर चौक व सिल्लेखाना या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 102644576 | 125524273 | 2150 |
| 3 | जाफर गेट ते मोंढा नाका व जाफर गेट ते आठवडी बाजार या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. | 77215753 | 94340664 | 950 |
| 4 | पोलीस मेस ते कटकट गेट या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. | 63460682 | 77536988 | 900 |
| 5 | ऐतिहासिक नौबत गेट ते सिटी चौक या रस्त्याचे पुलासह कॉंक्रीट करणे. | 35917971 | 43947563 | 535 |
| 6 | मदनी चौक ते सेंट्रल नाका या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 34783733 | 42528442 | 750 |
| 7 | गोपाल टी ते उत्सव मंगल कार्यालय या रस्त्याचे कॉंक्रीट करणे व औषधी भवन समोरील पुलाचे बांधकाम करणे. | 19603532 | 23965115 | 330 |
| | एम.एस.आर.डी.सी. एकूण | 423462197 | 517653876 | 6815 |

| कार्यान्वयीन यंत्रणा - एम.आय.डी.सी. | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम रु. | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | रस्त्याची लांबी (मी.) |
| 1 | कॅनॉट प्लेस येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 32326454 | 39526799 | 1200 |
| 2 | राज हाईटस्, एमजीएम ते एन-5 पाण्याची टाकी ते बाळासाहेब ठाकरे स्मृती उद्यान या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. | 69208623 | 84607180 | 930 |
| 3 | ए.पी.आय. कार्नर, जालना रोड ते कलाग्राम, गरवारे स्टेडीयम मार्गे प्रोझोन मॉल व ए.पी.आय. कार्नर ते एन-1 पोलीस चौक मार्गे सिडको बस स्टॅण्ड या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. | 145617695 | 177888687 | 2700 |
| 4 | साई मेडीसिटी हॉस्पिटल ते सर्वे नं.153 हर्सुल या 36 मी. या रुंद रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | 41306510 | 50400627 | 900 |
| 5 | एन-3 साई ट्रान्सपोर्ट, जालना रोड ते श्री.शिवनाथ राठी यांचे घर, एन-4 सिडको मार्गे छत्रपती कॉलेज या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. | 32862743 | 40165186 | 650 |
| 6 | ग्रीव्हस कॉटन ते जयभवानी चौक ते नारेगाव मार्गे अनिल कॅमिकल या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. | 58625023 | 71547088 | 1910 |
| 7 | पिया मार्केट ते सिटी चौक मार्गे सुराणा बिल्डींग या रस्त्याचे पुलासह कॉंक्रीट करणे. | 29743724 | 36337750 | 500 |
| | एम.आय.डी.सी एकुण | 409690772 | 500473317 | 8790 |
| कार्यान्वयीन यंत्रणा - महानगरपालिका औरंगाबाद | | | | |
| 1 | वोक्खार्ड ते जयभवानी चौक, नारेगाव रस्त्याचे डांबरीकरण करणे व रेल्वे स्टेशन ते तिरुपती एन्क्लेव्ह येथील रोडचे पुर्नडांबरीकरण करणे. | 82884691 | 101244686 | 2540 |
| 2 | दिपाली हॉटेल ते जयभवानी चौक ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे व रेल्वे स्टेशन फलायओवर येथील रोडचे पुर्नडांबरीकरण करणे. | 150291828 | 183661436 | 2550 |
| 3 | पुंडलिकनगर टाकी ते एन-3, एन-4 मधील हायकोर्ट ते कामगार चौक मुख्य रस्त्यापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. | 25043125 | 30564444 | 500 |
| 4 | भवानी पेट्रोल पंप एन-2, ते सी-सेक्टर मुख्य रस्ता ठाकरेनगर एन-2, सिडको रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. | 18098667 | 22110253 | 450 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | महालक्ष्मी चौक ते लोकशाही कॉलनी रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. | 14434312 | 17634401 | 350 |
| 6 | अग्रसेन चौक ते सेंट्रल एक्साईज ऑफिस रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 27855571 | 34056190 | 600 |
| 7 | जालना रोड ते ॲपेक्स हॉस्पिटल रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. | 26730133 | 32673545 | 600 |
| 8 | जळगाव रोड ते अजंता अंबेसेडर रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 15295396 | 18700863 | 430 |
| 9 | अमरप्रीत हॉटेल (बाळासाहेब ठाकरे म्युरल चौक) ते एकता चौक रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 53246218 | 64979353 | 2000 |
| | **मनपा एकुण** | 413879941 | 505625171 | 10020 |

उक्तनुसार परिशिष्ट-अ मध्ये नमूद प्रमाणे महानगरपालिकेतर्फे करावयाच्या एकूण 09 कामांचे सविस्तर अंदाजपत्रक SSR सन 2019-2020 च्या दरसुचीनुसार पीएमसी मार्फत तयार करण्यात आलेले आहे.

करीता प्रस्ताव सादर करण्यात येतो की, उपरोक्त प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका या कार्यान्वयीन यंत्रणे मार्फत करावयाच्या एकूण 09 रस्ते कामांची एकत्रीत अंदाजपत्रकीय रक्कम रु.50,56,25,171/- यास प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव 43/2020:-**

प्रस्तावात नमूद प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेने, पी.एम.सी. मार्फत शासनास सादर केलेल्या रु.462 कोटी रक्कमेच्या प्रकल्प आराखडा संदर्भाने शासनस्तरावर नमूद प्रकल्पातील सादर केलेल्या यादीमधील एकूण 23 रस्ते ज्यांची अंदाजपत्रकीय रक्कम रु.152.58 कोटी आहे. त्यांना परिशिष्ठ-अ नुसार अंतिम करुन, सदर कामांसाठी एम.आय.डी.सी., एम.एस.आर.डी.सी. यांनी प्रत्येकी साधारणपणे रु.50 कोटींची कामे त्यांच्या यंत्रणेकडून स्वनिधीतून करुन घ्यावयाचे निर्देश दिले. तसेच औरंगाबाद महानगरपालिकेला शासन निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे ठरले व निश्चित केलेल्या कार्यान्वयीन यंत्रणेने त्यांच्या करवी करावयाच्या कामांना तांत्रिक मंजूरी देऊन निविदेची कार्यवाही तात्काळ करावी असे ठरविल्या प्रमाणे उक्तनुसार परिशिष्ट-अ मध्ये नमूद प्रमाणे महानगरपालिकेतर्फे करावयाच्या एकूण 09 कामांचे सविस्तर अंदाजपत्रक SSR सन 2019-2020 च्या दरसुचीनुसार पीएमसी मार्फत रक्कम रु.50,56,25,171/- चे तयार करण्यात आलेले आहे व यास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांनी तांत्रिक सहमती दिलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका या कार्यान्वयीन यंत्रणे मार्फत करावयाच्या एकूण 09 रस्ते कामांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

कार्यान्वयीन यंत्रणा - महानगरपालिका औरंगाबाद

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम रु. | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | रस्त्याची लांबी (मी.) |
|---|---|---|---|---|
| 1 | वोक्खार्ड ते जयभवानी चौक, नारेगाव रस्त्याचे डांबरीकरण करणे व रेल्वे स्टेशन ते तिरुपती एन्क्लेव्ह येथील रोडचे पुर्नडांबरीकरण करणे. | 82884691 | 101244686 | 2540 |
| 2 | दिपाली हॉटेल ते जयभवानी चौक ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन रस्त्याचे कॉंक्रीटींग | 150291828 | 183661436 | 2550 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | *करणे व रेल्वे स्टेशन फलायओवर येथील रोडचे पुर्नडांबरीकरण करणे.* | | | |
| *3* | *पुंडलिकनगर टाकी ते एन-3, एन-4 मधील हायकोर्ट ते कामगार चौक मुख्य रस्त्यापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे.* | *25043125* | *30564444* | *500* |
| *4* | *भवानी पेट्रोल पंप एन-2, ते सी-सेक्टर मुख्य रस्ता ठाकरेनगर एन-2, सिडको रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे.* | *18098667* | *22110253* | *450* |
| *5* | *महालक्ष्मी चौक ते लोकशाही कॉलनी रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे.* | *14434312* | *17634401* | *350* |
| *6* | *अग्रसेन चौक ते सेंट्रल एक्साईज ऑफिस रस्त्याचे डांबरीकरण करणे.* | *27855571* | *34056190* | *600* |
| *7* | *जालना रोड ते ॲपेक्स हॉस्पिटल रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे.* | *26730133* | *32673545* | *600* |
| *8* | *जळगाव रोड ते अजंता अंबेसेडर रस्त्याचे डांबरीकरण करणे.* | *15295396* | *18700863* | *430* |
| *9* | *अमरप्रीत हॉटेल (बाळासाहेब ठाकरे म्युरल चौक) ते एकता चौक रस्त्याचे डांबरीकरण करणे.* | *53246218* | *64979353* | *2000* |
| | ***मनपा एकुण*** | *413879941* | *505625171* | *10020* |

*वरील प्रमाणे रस्त्यांच्या अंदाजपत्रकांचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. औरंगाबाद महानगरपालिका या कार्यान्वयीन यंत्रणे मार्फत करावयाच्या एकूण 09 रस्त्यांच्या कामांची एकत्रीत अंदाजपत्रकीय रक्कम रु.50,56,25,171/- यास प्रशासकीय मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.*

**<u>विषय क्रमांक ४४/२०२०:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०८.१०.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.११/०९/२०२० रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीच्या बैठकीमध्ये श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना उप आयुक्त या पदावर पदोन्नती देणेबाबत सर्वानुमते शिफारस करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार सदर पदाची नियुक्ती प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे.

निवड समितीच्या अहवालानुसार, श्रीमती अपर्णा थेटे यांची गोपनीय अहवालाची प्रतवारी उत्कृष्ठ असून त्यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित नाही. त्यांची विधी सल्लागार या पदावर दि.२/१/२००७ रोजी झालेली असून त्या सन १९९४ च्या मंजूर सेवाभरती नियमामधील उपआयुक्त पदासाठी असणारी अर्हता धारणा करीत आहेत.

तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.एएमसी-१६९३/१२१९/प्र.क्र.९७/नवि-२४.दि.८/१/२००२ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवाभरती नियमांमध्ये परिशिष्ट "अ" मधील अनुक्रमांक १३ (अ) रकाना (४) नियुक्तीची पध्दती यामधील अनुक्रमांक (३) येथील 'पदोन्नती गुणवत्तेनुसार' या ऐवजी 'पदोन्नती ज्येष्ठता व गुणवत्तेनुसार' अशी दुरूस्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील महानगरपालिका अधिकारी-कर्तव्य व अधिकार यातील प्रकरण ३ मधील नेमणूकीची पध्दतीमध्ये नियम ३ अन्वये विहित केलेली अर्हता धारण करणारा नगरपालिकेच्या सेवेतील कोणताही अधिकारी हा उक्त पदावर नेमणूक केली जाण्यास योग्य अशी व्यक्ती आहे असे महानगरपालिकेचे मत असेल तर महानगरपालिकेस या नियमात विहित केलेली पध्दती न अनुसरता अशा अधिकाऱ्याची उक्त पदावर नेमणूक करता येईल, अशी तरतूद आहे.

करीता, निवड समितीने शिफारस केल्यानुसार, श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना खुल्या प्रवर्गातून 'उपआयुक्त' या पदावर वेतनश्रेणी (एस-२०) ५६१००-१७७५०० (७व्या वेतन आयोगानुसार) मध्ये पदोन्नती देणेबाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५(४) अन्वये मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समितीने सर्वानुमते शिफारस केल्यानुसार, मा.प्रशासक यांची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ४४/२०२०:-**

आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने शिफारस केल्यानुसार, श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना खुल्या प्रवर्गातून 'उपआयुक्त' या पदावर वेतनश्रेणी (एस-२०) ५६१००-१७७५०० (७व्या वेतन आयोगानुसार) मध्ये पदोन्नती देणेबाबत मान्यता देण्यात येते. संबंधिताच्या नियुक्तीस शासन मान्यता मिळणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५(४) अन्वये मा.राज्य शासनाकडे पाठविण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०८.१०.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.०४/०९/२०२० रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीच्या बैठकीमध्ये रिक्त असलेल्या कार्यकारी अभियंता या पदावर श्री.एस.डी.काकडे, उप अभियंता यांना पदोन्नती देणेबाबत सर्वानुमते शिफारस करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार सदर पदाची नियुक्ती प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे.

निवड समितीच्या अहवालानुसार, औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवर कार्यकारी अभियंता संवर्गाची ०३ पदे मंजूर असून त्यापैकी ०१ पद भरण्यांत आले असून ०२ पदे रिक्त आहेत त्यापैकी खुला प्रवर्गातील ०१ पद रिक्त आहे.

उप अभियंता संवर्गातील कार्यरत अधिकाऱ्यांची सेवाज्येष्ठतेनुसार शैक्षणिक अर्हता, विभागीय चौकशी इ. बाबी विचारात घेता, श्री.एस.डी.काकडे यांना खुल्या प्रवर्गातून 'कार्यकारी अभियंता' या पदावर वेतनश्रेणी (एस-२३) ६७७००-२०८७०० (७ व्या वेतन आयोगानुसार) मध्ये शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A/१६-ब, दि.२९/१२/२०१७ रोजीचे पत्राच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यासाठी समितीने सर्वानुमते शिफारस केल्यानुसार, मा.प्रशासक यांची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ४५/२०२०:-**

आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने शिफारस केल्यानुसार, श्री.एस.डी. काकडे यांना खुल्या प्रवर्गातून 'कार्यकारी अभियंता' या पदावर वेतनश्रेणी (एस-२३) ६७७००-२०८७०० (७ व्या वेतन आयोगानुसार) मध्ये शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A/१६-ब,

दि.२९/१२/२०१७ रोजीचे पत्राच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६/२०२०:-** (प्रशासकीय प्रस्ताव दि.०८.१०.२०२०)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.०४/०९/२०२० रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीच्या बैठकीमध्ये रिक्त असलेल्या पदांवर खालील नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांना उप अभियंता या पदावर पदोन्नती देणेबाबत सर्वानुमते शिफारस करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार सदर पदाची नियुक्ती प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे.

निवड समितीच्या अहवालानुसार, औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवर उपअभियंता संवर्गाची २० पदे मंजूर असून त्यापैकी ०४ पदे भरण्यांत आली असून १६ पदे रिक्त आहेत त्यापैकी खुला प्रवर्गातील १० पदे रिक्त आहेत. त्यामध्ये यांत्रिकी-०२ पदे, विद्युत-०१ पद व स्थापत्य-०७ पदे असे एकूण १० पदे भरावी लागतील. तथापि, विद्युत विभागासाठी उपअभियंता पदावर पदोन्नती देण्यासाठी अर्हताधारक कर्मचारी सध्या उपलब्ध नाहीत महानगरपालिकेच्या सेवाभरती नियमानुसार अभियांत्रिकी शाखेची पदती-०४, पदविधारक-०४ व आयटीआयधारक-०२ पदांवर पदोन्नती देता येईल.

उपरोक्त प्रमाणे कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठतेनुसार शैक्षणिक अर्हता, विभागीय चौकशी इ.बाबी विचारात घेता, स्थापत्य (०७) व यांत्रिकी (०२) पदे भरण्यासाठी खालील कर्मचाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'उपअभियंता' या पदावर वेतनरेणी (एस-२०) ५६१००-१७७५०० (७व्या वेतन आयोगानुसार) मध्ये शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A/१६-ब दि.२९/१२/२०१७ रोजीचे पत्राच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यासाठी समितीने सर्वानुमते शिफारस केल्यानुसार, मा.प्रशासक यांची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**उपअभियंता (स्थापत्य)**

| अ क्र | सेवा ज्येष्ठता क्रमांक | पदवी/ पदविका/ आयटीआय | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | १ | पदवी | अब्दुल फारुख खान | खुला | खुला |
| २. | २ | पदवी | काशीनाथ मुरलधीर फालक | खुला | खुला |
| ३. | ४ | पदवी | सुमंत श्रीरामबुवा रामदासी | खुला | खुला |
| ४. | १ | पदविका | राजेंद्र प्रल्हादराव वाघमारे | खुला | खुला |
| ५. | २ | पदविका | सुनिल मुरलीधर जाधव | अजा | खुला |
| ६. | १ | आयटीआय | काशिनाथ एन. काटकर | अजा | खुला |
| ७. | ३ | आयटीआय | जगन्नाथ भाऊराव गाडेकर | खुला | खुला |

**उप अभियंता (यांत्रिकी)**

| अ क्र | सेवा ज्येष्ठता क्रमांक | पदवी/ पदविका/ आयटीआय | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | १ | पदवी | बाबुराव ज्ञानोबा घुले | भजड | खुला |
| २. | १ | पदविका | देविदास कडुबा पंडीत | खुला | खुला |

**ठराव क्र.४६/२०२०:-**

आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने शिफारस केल्यानुसार, खालील कर्मचाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'उपअभियंता' या पदावर वेतनश्रेणी (एस-२०) ५६१००-१७७५०० (७ व्या वेतन आयोगानुसार) मध्ये शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A/१६-ब, दि.२९/१२/२०१७ रोजीचे पत्राच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**उपअभियंता (स्थापत्य)**

| अ क्र | सेवा ज्येष्ठता क्रमांक | पदवी/ पदविका/ आयटीआय | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | पदवी | अब्दुल फारुख खान | खुला | खुला |
| २ | २ | पदवी | काशीनाथ मुरलधीर फालक | खुला | खुला |
| ३ | ४ | पदवी | सुमंत श्रीरामबुवा रामदासी | खुला | खुला |
| ४ | १ | पदविका | राजेंद्र प्रल्हादराव वाघमारे | खुला | खुला |
| ५ | २ | पदविका | सुनिल मुरलीधर जाधव | अजा | खुला |
| ६ | १ | आयटीआय | काशिनाथ एन. काटकर | अजा | खुला |
| ७ | ३ | आयटीआय | जगन्नाथ भाऊराव गाडेकर | खुला | खुला |

**उप अभियंता (यांत्रिकी)**

| अ क्र | सेवा ज्येष्ठता क्रमांक | पदवी/ पदविका/ आयटीआय | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | १ | पदवी | बाबुराव ज्ञानोबा घुले | भजड | खुला |
| २. | १ | पदविका | देविदास कडुबा पंडीत | खुला | खुला |

**विषय क्रमांक ४७/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०८.१०.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कोरोना विषाणुंच्या प्रसारामुळे (Covid-19) आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्याने आरोग्य विषयक गंभीर समस्या निर्माण झाली होती. या आपत्कालीन परिस्थितीत या विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याने कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०२०/४२५ दि.०४/०५/२०२० अन्वये श्री.एम.एम.पाटणी यांची सेवा करार पध्दतीने ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.४०,०००/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील, या अटीवर नियुक्ती देण्यात आलेली आहे.

तथापि, सदर मुदत ही दि.०३/११/२०२० रोजी संपली असून त्यांचे सेवेची आवश्यकता असल्याने तसेच सद्यस्थितीत ते कोरोना विषाणु (Covid-19) विशेष पथकात देखिल काम करत असल्याने त्यांचे सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे.

करिता श्री.एम.एम.पाटणी यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.०६/११/२०२० पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.०४/०५/२०२० च्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मा.प्रशासक यांचे मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ४७/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोरोना विषाणुंच्या प्रसारामुळे (Covid 19) आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्याने आरोग्य विषयक गंभीर समस्या निर्माण झाली होती. या आपत्कालीन परिस्थितीत या विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याने कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०२०/४२५ दि.०४/०५/२०२० अन्वये श्री.एम.एम.पाटणी यांची सेवा करार पध्दतीने ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा रु.४०,०००/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील,या अटीवर नियुक्ती देण्यात आलेली आहे. तथापि, सदर मुदत ही दि.०३/११/२०२० रोजी संपली असून त्यांचे सेवेची आवश्यकता असल्याने तसेच सद्यस्थितीत ते कोरोना विषाणु (Covid-19) विशेष पथकात देखिल काम करत असल्याने त्यांचे सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे.

करिता श्री.एम.एम.पाटणी यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.०६/११/२०२० पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.०४/०५/२०२० च्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४८/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१९.१०.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे औरंगपुरा येथील पिया मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील गाळा क्र.११ हा राष्ट्रीय दृष्टीहीन संघ, महाराष्ट्र यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.४९, दि.२१.१०.२००३ अन्वये प्रती माह भाडे रु.५५०/- प्रमाणे भाडेतत्वावर देण्यात आलेला होता. परंतु सदर गाळ्याचे क्षेत्र हे कमी असल्याने त्यांना त्याठिकाणी उपयोगात आणता आले नाही. त्यामुळे त्यांनी त्यासाठीचे भाडे माफ करुन पर्यायी जागा म्हणुन महानगरपालिकेचे गारखेडा परिसरातील नुपूर अपार्टमेंट लगत असलेले व्यापारी संकुलातील हॉल ज्यांचे क्षेत्रफळ १०५.११ चौ.मी. एवढा हॉलची मागणी केलेली आहे.

त्यानुसार संबंधीत संस्थेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ (ग) (४) (५) नुसार नाममात्र भाडे रु.१०००/- प्रमाणे व मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७७४, दि.१०.१२.२०१८ नुसार या जागेच्या बदल्यात हॉल देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा योग्य त्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ४८/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या औरंगपुरा येथील प्रिया मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील गाळा क्र.११ हा राष्ट्रीय दृष्टीहीन संघ, महाराष्ट्र यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.४९, दि.२१.१०.२००३ अन्वये प्रती माह भाडे रु.५५०/- प्रमाणे भाडेतत्वावर देण्यात आलेला होता. परंतु सदर गाळयाचे क्षेत्र हे कमी असल्याने त्यांना त्याठिकाणी उपयोगात आणता आले नाही. त्यामुळे

त्यांनी त्यासाठीचे भाडे माफ करुन पर्यायी जागा म्हणुन महानगरपालिकेचे गारखेडा परिसरातील नुपूर अपार्टमेंट लगत असलेले व्यापारी संकुलातील हॉल ज्यांचे क्षेत्रफळ १०५.११ चौ.मी. एवढा हॉलची मागणी केलेली आहे.

त्यानुसार संबंधीत संस्थेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ (ग) (४) (५) नुसार नाममात्र भाडे रु.१०००/- प्रमाणे व मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७७४, दि.१०.१२.२०१८ नुसार या जागेच्या बदल्यात हॉल देणे बाबत मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४९/२०२०:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१९.१०.२०२०)**

| ८ | मा.वि.नारेगाव मराठी | श्री.श्रीकांत किसनराव शिंदे | एम.एस्सी.बी.एड. | विज्ञान | ७२ तास |
| ९ | मा.वि.नारेगाव मराठी | श्री.मिर्झा अजमल बेग | एम.ए.बी.एड. | इंग्रजी | ७२ तास |
| १० | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती सुरेखा द. आक्षे | बी.एस्सी.बी.एड. | विज्ञान | ७२ तास |
| ११ | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती पट्टेबहादुर अर्चना नामदेव | बी.ए.बी.एड. | मराठी | ७२ तास |
| १२ | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्री. इंगळे प्रकाश विष्णु | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | ७२ तास |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती जाधव सुर्यमाला महादेव | बी.ए.बी.एड. | हिंदी | ७२ तास |
| १४ | मा.वि.बन्सीलाल नगर | श्रीमती काळे मनिषा रंगनाथ | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | ७२ तास |
| १५ | मा.वि.बन्सीलाल नगर | श्रीमती भडके ताई नारायण | बी.ए.बी.एड. | मराठी | ७२ तास |
| १६ | मा.वि.नारेगाव मराठी | श्रीमती फुलंब्रीकर अरुणा प्रभाकर | बी.एस्सी.बी.एड. | गणित | ७२ तास |
| १७ | मा.वि.बनेवाडी | श्री. सोनवणे राजेंद्र कडुबा | बी.एस्सी.बी.एड. | गणित | ७२ तास |
| १८ | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती चव्हाण शुभांगी बलभिमराव | एम.ए.बी.एड. | मराठी | ७२ तास |
| १९ | मा.वि.हर्सुल | श्री. संजय शंकर मोकळे | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | ७२ तास |
| २० | मा.वि.हर्सुल | श्रीमती भिलेगावकर प्रेरणा | बी.ए.बी.एड. | मराठी | ७२ तास |
| २१ | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती कुलकर्णी स्वाती प्रल्हादराव | बी.ए.बी.एड. | मराठी | ७२ तास |

वरीलप्रमाणे कमाल तासांची मर्यादा ठरवुन दिलेली आहे. त्यापेक्षा कोणत्याही घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही, याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक यांची राहील. याशिवाय शिक्षकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व तशी शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यात येईल.

वरील कर्मचाऱ्यांना सन २०२०-२१ च्या शैक्षणिक वर्षातील दिनांक ०१/०७/२०२० ते दिनांक ३०/०४/२०२१ (दिवाळीच्या सुट्टया वगळून) पर्यंतची मुदतवाढ देण्याबाबतचा तसेच उपरोक्त मुदतवाढीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक ६८/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या काळानुरुप भरती केलेल्या प्रस्तावित प्रस्तावातील अ.क्र.०१ ते २१ घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना कमाल तासांची ठरवून दिलेल्या मर्यादेप्रमाणे तसेच त्यापेक्षा कोणत्याही घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही, याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक यांची राहील, याशिवाय शिक्षकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व तशी शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यासह वरील एकूण २१ कर्मचाऱ्यांना सन २०२०-२१ च्या शैक्षणिक वर्षातील दिनांक ०१/०७/२०२० ते दिनांक ३०/०४/२०२१ (दिवाळीच्या सुट्टया वगळून) पर्यंतची मुदतवाढ देण्यास तसेच उपरोक्त मुदतवाढीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२१.१२.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३१३,३७६,३७७, ३७८, आणि ३८६ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील उद्योग धंद्याच्या आस्थापनांसाठी परवाना शुल्क आकारणी करण्याचा व वसुली करण्याचा प्रस्ताव दि.०६.१२.२०१८ रोजी मा.सर्वसाधारण

सभेमध्ये ठेवण्यात आला होता. उक्त ठरावास नगर विकास विभागाकडून दि.२६.११.२०२० अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सदरील ठरावानुसार विविध आस्थापनांकरीता परवाना शुल्क निश्चित करण्यात आलेले आहेत. या आस्थापनांची नोंदणी करून मंजुर दरानुसार शुल्क वसुल करून परवाना देणे आवश्यक आहे. महानगरपालिकेकडे उपलब्ध यंत्रणा व मनुष्यबळ नसल्यामुळे सदरील शुल्काची वसुली करण्याकरीता अभिकर्त्याची नेमणुक करण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक ६९/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध आस्थापनांकरीता परवाना शुल्क निश्चित करण्यात आलेले आहेत. या आस्थापनांची नोंदणी करून मंजुर दरानुसार शुल्क वसुल करून परवाना देणे आवश्यक आहे. महानगरपालिकेकडे उपलब्ध यंत्रणा व मनुष्यबळ नसल्यामुळे सदरील शुल्काची वसुली करण्या करीता अभिकर्त्यांची नेमणुक करण्यासाठी प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७०/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२१.१२.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे व सिडको कार्यालयाकडून हस्तांतरीत झालेले विविध ठिकाणी खेळांची मैदाने आहेत. सदरील खेळांच्या मैदानांमध्ये खेळाच्या अत्याधुनिक सोयी-सुविधा नाहीत. ज्यामुळे मनपा हद्दीतील खेळांडूंना विविध स्पर्धाची तयारी करण्यासाठी सरावासाठी निर्धारित केलेल्या निकषांपमाणे सुविधा उपलब्ध होत नाहीत. तसेच बऱ्याच ठिकाणी मैदानांची दुरावस्था झाल्यामुळे शहरातील मुलांसाठी ही मैदाने वापरण्या योग्य राहीली नाहीत. याकरीता महानगरपालिका हद्दीतील खेळांचे मैदानांवर अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्यास नागरीकांचे, खेळाडुंची सोय होऊन त्यातून उत्कृष्ठ खेळाडू निर्माण होतील. तसेच महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.

या करीता औरंगाबाद महानगरपालिकेचे व सिडको कार्यालयाकडून हस्तांतरीत झालेले विविध ठिकाणी सध्याच्या दैनंदिन वापरात बाधा न येऊ देता काही भागात खेळांचे मैदानांवर खेळाडूंच्या सरावासाठी अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता धोरण निश्चित करण्यात येईल. या करीता ईओआय (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) मागवून निविदा प्रक्रिया राबविणे इत्यादीसाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ७०/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचे व सिडको कार्यालयाकडून हस्तांतरीत झालेले विविध ठिकाणी सध्याच्या दैनंदिन वापरात बाधा न येऊ देता काही भागात खेळांचे मैदानांवर खेळाडुंच्या सरावासाठी अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता धोरण निश्चित करण्यात येईल. या करीता ईओआय (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) मागवून निविदा प्रक्रिया राबविणे इत्यादीसाठीचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२१.१२.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रिलायन्स मॉल लगत असलेले महानगरपालिकेस ७५/२५ टक्के विकास योजना आरक्षणातून मिळालेल्या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील चार हॉल प्रत्येकी हॉलचे क्षेत्रफळ १५३.०० चौ.मी.एवढे असून असे एकत्रित ६१२.०० चौ.मी. पार्किंगच्या व्यवस्थेसह मिळणेसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यालयासाठी भाडेतत्वावर मागितले असल्याने त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार भाडे आकारणी करून भाडेतत्वावर देणेसाठी संमती दर्शविलेली असल्याने उक्त

इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील चार हॉल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रा नुसार भाडेतत्वावर देणेसाठी प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक ७१/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रिलायन्स मॉल लगत असलेले महानगरपालिकेस ७५/२५ टक्के विकास योजना आरक्षणातून मिळालेल्या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील चार हॉल प्रत्येकी हॉलचे क्षेत्रफळ १५३.०० चौ.मी.एवढे असून असे एकत्रित ६१२.०० चौ.मी. पार्किंगच्या व्यवस्थेसह मिळणेसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यालयासाठी भाडेतत्वावर मागितलेली असल्याने त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार भाडे आकारणी करून भाडेतत्वावर देणेसाठी संमती दर्शविलेली असल्याने उक्त इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील चार हॉल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार भाडेतत्वावर देणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२१.१२.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.७७४ दि.११.१२.२०१८ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचा एन-४ सिडको येथील एम.आय.टी. शाळेच्या पाठीमागील बाजूस असलेल्या सिडकोच्या रेखांकनातील खुल्या जागेमधील हॉल भाडेतत्वावर मिळणेसाठी कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय या संस्थेस प्रतीमाह रु.१०००/- प्रमाणे वार्षिक भाडे रु.१२,०००/- त्यावर १८ टक्के जी.एस.टी.रु.२,१६०/- असे एकत्रित र.रु.१४,१६०/- तसेच एक वर्षाची अनामत रक्कम (मासिक भाडेच्या १२ पट) इत्यादीचा भरणा करण्याच्या अटीस अधीन राहून ठेवावयाचा प्रस्ताव विचारार्थ तथा योग्य त्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ७२/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडकोच्या रेखांकनातील खुल्या जागेमधील हॉल भाडेतत्वावर मिळणेसाठी कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय या संस्थेस प्रतीमाह रु.१०००/- प्रमाणे वार्षिक भाडे रु.१२,०००/- त्यावर १८ टक्के जी.एस.टी.रु.२,१६०/- असे एकत्रित र.रु.१४,१६०/- तसेच एक वर्षाची अनामत रक्कम (मासिक भाडेच्या १२ पट) इत्यादीचा भरणा करण्याच्या अटीस अधीन राहून प्रस्ताव मंजुर करण्यात येतो, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२१.१२.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या ज्या विविध ठिकाणी शालेय इमारती आहेत. त्यापैकी काही इमारतींची दुरावस्था झाली आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे या इमारतींची दुरुस्ती वेळेत करण्यात आली नाही. सदरील इमारती बंद अवस्थेत आहेत अथवा सदरील जागेवरील इमारती नामशेष झालेल्या आहेत. तसेच महानगरपालिकेच्या विकास आराखड्याप्रमाणे शालेय इमारतींसाठी मंजुर आरक्षणानुसार टीडीआर स्वरुपात अथवा आर्थिक मोबदला देऊन मंजुर रेखांकनातील शालेय आरक्षणाची जागा संपादित करण्यात आली आहे. या सर्व जागा शालेय उपक्रमांसाठीच निर्धारित केलेल्या असल्यामुळे या जागांवर/मिळकतींवर नव्याने शाळा विकसीत करणे अनिवार्य आहे. तथापि, मनपाची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे या जागांवर/मिळकतींवर नव्याने शाळा बांधणे, चालवणे दुरुस्ती करण्यास जास्तीचा कालावधी लागू शकतो. तसेच शहरातील विद्यार्थ्यांसाठी सुनियोजीत इमारतीत उच्च प्रतीचे आणि दर्जेदार शिक्षण अल्प दरात मिळावे हा उद्देश ठेऊन प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) तत्वावर खालील नमुद

जागा शालेय उद्देशासाठी शैक्षणिक संस्थांना इमारत बांधणे आणि चालविणे या करीता देण्याचे धोरण अंतीम करण्यतात येत आहे.

महानगरपालिकेच्या बंद पडलेल्या शालेय इमारती (शिक्षण विभागाच्या यादीनुसार)

१. गीतानगर मनपा शाळा,
२. एन-९ सिडको मनपा शाळा,
३. एन-११ हडको मनपा शाळा,
४. हर्षनगर मनपा शाळा,
५. मोतीकारंजा मनपा शाळा,
६. मॉडेल मिडल स्कुल गांधीनगर मनपा शाळा,
७. रेल्वेस्टेशन चेलीपुरा मनपा शाळा

महानगरपालिकेने विविध ठिकाणी संपादित केलेल्या शालेय आरक्षणातील मिळकतींचा तपशील खालील प्रमाणे

१. गारखेडा न.भु.क्र.७३५/१/पैकी क्षेत्रफळ ३६०० चौ.मी. (आरक्षण क्र.२७३)
२. हर्सुल न.भु.क्र.१७२/११ क्षेत्रफळ १८२ चौ.मी. (पी.एस.३)
३. कांचनवाडी गट क्र.४७/३, क्षेत्रफळ ४४५० चौ.मी. (पी.एस.४)
४. नक्षत्रवाडी गट क्र.१०२/पैकी क्षेत्रफळ ८८०४.४० चौ.मी. (आरक्षण क्र.१)
५. गारखेडा सर्व्हे नं.५१/१ (शालेय आरक्षण)

उपरोक्त नमुद मनपाच्या जागेवरील बंद पडलेल्या शालेय इमारती आणि शालेय उद्देशांकरीता संपादीत केलेल्या मिळकती करीता पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) तत्वावर शालेय उद्देश सफर करण्याकरीता धोरणात्मक निर्णयास्तव तसेच पीएमसी नियुक्त करून निविदा कार्यवाही करण्यासाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक ७३/२०२०:-**

प्रस्तावा दर्शविल्याप्रमाणे तसेच उपरोक्त नमुद मनपाच्या जागेवरील बंद पडलेल्या शालेय इमारती आणि शालेय उद्देशाकरीता संपादित केलेल्या मिळकती करीता पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) तत्वावर शालेय उद्देश सफल करण्याकरीता धोरणात्मक निर्णयास्तव तसेच पीएमसी नियुक्त करून निविदा करणेसाठी प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२२.१२.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन अनुदान र.रु.१०० कोटी मधून एकुण ३० रस्त्याचे व्हाईट टॉपींग करण्याच्या कामास मंजुरी मिळालेली आहे. यानुसार पॅकेजनिहाय खालील प्रमाणे बी-२ स्वरुपात निविदा प्रसिध्द करून निविदा मंजुरीअंती कामे अंतिम टप्प्यात असून रोड फर्निचरची उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

| अ.क्र. | पॅकेज | अंदाजपत्रकीय रक्कम | मंजुर निविदा रक्कम | कंत्राटदाराचे नाव | एकूण रस्ते |
|---|---|---|---|---|---|
| १. | १ | २३,४१,५१,६३९ | १९,५७,७८,९६२ | मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | ०७ |
| २. | २ | २४,५२,७१,८२४ | २०,५३,१४,६७९ | मे.जे.पी.इन्टरप्राईजेस | ०६ |
| ३. | ३ | २४,२९,५०,८२६ | २०,३२,०२,२८९ | मे.मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी | ०५ |
| ४. | ४ | २२,५८,०९,९८८ | १८,८८,०४,३३८ | मे.राजेश कन्स्ट्रक्शन कंपनी | १२ |
| **एकुण** | | **९४,८१,८४,२७७** | **७९,३१,००,२६८** | | **३०** |

महानगरपालिकेतर्फे सदर प्रकल्पावर नियुक्त पीएमसी मे.श्रीखंडे कन्स्ल्टंट प्रा.लि.मुंबई यांनी पॅकेज ०१ ते ०४ या चारही पॅकेजच्या कामांचे Less & Excess Statement सादर केले असून यामध्ये पॅकेजनिहाय झालेला खर्च काम झाले परंतु देयक देणे बाकी, अंतिम टप्प्यास असलेल्या कामांचा खर्च, अतिरीक्त बाबींच खर्च याचा संभाव्य तपशिल दिला आहे.

वॉर्ड क्र.६५ अंतर्गत जालना रोड वरील राजदिप कॉम्प्लेक्स पासून शितल फर्निशिंग समोरुन एम.जी.एम. हॉस्पिटलच्या दक्षिण गेट पर्यंतचा डांबरी रस्ता व एम.जी.एम कॅम्पस मधील सिडको कडून महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेले अंतर्गत रस्ते हे अनेक वर्षापुर्वी पुर्नःडांबरीकरण झालेले असून सद्यस्थित वाहतुकीच्या दृष्टिने पुर्णपणे नादुरुस्त झालेले आहे. तसेच पावसाळ्यात शहरात सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे बऱ्याच ठिकाणी रस्त्यावर खड्डे निर्माण झालेले आहे. सदर भागात मुख्य बाजारपेठ, दवाखाने, सिनेमागृह व रहिवासी क्षेत्र असलेला असून या भागातील हे मुख्य रस्ते दुरुस्ती होणे आवश्यक आहे. सदर रस्त्यांची कामे मंजुर शासन अनुदान र.रु.१०० कोटी (पॅकेज १,२,३,४) मधील होणाऱ्या संभाव्य बचतीमधून प्रस्तावित करण्यात आले आहेत.

मा.प्रशासक महोदय, यांनी या रस्त्यांची पाहणी केली असून पाहणी दरम्यान सदर कामे र.रु.१०० कोटीच्या रस्त्यांच्या कामाच्या बचतीमधून प्रस्तावित करणे बाबत आदेशित केले आहे. त्यानुसार वॉर्ड क्र.६५ अंतर्गत जालना रोड वरील राजदिप कॉम्प्लेक्स पासून शितल फर्निशिंग समोरुन एम.जी.एम.हॉस्पिटलच्या दक्षिण गेट पर्यंत व्हाईट टॉपिंग कॉंक्रीटींग करण्याचे काम हे शासन अनुदान अंतर्गत पॅकेज-०१ (कंत्राटदार मे.जीएनआय इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.) मध्ये र.रु.१.३४ कोटी बचतीच्या रक्कमेतून प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच एम.जी.एम.कॅम्पस मधील सिडको कडून महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेले अंतर्गत रस्ते व्हाईट टॉपींग कॉंक्रीटींग करण्याचे काम हे शासन अनुदान अंतर्गत पॅकेज-०२ (कंत्राटदार मे.जे.पी.इन्टरप्राईजेस) मधील र.रु.१.७९ कोटी संभाव्य बचतीच्या रक्कमेतून प्रस्तावित करण्यात येत आहे.

पॅकेज-०१ व पॅकेज-०२ मधून होणाऱ्या बचतीच्या रक्कमेतून प्रस्तावित दोन रस्त्यांची मंजुरी व्यतिरीक्त कामे करण्याचे नियोजन आहे. सदरील रस्त्याचे काम करीत असतांना मंजुर निविदा रक्कमेच्या आत काम करण्यात येणार असून यासाठी अतिरीक्त खर्च लागणार नाही. यामुळे दि.१९.०८.२०१७ च्या शासन निर्णयातील अट क्र.७ (ड) मध्ये सदर प्रकल्पाकरीता उपलब्ध करून देण्यात आलेला निधी त्याच उद्दीष्टासाठी खर्च करण्यात येत आहे.

पॅकेज-०१ (यापुर्वी मंजुर एकूण ०७ रस्ते) च्या बचतीमधून करावयाच्या अतिरीक्त रस्त्याचे काम वॉर्ड क्र.-६५ अंतर्गत जालना रोड वरील राजदिप कॉम्प्लेक्स पासून शितल फर्निशिंग समोरुन एम.जी.एम. हॉस्पिटलच्या दक्षिण गेट पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीटींग करण्याचे कामाचे अंदाजपत्रक र.रु.६५,७५,६३९/- चे पॅकेज-०१ कंत्राटदाराच्या बी-२ स्वरुपातील बाब निहाय मंजुर दरानुसार तयार करण्यात आले आहे. व पॅकेज-०२ (यापुर्वी मंजुर एकूण ०६ रस्ते) च्या संभाव्य बचतीमधून एम.जी.एम कॅम्पस मधील सिडको कडून महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेले अंतर्गत रस्त्याचे व्हाईट टॉपींग करण्याच्या अतिरीक्त रस्त्याचे कामाचे अंदाजपत्रक र.रु.१,५६,८६,९००/- चे पॅकेज-०२ चे कंत्राटदाराच्या बी-२ स्वरुपातील बाबनिहाय मंजुर दरानुसार तयार करण्यात आले आहे. यास मान्यता झाल्यास प्रत्यक्ष रस्त्याचे काम सुरु करून अंतिम करण्याचा कालावधी लक्षात घेता संबंधीत पॅकेज-०१ पॅकेज-०२ यांचे प्रकल्पांना मुदतवाढ देणे आवश्यक राहील. तरी मा.प्रशासक महानगरपालिका औरंगाबाद यांचे समोर उक्तनुसार पॅकेज-०१ व पॅकेज-०२ यांचे संभाव्य बचतीमधून

करावयाच्या अतिरीक्त रस्ते कामांच्या अंदाजपत्रकांना मुदतवाढीसह प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक ७४/२०२०:-**

प्रस्तावात सादर केल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६५ अंतर्गत जालना रोड वरील राजदिप कॉम्प्लेक्स पासून शितल फर्निशिंग समोरुन एम.जी.एम.हॉस्पीटलच्या दक्षिण गेट पर्यंतचा डांबरी रस्ता एम.जी.एम.कॅम्पस मधील सिडको कडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेले अंतर्गत रस्ते हे मुख्य रस्ते असून पावसाळ्यात शहरात सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे बऱ्याच ठिकाणी रस्त्यावर खड्डे निर्माण झालेले आहे. सदर भागात मुख्य बाजारपेठ, दवाखाने, सिनेमागृह व रहिवासी क्षेत्र असलेला असून या भागातील हे मुख्य रस्ते दुरुस्ती होणे आवश्यक आहे. सदर रस्त्यांची कामे मंजुर शासन अनुदान र.रु.१०० कोटी (पॅकेज-१,२,३ व ४) मधील होणाऱ्या संभाव्य बचतीमधून प्रस्तावीत करण्यात आले आहेत.

पॅकेज-०१ (यापुर्वी मंजुर एकूण ०७ रस्ते) च्या संभाव्य बचतीमधून करावयाच्या अतिरीक्त रस्त्याचे काम वॉर्ड क्र.६५ अंतर्गत जालना रोड वरील राजदिप कॉम्प्लेक्स पासून शितल फर्निशिंग समोरुन एम.जी.एम.हॉस्पिटलच्या दक्षिण गेट पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग कॉंक्रीटींग करण्याचे कामाचे अंदाजपत्रक र.रु.६५,७५,६३९/- चे पॅकेज-०१ चे कंत्राटदाराच्या बी-२ स्वरुपातील बाबनिहाय मंजुर दरानुसार व पॅकेज-०२ (यापुर्वी मंजुर एकूण ०६ रस्ते) च्या संभाव्य बचतीमधून करावयाच्या अतिरीक्त रस्त्याचे काम एम.जी.एम.कॅम्पस मधील सिडको कडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेले अंतर्गत रस्त्याचे व्हाईट टॉपींग करण्याचे कामाचे अंदाजपत्रक र.रु.१,५६,८६,९००/- चे पॅकेज-०२ चे कंत्राटदाराच्या बी-२ स्वरुपातील बाबनिहाय मंजुर दरानुसार शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यासह अतिरीक्त रस्ते कामांच्या अंदाजपत्रकाना मुदतवाढीसह मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७५/२०२०:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२४.१२.२०२०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलीस निरीक्षक सिटी चौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद शहर यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला आहे की, पोलीस सिटी चौक अंतर्गत शहागंज चमन येथे किराणा चावडी पोलीस चौकी कार्यरत आहे. सद्यस्थितीत येथे शहागंज चमन उद्यानाच्या परिसराचे नुतनीकरण करण्याचे काम प्रगतीपथावर असून त्यामध्ये सध्या असलेली किराणा चावडी पोलीस चौकी बाधीत होत आहे. त्यांचे पत्रात नमुद प्रमाणे शहागंज चमन भागास ऐतिहासीक वारसा असल्याने व येथील बाजारपेठ जुनी असल्याने येथे कापड दुकाने, फळ विक्रेते व इतर व्यावसायीक प्रतिष्ठाने मोठ्या प्रमाणावर आहेत. या कारणाने येथे ग्राहकांची सतत वर्दळ असते. शिवाय या भागास पुर्वीची जातीय दंगलीची पार्श्वभुमी असल्याने या भागात कायदा, सुव्यवस्था व शांतता राखणेसाठी वेळोवेळी पोलीस दल, एस.आर.पी.एफ. दलाची उपस्थिती आवश्यक ठरते. या कारणाने सदर भागात पोलीस चौकी असणे अत्यंत आवश्यक आहे. असे त्यांचे मत आहे. त्यामुळे या भागाची गरज विचारात घेता या ठिकाणी शहागंज चमनच्या दुसऱ्या बाजुस असलेल्या जागेत दक्षिण बाजुस पुर्वीची व अर्धवट बांधकाम झालेली शौचालयाची इमारत, पोलीस चौकीच्या वापरासाठी देण्याची त्यांनी विनंती केली आहे.

प्रकरणात या पुर्वी सदर ठिकाणी पे ॲण्ड युज शौचालयाचे बांधकाम सुरु करण्यात आले होते. परंतु या भागातील व्यापारी व प्रतिष्ठित मंडळी गुजराथी समाज विकास मंडळ औरंगाबाद यांनी शहागंज चमन परिसरात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा अर्धाकृती पुतळा उभारलेला असल्याने त्यांचे मांगल्य व पावित्र्य राखणसाठी तसेच या अर्धवट इमारतीच्या कार्यालयाने इतर वापर अनुज्ञेय केल्याने

खाजगी विधीज्ञ श्री.राजेश बन्सीलाल शहा यांनी मनपा विरुध्द मा.न्यायालयात दिवाणी दावा क्रमांक २९/२०१३ दाखल केला होता. नागरीकांचा विरोध विचारात घेता शौचालयाचे काम थांबविण्यात आले. या अर्धवट इमारतींचा वापर पोलीस चौकीसाठी देण्याचा निर्णय तत्कालीन मा.आयुक्त यांच्या दालनात झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. या बैठकीस प्रकरणातील याचिकाकर्ते श्री.राजेश शहा, ॲड.आर.आर.चिकांडे, श्री.गणपत चौधरी (व्यापारी), श्री,अनिल पटेल, अध्यक्ष गुजराथी समाज विकास मंडळ ई.उपस्थित होते.

तद्नंतर या विषयाच्या अनुषंगाने स.सदस्य यांनी पत्र देऊन कार्यालयास विनंती केली होती की, शौचालयाच्या अर्धवट बांधलेल्या इमारतींची पुर्णतः पाडकाम करण्यात यावे. यावर प्रशासनाने या अर्धवट इमारतीचा वापर हजेरी सेंटर, ग्रंथालय किंवा पोलीस चौकीसाठी करण्यासाठी योग्य असल्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीसाठी ठेवला असता मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर केला असता, सदर इमारतींचा वापर कोणत्याही कारणासाठी करण्यात येऊ नये व इमारत पुर्णतः निष्काशीत करण्याचा ठराव क्रमांक/१२५८ दि.१९.१२.२०१९ पारित केलेला आहे.

आता शहागंज चमन येथे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात येऊन या उद्यानाचे व परिसराचे सुशोभिकरणाचे काम पुर्ण करण्यात आलेले असल्याने तसेच पोलीस विभागाने सदर ठिकाणी पोलीस चौकीची गरज असल्याचे मत व्यक्त केले आहे.

तरी सदरची अर्धवट आर.सी.सी.इमारत मालमत्ता विभागाकडून करारनामा करण्यात येऊन पोलीस चौकीसाठी हस्तांतरीत करणे योग्य वाटते. हस्तांतरण करणेची कार्यवाही मालमत्ता विभाग व पोलीस विभाग यांनी परस्पर समन्वयाने करणे योग्य राहील.

उक्त नमुद प्रमाणे मा.सर्वसाधारण सभेचा पुर्व पारीत प्रस्ताव क्रमांक १२५८ दि.१९.१२.२०१९ रद्द करणे व सदरील जागा पोलीस चौकीसाठी प्रदान करण्यास मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ७५/२०२०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहागंज परिसर हा वर्दळीचा, शहराचा जुना विकसीत भाग असल्याने येथील व्यापारी प्रतिष्ठाणे, फळ विक्रेते यांची मोठी संख्या आहे. तसेच परिसराची पुर्वीची दंगलीची पार्श्वभुमी पाहता येथे कायदा सुव्यवस्था व शांतता राखण्यासाठी पोलीस चौकीची आवश्यकता असल्याने सार्वजनिक शौचालयासाठी बांधण्यात आलेली अर्धवट इमारत पोलीस चौकीसाठी हस्तांतरीत करणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

तरी पुर्वीचा मा.सर्वसाधारण सभेत पारित ठराव क्रमांक १२५८ दि.१९.१२.२०१९ रद्द करण्यास तसेच ही सार्वजनिक शौचालयाची अर्धवट बांधलेली इमारत पोलीस खात्यास हस्तांतरीत करण्यासाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१२.०१.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८३, ८९ या ठिकाणी नागरीकांसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने या ठिकाणी अनेक विकासात्मक कामे केवळ निधी उपलब्ध नसल्याने पुर्ण करता आली नाहीत. या भागात सर्वेक्षणानुसार ५०% पेक्षा जास्त दलित नागरी लोकसंख्या वसाहत असल्याने या ठिकाणी खालील प्रमाणे विकासात्मक कामे करणे अत्यंत आवश्यक असून त्यासाठी अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देता येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.८३, लघुवेतन कॉलनी, लायन्स कॉलनी, मुकूंदवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | २५.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.८३, देवगिरी कॉलनी, मुकूंदवाडी येथे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | २५.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.८९, चिकलठाणा, अण्णाभाऊ साठे नगर येथे सिमेंट कॉंक्रीट करणे. | २५.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.८९, चिकलठाणा निर्मलनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | २५.०० लक्ष |

करीता, वरीलप्रमाणे प्रस्ताव मा.प्रशासक यांच्या मान्यतेने मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास्तव सादर.

**ठराव क्रमांक ७६/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८३, ८९ या ठिकाणी नागरीकांसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने या ठिकाणी खालीलप्रमाणे विकासात्मक कामे करणे अत्यंत आवश्यक असून त्यासाठी अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तावास मान्यता देऊन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | अ.प.रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.८३, लघुवेतन कॉलनी, लायन्स कॉलनी, मुकूंदवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | २५.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.८३, देवगिरी कॉलनी, मुकूंदवाडी येथे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | २५.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.८९, चिकलठाणा, अण्णाभाऊ साठे नगर येथे सिमेंट कॉंक्रीट करणे. | २५.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.८९, चिकलठाणा निर्मलनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | २५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१३.०१.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रशासकीय ठराव क्र.१०. दि.२५/६/२०२० अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२०/५९३. दि.२५/०६/२०२० रोजीच्या आदेशान्वये दि.२८/०५/२०२० ते दि.२७/११/२०२० पर्यंत तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे.

नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.औमपा-२०१९/प्र.क्र.३१/नवि-२४, दि.२८/०९/२०२० नुसार औरंगाबाद महानगरपालिके मध्ये कार्यरत असलेल्या दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांचे महानगरपालिकेच्या सेवेत नियमित समावेशन व त्याकरिता अधिसंख्य अस्थायी पद निर्मिती करण्याबाबत सदर शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधिन राहून गट-क संवर्गात-४९ पदांवर नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

वरील शासन निर्णयान्वये पात्र न ठरलेल्या गट-क संवर्गातील खालील दैनिक वेतन कर्मचाऱ्यांची मुदतवाढ दि.२७/११/२०२० रोजी संपलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | प्रथम नियुक्तीची दिनांक |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती जयश्री जयंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | १०/१०/२००० |
| २) | श्री.अरुण रावजी बोडखे | वाहन चालक | १४/६/२००१ |
| ३) | श्री.सय्यद फरीदोद्दीन सय्यद गौस | वाहन चालक | १४/६/२००१ |
| ४) | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | १५/६/२००१ |
| ५) | श्री.रविंद्र कौतिकराव पाटील | वाहन चालक | १६/१०/२००२ |

त्यामुळे उक्त कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) च्या परंतुकान्वये ०२ दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ७७/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रशासकीय ठराव क्र.१०. दि.२५/६/२०२० अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२०/५९३. दि.२५/०६/२०२० रोजीच्या आदेशान्वये दि.२८/०५/२०२० ते दि.२७/११/२०२० पर्यंत तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे.

नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.औमपा-२०१९/प्र.क्र.३१/नवि-२४, दि.२८/०९/२०२० नुसार औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांचे महानगरपालिकेच्या सेवेत नियमित समावेशन व त्याकरिता अधिसंख्य अस्थायी पद निर्मिती करण्याबाबत सदर शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधिन राहून गट-क संवर्गात-४९ पदांवर नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

वरील शासन निर्णयान्वये पात्र न ठरलेल्या गट-क संवर्गातील खालील दैनिक वेतन कर्मचाऱ्यांची मुदतवाढ दि.२७/११/२०२० रोजी संपलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | प्रथम नियुक्तीची दिनांक |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती जयश्री जयंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | १०/१०/२००० |
| २) | श्री.अरुण रावजी बोडखे | वाहन चालक | १४/०६/२००१ |
| ३) | श्री.सय्यद फरीदोद्दीन सय्यद गौस | वाहन चालक | १४/०६/२००१ |
| ४) | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | १५/०६/२००१ |
| ५) | श्री.रविंद्र कौतिकराव पाटील | वाहन चालक | १६/१०/२००२ |

करिता उपरोक्त कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(३) च्या परंतुकान्वये ०२ दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.०१/१२/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरती नियुक्ती देण्याबाबतच्या विषयास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१३.०१.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे औरंगपुरा येथील नाथ सुपर मार्केट मधील पश्चिमेकडील जिन्या खालील जागा ज्याचे क्षेत्रफळ ४.४६ चौ.मी. एवढे असून २९ वर्षासाठी श्री.अभिजीत रामचंद जोशी यांना भाडेपट्ट्याने देण्यात आलेली आहे. संबंधीताच्या मागणी प्रमाणे व सदर ठिकाणी मागील बाजुस जागा उपलब्ध असल्याने पुर्वीच्या देण्यात आलेल्या जागेपेक्षा वाढीव १० फुटाची जागा देणे करीता प्रशासकीय मान्यता झाली असून ६x८ चौ.फुट (४.४६ चौ.मी.) या जागेत १० फुट जागा वाढवून देणे बाबत चालू सिध्द शिघ्र गणकानुसार वार्षिक भाडेमध्ये दुप्पटीने वाढ होऊन रु.२१,६२२/- १८ टक्के जी.एस.टी. सहीत होतात. त्याऐवजी ८x१६ चौ.फुट पडीत असलेली जागेचे वार्षिक भाडे १८ टक्के जी.एस.टी.सहीत रु.४२,०९१/- एवढी उत्पन्नात वाढ होत आहे.

वरील तुलनात्मक दृष्ट्या उत्पन्नात दुप्पटीने वाढ होत असल्याने तसेच मागील बाजुस असलेल्या जागेचा वापर होत नसल्याने यापुर्वी देण्यात आलेल्या ६x८ चौ.फुट जागे ऐवजी मागील बाजुस उपलब्ध असलेल्या १० फुटाची जागा वाढवून देणेस्तव व ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ७८/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचे औरंगपुरा येथील नाथ सुपर मार्केट मधील पश्चिमेकडील जिन्या खालील जागा ज्याचे क्षेत्रफळ ४.४६ चौ.मी. एवढे असून २९ वर्षासाठी

श्री.अभिजीत रामचंद जोशी यांना भाडेपट्ट्याने देण्यात आलेली आहे. संबंधीताच्या मागणी प्रमाणे व सदर ठिकाणी मागील बाजुस जागा उपलब्ध असल्याने पुर्वीच्या देण्यात आलेल्या जागेपेक्षा वाढीव १० फुटाची जागा देणे करीता प्रशासकीय मान्यता झाली असून ६X८ चौ.फुट (४.४६ चौ.मी) या जागेत १० फुट जागा वाढवून देणे बाबत चालु सिध्द शिघ्रगणकानुसार वार्षिक भाड्याने ३० वर्षाच्या कालावधी साठी भाडेपट्ट्याने देणेसाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७९/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१४.०१.२०२१)**

शहर अभियंता तथा नोडल अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, माहे फेब्रुवारी-२०२० पासून शहरात जागतिक महामारी कोव्हीड-१९/कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव वाढत चालला होता. माहे एप्रिल-२०२० पासून शहरात वाढत असलेला कोव्हीड-१९/कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी नागरीकांच्या टेस्टिंग (तपासणी) मोठ्या प्रमाणावर सुरु करण्यात आल्या. तपासणीचा अहवाल येण्यासाठी दोन ते तीन दिवस लागत होते. अशा वेळी संशयित नागरीकांना इतर नागरिकांपासून वेगळे ठेवण्यासाठी अलगीकरण/विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आलेले होते. तसेच बाधित नागरीकांसाठी वेगळे कोव्हीड केअर सेंटर स्थापित करण्यात आलेले होते.

अलगीकरण/विलगीकरण कक्ष व कोव्हीड केअर सेंटर येथील नागरीकांना सकाळचा चहा, बिस्कीट, नाश्ता, दुपारचे जेवण, सायंकाळचा चहा, रात्रीचे जेवण तसेच १० वर्षाखालील लहान मुलांना दुध/बिस्कीटे इ.पुरविण्यासाठी खालीलप्रमाणे वेगवेगळ्या बचत गटास/केटरर्स यांना काम देण्यात आले होते.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नाव | दर प्रति व्यक्ती प्रति दिन | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | क्षितीज महिला बचत गट | रु.१५०.०० | १७.०४.२०२० ते २९.०४.२०२० |
| २. | सच्चाई फुड प्रोडक्टस प्रा.लि. | रु.१०५.०० | ३०.०४.२०२० ते ०५.०५.२०२० |
| ३. | मेसर्स सिध्द इंटरप्राईजेस | रु.१५०.०० | ०६.०५.२०२० ते ३०.०५.२०२० |
| ४. | नम्रता केटरर्स | रु.१५७.५० | ३१.०५.२०२० ते २३.०६.२०२० |

तथापि, उपरोक्त पैकी काही पुरवठाधारक भोजनाच्या गुणवत्तेबाबत तक्रारी आल्यामुळे तर काहींना आर्थिक दृष्ट्या परवडत नसल्याने कारण देऊन त्यांनी सदरील काम पुढील कालावधीसाठी सुरु ठेवण्यास नकार दिला.

**अ) उपरोक्त पुरवठाधारकांना देण्यात आलेल्या देयकांचे विवरण खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | क्षितीज महिला बचत गट | रु.३,९०,२७०/- |
| २. | सच्चाई फुड ॲण्ड प्राईव्हेट प्रोडक्टस प्रा.लि. | रु.३,०१,९९६/- |
| ३. | सिध्द इंटरप्राईजेस | रु.१२,८५,०४६/- |
| ४. | नम्रता केटरर्स | रु.२४,९९,५९३/- |
| | **एकूण** | **रु.४४,७६,९०५/-** |

कोव्हीड-१९ विषाणुच्या प्रतिबंधासाठी महानगरपालिकेमार्फत स्थापित कोव्हीड केअर सेंटर व अलगीकरण/विलगीकरण कक्ष येथे भोजन पुरवठा करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मार्फत प्राप्त अनुदान र.रु.१ कोटीच्या तरतुदीतून रु.८० लाखाच्या मर्यादेत निविदा मागविण्यास प्रशासकीय ठराव क्र.१७ दि.१०.०६.२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार दि.१० जुन २०२० रोजी रु.८० लाखाची अल्प मुदतीची निविदा निविदा क्र.२०२० AMCA-५८३७१४-१ प्रसिध्द करण्यात आली

होती. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची निविदा अधाने इंडस्ट्रिज (अरुण अधाने) यांची रु.१३५/- प्रति व्यक्ती प्रति दिन या दराची होती. तथापि, इतक्या कमी दरात गुणवत्तापुर्ण भोजन पुरवठा होऊ शकेल किंवा नाही या बाबत सांशकता असल्याने भोजन पुरवठाधारकाची आर्थिक क्षमता, त्यांचे मनुष्यबळ, किचनची क्षमता, भोजन पुरवठ्यासाठी उपलब्ध वाहन व्यवस्था इ.बाबींच्या अनुषंगाने तपासणी करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली. सदर समितीत

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.एच.डी.पानझडे, शहर अभियंता | अध्यक्ष |
| २. | श्री.संजय पवार, मुख्य लेखाधिकारी | सदस्य |
| ३. | डॉ.निता पाडळकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी | सदस्य |
| ४. | श्री.एच.ए.कोल्हे, कार्यकारी अभियंता | सदस्य |
| ५. | श्रीमती विजया घाडगे,सहाय्यक आयुक्त, शिक्षण विभाग | सदस्य सचिव |
| ६. | श्री.रवि घडमोडे | सदस्य |

यांचा समावेश होता. समितीने दि.१५.०७.२०२० रोजी त्यांचा अहवाल मा.प्रशासक यांना सादर केला. या अहवालामध्ये रु.१३५/- हा निविदा दर व्यवहार्य नसून मुलभूत सुविधा, किचन, वाहतूक व्यवस्था इ.मुद्यांच्या अनुषंगाने सदरील निविदा धारकाकडे भोजन पुरवठ्याची क्षमता नाही असे समितीच्या पाहणीस दिसून आले.

मा.प्रशासक यांनी तो अहवाल स्विकारून सदर कामाची फेरनिविदा करण्या बाबत व सर्व निविदाधारकांना जेवण उच्च गुणवत्ता व पर्याप्त मात्रामध्ये पाहिजे असे लक्षात आणून देण्याचे आदेशीत केले. तसेच दरम्यान संबंधीत निविदाधारक अधाने इंडस्ट्रिज या ठेकेदाराने गैरसमजुतीने कमी दर भरल्याचे सांगून निविदा प्रक्रियेतून माघार घेतली.

दरम्यानच्या काळात मा.प्रशासक यांच्या सुचनेनुसार महानगरपालिकेने स्वत:चे स्वयंपाक गृह महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन (MIEPA) संस्था भडकलगेट औरंगाबाद येथे दि.२४.०६.२०२० पासून कार्यान्वीत केले होते. महानगरपालिकेचे स्वत:चे स्वयंपाकगृह चालू करण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मा.प्रशासक यांची दि.२६.०६.२०२० रोजी मान्यता घेण्यात आलेली होती.

तथापि, सदरील उपक्रम हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा नसल्याचे आढळून आले. तसेच महानगरपालिकेची यंत्रणा व मनुष्यबळ या कामी अडकून पडत असल्याचे निर्दशनास आले. त्यामुळे मा.प्रशासक यांच्याशी दि.२६.०६.२०२० झालेल्या सविस्तर चर्चेनुसार सदरील स्वयंपाकगृह बंद करण्याबाबत ठरविण्यात आले.

मा.प्रशासक यांच्या दि.२९.०६.२०२० रोजीच्या मान्यतेनुसार महानगरपालिकेचे महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन (MIEPA) संस्था, भडकलगेट, औरंगाबाद येथील स्वयंपाकगृह दि.३०.०६.२०२० पासून बंद करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे व त्यास मा.प्रशासक यांची दि.०१.०७.२०२० रोजी मान्यता प्राप्त आहे.

**ब) मध्यवर्ती स्वयंपाकगृह अंतर्गतचा खर्च.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तुलसी (भाजीपाला) | :- | रु.४४,०५७/- |
| २. | एम.एस.सेल्स एण्ड सर्व्हिस | :- | रु.१६,८१५/- |
| ३. | योगेश्वरी मिल्क | :- | रु.५७,६००/- |
| ४. | श्रध्दा गॅस एजन्सी | :- | रु.५०,१३८/- |
| ५. | उत्तमचंद बखारीया (किराणा) | :- | रु.२,४७,२९५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | मोतीलाल विनोदकुमार | :- | रु.१,५०,५६८/- |
| ७. | मीपा येथे पाण्याची टाकी बसविणे | :- | रु.६२,२१९/- |
| ८. | ठाकरे केटरर्स यांचे देयक | :- | रु.३,९२,६००/- |
| ९. | जैन कर्टन्स | :- | रु.३०,०२६/- |
| १०. | मेघना ट्रेडर्स | :- | रु.१,८७,५९४/- |
| ११. | सुराणा ट्रेडिंग | :- | रु.१८,९८२/- |
| | **एकूण** | **:-** | **रु.१२,५७,८९४/-** |

दरम्यानच्या कालावधीत सदरील समितीचा अहवाल येईपर्यंत तातडीने व्यवस्था करण्यासाठी शहरातील नामांकीत अशा नम्रता केटरर्स, क्रिम ॲण्ड क्रन्च, ग्लोबल डायनिंग, जैन केटरर्स, श्री साईकृपा भोजनालय, तुषार मंगलकेंद्र ॲण्ड केटरर्स, कर्तव्य केटरर्स, इनरिच इन्डस्ट्रियल फुड सल्पायर्स ॲण्ड केटरिंग सर्व्हिसेस, हॉटेल लालाजी एक्झीकेटीव्ह, अन्नामृत फाऊंडेशन, साई समृध्दी केटरर्स या दहा भोजन पुरवठा धारकांना कोव्हीड केअर सेंटर व अलगीकरण/विलगीकरण कक्ष विभागून देण्याचा निर्णय घेण्यात आला. या कालावधीत रुग्ण संख्येचा आकडा वाढतच चालला होता. रुग्ण संख्या २००० च्या पुढे गेली होती. त्यामुळे एखाद्या ठिकाणी तक्रारी आल्यास अथवा एखादा पुरवठाधारक पुरवठा करण्यास असमर्थ झाला तर विना व्यत्यय इतर पुरवठाधारकांकडून भोजन पुरवठा उपलब्ध करुन घेता येऊ शकेल. सदरील केटरर्स यांच्याशी चर्चा केली असता, सर्वांनीच प्रति व्यक्ती प्रति दिन रु.२००/- अधिक जीएसटी हाच दर मान्य केला. तथापि, सर्व पुरवठाधारकांना शहर अभियंता यांनी सुचना केली असता, सदर पुरवठाधारकांनी खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारित दराने भोजन पुरवठा करण्याचे मान्य केले. संबंधीत पुरवठाधारकांना समक्ष चर्चा करुन खालील तक्त्यात नमुद दरानुसार भोजन पुरवठ्यासाठी कार्यादेश देण्यात आले. सदर पुरवठादारांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) (सी) अंतर्गत मा.प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नाव | मान्य केलेली दर प्रति व्यक्ती प्रति दिन सर्व करांसह | कार्यादेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|
| १. | के.एन.के. हॉस्पीट्यालिटी | रु.१८०.०० | जा.क्र./मनपा/श.अ./२०२०/३५ दि.०१.०७.२०२० |
| २. | नम्रता केटरर्स | रु.१७९.०० | जा.क्र./मनपा/श.अ./२०२०/३४ दि.०१.०७.२०२० |
| ३. | जैन केटरर्स | रु.१७२.०० | जा.क्र./मनपा/श.अ./२०२०/३६ दि.०१.०७.२०२० |
| ४. | अन्नामृत फाऊंडेशन | रु.१७८.५० | जा.क्र./मनपा/श.अ./२०२०/४० दि.०९.०७.२०२० |
| ५. | कर्तव्य केटरर्स | रु.१७७.५० | जा.क्र./मनपा/श.अ./२०२०/३९ दि.०१.०७.२०२० |
| ६. | तुषार मंगलकेंद्र ॲण्ड केटरर्स | रु.१५७.५० | जा.क्र./मनपा/श.अ./२०२०/३८ दि.०१.०७.२०२० |
| ७. | हॉटेल लालाजी एक्झीकेटीव्ह | रु.१७९.०० | जा.क्र./मनपा/श.अ./२०२०/४६ दि.११.०७.२०२० |
| ८. | इनरिच इन्डस्ट्रियल सर्व्हिस फुड | रु.१७५.०० | जा.क्र./मनपा/श.अ./२०२०/४७ दि.१५.०७.२०२० |

| | | | |
|---|---|---|---|
| | सल्पायर्स ॲण्ड केटरिंग सर्व्हिसेस | | |
| ९. | श्री साईकृपा भोजनालय | रु.१६०.०० | जा.क्र./मनपा/श.अ./२०२०/३७ दि.०१.०७.२०२० |

प्रत्येकाचे दर वेगवेगळे आहेत याचे कारण पुरवठाधारकाचे किचन व त्यांना देण्यात आलेले सेंटरर्स यांचे अंतर वेगवेगळे असल्यामुळे वाहतुक व्यवस्थेचा विचार करुन प्रत्येकाच्या दरात कमी जास्त फरक आहे.

**क) मा.प्रशासक यांच्या मंजुरीनुसार भोजन पुरवठाधारकांना दिलेल्या कार्यादेशानुसार पुरवठाधारक निहाय दि.०१.०७.२०२० ते दि.०३.११.२०२० पर्यंत झालेला खर्च खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नाव | दि.०३/११/२०२० पर्यंत झालेला खर्च | अदाईगीच्या कार्यवाही अंतर्गत देयक |
|---|---|---|---|
| १. | के.एन.के.हॉस्पीट्यालिटी | ५७,५०,८५५/- | ०९,२९,७६०/- |
| २. | नम्रता केटरर्स | १९,३८,९९०/- | - |
| ३. | जैन केटरर्स | २७,०९,०६८/- | ३४,१८,६६०/- |
| ४. | अन्नामृत फाऊंडेशन | १७,४५,८४६/- | ३२,१६,५००/-<br>२,३०,६००/-<br>(वाहतूक खर्च) |
| ५. | कर्तव्य केटरर्स | ८,२७,०७२/- | -- |
| ६. | तुषार मंगलकेंद्र ॲण्ड केटरर्स | २४,५७,४४२/- | १६,६०,२२५/- |
| ७. | हॉटेल लालाजी एक्झीकेटीव्ह | २३,१८,६५०/- | - |
| ८. | इनरिच इन्डस्ट्रियल फुड सल्पायर्स ॲण्ड केटरिंग सर्व्हिसेस | ५४,११,८४५/- | - |
| ९. | श्री साईकृपा भोजनालय | ३५,८९,९०५/- | - |
| १०. | आयुष काढा | ४,०४,३००/- | ०४,०३,३१०/- |
| | **एकुण** | **२,७१,५३,९७३/-** | **९८,५९,०५५/-** |

वरीलप्रमाणे गठित केलेल्या समितीच्या अहवालाच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी वरीलप्रमाणे विविध केटरर्स यांचे दर मान्य करण्यास मा.प्रशासक यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) नुसार दिनांक १ जुलै २०२० रोजी मान्यता प्रदान केली. तसेच मा.प्रशासक यांनी याबाबत फेरनिविदा काढण्यात यावी व फेरनिविदा फायनल होईपर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये विना निविदा भोजन पुरवठ्याचे काम उपरोक्त सर्व पुरवठाधारकांस दि.१६.०७.२०२० रोजी मान्यता प्रदान केली आहे.

मा.प्रशासक यांच्या दि.३०.०७.२०२० च्या मान्यमेनुसार कोव्हिड केअर सेंटर/अलगीकरण/ विलगीकरण कक्ष यांचे वेगवेगळ्या गटात वर्गीकरण करुन खालीलप्रमाणे सात निविदा मागविण्यात आल्या.

| अ.क्र. | कोव्हीड केअर सेंटर व अलगिकरण/विलगीकरण कक्ष चे नांव | निविदा क्रमांक |
|---|---|---|
| १. | (१) तुकाराम मुलांचे वसतीगृह, किलेअर्क (२) नवखंडा महाविद्यालय (३) जामिया इस्लामिया काशिफ उल उलम मदरसा इमारत (४) पी.इ.एस.अभियांत्रिकी महाविद्यालय. | 2020_AMCA_600974_1 |
| २. | (१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील १४ वस्तीगृहे (२) शासकीय विज्ञान संस्था, निपटनिरंजन नगर यांचे तीन वस्तीगृहे. | 2020_AMCA_600894_3 |
| ३. | (१) कलाग्राम (२) मेल्ट्रॉन (३) सिपेट (४) एम.जी.एम. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स. | 2020_AMCA_600946_1 |
| ४. | (१) सामाजीक न्याय विभागाचे मुलींचे वस्तीगृह, पदमपुरा (६) शासकीय अध्यापक महाविद्यालय मुला/मुलींचे वस्तीगृह. (७) देवगिरी महाविद्यालय मुला/मुलींचे वस्तीगृह. | 2020_AMCA_600906_1 |
| ५. | महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे वस्तीगृह (२) मराठवाडा महसुल प्रशिक्षण प्रबोधिनी (३) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मुलांचे वस्तीगृह (४) इ.ओ.सी. अग्निशमन दल, पदमपुरा (५) छत्रपती शाहू महाराज आयुर्वेदिक कॉलेज (६) विभागीय क्रीडा संकुल. | 2020_AMCA_600852_2 |
| ६. | (१) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मुला व मुलींचे वस्तीगृह (२) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मुलांचे वस्तीगृह (३) शासकीय औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे नवीन वस्तीगृह (४) शासकीय तंत्रनिकेतन मुलांचे व मुलींचे वस्तीगृह. | 2020_AMCA_600917_1 |
| ७. | (१) इन्स्टीटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट मुलांचे वस्तीगृह (२) महानगरपालिका वॉर रुम आणि टास्कफोर्स. | 2020_AMCA_600885_3 |

सदर निविदा स्वीकृतीच्या कार्यावाही अंतर्गत होत्या. तथापि, आता रुग्णसंख्या झपाटयाने कमी झाल्यामूळे कलम ६७ (३) (सी) अंतर्गत नेमलेल्या पुरवठाधारकांकडूनच भोजन पुरवठा सुरु ठेवण्याचे आदेश मा.प्रशासक यांनी दिले. त्यानुसार ही निविदा प्रक्रिया रद्द करुन सध्याच्याच भोजन पुरवठाधारका कडून भोजन पुरवठयाचे काम सुरु आहे. तथापि. तुलसीचा चहा व आयुष काढा पुरविण्याच्या कामासाठी स्वतंत्र निविदा मागविण्यात आल्या आहे. या कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

वरील अ, ब आणि क नुसार भोजन पुरवठ्यावर आजपर्यंत झालेल्या एकूण खर्चाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

a) प्रथम टप्प्यात क्षितीजा महिला बचतगट, सच्चाई फुड ॲण्ड प्रा., सिध्द इंटरप्राईजेस, नम्रता केटरर्स यांनी पुरविलेल्या भोजन सेवेसाठी र.रु.४४,७६,९०५/- इतका खर्च झालेला आहे.

b) महानगरपालिकेचे स्वत: मीपा येथे कार्यान्वयीत केलेले मध्यवर्ती स्वयंपाकगृहासाठी भाजीपाला, किराणा, स्वंयपाकासाठी नेमलेले ठाकरे केटरर्स यांचे देयक, विविध पुरवठाधारकांची देयके अदाई व मीपा येथील इमारतीसाठी पाण्याची टाकी बसविणे इ.कामासाठी र.रु.१२,५७,८९४/- इतका खर्च झालेला आहे.

c) दि.०१.०७.२०२० ते दि.०३.११.२०२० पर्यंत भोजन पुरवठा व आयुष काढा, तुलसी चहा पुरविण्यापोटी झालेला खर्च देयक अदाईगीच्या कार्यवाही अंतर्गतचा एकूण खर्च रु.(२,७१,५३,९७३/- + ९८,५९,०५५/-) = रु.३,७०,१३,०२८/-.

आज दि.०३.११.२०२० पर्यंत महानगरपालिकेमार्फत स्थापित कोव्हीड केअर सेंटर अलगीकरण/ विलगीकरण कक्ष इ. ठिकाणी भोजन पुरवठ्यासाठी वरीलप्रमाणे तीन्हीचा (अ+ब+क) एकत्रित खर्च रु.४,२७,४७,८२७/- इतका झालेला आहे. सद्यस्थितीत दि.०३.११.२०२० रोजी रुग्णसंख्या २८४ पर्यंत कमी झालेली आहे. तथापि संभाव्य दुसऱ्या लाटेचा अंदाज गृहित धरून या पुढील तीन महिन्याच्या कालावधीसाठी अंदाज रु.०२.७५ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच भोजन पुरवठ्यासाठी एकूण र.रु.०७.०० कोटीचा खर्च अपेक्षित आहे. करीता उपलब्ध भोजन पुरवठा धारकांकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (सी) अंतर्गत करण्यात आलेल्या खर्चास व पुढील कालावधीत याच भोजन पुरवठाधारकां कडून भोजन पुरवठा करून घेण्यास तसेच अपेक्षित असलेली आर्थिक तरतुद रु.०२.७५ कोटी असा एकत्रित र.रु.०७.०० कोटीचा निधी उपलब्ध करून देण्याच्या मान्यतेस्तव सादर.

करीता, उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक ७९/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, माहे फेब्रुवारी-२०२० पासून शहरात जागतिक महामारी कोव्हीड-१९/ कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव वाढत चालला होता. माहे एप्रिल-२०२० पासून शहरात वाढत असलेला कोव्हीड-१९/कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी नागरीकांच्या टेस्टिंग (तपासणी) मोठ्या प्रमाणावर सुरु करण्यात आल्या. तपासणीचा अहवाल येण्यासाठी दोन ते तीन दिवस लागत होते. अशा वेळी संशयित नागरीकांना इतर नागरिकांपासून वेगळे ठेवण्यासाठी अलगीकरण/विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आलेले होते. तसेच बाधित नागरीकांसाठी वेगळे कोव्हीड केअर सेंटर स्थापित करण्यात आलेले होते. या कोव्हीड सेंटरवर रुग्णांना, अलगीकरण कक्षातील नागरीकांना व तेथील कार्यरत कर्मचाऱ्यांना भोजन पुरविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ, ब व क नुसार वेळोवेळी व्यवस्था करण्यात आली व त्याप्रमाणे भोजन पुरवठा करण्यात आला.

महानगरपालिकेमार्फत स्थापित कोव्हीड केअर सेंटर, अलगीकरण/विलगीकरण कक्ष इ. ठिकाणी भोजन पुरवठासाठी वरील प्रमाणे तीनही (अ+ब+क) चा एकत्रित खर्च र.रु.४,२७,४७,८२७/- इतका झालेला आहे. तसेच पुढील कालावधीतील पुरवठाधारकांचे देयके अदा करण्याच्या खर्चास व संभाव्य दुसऱ्या लाटेचा अंदाज गृहीत धरुन या पुढील तीन महिन्याच्या कालावधीसाठी अंदाज रु.०२.७५ कोटीचा खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच भोजन पुरवठ्यासाठी एकूण रु.०७.०० कोटीचा खर्च अपेक्षित आहे.

तसेच मा.प्रशासक यांच्या दि.३०.०७.२०२० यांच्या मान्यतेनुसार कोव्हीड केअर सेंटर अलगीकरण/विलगीकरण कक्ष यांचे वेगवेगळ्या गटात वर्गीकरण करून खालील प्रमाणे सात निविदा मागविण्यात आल्या.

| अ.क्र. | कोव्हीड केअर सेंटर व अलगिकरण/विलगीकरण कक्ष चे नांव | निविदा क्रमांक |
|---|---|---|
| १. | (१) तुकाराम मुलांचे वस्तीगृह, किलेअर्क (२) नवखंडा महाविद्यालय (३) जामिया इस्लामिया काशिफ उल उलम मदरसा इमारत (४) पी.इ.एस.अभियांत्रिकी महाविद्यालय. | 2020_AMCA_600974_1 |

| | | |
|---|---|---|
| २. | (१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील १४ वस्तीगृहे (२) शासकीय विज्ञान संस्था, निपटनिरंजन नगर यांचे तीन वस्तीगृहे. | 2020_AMCA_600894_3 |
| ३. | (१) कलाग्राम (२) मेल्ट्रॉन (३) सिपेट (४) एम.जी.एम. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स. | 2020_AMCA_600946_1 |
| ४. | (१) सामाजीक न्याय विभागाचे मुलींचे वस्तीगृह, पदमपुरा (६) शासकीय अध्यापक महाविद्यालय मुला/मुलींचे वस्तीगृह. (७) देवगिरी महाविद्यालय मुला/मुलींचे वस्तीगृह. | 2020_AMCA_600906_1 |
| ५. | (१) महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे वस्तीगृह (२) मराठवाडा महसुल प्रशिक्षण प्रबोधिनी (३) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मुलांचे वस्तीगृह (४) इ.ओ.सी. अग्निशमन दल, पदमपुरा (५) छत्रपती शाहू महाराज आयुर्वेदिक कॉलेज (६) विभागीय क्रीडा संकुल. | 2020_AMCA_600852_2 |
| ६. | (१) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मुला व मुलींचे वस्तीगृह (२) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मुलांचे वस्तीगृह (३) शासकीय औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे नवीन वस्तीगृह (४) शासकीय तंत्रनिकेतन मुलांचे व मुलींचे वस्तीगृह. | 2020_AMCA_600917_1 |
| ७. | (१) इन्स्टीट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट मुलांचे वस्तीगृह (२) महानगरपालिका वॉर रुम आणि टास्कफोर्स. | 2020_AMCA_600885_3 |

सदर निविदा स्विकृतीच्या कार्यवाही अंतर्गत होत्या. तथापि, आता रुग्णसंख्या झपाट्याने कमी झाल्यामूळे कलम ६७ (३) (सी) अंतर्गत नेमलेल्या पुरवठाधारकाकडूनच भोजन पुरवठा सुरु ठेवण्याचे आदेश मा.प्रशासक यांनी दिले. त्यानुसार ही निविदा प्रक्रिया रद्द करुन सध्याच्याच भोजन पुरवठाधारका कडून भोजन पुरवठ्याचे काम सुरु आहे. तथापि, तुलसीचा चहा व आयुष काढा पुरविण्याच्या कामासाठी स्वतंत्र निविदा मागविण्यात आल्या आहेत. या कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

करीता, उपलब्ध भोजन पुरवठाधाकांकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (सी) अंतर्गत करण्यात आलेल्या खर्चास व पुढील कालावधीत याच भोजन पुरवठाधारकांकडून भोजन पुरवठा करून घेण्यास तसेच अपेक्षित असलेली आर्थिक तरतुद रु.०२.७५ कोटी असा एकत्रित र.रु.७.०० कोटीचा निधी उपलब्ध करून देण्यास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येते. उपरोक्त नमुद बाबींसह मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८०/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१९.०१.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पशुसंवर्धन विभागाअंतर्गत मांस (बीफ,मटन,चिकन व मासोळी) विक्री करणाऱ्या महानगरपालिका हद्दीतील मांस विक्री दुकानास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८१ व ३८२ अन्वये सन-२०१५ पर्यंत मनपा मार्फत मांस,मासे विक्री करणे बाबत परवाना देण्यात येत होता.

अन्न व सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या दि.१४.०१.२०१५ चे आदेशान्वये अन्न व सुरक्षा व मानके अधिनियम २००६ व त्या अंतर्गत नियम व नियमन २०११ राज्यातील मांस व मांसजन्य पदार्थ तसेच मांस व मांसजन्य पदार्थ व्यावसायीकांना परवाना प्रदान करण्याचे अधिकार अन्न व औषधी प्रशासनास प्रदान करण्यात आलेल आहेत.

त्या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीतील मांस विक्रेत्यांना फक्त ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार सदर कायद्यानुसार महानगरपालिकेस प्रदान करण्यात आले आहेत.

औरंगाबाद शहरात मांस विकी परवान्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी मांस विक्रेत्यांकडून मागणी करण्यात येते. त्यानुसार स्थळ पाहणी, मनपाचे कर भरणा पावती, परिसरातील धार्मीक व शैक्षणीक स्थळे, नागरीकांच्या तक्रारी व मनपाने घालून दिलेल्या नियम अटींची पुर्तता इत्यादी बाबत पाहणी करून मनपामार्फत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते. त्यासाठी कोणतेही शुल्क आकरण्यात येत नाही. मनपाची या कामी लागणारी यंत्रणा, वेळ व मनुष्यबळ या बाबी लक्षात घेता व महानगरपालिकेचे आर्थिक स्त्रोत वाढविण्याच्या दृष्टिने मांस विक्री दुकानास मनपाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी वार्षीक रु.६००/- शुल्क आकारणे योग्य राहील. तसेच प्रतिवर्षी दुकाने तपासणी व ना हरकत प्रमाणपत्र नुतनीकरण करण्यासाठी प्रतिवर्षी रु.३००/- ठेवणे योग्य राहील व विलंब शुल्क प्रतिमाह रु.२५/- ठेवणे योग्य राहील.

करीता ना हरकत परवाना देण्याकरीता व परवाना नुतनीकरण शुल्क आकारणीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ८०/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात मांस परवानगीच्या ना हरकत प्रमाणपत्रासाठी मांस विक्रेत्यांकडून मागणी करण्यात येते. मनपा कडून यापुर्वी ना हरकत प्रमाणपत्र देण्यास कोणतेही शुल्क आकारण्यात येत नव्हते. मनपाच्या या कामी लागणारी यंत्रणा, वेळ व मनुष्यबळ या बाबी लक्षात घेता व महानगरपालिकेचे आर्थिक स्त्रोत वाढविण्याच्या दृष्टिने मांस विक्री दुकानास मनपाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी वार्षिक रु.६००/- शुल्क आकारण्यात येते व प्रतिवर्षी दुकाने तपासणी, ना हरकत परवाना नुतनीकरण करण्यासाठी प्रतिवर्षी रु.३००/- ठेवण्यात येते व विलंब शुल्क प्रतिमाह रु.२५ ठेवण्यात येते. वरील प्रमाण शुल्क आकारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८१/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२५.०१.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद येथे स्व.मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मृतीवन व स्मारक उभारणे या कामाकरीता शासन अनुदान र.रु.२५.४९ कोटी अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका या कार्यान्वयीन यंत्रणे मार्फत करावयाच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.२५,४९,१५,६११/- (Including GST 12%, Isurance 0.5%, Contingencies 5%, PMC charges, TPTA & TS charges 2%, Testing Charges 0.50% इत्यादींसह) चे आहे. शासन निर्णयानुसार या कामाची निविदा बी-२ स्वरुपाची आहे. या निविदेसाठी प्राप्त L1 निविदाधारक M/s MSL Jangid JV & M/s Design Factory India (Consortium) Noida यांची असून त्यांनी भरणा केलेले दर हे मंजुर निविदा र.रु.२१,४७,००,१०२/- पेक्षा कमी रक्कमेची म्हणजेच र.रु.२०,९९,७६,२८६/- इतकी आहे. (२.२०% निविदा रक्कमेपेक्षा कमी).

सदर निविदेमध्ये एकूण ५९८ बाबी (Items) आहेत. त्यामधील साधारणतः ४० बाबी मध्ये L1 यांचे दर L2 पेक्षा जास्त आहेत. L1 व L2 यांनी साधारणतः १८ बाबींमध्ये सारखे दर भरलेले आहेत. L1 यांनी L2 पेक्षा ५४० बाबींमध्ये कमी दर भरलेले ओत. त्यानुसार मा.आयुक्त यांनी L1 यांनी निविदेमध्ये ज्या बाबींकरीता (Items) L2 पेक्षा जास्त दर भरलेले आहेत. त्या सर्व बाबी L1 यांनी L2 ने भरलेल्या कमी दरानेच करणेबाबत मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे यास मंजुरीस घेणे व करार करणेस मा.स्थायी समिती, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी मान्यता घेणे बाबत.

संदर्भः- Tender ID 2020-AMCA-616315-1सन २०२०-२०२१.

| | | |
|---|---|---|
| १ | खात्यांचे नाव | राज्य शासन अनुदान |
| २ | कामाचे स्वरुप | सिडको येथे मा.स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मृतीवन व स्मारक उभारणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य केले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय,<br>औरंगाबाद महानगरपालिका या कार्यालयीन यंत्रणे मार्फत स्थापत्य व विद्युत विषयक कामांच्या एकत्रीत र.रु.२५,४९,१५,६११/- यास शासन निर्णय क्र.स्मारक-२०१६/प्रक्र-२७९/नवि-२४ दि.०९ मार्च २०२० अन्वये शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.२१,४७,००,१०२/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | • दै.लोकमत, दै.सामना<br>• दै.दि.पाईनिअर, दै.मिड-डे<br>• दै.नवभारत मुंबई<br>• संकेतस्थळ-महा-ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.१३.१०.२०२० |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्यची मुदत | दि.२०.११.२०२० |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.२४.११.२०२० (Technical Bid)<br>दि.२८.११.२०२० (Technical Bid) |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | पहिली |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०२ (दोन) |

(त्यापैकी पात्र निविदाधारकाची माहिती खालीलप्रमाणे

| **अ.क्र** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** | |
|---|---|---|---|---|
| १. | M/s MSL Jangid JV & M/s Design Factory India (Consortium) | २१,४७,००,१०२/- | २०,९६,८८,९३९/- | २.३३% कमी रक्कमेची |
| २. | Comt.Construction PVT Ltd. & Meroform India pvt.ltd. (Consortium) | २१,४७,००,१०२/- | २१,६३,९८,०५८/- | ०.७९% कमी रक्कमेची |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावांशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत | -- |

| | | |
|---|---|---|
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावीत. | प्राप्त होणाऱ्या शासकीय अनुदानातून |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | शासकीय अनुदान र.रु.९.१० कोटी प्राप्त उर्वरित निधी मिळणे बाबत मागणी करण्यात आलेली आहे. |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधून करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणऱ्या कार्यालयात जमा झाली आहे काय? डिपॉझिट रजिस्टर पान कमांक द्यावा) | -- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय (शासन निर्णय दि.०९ मार्च २०२०) |

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.५४४ दि.३१.०८.२०१६ अन्वये औरंगाबाद येथे स्व.मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मृतीवन व स्मारक उभारणे या प्रकल्पाकरीता महानगरपालिकेतर्फे नियुक्त पीएमसी मे.आर्कहोम कन्सल्टंट, नोयडा मार्फत अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेस्तव सार्वजिनक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी महानगरपालिकेने सादर केली असता, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी महानगपालिकेने सादर केलेले र.रु.२५.४९ कोटी रक्कमेचे सविस्तर अंदाजपत्रक तपासणी अंती स्थापत्य विषयक कामास व मुख्य अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी विद्युत विषयक कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

या अनुषंगाने उक्त नमुद प्रकल्पाची स्थापत्य व विद्युत विषयक कामांची एकत्रित बी-२ स्वरुपाची निविदा ई-टेंडरींग माध्यमातून मागविण्यात आली असून निविदा मंजुरी प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सदरील काम दर्जा व गुणवत्तापुर्वक होण्याच्या दृष्टिने महानगरपालिकेतर्फे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे.आर्कहोम कन्सलटंट, नोयडा यांची नियुक्ती केलेली आहे. सदर कामाच्या निविदेमध्ये Third Party Technical Audit बाबतच्या अटींचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांचे मार्फत Third Party Technical Audit करून घेण्यात येईल.

तरी औरंगाबाद येथे स्व.मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मारक व स्मृतीवन उभारणेच्या कामामधील उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे L1 निविदाधारक M/s MSL Jangid JV & M/s Design Factory India (Consortium) Noida यांचे ज्या बाबींमधील दर हे L2 पेक्षा जास्त भरलेले आहेत ते त्यांनी L2 ने भरलेल्या कमी दरानेच करणेबाबत मान्यता झाल्याने L1 निविदाधारक M/s MSL Jangid JV & M/s Design Factory India (Consortium) Noida यांचे प्रस्तावित काम हे साधारणतः रु.२०,९६,८८,९३९/- इतक्या रक्कमेचे (निविदा रक्कमेपेक्षा साधारणतः २.३३% कमी रक्कमेचे) असून त्यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक ८१/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे, औरंगाबाद येथे स्व.मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मृतीवन व स्मारक उभारणे बाबत या प्रकल्पासाठी, औरंगाबाद महानगरपालिका या कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत करावयाच्या कामासाठी र.रु.२५.४९ कोटी शासन निधी होणार असून सदरील प्रकल्पाचे काम दर्जा व गुणवत्तापुर्वक होण्याच्या दृष्टिने महानगरपालिकेमार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. आर्कहोम

कन्सलटंट, नोयडा यांची नियुक्ती केलेली आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णयानुसार Third Party Technical Audit करण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय या संस्थेच्या नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सदरील कामाचे L1 निविदाधारक M/s MSL Jangid JV & M/s Design Factory India (Consortium) Noida यांनी निविदेमध्ये ज्या बाबींकरीता (Items) L2 पेक्षा जास्त दर भरलेले आहेत. ते L1 यांनी L2 ने भरलेल्या कमी दरानेच करणेस औरंगाबाद येथे स्व.मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मृतीवन व स्मारक उभारणे या कामाची निविदा M/s MSL Jangid JV & M/s Design Factory India (Consortium) Noida यांची मंजुर निविदा रक्कमेपेक्षा साधारणतः र.रु.२०,९६,८८,९३९/- इतक्या रक्कमेची (निविदा रक्कमेपेक्षा साधारणतः २.३३% कमी रक्कमेची) असून सदर निविदा मंजुरीच्या प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८२/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२८.०१.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ जलतरण तलावाचे नुतनीकरण या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१५-१६ च्या दरसुचीनुसार र.रु.४९,४६,५५७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. त्यास मा.स्थायी समितीने विषय क्र.१०७४ दि.२०.०५.२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील कामास्तव नियमानुसार रितसर निविदा मागविण्यात आल्या असून ०२ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०४.०४% कमी दराची निविदा श्री.कुरैशी मोहम्मद खलील यांची प्राप्त झालेली होती. सदरील निविदा प्रस्तावास मा.स्थायी समितीने दि.०३.१२.२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार त्यांना सदर कामाचे करारनामा कार्यादेश देऊन काम सुरू करण्यात आलेले आहे. काम प्रगतीपथावर असून वॉटर प्रुफिंगच्या अनुषंगाने अतिरीक्त बाबींचे अंदाजपत्रक र.रु.१७,७१,२९३/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.४९,४६,५५७/- व अतिरीक्त बाबींचे अंदाजपत्रक र.रु.१७,७१,२९३/- असे एकूण र.रु.६७,१७,८५०/- मान्यते बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक ८२/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविलेल्या प्रमाणे सदर कामाचे एकुण अंदाजपत्रक र.रु.४९,४६,५५७/- व अतिरीक्त बाबींचे अंदाजपत्रक र.रु.१७,७१,२९३/- असे एकुण अंदाजपत्रक र.रु.६७,१७,८५०/- च्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२९.०१.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद यांचे मार्फत हर्सुल टी पॉईंट ते हर्सुल गाव दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र.एफ च्या रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे. संबंधीतांनी त्यांचे पत्र क्र.१७६१ दि.२१.१०.२०२० नुसार रस्ते अंतर्गत बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करणे संदर्भाने अंदाजपत्रक देणे बाबत कळविले आहे. या अंतर्गत प्रत्यक्ष पाहणी केली असता, १०० ते ३०० मीमी व्यासाच्या जलवाहिन्या तसेच व्हॉल्व्ह बाधीत होणार आहेत. सदर जलवाहिन्या व व्हॉल्व्ह तसेच अनुषंगीक उपांगे स्थलांतरीत करणे संदर्भाने रु.३,५७,४६,३०८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर जलवाहिनी स्थलांतरीत करण्याचे

काम कार्यकारी अभियता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद यांचे मार्फत व त्यांचे निधीतून होणार आहे. तथापि, या कामावर पाणी पुरवठा विभागामार्फत देखरेख करण्यात येईल.

करीता, हर्सुल येथील मुख्य रस्त्यालगत असलेल्या जलवाहीन्या स्थलांतरीत करणे संदर्भाने अंदाजपत्रक र.रु.३,५७,४६,३०८/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ८३/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल येथील मुख्य रस्त्यालगत असलेल्या जलवाहीन्या स्थलांतरीत करणे संदर्भाने अंदाजपत्रक र.रु.३,५७,४६,३०८/- मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०४.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्राथमिक सोयि सुविधांच्या विकास कामासाठी शासन निर्णय दिनांक ९ मार्च २०१५ अन्वये रु.२४.३३ कोटी निधी उपलब्ध करुन दिला. तथापि, सदर कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता आढळून आल्याने श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्यासाठी जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१६/२०१२. दि.१५.१२.२०१६ अन्वये ज्ञापन बजाविण्यात आले होते. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१८/४४ दि.१०.०१.२०१८ प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, जनहित याचिका क्र.३८/२०१७ मध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश दि.२६.०४.२०१८ चे अनुषंगाने शासन स्तरावरील चौकशी समिती गठीत करण्यात आली.

मा.प्रधान सचिव (नवि-२) यांचे अध्यक्षते खालील त्रिसदस्यीय समितीने प्राथमिक चौकशी अहवाल दि.०८.०६.२०१८ रोजी सादर केला. सदर अहवालानुसार जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१८/१०८६. दि.२४.०७.२०१८ श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांना पुर्वीच्या दोषारोपांसह अतिरिक्त दोषारोपपत्र बजाविण्यात आले. कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुबई यांचे पत्र क्र.औमनपा-२०१८/प्र.क्र.३०८-अ/नवि-२४ दि.०९.०३.२०२० सोबत प्राप्त चौकशी अहवाल चौकशी अधिकारी तथा सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांचे वरिल ०४ दोषारोप सिध्द झाले असून, ०६ दोषारोप अंशतः सिध्द झाले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार सदर पदाची नियुक्ती प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. श्री.एस.डी.पानझडे, शहर, अभियंता यांचेवरील दोषारोप वरीलप्रमाणे सिध्द झाल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९८२ चे प्रकरण तीन नियम ५ (एक) नुसार संबधितावर ठपका ठेवण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ८४/२०२१:-**

आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रू.२४.३३ कोटी निधीतील कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता प्रकरणांत विभागीय चौकशी अंती श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांचेवरील ०४ दोषारोप सिध्द झाले असून ०६ दोषारोप अंशतः दोषारोप सिध्द झाल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९८२ चे प्रकरण तीन नियम ५ (एक) नुसार संबंधितावर ठपका ठेवण्याबाबत मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८५/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०४.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्राथमिक सोयि सुविधांच्या विकास कामासाठी शासन निर्णय दिनांक ९ मार्च २०१५ अन्वये रु.२४.३३ कोटी निधी उपलब्ध करुन दिला. तथापि, सदर कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता आढळून आल्याने श्री.सय्यद सिकंदर अली, कार्यकारी अभियंता

(सेवानिवृत्त) यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यासाठी जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१६/२०१३. दि.१५.१२.२०१६ अन्वये ज्ञापन बजाविण्यात आले होते. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१८/४६. दि.१०.०१.२०१८ प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, जनहित याचिका क्र.३८/२०१७ मध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश दि.२६.०४.२०१८ चे अनुषंगाने शासन स्तरावरील चौकशी समिती गठीत करण्यात आली. या दरम्यान श्री.सय्यद सिकंदर अली, कार्यकारी अभियंता हे दि.३०.०९.२०१८ रोजी नियतवयोमानाने सेवानिवृत्त झाले.

मा.प्रधान सचिव (नवि-२) यांचे अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीने प्राथमिक चौकशी अहवाल दि.०८.०६.२०१८ रोजी सादर केला. सदर अहवालानुसार जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१८/१०८७. दि.२४.०७.२०१८ श्री.सय्यद सिकंदर अली, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना पुर्वीच्या दोषारोपांसह अतिरिक्त दोषारोपपत्र बजाविण्यात आले. कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुबई यांचे पत्र क्र.औमनपा-२०१८/प्र.क्र.३०८-अ/नवि-२४ दि.०९.०३.२०२० सोबत प्राप्त चौकशी अहवाल चौकशी अधिकारी तथा सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सादर केलेल्या चौकशी अहवाला नुसार श्री.सय्यद सिकंदर अली, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांचेवरिल ०२ दोषारोप सिध्द झाले असून, ०४ दोषारोप अंशतः सिध्द झाले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार सदर पदाची नियुक्ती प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. श्री.सय्यद सिकंदर अली, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांचेवरील दोषारोप वरीलप्रमाणे सिध्द झाल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ चे उपनियम २७(१) नुसार संबंधितांचे सेवानिवृत्त झाल्यापासून १०% सेवानिवृत्तीवेतन कायमस्वरूपी गोठविण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक ८५/२०२१:-</u>**

आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रु.२४.३३ कोटी निधीतील कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता प्रकरणांत विभागीय चौकशी अंती श्री.सय्यद सिकंदर अली, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांचेवरील ०२ दोषारोप सिध्द झाले असून, ०४ दोषारोप अंशतः दोषारोप सिध्द झाल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्त) नियम १९८२ चे उपनियम २७ (१) नुसार संबंधितांचे सेवानिवृत्त झाल्यापासून १०% सेवानिवृत्ती वेतन कायमस्वरूपी गोठविण्याबाबत मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८६/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०४.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्राथमिक सोयि सुविधांच्या विकास कामासाठी शासन निर्णय दिनांक ९ मार्च २०१५ अन्वये रु.२४.३३ कोटी निधी उपलब्ध करुन दिला. तथापि, सदर कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता आढळून आल्याने श्री.एस.पी.खन्ना, उप अभियंता (सेवानिवृत्त) यांचे विरुध्द विभागीय चौकशी करयासाठी जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१७/३०७. दि.०९.०३.२०१७ अन्वये ज्ञापन बजाविण्यात आले होते. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१८/४८ दि.१०.०१.२०१८ प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, जनहित याचिका क्र.३८/२०१७ मध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश दि.२६/०४/२०१८ चे अनुषंगाने शासन स्तरावरील चौकशी समिती गठीत करण्यात आली. या दरम्यान श्री.एस.पी.खन्ना हे दि.३१.०३.२०१८ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाले.

मा.प्रधान सचिव (नवि-२) यांचे अध्यक्षते खालील त्रिसदस्यीय समितीने प्राथमिक चौकशी अहवाल दि.०८.०६.२०१८ रोजी सादर केला. सदर अहवालानुसार जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१८/१०८८. दि.२४.०७.२०१८ श्री.एस.पी.खन्ना, उप अभियंता (सेवानिवृत्त) यांना पुर्वीच्या दोषारोपांसह अतिरिक्त दोषारोपपत्र बजाविण्यात आले. कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.औमनपा-२०१८/प्र.क्र.३०८-अ/नवि-२४ दि.०९.०३.२०२० सोबत प्राप्त चौकशी अहवाल चौकशी अधिकारी तथा सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार श्री.एस.पी.खन्ना, उप अभियंता (सेवानिवृत्त) यांचे वरिल ०२ दोषारोप सिध्द झाले असून, ०४ दोषारोप अंशत: सिध्द झाले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार सदर पदाची नियुक्ती प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. श्री.एस.पी.खन्ना, उप अभियंता (सेवानिवृत्त) यांचेवरील दोषारोप वरील प्रमाणे सिध्द झाल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे उपनियम २७(१) नुसार संबंधितांचे सेवानिवृत्त झाल्यापासून १०% सेवानिवृत्ती वेतन कायमस्वरूपी गोठविण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ८६/२०२१:-**

आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रु.२४.३३ कोटी निधीतील कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता प्रकरणांत विभागीय चौकशी अंती श्री.एस.पी.खन्ना, उप अभियंता (सेवानिवृत्त) यांचेवरील ०२ दोषारोप सिध्द झाले असून, ०४ दोषारोप अंशत: दोषारोप सिध्द झाल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्त) नियम १९८२ चे उपनियम २७(१) नुसार संबंधितांचे सेवानिवृत्त झाल्यापासून १०% सेवानिवृत्ती वेतन कायमस्वरूपी गोठविण्याबाबत मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८७/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१०.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०२१-२०२२ या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य (पशुपक्षी खाद्य, मासोळी, लुसन घास, हिरवा मका, शाळू बाटूक, भाजीपाला व किराणा पदार्थ) खरेदी करण्यासाठी ई-टेन्डर द्वारे निविदा मागवून दर निश्चीत करावयाचे आहेत.

प्राणी संग्रहालयात असलेले प्राणी काळविट, सांबर, निलगाय, चितळ, माकड, पाणपक्षी, मोर, कासव, ई. प्राण्यांना केंद्रिय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे मानकानुसार खाद्य देण्यात येत आहे. सदर खाद्य खरेदी करण्यासाठी अंदाजे वार्षिक खर्च रु.३७.८० लक्ष अपेक्षीत आहे. सदर खर्च हा प्राणी देखील या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. प्राण्यांची संख्या कमी जास्त झाल्यास त्यानुसार खाद्यांचे प्रमाण कमी जास्त करण्यात येते.

करीता, सन २०२१-२२ या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद रु.३७.८० लक्ष मंजुरीसाठी मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक ८७/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०२१-२०२२ या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद रु.३७.८० लक्ष यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८८/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१०.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य बीफ खरेदी करण्यासाठी ई-टेन्डरद्वारे निविदा मागवून दर निश्चीत करावयाचे आहेत.

प्राणी संग्रहालयात असलेले हिंस्त्र प्राणी वाघ, पांढरे वाघ, बिबटे, कोल्हा, उदबिल्ला आणि मगर या प्राण्यांना केंद्रिय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवि दिल्ली यांचे मानकानुसार सध्या प्रतिदिन १२५ किलो बीफ खाद्य खरेदी करण्यात येत आहे. सद्याचे बीफ खरेदीचे दर रु.१७८/- प्रति किलो आहे. या दरानुसार बीफ खाद्य खरेदी करण्यासाठी अंदाजे वार्षिक खर्च रु.६९.६५ लक्ष अपेक्षीत आहे. सदर खर्च हा प्राणी देखभाल या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. प्राण्यांची संख्या कमी जास्त झाल्यास त्या नुसार बीफ खरेदीचे प्रमाण कमी जास्त करण्यात येते.

करीता सन २०२१-२०२२ या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य बीफ खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद रु.६९.६५ लक्ष मंजुरीसाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक ८८/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०२१-२०२२ या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य बीफ खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद रु.६९.६५ लक्ष यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८९/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.११.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.सुमंत मोरे, उपआयुक्त यांनी त्यांचा मुलगा नामे चि.ओमकार सुमंत मोरे यांच्या कर्करोगावर (Ewing's Sarcoma of Right Proximal Tibai) या आजारपणावर Tata Memorial Hospital, Mumbai येथे उपचारापोटी र.रु.४,९९,०२२/- (अक्षरी रुपये चार लाख नव्याण्णव हजार बावीस फक्त) इतका खर्च झाला आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमा मध्ये या आजाराचा आकस्मिक आजार म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.१६/११/२०११ मध्ये 'परिशिष्ट-अ' शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची यादीमध्ये उक्त रुग्णालयाचे नांव समाविष्ट आहे.

त्यानुषंगाने संबंधिताने सदर आजारपणावर केलेला वैद्यकीय खर्च रु.४,९९,०२२/- एवढा खर्च झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.४,१३,७१७/- एवढी असून सदरील अनुज्ञेय रकमेच्या ९०% र.रु.३,७२,३४५/- (अक्षरी रुपये तीन लाख बहात्तर हजार तीनशे पंचेचाळीस फक्त) पैकी ५% र.रु.२४,९५१/- (अक्षरी रुपये चौवीस हजार नऊशे एक्कावन्न फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.४,९९,०२२/- च्या ५% प्रमाणे) मनपा फंडात जमा करुन उर्वरित र.रु.३,४७,३९४/- (अक्षरी रुपये तीन लाख सत्तेचाळीस हजार तीनशे चौऱ्याण्णव फक्त) रक्कम देय आहे.

करिता, श्री.सुमंत मोरे, उपआयुक्त यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.४,१३,७१७/- च्या ९०% र.रु.३,७२,३४५/- (अक्षरी रुपये तीन लाख बहात्तर हजार तीनशे पंचेचाळीस फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक ८९/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार श्री.सुमंत मोरे, उपआयुक्त यांनी त्यांचा मुलगा नामे चि.ओमकार सुमंत मोरे याच्या कर्करोगावर (Ewing's Sarcoma of Right Proximal Tibai) या आजारपणावर Tata Memorial Hospital, Mumbai येथे उपचारापोटी वैद्यकीय खर्च र.रु.४,९९,०२२/- एवढा खर्च झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.४,१३,७१७/- एवढी असून सदरील अनुज्ञेय रकमेच्या ९०% र.रु.३,७२,३४५/- (अक्षरी रुपये तीन लाख बहात्तर हजार तीनशे पंचेचाळीस फक्त) पैकी ५% र.रु.२४,९५१/- (अक्षरी रुपये चौवीस हजार नऊशे एक्कावन्न फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.४,९९,०२२/- च्या ५% प्रमाणे) मनपा फंडात जमा करुन उर्वरित र.रु.३,४७,३९४/- (अक्षरी रुपये तीन लाख सत्तेचाळीस हजार तीनशे चौऱ्याण्णव फक्त) रक्कम देय आहे.

करीता, श्री.सुमंत मोरे, उपआयुक्त यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.४,१३,७१७/- च्या ९०% र.रु.३,७२,३४५/- (अक्षरी रुपये तीन लाख बहात्तर हजार तीनशे पंचेचाळीस फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९०/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१२.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संपुर्ण भारत देश ऑक्टोंबर-२०१८ स्वच्छ करण्याच्या उद्देशाने दि.०२ ऑक्टोंबर २०१४ पासून **"स्वच्छ भारत अभियान"** देश भरात राबविण्यात येत आहे. त्याच धर्तीवर स्वच्छ महराष्ट्र अभियान (नागरी) प्रस्ताव सादरची अंमलबजावणी संदर्भाधीन दि.१५ मे २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये संपुर्ण **"मिशन मोड"** पध्दतीने सुरु आहे. या अभियाना अंतर्गत शहरे **"हागणदारी मुक्त"** करणे व घनकचरा व्यवस्थापनांतर्गत **"स्वच्छ"** करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी करून राज्याचा नागरी भाग दि.०१ ऑक्टोंबर २०१७ **"हागणदारी मुक्त"** घोषीत करण्यात आले आहे. आता या अभियांनाअंतर्गत घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहरे **"शहर स्वच्छ"** करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तथापि, नागरी भागात व सार्वजनिक ठिकाणी काही प्रमाणात होत असलेल्या अस्वच्छतेमुळे नागरीकांकडून प्रतिकुल प्रतिक्रिया व्यक्त होतांना दिसून येतात.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, शहरांना कचरा मुक्त होण्याकरीता एकूणच स्वच्छतेमध्ये क्रमाक्रमाने आणखी सुधारणा होण्यास्तव शहरांना तारांकीत मानांकन (Star Rating) देण्याबाबतची नियमावली (A Prtocol for making citis Garbege free) केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आली आहे.

Water+ घोषित करणे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनातील एक घटक म्हणुन व स्वच्छ सर्वेक्षण २०२१करीता अनिवार्य आहे. यावरती शासनाकडून येणारे अनुदान अवलंबून आहे. त्याच प्रकारे स्वच्छ अभियान (नागरी) अंतर्गत कचरा विलगीकरणाची कार्यवाही न करणाऱ्या व स्वच्छ सर्वेक्षण मध्ये योग्य कामगिरी न करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राधान्याने देण्यात येणारी अनुदाने थांबविण्याबाबत नगर विकास विभागाने शासन निर्णय क्र.स्वमअ-२०१८/प्र.क्र.७९/नवि-३४ दिनांक २९ जानेवारी २०१८ द्वारे कळविलेले आहे.

त्या अनुषंगाने औरंगाबाद शहरात स्वच्छ अभियानाची सुरुवात दि.०१ ऑक्टोंबर २०१७ पासून झाली आहे. दि.३१ मार्च २०१८ रोजी महाराष्ट्र व पर्यायाने औरंगाबाद शहर **"हागणदारी मुक्त"** म्हणुन घोषित करण्यात आला असून ठराव क्र.८३३ दि.२९.१२.२०१६ रोजी मा.सर्वसाधारण सभेने या बाबत

मान्यता दिलेली आहे व ठराव क्र.६८४ दि.२०.१०.२०१८ रोजी मा.सर्वसाधारण सभेने शहर ODF+ व स्वच्छतेमध्ये ३ Star घोषित केले आहे. तसेच ठराव क्र.१२४४ दि.१९.१२.२०१९ अन्वये औरंगाबाद शहर ODF++ म्हणुन घोषित करण्यात आले असून दि.१५.०२.२०२१ रोजी Re-certification झाले आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार औरंगाबाद महानगरपालिका शहर **"हागणदारी मुक्त"** Water+) साठी मानांकन व घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहर स्वच्छते बाबत पंचतारांकीत दर्जा (5 star) निश्चित केले असून त्या बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ९०/२०२१:-**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार औरंगाबाद महानगरपालिका शहर **"हागणदारी मुक्त"** Water+) साठी मानांकन व घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहर स्वच्छते बाबत पंचतारांकीत दर्जा 5 star निश्चित केले असून त्या बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९१/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१६.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आणि पाणीपट्टी करापोटी मालमत्ता धारकांकडून धनादेशाद्वारे कर भरणा करण्यात येतो. तथापि, करापोटी स्विकारण्यात आलेले धनादेश मोठ्या प्रमाणावर न वटल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. यामध्ये करदात्यांकडून जाणीव पुर्वक चुका केल्या जातात. जसे की, स्वाक्षरीमध्ये खाडाखोड, स्वाक्षरीमध्ये बदल, रक्कम अक्षरी व अंकात तफावत किंवा चुकीचे लिहीणे, नॉन सीटीएसचा धनादेश देणे, खात्यात रक्कम नसताना धनादेश देणे, खातेदाराची सही नसणे, धनादेशाच्या तारखेत चुका असणे, शाई बदल असणे, उपआयुक्त महानगरपालिका यांचे नाव न लिहीता धनादेश देणे, ज्यामुळे धनादेश वटत नाहीत. अशा बाबींना आळा घालण्यासाठी निगोशिऐबल इन्स्ट्रयुमेंट ॲक्ट अंतर्गत सेक्शन-१३८ व भा.द.वि.चे सेक्शन-४२० च्या व्यतिरिक्त ज्या मालमत्ता धारकांचे धनादेश अनादर होतात. त्यांचे विरूध्द दंडात्मक कार्यवाहीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. तसेच खात्यामध्ये रक्कम नसणे व स्वाक्षरीमध्ये चुका/तफावत आढळल्याने धनादेश अनादर होण्याच्या कारणा व्यतिरिक्त इतर कारणांमुळे धनादेश मनपाच्या वसूली कर्मचाऱ्यांच्या व रोखपालांच्या दुर्लक्षांमुळे/निष्काळजीपणामुळे अनादर होणाऱ्या धनादेशा करीता संबंधीत कर्मचाऱ्यांविरूध्द देखील दंडात्मक कार्यवाही करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. करीता मालमत्ताधारक व मनपाचे संबंधीत वसुली कर्मचारी आणि रोखपाल यांच्याकडून उक्त नमुद केलल्या कारणांकरीता खालील प्रमाणे दंडाची रक्कम धनादेशाच्या रक्कमेने व्यतिरिक्त एफ-१ पावतीद्वारे वसूल करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येतो.

| अ.क्र. | न वटलेल्या धनादेशाची रक्कम | करा व्यतिरिक्त दंडाची रक्कम |
|---|---|---|
| १. | रूपये ०१ ते १००० | १०० रुपये दंड |
| २. | रूपये १००१ ते ५००० | २०० रुपये दंड |
| ३. | रुपये ५००१ ते १०,००० | ३०० रुपये दंड |
| ४. | रुपये १०,००१ ते १,००,००० | १००० रुपये दंड |
| ५. | रुपये १,००,००१ च्या पुढे | २००० रुपये दंड |

करीता प्रस्ताव मा.प्रशासक यांचे विचारार्थ तथा मान्यतेस्तव.

**ठराव क्रमांक ९१/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मालमत्ता कर आणि पाणीट्टी करापोटी मालमत्ता धारकांकडून धनादेशाद्वारे कर भरण्यात येतो. सदर धनादेश मालमत्ता धारकांव्दारे जाणीवपुर्वक अनादर होतात तसेच कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अनादर होतात, करीता मालमत्ताधारक व मनपाचे संबंधीत वसूली कर्मचारी आणि रोखपाल यांच्याकडून उक्त नमूद केलेल्या कारणांकरीता वरील प्रमाणे दंडाची रक्कम धनादेशाच्या रक्कमे व्यतिरिक्त एफ-१ पावतीद्वारे वसूल करण्यात येईल. प्रस्तावात नमुद केल्यानुसार दंडाची रक्कम वसूल करण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२२.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हीड-१९ या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pendemic संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असून कोव्हीड-१९ हा साथरोग नियंत्रीत करण्याची आवश्यकता आहे.

औरंगाबाद शहरातील कोव्हिड-१९ विषाणु बाधित रुग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना करण्या बाबत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात आरोग्य विभागा अंतर्गत कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी लागणारी वैद्यकीय साहित्य व उपकरणे खरेदी करीता कलम ६७ (३) C अंतर्गत मान्यता प्राप्त पुरवठाधारक मे.मेट्रो मेटल इंडस्ट्रिज, औरंगाबाद यांचेकडून मे.हाफकि न बायो फार्मासिटुकल्स कार्पोरेशन, मुंबई यांच्या दर करारानुसार खरेदी करण्यात आलेली आहेत. त्यासाठी झालेला खर्च खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | संख्या | प्रति नग दर | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| 1. | Hospital bed with mattress & pillow | 100 | 11000 | 1100000 |
| 2. | I.V. stand | 100 | 1300 | 130000 |
| 3. | Bed side locker | 200 | 4000 | 800000 |
| 4. | Stretcher with trolley | 50 | 10000 | 500000 |
| 5. | Dressing trolley | 50 | 4000 | 200000 |
| 6. | Linen trolley | 50 | 7000 | 35000 |
| 7. | Bed side Screen | 200 | 2500 | 500000 |
| 8. | Cloth Stretcher | 50 | 2500 | 125000 |
| | | | **एकूण रक्कम रुपये** | **37,05,000** |

मे.मेट्रो मेटल इंडस्ट्रिज, औरंगाबद यांच्याकडून सन २०२०-२१ या आर्थीक वर्षासाठी कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी लागणारी वैद्यकीय साहित्य व उपकरणे खरेदी करीता तरतुद रु.३७,०५,०००/- (अक्षरी रुपये सदतीस लक्ष पाच हजार फक्त) एवढा खर्च करण्यात आलेला आहे.

सदरील खर्च मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी वितरीत केलेल्या कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी प्राप्त निधीतून भागविण्यात आलेला आहे.

करीता सदरील खर्चास मा.स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ९२/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोव्हिड-१९ साथ नियंत्रणाकरीता वैद्यकीय उपकरणे व साहित्य मे.हाफकिन बायोफार्मासुटिकल्स कॉर्पोरेशन, मुंबई यांच्या दर करारानुसार मान्यता प्राप्त पुरवठा धारकाकडून मे.मेट्रो मेटल इंडस्ट्रिज, औरंगाबाद यांच्याकडून कलम ६७ (३) सी नुसार खरेदी करण्यात आलेली आहे.

सदरील खरेदीचे देयक रु.३७,०५,०००/- हे मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी वितरीत केलेल्या प्राप्त निधीतून अदा करण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही.

**विषय क्रमांक ९३/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२२.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हिड-१९ या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असून कोव्हिड-१९ हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे.

औरंगाबाद शहरामधील कोव्हिड-१९ विषाणु बाधित रुग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना करण्या बाबत प्रस्ताव सादर करीता आहेत की, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात आरोग्य विभागा अंतर्गत कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी व साथ नियंतत्रणात आणण्या करीता लागणारी रॅपिड अँटीजन टेस्ट किटची आवश्यकता होती, त्यानुसार साथ नियंत्रणात आणण्या करीता जास्तीत जास्त रुग्ण शोधून अलगीकरण करणे आवश्यक होते या करीता सिटी इंट्री पॉईअट तसेच २४ तास मोबाईल टिम मार्फत करण्यात येणारी रॅपिड अँटीजेन टेस्ट करण्यासाठी कार्यरत असलेले बुथ तसेच मोबाईल टिम व मोबाईल स्वॅब टेस्टिंग टिम स्थापित करण्यात आलेल्या होत्या व त्यांचा साठी रॅपिड अँटीजन टेस्ट किट खरेदी करणे आवश्क आहे.

त्यानुषंगाने आरोग्य विभागाअंतर्गत कलम ६७ (३) सी अंतर्गत शासन निर्णय क्रमांक कोरोना २०२०/प्र.क्र.१७३/आरोग्य-५ दि. २२ जुन २०२० नुसार शासनमान्य I C M R मान्यता प्राप्त दराने STANDARD Q-COVID-19 ANTIGEN DETECTION KIT ची खरेदी करण्यात आलेली आहे.

सदर STANDARD Q-COVID-19 ANTIGEN DETECTION KIT चा पुरवठा करण्यासाठी शासन मान्य पुरवठा धारक मे. S.D. BIOSENSOR HEALTH CARE PVT.LTD. GURUGRAM यांनी पुरवठा केलेला असून त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकांची नावे | साहित्याचा तपशील | संख्या | दर | प्राप्त दिनांक | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | S.D. BIOSENSOR HEALTH CARE PVT.LTD. GURUGRAM | STANDARD Q-COVID-19 ANTIGEN DETECTION KIT | 50000 | 450.00+12%GST | 08.07.2020 | 25200000 |
| | | | 50000 | 450.00+12%GST | 18.07.2020 | 25200000 |
| | | | 50000 | 450.00+12%GST | 24.07.2020 | 25200000 |
| | | | 50000 | 410.00+12%GST | 11.08.2020 | 22960000 |
| | | | 40000 | 410.00+12%GST | 02.09.2020 | 18368000 |
| 2. | LAB INDIA | | 1900 | 410.00+12%GST | 03.09.2020 | 872480 |
| 3. | S.D. BIOSENSOR HEALTH CARE PVT.LTD. GURUGRAM | | 5000 | 370.00+12%GST | 22.10.2020 | 2072000 |
| | | | 15000 | 265.00+12%GST | 09.11.2020 | 4452000 |
| | | | | | एकूण | 12,43,24,480 |

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी लागणारी STANDARD Q-COVID-19 ANTIGEN DETECTION KIT खरेदी तरतुद रु.१२,४३,२४,४८०/- (अक्षरी बारा कोटी त्रेचाळीस लक्ष चोवीस हजार चारशे ऐंशी रुपये फक्त) एवढा खर्च अपेक्षीत आहे. त्यापैकी रु.५,०४,००,०००/- (पाच कोटी चार लक्ष रुपये खर्च झालेला आहे) उर्वरित रु.७,३९,२४,४८०/- एवढी रक्कम निधी उपलब्ध झाल्यानंतर अदा करणेस्तव व मंजुरीस्तव सादर.

सदरील खर्च मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी नेमलेल्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) च्या माध्यमातून प्राप्त झाल्यानंतर निधीतून भागविता येईल.

करीता, सदरील खर्चास मा.स्थायी समितीच्या कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक ९३/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षी कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोगय विभागा अंतर्गत शासन निर्णय क्रमांक कोरोना-२०२०/प्र.क्र.१७३/आरोग्य-५ दिनांक २२ जुन २०२० नुसार शासन मान्य ICMR मान्यता प्राप्त दराने सदरील खर्च मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी वितरीत केलेल्या प्राप्त निधीतून रु.५,०४,००,०००/- (रुपये पाच कोटी चार लक्ष फक्त) खर्च करण्यात आलेला आहे. उर्वरित रु.७,३९,२४,४८०/- एवढी रक्कम निधी उपलब्ध झाल्यानंतर भागविण्यात येईल.

करीता, रु.५,०४,००,०००/- (पाच कोटी चार लक्ष रुपये) खर्चाचे देयक अदा करणेस्तव मान्यतेस्तव व उर्वरित देयक रु.७,३९,२४,४८०/- एवढी रक्कम अदा करणेस्तव तसेच खरेदी करण्याच्या मान्यतेस्तव सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२२.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हिड १९ या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असुन कोविड-१९ हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे.

औरंगाबाद शहरामधील कोविड-१९ विषाणु बाधित रुग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना करण्या बाबत प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात आरोग्य विभागाअंतर्गत कोविड१९ प्रतिबंधात्मक उपायोजना करण्यासाठी लागणारी औषधी, वैद्यकिय साहित्य व उपकरणे, लॅब कंझ्युमेबल व डिस्पोजेबल व इतर औषधी खरेदी अंतर्गत महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर ई-निविदा दिनांक २७/०७/२०२० रोजी मागविण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे औषधी व साहित्य खरंदी करण्याचे प्रस्तावति आहे, त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**A TABLETS / CAPSULES / SYRUPS**

| Sr. No. | Name of Drug | Qty | Rate | Total Cost |
|---|---|---|---|---|
| 1. | Tab Metronidazole 400mg | 50000 | 0.7 | 35000 |
| 2. | Tab Methyl Prednisolne 4mg | 5000 | 1.75 | 8750 |
| 3. | Tab Emcet | 50000 | 5 | 250000 |
| 4. | Tab Pantaprozole 40 | 50000 | 0.9 | 45000 |
| 5. | Tab Cefixime 200 mg | 50000 | 4.2 | 210000 |
| 6. | Tab Agumentin 625 (6tabs pack) | 100000 | 29.16 | 2916000 |
| 7. | Tab Vitamine C 500mg | 200000 | 2 | 400000 |
| 8. | Tab B.complex (10's pack) | 200000 | 1.5 | 300000 |
| 9. | Tab Vitamine D3 (4 tabs pack) | 200000 | 5 | 1000000 |
| 10. | Tab Calcium Lactate Loose | 100000 | 0.15 | 15000 |
| 11. | Tab Ciplar 10mg | 2000 | 1.8 | 3600 |
| 12. | Cap Depin 10mg | 2000 | 1.6 | 3200 |
| 13. | Tab Depin 10mg | 2000 | 1.6 | 3200 |
| 14. | Tab Calmpose 5mg | 2000 | 0.3 | 600 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 15. | Tab Gasex | 10000 | 1.2 | 12000 |
| 16. | Tab Favipiravir 200mg | 10000 | 33 | 330000 |
| 17. | Syrup Cough 5 Ltrs. | 2000 | 150 | 300000 |
| 18. | Tab Zine sulphate | 200000 | 0.8 | 160000 |
| 19. | sy Ondensatron | 5000 | 15 | 75000 |
| 20. | Sy Cetrizine | 5000 | 12 | 60000 |
| 21. | Sy Domperidone | 5000 | 18 | 90000 |
| 22. | Sy Paracetamol | 10000 | 12 | 120000 |
| 23. | Tab Ondensatron | 100000 | 0.7 | 70000 |
| 24. | Sy Amox+Clav | 5000 | 24 | 120000 |
| 25. | Sy Azithromycine | 5000 | 20 | 100000 |
| 26. | Tab Ranitidine+Domperidon | 100000 | 0.8 | 80000 |
| 27. | Tab Multivitamine | 200000 | 1.5 | 300000 |
| 28. | Tab Azithromycin 500 | 50000 | 11 | 550000 |
| 29. | Tab Cetrizine 10gm | 150000 | 0.2 | 30000 |
| 30. | Tab Paracetamol 500 mg | 2000000 | 0.44 | 880000 |
| **B** | **INJECTIONS** | | | |
| 31. | Inj Meropenem 1 gm | 100 | 178 | 17800 |
| 32. | Inj Dexamethasone 2ml | 5000 | 6.5 | 32500 |
| 33. | Inj Dextrose 25% | 100 | 25 | 2500 |
| 34. | Inj Dextrose 50% | 100 | 30 | 3000 |
| 35. | Inj Piperacillin+Tazobactam 4.5gm | 100 | 75 | 7500 |
| 36. | Inj Cefitriaxone 1 gm | 5000 | 22 | 110000 |
| 37. | Inj Enaxopatine (LMWH) 40gm | 500 | 165 | 82500 |
| 38. | NS 3% | 100 | 34 | 3400 |
| 39. | Inj Tocilizumab 400 gm | 20 | 39000 | 780000 |
| 40. | Inj Remdesivir 100 gm | 10 | 2626.4 | 26264 |
| 41. | Inj Doxofylline 100 mg | 100 | 45 | 4500 |
| 42. | 100 ml Normal Saline (NS) | 1000 | 11 | 11000 |
| 43. | IV set | 5000 | 9.1 | 45500 |
| 44. | SV set | 5000 | 8.1 | 40500 |
| 45. | IV Ringal lactate | 5000 | 20 | 100000 |
| 46. | IV DNS | 5000 | 20 | 100000 |
| 47. | IV 5% Detrose | 5000 | 20 | 100000 |
| 48. | IV Normal Saline | 5000 | 19.5 | 97500 |
| 49. | Inj Deltaparin 2500 IU | 100 | 135 | 13500 |
| **C** | **CONSUMABLE AND DOSPOSABLE** | | | |
| 50. | 50 cc Syring | 100 | 24.3 | 2430 |
| 51. | 20cc Syring | 100 | 11.31 | 1131 |
| 52. | 5 cc Syring | 2000 | 3 | 6000 |
| 53. | 2cc Syring 2.5 | 2000 | 2.5 | 5000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 54. | Insuline Syring BD | 5000 | 8 | 40000 |
| 55. | Ango Cath 20 | 500 | 17 | 8500 |
| 56. | Ango Cath 22 | 500 | 17 | 8500 |
| 57. | Ango Cath 24 | 500 | 21 | 10500 |
| 58. | Cotton 500 gm | 500 | 105 | 52500 |
| 59. | Gauze 45X18 | 500 | 110 | 55000 |
| 60. | Paper Sticking 2.5 cm | 100 | 350 | 35000 |
| 61. | Hand Wash 200ml | 5000 | 40 | 200000 |
| 62. | 02 Cannula Infant | 500 | 27 | 13500 |
| 63. | 02 Cannula (Adult & Infant) | 1000 | 27 | 27000 |
| 64. | Bed Pan Plastic (Male & Female) | 500 | 120 | 60000 |
| 65. | Ambu Bag Adult | 5 | 1900 | 9500 |
| 66. | ECG Chest leads (For Monitor) | 1000 | 5 | 5000 |
| 67. | Sticking Role 4 inch | 500 | 490 | 245000 |
| 68. | Kidney Tray Plastic | 100 | 40 | 4000 |
| 69. | Fix Plast | 500 | 15 | 7500 |
| 70. | Dynaplast | 100 | 225 | 22500 |
| 71. | Scizzor (6 inch) | 50 | 180 | 9000 |
| 72. | Hand Sanitizers 100 ml | 400000 | 15 | 6000000 |
| 73. | ECG Machine | 10 | 30870 | 308700 |
| 74. | Digital B.P.Apparatus | 200 | 1350 | 270000 |
| 75. | Hand Gloves Nitrile large | 300000 | 8 | 2400000 |
| 76. | Pulse Oxymeter | 1000 | 1250 | 1250000 |
| 77. | Thermal Gun | 1000 | 1650 | 1650000 |
| 78. | BMW bags (packing per kg Size26X30) | 1000 | 7 | 7000 |
| 79. | O2 Concentration Machine | 50 | 48500 | 2425000 |
| 80. | Sanitizer 500 ml | 10000 | 115 | 1150000 |
| 81. | IV infusion flow regulator | 500 | 75 | 37500 |
| 82. | Endotracheal tube 5,7,7-5,8,8.5 size each 5 | 25 | 100 | 2500 |
| 83. | Foleys catheter 10,12,14,16, size each 10 | 40 | 50 | 2000 |
| 84. | Urometer Urobags | 100 | 150 | 15000 |
| 85. | Ryles Tube 10,12,14,16 size each 5 | 20 | 23 | 460 |
| 86. | Infant Feeding Tube 6,8,10 size each10 | 30 | 12 | 360 |
| 87. | Suction Catheter size 8,10,12size each 100 | 300 | 21 | 6300 |
| 88. | IV Extension Tube 150 cm | 200 | 75 | 15000 |
| 89. | Laryngoscope with blades size 0,1,2 | 4 | 3000 | 12000 |
| 90. | Oral Airway size 4,6,8,10,12 size each 5 | 25 | 90 | 2250 |
| 91. | Oxygen mask adult | 500 | 35 | 17500 |
| 92. | Non Re Breathing Mask | 500 | 85 | 42500 |
| 93. | Xylocain Jelly | 500 | 25 | 12500 |
| 94. | ECG jelly 5 ltr | 100 | 410 | 41000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 95. | Ventillator tube set | 10 | 250 | 2500 |
| 96. | Surgical Gloves medium and large size | 5000 | 4.9 | 24500 |
| 97. | Pricking Lancet 100 pieces | 500 | 2 | 1000 |
| 98. | Jumbo Cylinder Refilling 700 cubin meter | 400 | 250 | 100000 |
| 99. | Small Cylinder Refilling 154 Cubic meter | 800 | 150 | 120000 |
| 100. | Gree Cloth (Meters) | 10000 | 40 | 400000 |
| 101. | Dispo Caps | 100000 | 1.9 | 190000 |
| 102. | Face Shields 400 Micron | 10000 | 29 | 290000 |
| 103. | Cotton Grown with cap,masks | 1000 | 189 | 189000 |
| **Total Amount** | | | | 27857445 |

सदर ई-निविदा खरेदीस परिच्छेद क्रमांक ३४ नुसार दिनांक १५.०९.२०२० रोजी मा.आयुक्त महोदयांनी मान्यता दिलेली आहे त्याअनुषंगाने मान्यता प्राप्त पुरवठा दर म्हणुन मे. दिपक डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद यांना दिनांक ०५.१०.२०२० रोजी जा.क्र./मनपा/आरोग्य/२०२०/१६९६ दिनांक ०५.१०.२०२० नुसार सदरील औषधी व साहित्याचा पुरवठा करण्यासाठी कार्यादेश देण्यात आलेला आहे व मे. पारस डाईंग ॲण्ड प्रिंटींग मिल्स,मुंबई यांना जा.क्र./आरोग्य/२०२०/१७५५ दिनांक १३.१०.२०२० नुसार साहित्य खरेदी साठी कार्यादेश देण्यात आलेला आहे. या पुरवठाधारकांनी पुरवठा केलेला असुन त्यांचा तपशील सोबत जोडण्यात येत आहे.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी लागणारी औषधी, वैद्यकिय साहित्य/उपकरणे, लॅब कंझ्युमेबल व डिस्पोजेबल इतर औषधी खरेदी साठी लागणारी खरेदी करीता तरतुद **रु.२,७८,५७,४४५/- (रुपये अक्षरी दोन कोटी अष्ठयाहत्तर लक्ष सत्तावन्न हजार चारशे पंचेचाळीस फक्त)** एवढा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी **रु.४५,२९,११२/- (रुपये पंच्चेचाळीस लक्ष एक्कोण्णतीस हजार एकशे बारा फक्त)** इतक्या खर्चाचे कार्यादेश देण्यात आलेले आहे सदरील खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव सादर व उर्वरीत **र.रु.२,३३,२८,३३३/-** एवढ्या रक्कमेस खर्चाच्या मंजुरीस मान्यतेस्तव सादर.

सद्यस्थितीमध्ये कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी लागणारी औषधी व साहित्य यांचे दर स्थानिक बाजारपेठेमध्ये कमी झालेले आहेत. करीता कमी दराने पुरवठा करण्यासाठी पुरवठाधारकास पुरवठा करण्याच्या मान्यतेस्तव सादर. तसेच इतर बाबी आवश्यकतेनुसार खरेदी करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

सदरील खर्च मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी प्राप्त निधीतुन खर्च करण्यास मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ९४/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षी कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत लागणारे औषधी, वैद्यकिय साहित्य/उपकरणे, लॅब कंझ्युमेबल व डिस्पोजेबल इतर लागणारी औषधी खरेदी करीता प्राप्त झालेल्या निविदा धारकाशी झालेल्या वाटाघाठी अंती ठरल्यानुसार रक्कम रुपये २,७८,५७,४४५/- (अक्षरी दोन कोटी अष्ठयाहत्तर लक्ष सत्तावन्न हजार चारशे पंचेचाळीस रुपये फक्त) एवढा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी रुपये ४५,२९,११२/- (पंच्चेचाळीस लक्ष एक्कोण्णतीस हजार एकशे बारा रुपये फक्त) इतक्या खर्चाचे कार्यादेश

देण्यात आलेले आहे सदरील खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव सादर व उर्वरीत रक्कम रुपये २,३३,२८,३३३/- एवढ्या रक्कमेस खर्चाच्या मंजुरीस मान्यतेस्तव सादर

सद्यस्थितीमध्ये कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी लागणारी औषधी व सहित्य चे दर सतत बदलत आहे. त्यामुळे पुरवठा धारकास खरेदी करतेवेळी स्थानिक बाजारपेठेतील दर तपासुन कार्यादेश देण्याच्या मान्यतेस्तव सादर

सदरील खर्च मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी प्राप्त निधी तुन खर्च करण्यास मान्यतेस्तव सादर

पुरवठाधारकांकडून औषधी, वैद्यकिय साहित्य/उपकरणे, लॅब कंझ्युमेबल व डिस्पोजेबल व इतर लागणारी औषधी खरेदी करणेच्या निविदेस व ई-निविदा मान्यताप्राप्त पुरवठाधारकाकडून खरेदी प्रक्रियेस व उपरोक्त देयक अदा करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२२.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हिड-१९ विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असून कोव्हिड-१९ हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे.

औरंगाबाद शहरामधील कोव्हिड-१९ विषाणु बाधित रुग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना करण्या बाबत प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात आरोग्य विभागा अंतर्गत कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपायायोजना करण्यासाठी औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.औरंगाबाद तर्फे कोव्हिड रुग्ण, डॉक्टर व इतर यांच्या वाहतूकी करीता दि.०१.०४.२०२० ते दि.३०.०९.२०२० पर्यंतच्या कालावधीची देयके एकूण रु.१,७२,८६,८१८/- (अक्षरी एक कोटी बहात्तर लक्ष शहाऐंशी हजार आठशे अठरा रुपये फक्त) एवढा खर्च अपेक्षित आहे.

दि.०१.०४.२०२० ते ३०.०९.२०२० पर्यंत पुरविलेल्या बसेसची देयके यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कालावधी | | तपशील | | |
|---|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | भाडे | जीएसटी | एकूण |
| १. | ०१.०४.२०२० | ३०.०६.२०२० | २७,५३,९१० | ४,९५,७०४ | ३२,४८,६१४ |
| २. | ०१.०७.२०२० | १५.०७.२०२० | २२,२०,८८९ | ३,९९,७६२ | २६,२०,६५१ |
| ३. | १६.०७.२०२० | ३१.०७.२०२० | २६,१९,५०२ | ४,७१,५१० | ३०,९१,०१२ |
| ४. | ०१.०८.२०२० | १५.०८.२०२० | १९,७७,५५६ | ३,५५,९६० | २३,३३,५१६ |
| ५. | १६.०८.२०२० | ३१.०८.२०२० | १८,९२,८१२ | ३,४०,७०६ | २२,३३,५१८ |
| ६. | ०१.०९.२०२० | १५.०९.२०२० | १८,२१,१९५ | ३,२७,८१५ | २३,४९,०१० |
| ७. | १६.०९.२०२० | ३०.०९.२०२० | ११,९४,४८९ | २,१५,००८ | १४,०९,४९७ |
| | | **एकूण** | **१४४८०३५३** | **२६०६४६५** | **१,७२,८६,८१८** |

स्मार्ट शहर बस ही रा.प.महामंडळ व ए.एस.डी.सी.एल.च्या संयुक्त विद्यमाने सुरु केली असून सद्यस्थितीमध्ये स्मार्ट शहर बर रा.प.महामंडळास रु.६२/- प्रति कि.मी.प्रमाणे रक्कम अदा केलेली आहे. सदरील खर्च एकूण रु.१,७२,८६,८१८/- (अक्षरी एक कोटी बहात्तर लक्ष शहाऐंशी हजार आठशे अठरा रुपये फक्त) इतका झालेला खर्च ए.एस.डी.सी.एल.(स्मार्ट सिटी) यांच्या कडून अदा करण्यात आलेला आहे. सदर खर्च ए.एस.डी.सी.एल.ला अदा करणे बाबत मा.जिल्हाधिकारी यांना मागणी करण्यास्तव

सादर तसेच निधी प्राप्त झाल्यानंतर अदा करणेस्तव व खर्चास मा.सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक ९५/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षी कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.औरंगाबाद तर्फे कोव्हिड रुग्ण, डॉक्टर व इतर यांच्या वाहतुकीकरीता दि.०१.०४.२०२० ते ३०.०९.२०२० पर्यंतच्या कालावधीची देयके सदरील खर्च एकूण रु.१,७२,८६,८१८/- (अक्षरी एक कोटी बहात्तर लक्ष शहाऐंशी हजार आठशे अठरा रुपये फक्त) इतका झालेला खर्च ए.एस.डी.सी.एल.(स्मार्ट सिटी) यांच्या कडून अदा करण्यात आलेला आहे. सदर खर्च ए.एस.डी.सी.एल.ला अदा करणे बाबत मा.जिल्हाधिकारी यांना मागणी करण्यास्तव सादर तसेच निधी प्राप्त झाल्यानंतर सदरील खर्च औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.औरंगाबाद यांना अदा करणेच्या मान्यतेस्तव सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२२.०२.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हिड-१९ या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असून कोव्हिड-१९ हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे. औरंगाबाद शहरामधील कोव्हिड-१९ विषाणु बाधित रुग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना करण्या बाबत प्रस्ताव सादर करीता आहेत की, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत लागणारे Tripler Layer face masks, Personal Protection Kits, Masks N-95, VTM Kits, Oxygen Cylinder With Trolly, Humidifier and flow meter व इतर लागणारी औषधी खरेदी करीता ई.निविदा दिनांक ०३.०६.२०२० रोजी मागविण्यात आली होती. त्यानुसार खरेदी करावयाच्या ई-निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नाव | वस्तुचे नाव | दर | संख्या | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १. | सिध्दटेक हेल्थ केअर | Tripler Layer face masks | 4.00 | 75000 | 262500 |
| २. | एज्युकेशन ॲण्ड रिसर्च ॲण्ड कंपनी | Personal Protection Kit | 438.90 | 7400 | 3145000 |
| ३. | कॉपी क्लासिक | Masks N-95 | 59.00 | 5000 | 190000 |
| ४. | भगवती फिडस् प्रा.लि. | VTM Kits | 135.98 | 50000 | 5499980 |
| ५. | सुहदम आर्थो | Oxygen Cylinder with Trolly, Humidifier and flow meter | 12331 | 100 | 1200000 |
| ६. | इतर अनुषंगिक औषधी व साहित्य खरेदीसाठी लागणारा खर्च | दरपत्रकावर | -- | -- | 2202520 |
| | | | | **एकूण** | **12500000** |

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत लागणारी व Tripler Layer face masks, Personal Protection Kits, Masks N-95, VTM Kits, Oxygen Cylinder With

Trolly, Humidifier and flow meter लागणारी तरतुद रु.१,२५,००,०००/- (अक्षरी एक कोटी पंचवीस लक्ष रुपये फक्त) एवढा खर्च करण्यात आलेला आहे.

सदरील खर्च मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी प्राप्त निधीतून भागविण्यात आलेला आहे.

सदरील खरेदी साठी ई-निविदा सादर करण्यात आलेली आहे. त्यानुसार कमी दराने पुरवठा करणाऱ्या पुरवठा धारकाकडून खरेदी करण्यात आलेली आहे. त्यासाठी रु.१,२५,००,०००/- (अक्षरी एक कोटी पंचवीस लक्ष रुपये फक्त) एवढा खर्चासाठी मान्यतेस्तव सादर.

करीता सदरील खर्चास मा.सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक ९६/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षी कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत लागणारे Tripler Layer face masks,Personal Protection Kits,Masks N-95,VTM Kits,Oxygen Cylinder With Trolly,Humidifier and flow meter व इतर लागणारी औषधी खरेदी करीता प्राप्त झालेल्या निविदा धारकाशी वाटाघाटी अंती ठरल्यानुसार र.रु.१,२५,००,०००/- पुरवठा धारकांकडून Tripler Layer face masks, Personal Protection Kits,Masks N-95,VTM Kits,Oxygen Cylinder With Trolly, Humidifier and flow meter व इतर लागणारी औषधी व साहित्य खरेदी करण्याच्या ई-निविदेस व करण्यात आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०१.०३.२०२१)**

प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.प्रविण रांजणगांवकर, नोंदणी लिपीक, आरोग्य विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वत:च्या कोवीड-१९ च्या आजारावर उपचारासाठी खाजगी रुग्णालय धूत हॉस्पीटल, जालना रोड, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून र.रू.४,५०,५७१/- (चार लाख पन्नास हजार पाचशे एकाहत्तर रूपये फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून कोवीड-१९ या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.४,५०,५७१/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.७४,१७३/- वजा जाता रु.३,७६,३९८/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या ९०% रु.३,३८,७५८/- इतकी होते. एकुण खर्चाच्या ५% र.रु.२२,५२८/- ही मनपा फंडात जमा करुन मंजुर देय र.रु.३,१६,२३०/- संबंधितास अदा करावयाची आहे.

संबंधिताने धूत हॉस्पीटल, जालना रोड, औरंगाबाद येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-२०२०/प्र.क्र.६६/राकावि-२, नवीन इमारत मंत्रालय मुंबई, दि.१७/१२/२०२० नुसार परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या कोवीड-१९ या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालया प्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. सदरच्या प्रस्तावाची पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करिता श्री.प्रविण रांजणगांवकर, नोंदणी लिपीक, आरोग्य विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.३,१६,२३०/- संबंधिताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक ९७/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, श्री.प्रविण रांजणगांवकर, नोंदणी लिपीक, आरोग्य विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या कोवीड-१९ या आजारावर खाजगी रुग्णालय धूत हॉस्पीटल औरंगाबाद येथे उपचार घेतलेला आहे. नियमाप्रमाणे एकुण र.रु.३,१६,२३०/- खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. सदर रक्कम संबंधितास अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९८/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०२.०३.२०२१)**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत विविध ईमारतींवर मोबाईल कंपन्यांनी मोबाईल टॉवर उभारले आहेत. अशा टॉवरला महाराष्ट्र प्रादेशीक नगर रचना कायद्याअंतर्गत टॉवर उभारण्याची परवानगी घेणे तसेच महाराष्ट्र मनपा अधिनियम अंतर्गत मालमत्ता कर आकारणी व वसुली होणे आवश्यक असते. हे काम व्यावसायीक पध्दतीने करणे महानगरपालिकेच्या सध्या उपलब्ध यंत्रणेसाठी जिकरीचे काम ठरत आहे. परिणामी विविध तांत्रीक व कायदेशीर मुद्यांमुळे मोबाईल टॉवर कंपन्यांकडील महसुलाची मोठी रक्कम वसुल होत नसल्याचे दिसुन येत आहे. मोबाईल टॉवर कंपन्यांकडील महसुल वसुल होण्याच्या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत, विहीत करण्यात आलेल्या अटी शर्तीच्या आधीन राहुन म.प्रा.न.र.कायद्याअंतर्गत टॉवर उभारण्याची परवानगी देण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची तसेच म.मनपा अधिनियम अंतर्गत मालमत्ता कर आकारणीसाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करून घेणे इत्यादींसाठी खाजगी अभिकर्ता नियुक्त करणे आवश्यक आहे. अशा नियुक्त खाजगी अभिकर्त्याने पुढील कार्यवाही करणे अपेक्षीत असेल.

१. महानगरपालिका हद्दीतील सध्या अस्तिवात असलेल्या मोबाईल टॉवरचे सर्वेक्षण करुन त्यांची कंपन्या, उभारणी दिनांक, टॉवरचे तंत्रिक वर्णन, उभारलेल्या जागेची कायदेशीर कागदपत्रे तसेच महाराष्ट्र मनपा अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशीक नगर रचना कायद्याअंतर्गत आवश्यक मुद्दे निहाय सविस्तर यादी तयार करणे व ती महानगरपालिकेस सादर करणे. प्रचलीत पध्दतीने लागु असलेल्या दराने मोबाईल टॉवरची एकुण मालमत्ताकर मागणी निश्चित करणे.
२. भविष्यात हद्दीत उभारल्या जाणाऱ्या मोबाईल टॉवरच्या परवानगी व कर आकारणी प्रस्तावाबाबत आवश्यक ती सर्व कायदेशीर कागदोपत्री प्रक्रिया पुर्ण करुन देणे.
३. महानगरपालिका हद्दीत सध्या अस्तित्वात असलेल्या व भविष्यात उभारल्या जाणऱ्या माबाईल टॉवर वर लक्ष ठेऊन त्यांच्या कडील मालमत्ताकर वसुली तसेच परवानगी नुतनीकरण इत्यादीसाठी महापालिकेस आवश्यक ते कायदेशीर सहाय्य करणे.
४. विनापरवानगी अनधिकृतरित्या उभारल्या जात असलेल्या माबाईल टॉवरबाबत कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी अतिक्रमण विभागास आवश्यक ते कायदेशीर सहाय्य करणे.
५. मा.न्यायालयात दाखल दाव्यांमध्ये बाजु मांडण्यासाठी महानगरपालिकेस मागणीनुसार आवश्यक तो कायदेशीर सल्ला व कागदपत्रे पुरवणे.

करीता अटी शर्तीच्या अधीन राहुन मोबईल टॉवर उभारणी व कर वसुली कामी सहाय्य करणेसाठी उपरोक्त तसेच इतर आवश्यक बाबींची पुर्तता करण्यासाठी निविदेद्वारे खाजगी अभिकर्ता नेमण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ९८/२०२१:-**

प्रस्तावात उपरोक्तप्रमाणे दर्शविल्यानुसार, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत म.प्रा.न.र. कायद्याअंतर्गत टॉवर उभारण्याची परवानगी देण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची तसेच म.मनपा अधिनियम अंतर्गत मालमत्ता कर आकारणीसाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन घेणे, कर

वसुलीकामी सहाय्य करणे तसेच इतर आवश्यक बाबींची पुर्तता करण्यासाठी खाजगी अभिकर्ता नेमण्यासाठी विहीत करण्यात आलेल्या अटी शर्तीच्या आधीन राहुन निविदा प्रक्रिया करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९९/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०२.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो कि, श्री.कैलास गंगाराम गरूड, चौकिदार उद्यान विभाग मनपा औरंगाबाद यांनी त्यांच्या ह्रदयाचे आजार (Prtheumatic Heart Disease With Severe MS With Tricuspid Valve Disease) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रुग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पिटल औरंगाबाद येथे उपचार केलेला असून र.रु.५,१९,४७०/- (अक्षरी पाच लक्ष एकोणावीस हजार चारशे सत्तर रुपये) इतका खर्च केला आहे.

महानगरपालिका वैद्यकिय परतावा विनियमामध्ये या आजाराचा आकस्मिक आजार म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.१६.११.२०११ मध्ये परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयाल घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शसकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपूर्ती अनूज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयांच्या यादीमध्ये उक्त रुग्णालयाचे नांव समाविष्ट आहे.

त्यानुषंगाने संबंधिताने सदर आजारपणावर केलेल्या वैद्यकिय खर्च रु.५,१९,४७०/- एवढा खर्च झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.५,०५,०६७/- एवढी असून सदरील अनुज्ञेय रक्कमेच्या ९० टक्के र.रु.४,५४,५६०/- (अक्षरी चार लक्ष चोपन्न हजार पाचशे साठ रुपये) पैकी ५ टक्के र.रु.२५,९७३/- (अक्षरी पंचवीस हजार नऊशे त्र्याहत्तर रुपये फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.५,१९,४७०/-च्या ५ टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत र.रु.४,२८,५२७/- अग्रीम रक्कम रु.१,५०,०००/- वजा जाता एकुण शिल्लक र.रु.२,७८,५८७/-(अक्षरी रु. दोन लक्ष अठ्याहत्तर हजार पाचशे सत्याऐंशी रुपये फक्त) रक्कम देय आहे.

करिता श्री.कैलास गंगाराम गरुड, चौकीदार उद्यान विभाग यांना अनुज्ञेय असलेली र.रु.२,७८,५८७/- (अक्षरी दोन लक्ष अठ्याहत्तर हजार पाचशे सत्याऐंशी रुपये फक्त) या वैद्यकिय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक ९९/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्यानूसार, श्री.कैलास गंगाराम गरुड, चौकीदार, उद्यान विभाग मनपा औरंगाबाद यांनी त्यांच्या ह्रदयाचे आजार (Prtheumatic Heart Disease With Severe MS With Tricuspid Valve Disease) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रुग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पिटल औरंगाबाद येथे उपचार केलेला असून र.रु.५,१९,४७०/- (अक्षरी पाच लक्ष एकोणावीस हजार चारशे सत्तर रुपये) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.५,०५,०६७/- एवढी असून सदरील अनुज्ञेय रक्कमेच्या ९० टक्के र.रु.४,५४,५६०/- (अक्षरी चार लक्ष चोपन्न हजार पाचशे साठ रुपये) पैकी ५ टक्के र.रु.२५,९७३/- (अक्षरी पंचवीस हजार नऊशे त्र्याहत्तर रुपये फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.५,१९,४७०/-च्या ५ टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत र.रु.४,२८,५२७/- अग्रीम रक्कम रु.१,५०,०००/- वजा जाता एकुण शिल्लक र.रु.२,७८,५८७/-(अक्षरी दोन लक्ष अठ्याहत्तर हजार पाचशे सत्याऐंशी रुपये फक्त) रक्कम देय आहे.

करिता श्री.कैलास गंगाराम गरूड, चौकीदार, उद्यान विभाग यांना अनुज्ञेय असलेली र.रु.२,७८,५८७/-(अक्षरी दोन लक्ष अठ्याहत्तर हजार पाचशे सत्याऐंशी रुपये फक्त) या वैद्यकिय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १००/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०३.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कांचनवाडी येथे UIDSSMT या योजनेअंतर्गत १६१.० द.ल.ली.क्षमतेचे मल-जल प्रक्रिया केंद्र (STP) बांधण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत सदर मल-जल प्रक्रिया केंद्र योग्य रितीने सुरु असून दररोज सरासरी ६० ते ६५ द.ल.ली.पाण्यावर SBR टेक्नॉलॉजी द्वारे प्रक्रिया केली जाते व प्रक्रिया केल्यानंतर सदरील पाणी सद्या नदीमध्ये सोडण्यात येते. सदरील Secondary Treatment व्दारे प्राप्त होणाऱ्या पाण्यावर Tertiary Treatment करुन मिळणारे शुध्द पाणी (Treated Water) वाळुज औद्योगीक क्षेत्र व इतर भागाकरीता/बाबींकरीता पुरविण्यासाठी कांचनवाडी मल-जल प्रक्रिया केंद्र परिसरात Tertiary Treatment Plant उभारण्याचे नियोजन आहे. या करीता प्रथम प्रायोगिक तत्वावर ०२ द.ल.ली. क्षमतेचा Tertiary Treatment Plant उभारणे व शुध्द केलेल्या पाण्याचा वापर वाळुज औद्योगीक क्षेत्र व सदरील पाणी वापरणे पूरक क्षेत्र इत्यादीं करीता देण्याचे प्रस्तावित आहे. हा प्रयोग सफल झाल्यास टप्याटप्याने पुर्ण क्षमतेचा Tertiary Treatment Plant उभारता येईल. सदर कामांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, निविदा पुर्व कामे करणे व निविदा पश्चात कामे करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नेमणुक करणे आवश्यक आहे.

करीता या कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नियुक्ती करण्यासाठी निविदा कार्यवाही करणे व अनुषंगीक कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक १००/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कांचनवाडी मल-जल प्रक्रिया केंद्र परिसरात प्रायोगिक तत्वावर ०२ द.ल.ली. क्षमतेचा Tertiary Treatment Plant उभारणे व पाण्याचा वापर वाळुज औद्योगीक क्षेत्र व सदरील पाणी वापरणे पूरक क्षेत्र इत्यादींकरीता करणे, हा प्रयोग सफल झाल्यास टप्याटप्याने पुर्ण क्षमतेचा Tertiary Treatment Plant उभारण्याच्या कामांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, निविदा पुर्व कामे करणे व निविदा पश्चात कामे करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नेमणुक करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०१/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१५.०३.२०२१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद येथे सिडको एम.जी.एम.परीसरातील प्रियदर्शनी उद्यानामध्ये स्व.मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक व स्मृतीवन उभारणे या कामास शासन निर्णय दि.०९ मार्च २०२० नुसार र.रु.२५.४९ कोटीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. प्रशासकीय मान्यता रक्कमेच्या मर्यादेत तयार केलेल्या अंदाजपत्रकामध्ये संरक्षण भिंती करीता चैनलिंक फेन्सिंगची तरतुद केलेली आहे. प्रस्तावित स्मृतीवन व स्मारकाचे मांगल्य तसेच पावित्र्य राखण्यासाठी संरक्षणाच्या दृष्टिने चैनलिंक फेन्सिंग ऐवजी पक्क्या स्वरुपात आर.सी.सी.मध्ये संरक्षीत भिंत बांधणे आवश्यक आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक विभागाच्या SSR दरसुची सन २०२०-२१ नुसार र.रु.१,९६,००,०००/- चे तयार करण्यात आलेले असून सदर कामासाठी आवश्यक असणारा खर्च हा शासन अनुदानातून प्रस्तावीत आहे.

करीता सदरील कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक १०१/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, सिडको एम.जी.एम.परिसरातील प्रियदर्शनी उद्यानामध्ये स्व.मा. बाळसाहेब ठाकरे स्मृतीवन व स्मारक उभारणेच्या जागेस शासकीय अनुदानामधून आर.सी.सी. मध्ये संरक्षण भिंत बांधणेच्या र.रु.१,९६,००,०००/-इतकेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०२/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१७.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील मोबाईल टॉवरचा मालमत्ता कर मोठ्या प्रमाणात थकीत असून मोबाईल टॉवर कंपन्यांनी मा.न्यायालयात याचिका दाखल केल्यामुळे वसुली होत नव्हती. मा.न्यायालयात दाखल असलेल्या रिट याचिका क्र.४३३४/२०१९,४३३५/२०१९,२५६०/२०१९,२७/२०२०, २१२९/२०२१ या प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालयात मनपाच्या वतीने कायदेशीर बाजू मांडण्यासाठी श्री.संभाजी टोपे यांची विधीज्ञ म्हणुन नेमणुक केलेली आहे.

न्यायालयीन प्रकरणामध्ये मोबाईल कंपन्यांकडून र.रु.१,७८,११,३३५/- वसुल झालेली असून उर्वरित प्रकरणात वसुलीची कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे मा.न्यायालयाकडून वसुलीस स्थगिती मिळू नये म्हणुन प्रकरणामध्ये मनपाचे विधीज्ञ हे सतत प्रयत्नशील आहेत. त्यामुळे यावर्षी या प्रकरणांमध्ये स्थगिती मिळालेली नाही.

मोबाईल टॉवर मालमत्ता कर वसुली प्रकरणामध्ये ॲड.श्री.संभाजी टोपे यांनी विशेष फीसची मागणी केली. त्यास अनुसरून विधीज्ञांना विशेष फीस अदा करण्याबाबत मा.प्रशासक महोदय यांचे मान्यतेसाठी संचिका सादर केली असता, प्रथमत: रु.५.०० लक्ष (रु.पाच लक्ष फक्त) अदा करण्यास मान्यता मिळालेली आहे. तसेच उर्वरित फीस देण्याबाबत पुन्हा प्रस्तावीत करण्याचे मा.प्रशासक, महोदय यांनी सुचित केले आहे

मा.प्रशासक महोदयांच्या मान्यतेप्रमाणे ॲड.श्री.संभाजी टोपे यांना तुर्त रु.५.०० लक्ष विशेष फी पोटी अदा करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १०२/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील मोबाईल टॉवरचा मालमत्ता कर मोठ्या प्रमाणात थकीत असून मोबाईल टॉवर कंपन्यांनी मा.न्यायालयात दाखल असलेल्या रिट याचिका क्र.४३३४/२०१९, ४३३५/२०१९,२५६०/२०१९,२७/२०२०,२१२९/२०२१ या प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालयात मनपाच्या वतीने कायदेशीर बाजू मांडण्यासाठी श्री.संभाजी टोपे यांची विधीज्ञ म्हणुन नेमणुक केलेली असून न्यायालयीन प्रकरणामध्ये मोबाईल कंपन्यांकडून र.रु.१,७८,११,३३५/- वसुल झालेली आहे. उर्वरित प्रकरणात वसुलीची कार्यवाही सुरु आहे. मा.न्यायालयाकडून वसुलीस स्थगिती मिळू नये म्हणुन प्रकरणामध्ये मनपाचे विधीज्ञ हे सतत प्रयत्नशील असून यावर्षी या प्रकरणांमध्ये स्थगिती मिळालेली नाही. मोबाईल टॉवर मालमत्ता कर वसुली प्रकरणामध्ये ॲड.श्री.संभाजी टोपे यांनी विशेष फीसची मागणी केली. त्यानुसार त्यांना प्रथमत: रु.५.०० लक्ष (रु.पाच लक्ष फक्त) अदा करण्यास तसेच उर्वरित फीस देण्याबाबत पुन्हा प्रस्तावित करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०३/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१८.०३.२०२१)**

प्रस्तावात सादर करण्यात येतो की, समर्थनगर मंजुर रेखांकनात सर्व भुखंडाच्या मागील बाजुस १५ फुट रुंद गल्ली ही मैला व घाण वाहून नेण्यासाठी ठेवण्यात आलेली होती. या गल्लीचा प्रत्यक्षात

कोणताही वापर होत नसल्यामुळे कार्यालयाने प्रस्ताव क्रमांक १०७/१९९५ दि.२२.०२.१९९५ नुसार धोरणात्मक निर्णय घेऊन या गल्लीची जागा केवळ चटई क्षेत्र निर्देशांक वाढविण्यासाठी व त्या गल्लीचा केवळ सामासिक अंतर म्हणुन उपयोग करण्यासाठी देय केले. त्याच धर्तीवर एस.बी.कॉलनी या मंजुर रेखांकनातील भुखंड क्र-३९ न.भु.क्र.४८९६ व भुखंड क्र-४० न.भु.क्र.४८९३,४८९४,४८९५ यांच्यामधील ४.५० मी.रुंद गल्लीची जागा ज्याचे क्षेत्र प्रत्येकी २.२५X१३.७१ मीटर असून दोन्ही बाजुच्या मिळकत धारकांना अर्धी-अर्धी देण्याचा प्रस्ताव आहे.

प्रस्ताव मान्यता झाल्यास पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येईल.

**<u>ठराव क्रमांक १०३/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एस.बी.कॉलनी या मंजुर रेखांकनातील भुखंड क्र-३९ न.भु.क्र.४८९६ व भुखंड क्र-४० न.भु.क्र.४८९३,४८९४,४८९५ यांच्यामधील ४.५० मी.रुंद गल्लीची जागा प्रत्यक्षात बाजुचे मिळकतधारक वापरत असल्याने या मिळकतधारकांना प्रत्येकी अर्धी-अर्धी केवळ चटई क्षेत्र निर्देशांक वाढविण्यासाठी व त्या गल्लीचा केवळ सामासिक अंतर म्हणुन उपयोग करण्यासाठी सिध्द शिघ्र गणक दराच्या दुप्पट दराने आकारणी करून वापरास देण्याची परवानगी देण्यात येते. या जागेवर लगतच्या भुखंडधारकांना कोणतेही विकास परवानगी दिली जाणार नाही.

**<u>विषय क्रमांक १०४/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१९.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मातोश्री लॉन्स ते मिनी घाटी, चिकलठाणा, औरंगाबाद (विमानतळा समोर) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत रस्ता रुंदीकरण, उड्डाणपुल बांधकाम प्रस्तावीत आहे. सद्यस्थितीत कामे सुरु झालेली आहेत. या ठिकाणी महानगरपालिकेच्या अस्तित्वातील २००,३०० मी.मी.व्यासाच्या जलवाहिन्या रस्ता, उड्डाणपुल मध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजुने बाधीत होत आहेत. सदर ठिकाणी जलवाहिन्या स्थलांतरीत करणे, बदलण्याचे काम प्राधिकरणामार्फत त्यांच्या कंत्राटदाराकडून करण्यात येत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र.२१७० दि.२९.१२.२०२० नुसार कळविले आहे. याच पत्रामध्ये अंदाजपत्रकाला मान्यता देण्याची विनंती केली आहे.

सदर कामाचे सन २०१९-२०२० च्या मजिप्रा दरसुचिनुसार रु.१,१८,८०,०००/- ढोबळ किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले आहे. करीता, मातोश्री लॉन्स ते मिनी घाटी, चिकलठाणा, औरंगाबाद (विमानतळासमोर) अस्तित्वातील २००, ३०० मी.मी.व्यासाच्या रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करणे बाबत अंदाजपत्रक र.रु.१,१८,८०,०००/- मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १०४/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मातोश्री लॉन्स ते मिनी घाटी, चिकलठाणा, औरंगाबाद (विमानतळा समोर) अस्तित्वातील २००, ३०० मी.मी.व्यासाच्या रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या जलवाहीन्या स्थलांतरीत करणे बाबतचे अंदाजपत्रक र.रु.१,१८,८०,०००/- मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १०५/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१९.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-१९) या विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रातील शहरात वेगाने पसरत असल्याचे निर्दशनास आले आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदे १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन त्या बाबतची नियमावली तयार केली आहे. कोरोना बाधित

रुग्णांची संख्या औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणुच्या संसर्गात अधिक वाढ होऊ न देता तात्काळ उपाय योजना करणे आवश्यक आहे.

कोव्हिड-१९ मुळे अभुतपुर्व आणि अकल्पनीय परिस्थिती उद्‌भवलेली आहे. याकरीता कंत्राटी पध्दतीने ठराविक वेतनावर वैद्यकीय अधिकारी, दंतरोगतज्ञ, स्टाफ नर्स, लॅब टेक्नीशीयन व इतर कर्मचारी स्वत:चा जीव धोक्यात घालून सेवा बजावत आहेत. सदरील अधिकारी व कर्मचारी स्वॅब टेस्टींग व प्रत्यक्ष रुग्णांना आरोग्य सेवा देत आहेत.

मा.प्रशासक यांनी “स्वॅब आपल्या दारी” ही योजना सुरु केली असून त्यामध्ये विविध ठिकाणी लोकांच्या घरी जाऊन स्वॅब तपासणी केलेली आहे. सदरील अधिकारी व कर्मचारी हे जोखमीच्या परिस्थितीमध्ये घरी गेल्यास घरातील इतर व्यक्तींना संसर्ग होण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यामूळे हॉटेलमध्ये राहण्याची जेवण, नाश्त्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.सदरील बाबींकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (सी) तरतुदीनुसार मान्यता देण्यात येते.

| अ.क्र. | हॉटेलचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | हॉटेल रविराज, औरंगाबाद | रु.४६.६१ लक्ष |
| २. | हॉटेल जेन्टलमेन, औरंगाबाद | रु.१०.५१ लक्ष |
| ३. | हॉटेल ७ ॲपल, औरंगाबाद | रु.२.३५ लक्ष |
| ४. | हॉटेल क्लिक (झीरीकॉन हॉटेल प्रा.लि.), | रु.२.३७ लक्ष |
| | **एकूण** | **रु.६१.८४ लक्ष** |

सदरील खर्च हा कोव्हिड-१९ करीता उपलब्ध एचडीआरएफ किंवा कोव्हिडच्या अनुदानातून करण्यात आलेला आहे. अधिकारी व कर्मचारी यांना नाश्ता, जेवण व राहणे या करीता झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १०५/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-१९) या विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केलेला आहे. अभुतपुर्व आणि अकल्पनीय परिस्थिती उद्‌भवलेली आहे. सदरील आपत्कालीन परिस्थितीमध्ये अधिकारी व कर्मचारी कार्य करीत आहेत. घरातील इतर व्यक्तींना संसर्ग होण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे हॉटेलमध्ये राहण्याची, जेवण व नाश्त्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदरील हॉटेल देयक हॉटेल रविराज, औरंगाबाद-रु.४६.६१ लक्ष, हॉटेल जेन्टलमेन, औरंगाबाद-रु.१०.५१ लक्ष, हॉटेल जेन्टलमेन, औरंगाबाद-रु.२.३५ लक्ष, हॉटेल क्लिक (झीरीकॉन हॉटेल प्रा.लि.)-रु.२.३७ लक्ष सदरील खर्च हा कोव्हिड-१९ करीता उपलब्ध एचडीआरएफ किंवा कोव्हिडच्या अनुदानातून अदा करण्यासाठी कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०६/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२३.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.सुभाष मोटे, शाखा अभियंता हे दि.३१.०७.२०२० रोजी सेवानिवृत्त झाले असून त्यांचे जागेवर कोणीही तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नसल्याने व कोरोना प्रभावामुळे कर वसुलीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०२०/९३४ दि.११.०९.२०२० अन्वये श्री.सुभाष मोटे, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांची सेवा ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त

अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्त पुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकुण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता अणि अंशराशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा रु.४०,०००/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील. या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.१०.०३.२०२१ रोजी संपत असून झोन कार्यालयात त्यांचे जागेवर कोणीही तांत्रिक कर्मचारी सद्यस्थितीत उपलब्ध नाही. तसेच झोन अधिकारी यांनी कर निर्धारक व संकलक यांचेमार्फत सादर केलेल्या अहवालानुसार श्री.सुभाष मोटे यांनी मालमत्ता करासंदर्भात सोपविण्यात आलेली कामे योग्य प्रकारे पार पाडली असून त्यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकत आहे.

करीता, श्री.सुभाष मोटे, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांना दोन दिवसांची तांत्रिक खंड देऊन दि.१२.०३.२०२१ पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.११.०९.२०२० च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १०६/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०२०/९३४ दि.११.०९.२०२० अन्वये श्री.सुभाष मोटे, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांची सेवा ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकुण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंश राशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा रु.४०,०००/-(रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील. या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.१०.०३.२०२१ रोजी संपत असून झोन अधिकारी यांनी कर निर्धारक व संकलक यांचेमार्फत सादर केलेल्या अहवालानुसार श्री.सुभाष मोटे यांनी मालमत्ता करासंदर्भात सोपविण्यात आलेली कामे योग्य प्रकारे पार पाडली असून त्यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे.

करीता, श्री.सुभाष मोटे, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.१२.०३.२०२१ पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.११.०९.२०२० च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १०७/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२३.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा-देवळाई परिसर औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये दि.१८.०१.२०१६ रोजी नव्याने समाविष्ट झालेला आहे. सातारा-देवळाई भागाचा शहरातील इतर भागांमध्ये सर्वकष विकास होण्याच्या दृष्टिने तसेच तेथील नागरीकांना किमान नागरी सोयी सुविधा मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे या भागातील रस्ते विकसीत करणे, खुल्या जागा विकसीत करणे, गार्डन विकसीत करणे, स्मशानभुमी व कब्रस्तान विकसीत करणे, इमारती बांधकामे, ब्रिज/कल्व्हर्ट विकसीत करण्याची कामे करण्यासाठी केंद्र व राज्य शासन निर्णय/मार्गदर्शन तत्वे/परिपत्रकाच्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करणे, प्रकल्प मंजुरी अंती प्रकल्पावर देखरेखीची कामे (निविदा पुर्व कामे व निविदा पश्चात कामे) करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी.) यांची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आली. या कामासाठी चौथ्या

वेळेस ई-निविदा मागविलेली असता, WAPCOS Ltd.(A Govt of India Undertaking) यांची एक निविदा प्राप्त आहे.

निविदेत प्राप्त दर :-

1. Preparation of DPR and Bid Process Management 0.65% of Project Cost
2. Project Management Consultancy 1.12% of Project Cost

Total 1.77% of Project Cost
(Including GST as applicable)

प्रकरणात जास्तीचा दर वाटत असल्याने महानगरपालिकेच्या निविदा मंजुरी समिती समोर दराची वाटाघाटी होऊन खाली दिलेले दर अंतिम करण्यात आले.

3. Preparation of DPR and Bid Process Management 0.60% of Project Cost
4. Project Management Consultancy 1.00% of Project Cost

Total 1.60% of Project Cost
(Including GST as applicable)

करीता, WAPCOS Ltd.(A Govt of India Undertaking) यांची निविदा पुर्व कामे करण्यासाठी प्रकल्प किंमतीच्या ०.६० टक्के दराने व निविदा पश्चात कामे करण्यासाठी प्रकल्प किंमतीच्या १.०० टक्के असे एकूण प्रकल्प किंमतीच्या १.६० टक्के (Including GST as applicable) दराने काम करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

संदर्भ:-टेंडर क्र.2019AMCA-459451-4

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता-१ |
| २ | कामाचे स्वरुप | सातारा देवळाई भागासाठी रस्ते, खुल्या जागा, गार्डन, स्मशान भुमी, कब्रस्तान विकसीत करणे इ.कामांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून देखरेखीची कामे करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी.) यांची नियुक्ती करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | लागू नाही. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | --- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दचा दिनांक | ई-निविदा विभाग महानगरपालिका औरंगाबाद |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.०३.०३.२०२० ते दि.०९.०३.२०२० |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.१३.०३.२०२० |
| ६ | एकुण किती टेंडर्स आली? | चौथी वेळ - एक निविदा |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यांत द्यावी.)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| १ | WAPCOS Ltd. (A Govt. of India Undertaking) | ---- | दराच्या वाटाघाटी अंती<br>१. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | निविदा पुर्व कामे करणे.-०.६० टक्के प्रकल्प किंमतीच्या<br>२. निविदा पश्चात कामे-१.०० टक्के प्रकल्प किंमतीच्या एकूण-१.६० टक्के प्रकल्प किंमतीच्या (Including GST as applicable) |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | सदर दर हे शासन निर्णयात नमुद मर्यादेत आहेत. |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पाहणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मनपा तरतुद |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर पान क्रमांक द्यावा. | |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | लागू नाही. |

तरी विषयांकीत प्रकरणी निविदाधारक WAPCOS Ltd.(A Govt of India Undertaking) यांच्याकडून वाटाघाटी अंती सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे (डी.पी.आर.) व निविदा पुर्व कामे करणेसाठी प्रकल्प किंमतीच्या ०.६० टक्के दराने व निविदा पश्चात कामे करण्यासाठी प्रकल्प किंमतीच्या १.०० टक्के असे एकूण प्रकल्प किंमतीच्या १.६० टक्के (Including GST as applicable) दराने कम करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारास्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १०७/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सातारा-देवळाई भाग औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेला असून या भागाचा शहरातील इतर भागांप्रमाणे सर्वकष विकास होण्याच्या दृष्टिने या भागातील रस्ते, खुल्या जागा, गार्डन, स्मशानभुमी व कब्रस्तान विकसीत करणे, इमारती बांधकामे ब्रीज/कल्व्हर्ट विकसीत करण्याची कामे इ.कामे करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करणे, प्रकल्प मुंजरी अंती प्रकल्पावर देखरेखीची कामे (निविदा पुर्व कामे व निविदा पश्चात कामे) करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार (पी.एम.सी.) यांची नियुक्ती करण्यासाठी चौथ्या वेळेस ई-निविदा मागविली असता, WAPCOS Ltd. (A Govt of India Undertaking) यांची एक निविदा प्राप्त आहे. संबंधीतांसोबत केलेल्या वाटाघाटी अंती सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे (डी.पी.आर.) व निविदा पुर्व कामे करण्यासाठी प्रकल्प किंमतीच्या ०.६० टक्के दराने व निविदा पश्चात कामे करण्यासाठी प्रकल्प किंमतीच्या १.०० टक्के असे एकूण प्रकल्प किंमतीच्या १.६० टक्के

(Including GST as applicable) दराने काम करून घेण्यास व करार करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १०८/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२३.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-२ राबविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दि.११.०१.२००७ विषय क्रमांक ६५५/४ नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरील कार्यक्रम २००७ ते २०१२ या कालावधी करीता होता. प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर मनपातर्फे प्रकल्पाचा भार सोसण्यास व कार्यक्रम नियमित स्वरुपात राबविण्यास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. मा.अतिरीक्त संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे पत्र जा.क्र.राकुकका/अर्बनआरसीएच/कक्ष-१७/२०१७२-४४/०७ दि.२६.०३.२००७ प्रकल्प राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे.

वाढती लोकसंख्या, मातामृत्यु व बालमृत्यु एकुण प्रजनन दर कमी करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याचप्रमाणे गरोदर माता, बालके, किशोरवयीन मुले व मुली यांच्याकरीता विविध आरोग्य सेवा सुविधा देण्यासाठी निरनिराळे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविले जातात. मा.स्थायी समिती सभा दि.०४.०८.२०२० विषय क्रमांक अन्वये आरसीएच-२ अंतर्गत कार्यरत एकुण २६ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दि.०५.०८.२०२० ते ३१.०१.२०२१ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरील मुदतवाढ दि.३१.०१.२०२१ रोजी संपुष्टात येत आहे. खालील सर्व पदे नियमित स्वरुपात न ठेवल्यास आरोग्स सेवा विस्कळीत होईल. यामुळे सर्व पदांची आवश्यकता आहे. सध्या कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या ठराविक वेतनाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम | ठराविक वेतन |
|---|---|---|---|
| १. | डॉ.वैशाली मुदगडकर | महिला वैद्यकीय अधिकारी | रु.६०,०००/- |
| २. | श्रीमती जया उघडे | स्टाफ नर्स | रु.२०,०००/- |
| ३. | श्रीमती सुनिता गणपत नरवडे | स्टाफ नर्स | रु.२०,०००/- |
| ४. | श्रीमती विद्या राजु शर्मा | स्टाफ नर्स | रु.२०,०००/- |
| ५. | श्रीमती ज्योती रामचंद्र बनकर | स्टाफ नर्स | रु.२०,०००/- |
| ६. | श्रीमती मेरी पाखरे | स्टाफ नर्स | रु.२०,०००/- |
| ७. | श्रीमती ज्योती चव्हाण | एएनएम | रु.१७,०००/- |
| ८. | श्रीमती द्रोपदी डक | एएनएम | रु.१७,०००/- |
| ९. | श्रीमती लक्ष्मी पाटील | एएनएम | रु.१७,०००/- |
| १०. | श्रीमती मिनाक्षी डोंगरे | एएनएम | रु.१७,०००/- |
| ११. | श्रीमती रेखा नायमाने | एएनएम | रु.१७,०००/- |
| १२. | श्रीमती शिला राठोड | एएनएम | रु.१७,०००/- |
| १३. | श्रीमती सोनाली पावलस भिसे | एएनएम | रु.१७,०००/- |
| १४. | श्रीमती वर्षा जाधव | एएनएम | रु.१७,०००/- |
| १५. | श्रीमती वर्षा महादु सोनवणे | एएनएम | रु.१७,०००/- |
| १६. | श्रीमती सुनंदा नामदेव चव्हाण | एएनएम | रु.१७,०००/- |
| १७. | श्रीमती सारिका मनोहर इंगळे | एएनएम | रु.१७,०००/- |
| १८. | श्रीमती कविता चव्हाण | एएनएम | रु.१७,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | श्रीमती वैशाली चिंतामण बिऱ्हारे | एएनएम | रु.१७,०००/- |
| २०. | श्रीमती सिमा अरुण गुरव | एएनएम | रु.१७,०००/- |
| २१. | श्रीमती समिना बेगम शेख सलीम | एएनएम | रु.१७,०००/- |
| २२. | श्रीमती वर्षा हरिभाऊ फुले | एएनएम | रु.१७,०००/- |
| २३. | श्रीमती आरती एकनाथ वाघमारे | एएनएम | रु.१७,०००/- |
| २४. | श्रीमती अश्विनी रमेशराव परळकर | एएनएम | रु.१७,०००/- |
| २५. | श्रीमती प्रियंका चंद्रकांत मगरे | एएनएम | रु.१७,०००/- |
| २६. | श्रीमती अग्नेस जे.मकासरे | एएनएम | रु.१७,०००/- |

सध्या कार्यरत १ वैद्यकीय अधिकारी व २५ कर्मचारी यांन वेतनाकरीता रु.५,००,०००/- व वार्षिक खर्च रु.६०,००,०००/- अपेक्षित आहे. सदरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च मनपा अर्थसंकल्प माता व बाल संगोपन (आरसीएच) या घटकांमध्ये करण्यात आलेली आहे. आरसीएच-२ अंतर्गत सध्या कार्यरत १ अधिकारी व २५ कर्मचारी यांना प्रस्तावित केल्यानुसार १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन म्हणजे दि.०२.०२.२०१८ ते ३१.०७.२०२१ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास व वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यास प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १०८/२०२१:-</u>**

प्रस्ताव दर्शविल्यानुसार, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य टप्पा-२ राबविण्यासाठी आरसीएच-२ अंतर्गत कार्यरत ठराविक वेतनावरील अ.क्र.१ ते २६ अधिकारी व कर्मचारी यांना १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.०२.०२.२०२१ ते ३१.०७.२०२१ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व मनपा फंडातून वेतन अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १०९/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२३.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३५ नारेगाव येथील नारेगाव-मांडकी मुख्य रस्त्यावरील सार्वजनिक शौचालय मोडकळीस आले असून शौचालयाच्या इमारतीचा काही भाग पडला आहे. शौचालय वापरात नसल्यामुळे तेथे घाण व दुर्गंधी होत असल्याने सदरील शौचालय पाडणे बाबत माजी नगरसेवक श्री.गोकुळसिंग मलके व स्थानिक नागरीक यांनी मागणी केली आहे. सदरील शौचालयाची इमारत जीर्ण व दुरावस्थेत असल्यामुळे तसेच शौचालयामुळे रस्त्यात दुर्गंधी व घाण होत असल्याने सदरील शौचालय अतिक्रमण विभागाकडून पाडणे करीता दि.२५.०२.२०२१ रोजी अतिरीक्त आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी, वॉर्ड क्र.३५, नारेगाव येथील नारेगाव-मांडकी मुख्य रस्त्यावरील सार्वजनिक शौचालयाची जीर्ण झालेली इमारत पाडण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक १०९/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३५ नारेगाव येथील नारेगाव-मांडकी मुख्य रस्त्यावरील सार्वजनिक शौचालयाची जीर्ण झालेली इमारत पाडण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ११०/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२६.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८२, ९० या ठिकाणी नागरीकांसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने या ठिकाणी अनेक विकासात्मक कामे केवळ निधी उपलब्ध नसल्यामुळे पुर्ण करता आली नाहीत. या भागात सर्व्हेक्षण नुसार ५०% पेक्षा जास्त दलित नागरी लोकसंख्या वसाहत असल्याने

या ठिकाणी खालील प्रमाणे विकासात्मक कामे करणे अत्यंत आवश्यक असून त्यासाठी “साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना” सन २०२०-२०२१ अंतर्गत निधी उपलब्ध करून देता येईल.

करीता, प्रस्तावीत खालील कामाचे र.रु.७५,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.८२ अंबिका नगर येथील सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.८२ अंबिका नगर मधील पोलीस कॉलनी मध्ये सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१५.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.८२ अंबिका नगर मधील पोलीस कॉलनी येथे ड्रेनेज लाईन करणे. | रु.१०.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.९० राजनगर मुकूंदनगर येथे ड्रेनेज लाईन करणे. | रु.२५.०० लक्ष |

करीता, वरील प्रमाणे प्रस्ताव मा.प्रशासक यांच्या मान्यतेने मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास्तव सादर.

**ठराव क्रमांक ११०/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तावित कामाचा खर्च “साहित्य रत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना” सन २०२०-२०२१ अंतर्गत करण्यात येणार आहे. करीता प्रस्तावीत कामाच्या अंदाजपत्रकांना मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १११/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३१.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व १०४ नुसार सन २०२०-२०२१ चे सुधारित व कलम ९५ नुसार सन २०२१-२०२२ चे जमा व खर्चाच्या मुळ अंदाजास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ व १०० नुसार अंतिम मान्यता देणे करीता प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक १११/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जमा व खर्चाचे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तसेच अर्थसंकल्पात महानगरपालिका फंडातून र.रु.१००.०० कोटीच्या रस्त्यांची पुर्नबांधणी व मजबुतीकरण करण्याची नवीन कामांसाठी विशेष तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच अग्निशमन विभाग सक्षम बनविण्यासाठी या विभागाकरीता रु.१६.६६ कोटीची तरतुद केलेली आहे. या व्यतिरीक्त मागील वर्षातील कोव्हिड-१९ प्रभावामुळे जे प्रकल्प हाती घ्यावयाचे आहे ते बांधा-वापरा व हस्तांतरीत करा (BOT) तत्वावर त्याच प्रमाणे इच्छुकांकडून अनामत रक्कमा घेऊन विकसीत करावयाचे वाणिज्यिक व्यापारी संकुले इ. बहुउद्देशीय व लोकाभिमुख प्रस्ताव जे नागरीकांचे हित लक्षात घेऊन प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. त्यासह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांचे कलम १०३ व १०४ नुसार सन २०२०-२०२१ चे सुधारित अंदाज जमा रु.६६६ कोटी २७ लक्ष २५ हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक र.रु.१२९ कोटी ५० लक्ष ५१ हजार यासह एकूण जमा र.रु.७९५ कोटी ७७ लक्ष ७६ हजार आणि एकूण खर्च रु.७५१ कोटी ४९ लक्ष ३० हजार लक्षात घेता, र.रु.४४ कोटी २८ लक्ष ४६ हजार शिल्लकीचे त्याच प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९५ नुसार सन २०२१-२०२२ चे जमा व खर्चाचे मुळ अंदाज यामध्ये शासकीय अनुदानासह प्रारंभीची शिल्लक र.रु.१५९ कोटी ५१ लक्ष ११ हजार व अपेक्षित जमा

र.रु.१११५ कोटी ७३ लक्ष ०० हजार असे एकूण र.रु.१२७५ कोटी २४ लक्ष ११ हजार आणि अपेक्षीत खर्च र.रु.१२७४ कोटी ३९ लक्ष ७७ हजार विचारात घेता, र.रु.८४ लक्ष ३४ हजार शिल्लकीचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ व १०० नुसार मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११२/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३१.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हिड-१९ या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश, राज्यामध्ये व शहरामध्ये पसरली असून कोव्हिड-१९ हा साथरोग नियंत्रीत करण्याची आवश्यकता आहे.

औरंगाबाद शहरातील कोव्हिड-१९ विषाणु बाधीत रुग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना करण्याबाबत सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात आरोग्य विभागाअंतर्गत कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत शहरामध्ये कोव्हिड केअर सेंटर, क्वारेंनटाईन सेंटर तसेच फीवर क्लिनीक सुरु करण्यात आलेले आहे.

सदरील ठिकाणी निर्माण होणारा वैद्यकीय जैवीक कचरा (BMW) हा शासनाच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे दररोज संकलीत करून शास्त्रोक्त पध्दतीने व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार वाहतूक, विल्हेवाट लावण्यासाठी रु.१००/- प्रति किलो आणि रु.१५,०००/- प्रति महिना (रु.५०० प्रति दिन) ट्रान्सपोर्ट (वाहतूक) प्रति सेंटर या प्रमाणे संकलन, वाहतूक व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरीता मे.वॉटरग्रेस (बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट प्रोजेक्ट) सर्वे नं.१२, गट नं.१२२ पाटोदा शिवार, औरंगाबाद यांना कार्यादेश क्रमांक जा.क्र.मनपा/आरोग्य/८३७/२०२० दि.०७.०५.२०२० नुसार मा.प्रशासक महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या स्वाक्षरीनिशी देण्यात आलेला आहे.

सन-२०२१ या आर्थिक वर्षासाठी कोव्हीड-१९ अंतर्गत प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत वैद्यकीय जैविक कचऱ्यांची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरीता मार्च-२०२१ पर्यंत रु.७५,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्च्याहत्तर लक्ष फक्त) एवढा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी रु.५०,७२,७५०/- (अक्षरी रुपये पन्नास लक्ष बहात्तर हजार सातशे पन्नास फक्त) एवढा खर्च झालेला असून झालेल्या खर्चाच्या रक्कमेस कार्योत्तर मंजुरीस मान्यतेस्तव सादर.

सदरील खर्च मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी नेमलेल्या जिल्हा नियोजन व विकास समिती (DPDC) किंवा राज्य आपत्ती व्यवस्थापन निधी (SDRF) च्या कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना माध्यमातून प्राप्त निधी मधुन प्राप्त झाल्यानंतर खर्च करण्यास मान्यतेस्तव सादर.

करीता सदरील खर्चास मा.सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक ११२/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षी कोव्हिड-१९ अंतर्गत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी वैद्यकीय जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणेकरीता मार्च-२०२१ पर्यंत रु.७५,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्च्याहत्तर लक्ष फक्त) एवढा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी रु.५०,७२,७५०/- (अक्षरी रुपये पन्नास लक्ष बहात्तर हजार सातशे पन्नास फक्त) एवढा खर्च झालेला असून झालेल्या खर्चाच्या रक्कमेस कार्योत्तर मंजुरीस मान्यतेस्तव सादर.

सदरील खर्च मा.जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या जिल्हा नियोजन व विकास समिती (DPDC) किंवा राज्य आपत्ती व्यवस्थापन निधी (SDRF) च्या कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना माध्यमातून प्राप्त निधी मधुन प्राप्त झाल्यानंतर खर्च करण्यास मान्यतेस्तव सादर.

सदरील खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११३/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३१.०३.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत १०० दलली जल शुध्दीकरण केंद्र १९९२ साली कार्यान्वयीत करण्यात आलेले आहे. केंद्राची उभारणी करताना गाळणी हौद स्वच्छ करण्यासाठी दाबयुक्त हवा घेणेकरीता २५० मीमी व्यासाचे व गाळण झालेले पाणी घेण्या करीता ३५० मीमी व्यासाचे स्लूस व्हॉल्व्ह बसविण्यात आलेले आहेत. बसविण्यात आलेल्या व्हॉल्व्हचे आयुर्मान २८ वर्ष झालेले आहे. नियमीत वापर व क्लोरीनयुक्त पाण्यामुळे बहुतांश झडपांची झीज झालेली आहे. यामुळे या झडपांची नेहमीच दुरुस्ती करावी लागते. त्याचप्रमाणे झडपांच्या गेटमधून गळती सुरु झाल्याने जलवाहिनीच्या देखभाल दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहेत. सद्यस्थितीत गाळणी हौद क्र.१०,१२,६ व ४ यांच्या पाईपला गळती होऊन पाणी वाया जात आहे. यापुर्वी या पाईपची २ ते ३ वेळेस दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तथापि, पाईप जाडी अत्यंत कमी झालेली असल्याने व झडपांच्या गळतीमधून पाणी व्यय होत असल्याने वेल्डिंगद्वारे गळतीची दुरुस्ती करणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे या पाईपच्या दुरुस्ती करीता खंडणकाळ घेऊन संपुर्ण गाळणी हौद रिकामे करावे लागतात. त्याचप्रमाणे भविष्यात मोठ्या प्रमाणावर पाईपला भगदाड पडल्यास गाळणीगृहात पाणी साचून विद्युत मोटरींना हानी पोहचू शकते. यामुळे सर्वच झडपा नव्याने बसविणे गरजेचे आहे.

कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१९-२०२० व सा.बां. विभागाच्या सन २०१८-१९ दरसुचीनुसार व प्राप्त मंजुर दरपत्रकानुसार तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकीय र.रु.३३,३९,६८३/- इतकी आहे. सदरील कामासाठी अर्थसंकल्प सन २०२०-२१ अंतर्गत रु.३० लक्षची तरतुद पान क्र.Exe.Eng.w.w.New Work P.No.-6 अनु.क्र.४ नुसार करण्यात आलेली आहे. करीता, अंदाजपत्रक र.रु.३३,३९,६८३/- चे मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ११३/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत १०० दलली जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथील गाळणी हौदाचे स्लूस व्हॉल्व्ह बदलण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.३३,३९,६८३/- मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११४/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३१.०३.२०२१)**

अतिरीक्त आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, दरवर्षी विविध विभागांकडून मागणी नोंदवून लिखाण साहित्याची वर्षभरासाठी निविदा मागविण्यात येते. तथापी या वर्षी लेखानुदान माहे ऑगस्ट-२०२० ते मार्च २०२१ कालावधीसाठी मंजूर करण्यात आलेले आहे. लेखानुदान २०२०-२१ साठीची तरतुद ही "लिखाण साहित्य खरेदी" या लेखा शिर्षात करण्यात आली आहे. लिखाण साहित्य खरेदी करण्यासाठी रु.६०.०० लक्षची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी झालेला खर्च वजा जाता रु.४६.८९ लक्षची तरतूद शिल्लक आहे. या तरतुदीमधून अत्यावश्यक असलेले खालील लिखाण साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | साहित्याचे विवरण | कंपनी | अपेक्षित संख्या | खुल्या बाजारातील दर सर्व करासहीत | प्रमाण | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५०० कागदाची रिम नेटवेट २.६ किलो झेरॉक्स पेपर मॅफलीथो १/४ (F.S.)साईज ७० GSM size 215/345 M.M.mill packing | B2B | ३०० | ३१४ | नग | ९४२०० |
| २ | ५०० कागदाची रिम नेटवेट २.२ किलो झेरॉक्स पेपर मॅफलीथो A-4 फुलसाईज ७० GSM size 210/297 M.M.mill | B2B | ४००० | २४६ | नग | ९८४००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | packing | | | | | |
| ३ | रायटिंग पेपर १/४ (F.S.) साईज ७० GSM size २१७/३४७ M.M. mill packing ५०० कागदाची रिम | - | ३०० | २१३ | नग | ६३९०० |
| ४ | रुलिंग पेपर १/४ (F.S.) साईज ७० GSM size २१७/३४७ M.M. mill packing ५०० कागदाची रिम | - | २०० | ३९२ | नग | ७८४०० |
| ५ | पेन्सिल कार्बन (५०३ सफायर रॉयल ब्ल्यु) | Kores | ३०० | २६६ | नग | ७९८०० |
| ६ | स्टॅम्प पॅड नं.३ मोठे | Camel/ Kores | २५० | ११८ | नग | २९५०० |
| ७ | स्टेप्लर नं.१० | Kangaro | २५० | ७७ | नग | १९२५० |
| ८ | स्टेप्लर नं.HD ४५ मोठे | Kangaro | २५० | १५३ | नग | ३८२५० |
| ९ | स्टेप्लर पीन नं.१० | Kangaro | २५०० | १४ | नग | ३५००० |
| १० | स्टेप्लर पीन नं.२४/६ | Kangaro | २००० | २६ | नग | ५२००० |
| ११ | पंचिग मशिन ५०० नंबर | Kangaro | २५० | १७७ | नग | ४४२५० |
| १२ | पेस्ट ३०० | Camel/ Kores | ५०० | ५३ | नग | २६५०० |
| १३ | टाचणी ५० ग्रॅम पाकीट | Lion | १००० | २१ | नग | २१००० |
| १४ | पेन्सिल खोडरबर | Apsara | ५०० | ५ | नग | २५०० |
| १५ | पेन्सिल HB | Apsara | ५०० | ६ | नग | ३००० |
| १६ | बॅटरी सेल मोठे | Eveready | ५०० | ४५ | नग | २२५०० |
| १७ | पेन्सिल सेल A.A | - | १००० | ३८ | नग | ३८००० |
| १८ | पेन्सिल सेल A.A.A | - | १००० | २१ | नग | २१००० |
| १९ | सर्व्हींग ट्रे १५ इंची ॲक्रोलिक फायबर | - | २०० | २९५ | नग | ५९००० |
| २० | फाईल टॅग १८ इंची (१४४ चा ग्रोस पाकीट) | Lion | १५०० | १४५ | पाकीट | २१७५०० |
| २१ | पर्मनंट मार्कर पेन | Camel | ७०० | ४१ | नग | २८७०० |
| २२ | बोर्ड मार्कर पेन | Camel | २०० | ३५ | नग | ७००० |
| २३ | हायलायटर पेन | Camel/ Pik | ६०० | ५३ | नग | ३१८०० |
| २४ | स्केच पेन पाकीट | Pik | ५०० | ५७ | नग | २८५०० |
| २५ | बस्ता बांधन्यास्तव लागणारा कपडा | Genda Chap | ३००० | ५७ | मिटर | १७१००० |
| २६ | P.V.C. रिपोर्ट फाईल ३६० T. | - | ६०० | ३३ | नग | १९८०० |
| २७ | शॉटहॅंड नोटबुक फुल साईज १०० पानी | Shivam/ World Star | ५०० | ५३ | नग | २६५०० |
| २८ | लिफाफे आतून कापडाचे आवरण असलेला पिस्ता रंग साईज १० बाय १२ | - | १००० | ९ | नग | ९००० |
| २९ | लिफाफे आतून कापडाचे आवरण असलेला पिस्ता रंग साईज १६ बाय १२ | - | १००० | १२ | नग | १२००० |
| ३० | रजिस्टर ७२ पानी फुलसाईज | Classmate/ World Star | १५०० | ४७ | नग | ७०५०० |
| ३१ | रजिस्टर १७२ पानी फुलसाईज | Classmet/ World | ८०० | ७३ | नग | ५८४०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Star | | | | |
| ३२ | कॅक्ल्युलेटर १२ Digit | Citizen | ४०० | ४४८ | नग | १७९२०० |
| ३३ | रबर बॅड नायलॉन (४ इंची व २ इंची मिक्स) | - | १०० | ५३१ | प्र.किलो | ५३१०० |
| ३४ | करेक्शन पेन (Whinter Pen) | Kores | ४०० | ४७ | नग | १८८०० |
| ३५ | स्टेनलेस स्टील स्केल १२ इंची जाड | Khyati /Cristal | ७०० | ३५ | नग | २४५०० |
| ३६ | स्टील टॉर्च ३ सेल जीवन साथी | Eveready | २५ | ७६७ | नग | १९१७५ |
| ३७ | वॉशिग पावडर १ किलो पाकीट | NIrma | ५०० | ६५ | नग | ३२५०० |
| ३८ | रुम फ्रेशनर | Cancord / Air | २०० | २१२ | नग | ४२४०० |
| ३९ | कपबशी बोनचायना | Hans | ५० | ९४४ | प्र. सेट | ४७२०० |
| ४० | टरकिश नॅप्किन फुल साईज | Bombay Dyeing | ५० | १२४ | प्र.डझन | ६२०० |
| ४१ | टरकिश टॉवेल फुल साईज | Bombay Dyeing | १०० | ७३२ | नग | ७३२०० |
| ४२ | पाणी पिण्याचे ग्लास | Yara | ७० | ४१३ | प्र.डझन | २८९१० |
| ४३ | स्पाईक गार्ड ६ पीन | Prime | १०० | ५३१ | नग | ५३१०० |
| ४४ | पेन ड्राईव्ह १६ जीबी | HP/ Sandisk | २०० | ७०८ | नग | १४१६०० |
| ४५ | कलर फ्लॉग | - | ४०० | ५३ | प्रती पॅड | २१२०० |
| ४६ | टोनर (सर्व प्रकारचे संगणकीय टोनर रिफिल टोनर) | - | ८०० | ६४९ | नग | ५१९२०० |
| ४७ | बॉक्स फाईल | Kangaro | ३५० | ९२ | नग | ३२२०० |
| ४८ | यु क्लिप | Lion | १०० | ३० | नग | ३००० |
| ४९ | फाइल पॅड ४ पट्टीचे | - | १०० | ३० | नग | ३००० |
| ५० | फाइल पॅड २ पट्टीचे | - | १०० | २६ | नग | २६०० |
| ५१ | डुब्लीकेटींग बुक | World Star / Shivam | १०० | ९४ | नग | ९४०० |
| ५२ | लॉक ६ लिवर | Godrej Freedom | ८० | ५७२ | नग | ४५७६० |
| ५३ | लॉक ७ लिवर | Godrej Freedom | ९० | ७६९ | नग | ६९२१० |
| | | | | | एकूण | ३८१८२०५ |

उपरोक्त साहित्याचे दर हे खुल्या बाजारातील असून त्या दरानुसार लिखाण साहित्य खरेदी साठीचा अंदाजे खर्च रु.३८,१८,२०५/- (अक्षरी अडोतीस लक्ष अठरा हजार दोनशे पाच फक्त) इतका अपेक्षित आहे. यासाठी “लिखाण साहित्य खरेदी” या लेखाशिर्षातून तरतुद उपलब्ध होणे व सदर साहित्य खरेदीसाठी निविदा मागविताना एका वर्षासाठी उपरोक्त साहित्याच्या दरास मंजूरी घेण्यात येवून उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत मंजूर दरानुसार आवश्यक साहित्य खरेदी करण्यात येईल. करीता निविदा मागविण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ११४/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध विभांगाच्या मागणीनुसार प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साहित्य पुरवठा करणेसाठी "लिखाण साहित्य" या लेखाशिर्षातून आर्थिक तरतुद रु.३८,१८,२०५/- उपलब्ध करुन देण्यात येते तसेच निविदा मागवितांना वार्षिक दरांसाठी मंजूरी प्रदान करण्यात येवून उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत आवश्यक साहित्य खरेदी करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११५/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१२.०४.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जागतिक पातळीवर उध्दभवलेल्या कोरोना विषाणू (COVID-19) या संसर्गजन्य आजारामुळे राज्यात आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी आपत्कालीन उपाय योजना करण्यात आल्या आहेत. सदर उपाय योजनांसाठी औरंगाबाद शहरात कोवीड-१९ च्या वाढत्या उद्रेकाच्या पार्श्वभुमीवर महानगरपालिका हद्दीमध्ये पुरेसे कोवीड सेंटर उभारणी करीता ७००० साधे पलंग (बेड) खरेदी करणे साठी प्रस्ताव आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक, औरंगाबाद यांनी कोवीड-१९ करीता मागविलेल्या (Simple Bed) साधे पलंग मागविण्याच्या धर्तीवर व निविदेतील निकष (Specification) व नकाशानुसार फक्त पलंग (Simple Bed) खरेदी करण्यासाठी पलंग उत्पादक/विक्रीत्याकडून दरपत्रक मागवून, प्राप्त दरपत्रकातील सर्वात कमी दरानुसार म्हणजेच रु.२,८९०/- (सर्व करांसह) एकूण ५००० पलंगासाठी अंदाजपत्रक रु.१,४४,५०,०००/- चे तयार करण्यात आले होते. तथापी सुधारीत मंजूरीनुसार ७००० पलंग (Simple Bed) खरेदी करण्यासाठी मंजूरी प्राप्त आहे. त्यासाठी रु.२,०२,३०,०००/- (रु. दोन कोटी दोन लक्ष तीस हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. खरेदी करावयाच्या पलंग (Simple Bed) चे तांत्रिक निकष (Specification) खालीलप्रमाणे आहेत.

1. Overall Size :
   1880mm (L) x 915mm (W) x 550mm(H) Height from Ground level to top surface of main frame only.
2. Frame of the bed :

a) MS - L Angle 30mm x 30mm, 11SWG. (1830mm Length x 915mm width)
b) Four support at middle, in equal distance, it must be MS - L Angle 25mm x 25mm, 11SWG.
c) **"Govt. of Maharashtra Public Health Dept.& Mfg date"** must be embossed at visible sight, must be easily readable.

3. Top of Cot :
   Should be made from MS - 16SWG strips. Each strips should be of 30mm width. All strips should be cross fitted as shown in tentative drawing, distance between two strips must be 70mm, all strips should be riveted to main frame.
4. Legs with Bow : (H-760mm)

a) Leg & bow should be made of 25mm OD, 16SWG, MS.
b) Two number of vertical & one horizontal supports, 8mm MS rod.
c) Four legs have nylon bush.
d) Hinge strips have 3mm thickness, width 20mm, fitted to four legs, having folding mechanism of legs.
e) Provision for mosquito curtain poll at four corner of legs having 2 No. on each legs.

5. Colour : Off white Shade, all metal part should be pre-treated & coated with epoxy powder with film thickness of minimum 60 microns and oven baked at 180 - 200º C.
6. Load baring capacity : 120 kg at every point of horizontal plain.
7. Approximate total weight – 30kg (±2kg).

७००० पलंग खरेदीसाठी निविदा मागविणे व पहिल्या टप्प्यात १००० पलंग पुरवठयाचे आदेश निर्गमित करणे व त्यापुढे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या आवश्यकतेनुसार व आयुक्त यांच्या मान्यतेनुसार भविष्यात टप्प्या-टप्प्याने खरेदी करणे प्रस्तावित आहे. पलंग (Simple Bed) खरेदी करण्यासाठी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या राज्य आपत्ती व्यवस्थापन निधी (SDRF) लेखा शिर्षातून खरेदी करणे प्रस्तावित आहे. पलंग (Simple Bed) खरेदी करण्यासाठी रु. २,०२,३०,०००/- (रु. दोन कोटी दोन लाख तीस हजार फक्त) इतका निधी उपलब्ध होणे तसेच उक्त नमुद निकषानुसार ७००० पलंग टप्प्या-टप्प्याने खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ११५/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.जिल्हा शल्य चिकित्सक यांनी कोवीड-१९ करीता मागविलेल्या (Simple Bed) साधे पलंग मागविण्याच्या धर्तीवर व निविदेतील निकष (Specification) व नकाशानुसार ७००० पलंग (Simple Bed) खरेदी करण्यासाठी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या राज्य आपत्ती व्यवस्थापन निधी (SDRF) लेखा शिर्षातून खरेदी करणे प्रस्तावित आहे. पलंग (Simple Bed) खरेदी करण्यासाठी रु.२,०२,३०,०००/- (रु.दोन कोटी दोन लाख तीस हजार फक्त) इतका निधी उपलब्ध करण्यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी कार्यवाही करावी. तसेच ७००० निविदा मागविणे व पहिल्या टप्प्यात १००० पलंग पुरवठयाचे आदेश निर्गमित करणे व त्यापुढे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या आवश्यकतेनुसार भविष्यात टप्प्या-टप्प्याने पलंग (Simple Bed) खरेदी करण्यासाठी मंजूरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११६/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१६.०४.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कोरोना साथरोगाचा संसर्ग राज्यात व शहरात दिर्घ कालावधी पासून लॉकडाऊन लागू करण्यात आला असला तरी, संसर्ग नियंत्रणात ठेवणे व नागरीकांच्या जिवीताचे रक्षण होण्याच्या दृष्टिने त्यांच्या उपस्थिती मर्यादीत करण्यात आली आहे. या कारणाने मृत्युचे प्रमाणही वाढल्याने अंत्यसंस्काराच्या संख्येत वाढ झाली आहे. या कारणाने औरंगाबाद महानगरपालिकेने LPG गॅसवर चालणारी शवदाहीनी बसविण्याचा निर्णय घेतला असून त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून या कामासाठीचा खर्च कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखणे करावयाच्या उपाय योजना संदर्भाने मा.जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राज्य आपत्ती व्यवस्थापन निधी अंतर्गत उपलब्ध अनुदानामधून केला जाणार आहे. निविदा र.रु.६६,३६,६४४/- अधिक GST व स्थापत्य विषयक काम यासह या कामाची एकूण अंदाजपत्रकीय र.रु.७८,००,०००/- एवढी आहे. सदरची निविदा प्रसिध्द केल्याचा व निविदा उघडण्याचा तपशील खालील नमूद प्रमाणे आहे.

संदर्भ:-टेंडर क्रमांक 2020-AMCA-627536-1

| अ.क्र. | तपशील | कार्यवाही |
|---|---|---|
| १. | **विभागाचे नाव** | **विभाग प्रमुख (विद्युत)<br>उपअभियंता जलनि:स्सारण** |
| २. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे | होय<br>निविदा र.रु.६६,३६,६४४.००<br>१२%GST ची र.रु.७,९६,३९७.०० |

| | | |
|---|---|---|
| | | स्थापत्य विषयक कामासाठी तरतुद र.रु.३,६६,९५९.०० <br> ------------------------------------------ <br> एकूण र.रु.७८,००,०००.०० |
| ३. | ई-निविदा प्रसिध्द केल्याचा दिनांक (दुरुस्तीसह) | १० डिसेंबर २०२० <br> १५ जानेवारी २०२१ |
| ४. | निविदा स्विकारण्याची मुदत | १५ जानेवारी २०२१ |
| ५. | निविदा उघडण्याची दिनांक | २३ फेब्रुवारी २०२१ |
| ६. | एकुण प्राप्त निविदा | चार (४) |

या कामासाठी महानगरपालिकेच्या ई-निविदा विभागाकडून रितसर पुर्व-निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांचा तपशील नमुद प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटादाराचे नाव | निविदा धारकांची ऑफर रक्कम रुपये | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|---|
| १. | अल्फा इंटरप्रायजेस | ५५,७४,७८०.९६ | अं.प.दरापेक्षा १६% कमी दराने |
| २. | व्हिजन इंटरप्रायजेस | ६६,३६,६४४.०० | अं.प.दराने |
| ३. | कल्याणी इंटरप्रायजेस | ७०,३४,८४२.६४ | अं.प.दरापेक्षा ६% जास्त दराने |
| ४. | चिरंतन उद्योग | ७२,३३,९४१.९६ | अं.प.दरापेक्षा ९% जास्त दराने |

त्यानुसार तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची निविदा अल्फा इंटरप्रायजेस यांची प्राप्त झालेली आहे. त्यानुसार अल्फा इंटरप्रायजेस यांची निविदा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ११६/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैलासनगर स्मशानभुमी येथे नव्याने LPG गॅसवर चालणारी शवदाहीनी उभारण्यासाठी निविदा र.रु.६६,३६,६४४/- + GST साठीची तरतुद व स्थापत्य विषयक काम यासाठी काढण्यात आली असता, सर्वाधिक कमी दराची निविदा अल्फा इंटरप्रायजेस यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची प्राप्त झाली आहे. करीता सर्वाधिक कमी दराची अल्फा इंटरप्रायजेस यांच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११७/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१९.०४.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक, प्राणी संग्रहालय हे दि.३१/०३/२०२१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. सद्यास्थितीत मुख्य पशुसंवर्धन अधिकारी व संचालक, प्राणी संग्रहालय हे पद रिक्त आहे. सदर पदाची अर्हता धारण करणारे समकक्ष कोणीही अधिकारी सद्यस्थितीत महानगरपालिकेत उपलब्ध नाही. त्यामुळे दैनंदिन वेळी व कोरोना काळात प्राणी संग्रहालयातील वन्य प्राण्यांच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयातील वन्य प्राण्यांची निगा/ देखभाल व औषधोपचार करण्यासाठी सल्लागार म्हणून काम करणे या विवक्षित कामाकरीता डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी (सेवानिवृत्त) यांची सेवा विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमत: ०६ महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा

सेवानिवृत्ती पूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंश राशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रू.४०,०००/- (रुपये चाळीस हजार फक्ते) इतक्या मर्यादेत राहील, या अटीवर घेण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ११७/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक, प्राणी संग्रहालय हे दि.३१.०३.२०२१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. सद्यस्थितीत मुख्य पशुसंवर्धन अधिकारी व संचालक, प्राणी संग्रहालय हे पद रिक्त आहे. सदर पदांची अर्हता धारण करणारे समकक्ष कोणीही अधिकारी सद्यस्थितीत महानगरपालिकेत उपलब्ध नाही. त्यामुळे दैनंदिन वेळी व कोरोना काळात प्राणी संग्रहालयातील वन्य प्राण्यांच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

"औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयातील वन्य प्राण्यांची निगा/ देखभाल व औषधोपचार करण्यासाठी सल्लागार म्हणुन काम करणे" या विवक्षित कामांकरीता डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी (सेवानिवृत्त) यांची सेवा विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमतः ०६ महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारीश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.४०,०००/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादेत राहील, या अटीवर घेण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

करीता, उक्त प्रस्तावानुसार "औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयातील वन्य प्राण्यांची निगा/देखभाल व औषधोपचार करण्यासाठी सल्लागार म्हणुन काम करणे" या विवक्षित कामांकरीता डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी (सेवानिवृत्त) यांची सेवा करार पध्तीने प्रथमतः ०६ महिन्यांच्या कालावधी करीता नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११८/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२३.०४.२०२१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विविध विभागांकडून मागणी नोंदवून स्वच्छता साहित्याची निविदा क्र.2020_AMCA_610286_4 नुसार निविदा मागविण्यात आली. चौथ्या वेळेस फक्त एक निविदा मे.यश ट्रेडिंग कंपनी औरंगाबाद यांची प्राप्त झाली. प्राप्त निविदेतील दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | प्रमाण | निविदेतील प्राप्त दर सर्व करांसहित |
|---|---|---|---|
| १. | साधे खराटे (७५० ग्रॅम) | नग | ४८.५० |
| २. | लांब दांडीचे खराटे (७५० ग्रॅम) | नग | ९८ |
| ३. | फावडे दांड्यासह | नग | ३८२ |
| ४. | टिकाव दांड्यासह | नग | ४४७ |
| ५. | लहान टोपले १२ इंची | नग | २५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | मोठे टोपले १८ इंची | नग | ३०० |
| ७. | लांब दांडीचे फावडे | नग | ३२० |
| ८. | सब्बल | नग | ९०० |
| ९. | लोखंडी बकेट | नग | २६० |
| १०. | कुंचा झाडू | नग | १०५ |
| ११. | ताडपत्री मोठी २१ बाय १२ | नग | ५०४०<br>(रु.२० प्रती चौ.फु) |
| १२. | गमबुट | नग | १२७५ |
| १३. | पांढरे फिनेल ५ लि.कॅन | कॅन | ४०० |
| १४. | काळे फिनेल २५ लि.कॅन | कॅन | २३५०<br>(94 par lit) |
| १५. | लाईफ बॉय साबण | नग | २२ |
| १६. | रबरी हॅण्ड ग्लोज | नग | १२५ |
| १७. | फावडे दांडे | नग | ४५ |
| १८. | टिकाव दांडे | नग | ४५ |
| १९. | ॲसिड १ लि.कॅन | लिटर | ५५ |
| २०. | रबरी पाईप १/२ इंची | फुट | ८.५० |
| २१. | रबरी पाईप १ इंची | फुट | ३० |
| २२. | फ्लोअर वायपर | नग | ३५० |
| २३. | कापडी मास्कचे सद्याचे दर (प्रती नग ८) | नग | ९ |
| २४. | फ्लोरोसेंट सेफ्टी जॅकेट प्राप्त दरानुसार | नग | ४१० |
| २५. | लोखंडी पंजे | नग | ३५८ |

प्राप्त निविदेतील दर जास्ती असल्यामुळे केंद्रीय खरेदी समक्ष दि.२३.०२.२०२१ रोजी दर वाटाघाटी करण्यात आली. दर वाटाघाटी समिती समोर पुरवठादार यांनी लेखी संमतीपत्र देऊन खालील दरानुसार साहित्याचा पुरवठा करण्यासाठी सहमती दिली. त्यानुसार केंद्रीय खरेदी समितीने खालील प्रमाणे दर निश्चित करून दिले आहेत.

| **अ. क्र.** | **साहित्याचा तपशील (कपंनीच्या नावासह)** | **प्रमाण** | **अंदाजपत्रकीय दर सर्व करां सहित (बाजार भावा नुसार)** | **२०२०-२१ मध्ये खरेदी केलेल्या साहित्याचे दर** | **यश ट्रेडिंग कंपनी यांचे निविदेतील दर सर्व करां सहित** | **वाटाघाटी अंती अंतिम झालेले दर सर्व करां सहित** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| १. | साधे खराटे (७५० ग्रॅम) | नग | 65 | 36 | 48.50 | 36 |
| २. | लांब दांडीचे खराटे (७५० ग्रॅम) | नग | 95 | - | 98 | 95 |
| ३. | फावडे दांड्यासह (टाटा कंपनीचे) | नग | 238 | 238 | 382 | 310 |
| ४. | टिकाव दांड्यासह | नग | 352 | - | 447 | 400 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (टाटा कंपनीचे) | | | | | |
| ५. | लहान टोपले १२ इंची | नग | 126 | - | 250 | 188 |
| ६. | मोठे टोपले १८ इंची | नग | 163 | 163 | 300 | 232 |
| ७. | लांब दांडीचे फावडे | नग | 177 | - | 320 | 249 |
| ८. | सब्बल | नग | 1035 | - | 900 | 900 |
| ९. | लोखंडी बकेट | नग | 235 | - | 260 | 235 |
| १०. | कुंचा झाडू (४०० ग्रॅम) | नग | 100 | 104 | 105 | 100 |
| ११. | ताडपत्री मोठी २१ बाय १२ | नग | 3568 (रु.१४.१५ प्रति चौ.फु.) | - | 5040 (रु.२० प्रति चौ.फु.) | 3568 |
| १२. | गमबुट (डकबॅक कंपनीचे) | नग | 980 | 1049 | 1275 | 980 |
| १३. | पांढरे फिनेल ५ लि.कॅन | कॅन | 183 | - | 400 | 183 |
| १४. | काळे फिनेल २५ लि.कॅन | कॅन | 2600 (104 per lit) | 2065 (413 five lit.ie.82.60 Per Ltr.) | 2350 (94 Per Ltr.) | 2065 (413 five lit.ie.82.60 Per Ltr.) |
| १५. | लाईफ बॉय साबण (१२५ ग्रॅम) | नग | 25 (current MRP) | - | 22 | 22 |
| १६. | रबरी हॅण्ड ग्लोज | नग | 151 | 116 | 125 | 116 |
| १७. | फावडे दांडे | नग | 34 | - | 45 | 34 |
| १८. | टिकाव दांडे | नग | 39 | - | 45 | 39 |
| १९. | ॲसिड १ लि.कॅन | लिटर | 57 | 236 (Five Ltr.ie 47.29 Per Ltr.) | 55 | 236 (Five Ltr.ie 47.29 Per Ltr.) |
| २०. | रबरी पाईप १/२ इंची | फुट | 33 | - | 8.50 | 8.50 |
| २१. | रबरी पाईप १ इंची | फुट | 41 | - | 30 | 30 |
| २२. | फ्लोअर वायपर | नग | 378 | 327 | 350 | 327 |
| २३. | कापडी मास्क | नग | 12 | 8 | 9 | 8 |
| २४. | फ्लोरोसेंट सेफ्टी जॅकेट | नग | 300 | 300 | 410 | 300 |
| २५. | लोखंडी पंजे | नग | 300 | - | 358 | 300 |

केंद्रीय दर निश्चितीकरण समितीने वरील नमुद तक्त्यातील स्तंभ क्र.७ मधील मंजुर दरानुसार साहित्य खरेदी करण्यास मान्यता देऊन पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी प्रदान केली आहे. या दरानुसार व अंदाजपत्रकीय नमुद संख्येनुसार साहित्य खरेदी अंदाजपत्रकीय तरतुद रु.३६,५७,०८०/- च्या मर्यादेत खरेदी करण्याचा व पुरवठादार मे.यश ट्रेडिंग कंपनी यांची वाटाघाटी अंती मंजुर केलेल्या दरानुसार निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक ११८/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध विभागांकडून मागणी नोंदवून स्वच्छता साहित्य खरेदी करण्याची निविदा क्र.2020_AMCA_610286_4 नुसार निविदा मागविण्यात आली. चौथ्या वेळेस प्राप्त फक्त एक निविदा मे.यश ट्रेडिंग कंपनी यांची होती. केद्रीय दर निश्चीतीकरण समितीने वाटाघाटी अंती मंजुर केलेले दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशील (कंपनीच्या नावासह) | प्रमाण | वाटाघाटी अंती अंतिम झालेले दर सर्व करांसहीत |
|---|---|---|---|
| १. | साधे खराटे (७५० ग्रॅम) | नग | ३६ |
| २. | लांब दांडीचे खराटे (७५० ग्रॅम) | नग | ९५ |
| ३. | फावडे दांड्यासह (टाटा कंपनीचे) | नग | ३१० |
| ४. | टिकाव दांड्यासह (टाटा कंपनीचे) | नग | ४०० |
| ५. | लहान टोपले १२ इंची | नग | १८८ |
| ६. | मोठे टोपले १८ इंची | नग | २३२ |
| ७. | लांब दांडीचे फावडे | नग | २४९ |
| ८. | सब्बल | नग | ९०० |
| ९. | लोखंडी बकेट | नग | २३५ |
| १०. | कुंचा झाडू (४०० ग्रॅम) | नग | १०० |
| ११. | ताडपत्री मोठी २१ बाय १२ | नग | ३५६८ |
| १२. | गमबुट (डक बॅक कंपनीचे) | नग | ९८६ |
| १३. | पांढरे फिनेल ५ लि.कॅन | कॅन | १८३ |
| १४. | काळे फिनेल २५ लि.कॅन | कॅन | २०६५ (413 five lit i.e.82.60 per lit) |
| १५. | लाईफ बॉय साबण (१२५ ग्रॅम) | नग | २२ |
| १६. | रबरी हॅण्ड ग्लोज | नग | ११६ |
| १७. | फावडे दांडे | नग | ३४ |
| १८. | टिकाव दांडे | नग | ३९ |
| १९. | ॲसिड १ लि.कॅन | लिटर | २३६ (five lit i.e.47.20 per lit) |
| २०. | रबरी पाईप १/२ इंची | फुट | ८.५० |
| २१. | रबरी पाईप १ इंची | फुट | ३० |
| २२. | फ्लोअर वायपर | नग | ३२७ |
| २३. | कापडी मास्क | नग | ८ |
| २४. | फ्लोरोसेंट सेफ्टी जॅकेट | नग | ३०० |
| २५. | लोखंडी पंजे | नग | ३०० |

वरील दरानुसार व अंदाजपत्रकातील नमुद संख्येनुसार साहित्य खरेदीस, अंदाजपत्रकीय र.रु.३६,५७,०८०/- च्या मर्यादेत खरेदी करण्यासाठी व पुरवठादार मे.यश ट्रेडिंग कंपनी, औरंगाबाद यांची निविदा स्विकृतीस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ११९/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२४.०४.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हिड-१९) या विषाणुमूळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषित केलेला आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३.०३.२०२० पासून लागू करून त्या बाबतची नियमावली तयार केली आहे. कोरोना बाधीत रुग्णांची संख्या औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यावर नियंत्रण करणे व विषाणु संसर्गात अधिक वाढ होऊ न देता तात्काळ उपाय योजना आखण्यात येत

आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन कोरोना रुग्णांना तातडीने उपचार मिळवून देण्यासाठी रुग्णवाहिका खरेदी करणे व लस/औषधी साठवणूकीसाठी रेफ्रीजरेटर्स, आईस-लाईन रेफ्रिजरेटर्स, डिप फ्रिजर्स खरेदी करणे गरजेचे असल्याने सी.एस.आर.फंडातून निधी देण्याची मागणी राज्य शासनाकडे करण्यात आली होती. त्यानुसार राज्य शासनाकडून रु.२०० लक्ष निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या शासकीय निधीतून खालील प्रमाणे रुग्णवाहिका व इतर साहित्य खरेदी करावयाचे आहे.

| **अ.क्र.** | **रुग्णवाहिका/साहित्य** | **नग** | **दर** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| १. | बेसिक ॲम्ब्युलन्स (एस.एम.एल) | **०६** | **१५,००,०००/-** | **९०,००,०००.००** |
| २. | कार्डियाक ॲम्ब्युलन्स (एस.एम.एल) | **०२** | **२२,००,०००/-** | **४४,००,०००.००** |
| ३. | कार्डियाक ॲम्ब्युलन्सची उपकरणे | **०२** | **९,९६,५२०/-** | **१९,९३,०४०.००** |
| ४. | रेफ्रिजरेटर २०० लिटर | **५०** | **२०,४८,९८६/-** | **१०,२४,४९३.००** |
| ५. | आईस-लाईन रेफ्रिजरेटर ३०० लिटर | **१५** | **२,००,०००/-** | **३०,००,०००.००** |
| ६. | डिप फ्रिजर ५०० लिटर | **१५** | **२४,९९४/-** | **३,७४,९१०.००** |
| | | | **एकूण रक्कम रुपये** | **१,९७,९२,४४३.००** |

उपरोक्त प्रमाणे कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी रुग्णवाहिकी व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक र.रु.१,९७,९२,४४३/- चा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. मान्यता मिळाल्यास जीईएम पोर्टलद्वारे तसेच जाहिर निविदा मागवून साहित्य खरेदी करण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक ११९/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी रुग्णवाहिका व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी र.रु.१,९७,९२,४४३/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास तसेच प्रस्तावित वाहने व साहित्य खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२०/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२६.०४.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.भिमराव तोताराम काचोळे, शिपाई, लेखा विभाग, मनपा औरंगाबाद यांनी त्यांची पत्नी नामे किरण भिमराव काचोळे यांच्या गुडघ्याचे प्रत्यारोपण (Osteoarthritis both knee) या आजारावर संतपुरे हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून यासाठी र.रु.२,८४,४६५/- (अक्षरी रु.दोन लक्ष चौऱ्याऐंशी हजार चारशे पासष्ठ फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.२,४५,७५१/- एवढी असून सदरील रकमेच्या ९० टक्के र.रु.२,२१,१७५/- (अक्षरी रुपये दोन लक्ष एकवीस हजार एकशे पंच्च्याहत्तर फक्त) मधून ५ टक्के र.रु.१४,२२३/- (अक्षरी रुपये चौदा हजार दोनशे तेवीस फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.२,८४,४६५/- च्या ५ टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रु.२,०६,९५२/- (अक्षरी दोन लक्ष सहा हजार नऊशे बावन्न फक्त) रक्कम देय आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये गुडघ्याची प्रत्यारोपण आजार या आजाराचा विशिष्टोपचार आजार म्हणुन समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.१६.११.२०११ मध्ये परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट स्वरुपाच्या आजारावर घेतलेल्या उपचारा

साठीच्या खर्चाच्या प्रतिपुर्ती अनुज्ञेयते साठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांच्या यादी मध्ये सदरील रुग्णालयाचा समावेश नसल्या कारणाने त्यांना परतावा अनुज्ञेय नव्हता. तथापि, सदरील कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती विचारात घेता, त्यास हा खर्च झेपावणारा नसल्यामुळे तसेच त्याने प्रत्यक्षात खर्च केलेला असल्यामुळे मा.महासभेस असलेल्या विशेषाधिकारात सदरील वैद्यकीय परतावा एकूण रक्कमेचे तीन समान हफ्ते करून अदा करण्यास मान्यता मा.प्रशासक यांनी दिलेली असून वैद्यकीय खर्च र.रु.२.०० लक्ष पेक्षा जास्त असल्यामुळे सदरील परतावा मान्य करण्याचे अधिकार मा.स्थायी समिती यांचे अधिन असल्यामुळे परतावा खर्चास विशेष बाब म्हणुन मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १२०/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.भिमराव तोताराम काचोळे, शिपाई, लेखा विभाग, मनपा औरंगाबाद यांनी त्यांची पत्नी नामे किरण भिमराव काचोळे यांच्या गुडघ्याचे प्रत्यारोपण (Osteoarthritis both knee) या आजारावर संतपुरे हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून यासाठी र.रु.२,८४,४६५/- (अक्षरी रुपये दोन लक्ष चौऱ्याऐंशी हजार चारशे पासष्ठ फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.२,४५,७५१/- एवढी असून सदरील रकमेच्या ९० टक्के र.रु.२,२१,१७५/- (अक्षरी रुपये दोन लक्ष एकवीस हजार एकशे पंच्च्याहत्तर फक्त) मधून ५ टक्के र.रु.१४,२२३/- (अक्षरी रुपये चौदा हजार दोनशे तेवीस रुपये फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.२,८४,४६५/- च्या ५ टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रु.२,०६,९५२/- (अक्षरी रुपये दोन लक्ष सहा हजार नऊशे बावन्न फक्त) रक्कम देय आहे.

सदरील कर्मचाऱ्याची आर्थिक स्थिती विचारात घेता, त्यास हा खर्च झेपावणारा नसल्यामुळे तसेच त्याने प्रत्यक्षात खर्च केलेला असल्यामुळे मा.महासभेस असलेल्या विशेषाधिकारात सदरील परतावा खर्च र.रु.२,०६,९५२/- ला विशेष बाब म्हणुन सदरील रक्कमेचे तीन समान हफ्ते करुन अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२१/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२८.०४.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणीपुरवठा योजने अंतर्गत फारोळा येथे १०० व ५६ दलली प्रतिदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र असून या दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रात दररोज १५० दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत प्रामुख्याने तुरटी, ब्लिचींग पावडर व क्लोरीन गॅस चा वापर विविध टप्प्यांवर केला जातो. अशुध्द पाण्यात गढुळतेचे प्रमाण जास्त असते. पाण्यातील गढूळता कमी करण्यासाठी प्रामुख्याने तुरटी ग्रेड-१ चा वापर केला जातो. जायकवाडी उद्भवावरून येणाऱ्या पाण्यात गढुळतेचे प्रमाण कमी असते. तथापि, सरासरी १० पीपीएम इतकी तुरटी मात्रा वर्षभर द्यावी लागते. पावसाळ्याच्या दिवसात धरणात नवीन पाण्याची आवक वाढल्यानंतर पाण्याच्या गढुळतेत प्रचंड वाढ होते. त्यावेळेस तुरटीची मात्रा वाढवावी लागते. या सर्व बाबींचा विचार करता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राची वार्षीक मागणी ही ९१० मे.टन इतकी आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक मजिप्रा मंडळाच्या सन २०१९-२०२० च्या दरसुचीतील साहित्य पुरवठ्याच्या दरानुसार तयार केले असून अंदाजपत्रकीय र.रु.९०,९७,०४३/- इतकी आहे.

सदरील कामाची ई-निविदा कार्यवाही केली असता, निविदा कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे संदर्भ:-टेंडर आय.डी.क्र.2020-AMCA-626326-2

| | | |
|---|---|---|
| १. | **खात्याचे नाव** | **कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग)** |

| | | |
|---|---|---|
| २. | कामाचे स्वरुप/कामाचे नाव | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-फारोळा जलशुध्दीकरण केंद्रा करीता तुरटी ग्रेड-१ पुरवठा करणे. |
| ३. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव | होय, र.रु.९०,९७,०४३/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स/निविदा मागविण्यात आली. | र.रु.८१,२२,३६०/- |
| ४. | ज्यावृत्तपत्रात निविदेची जाहिरात देण्यात आली होती. त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई निविदा मार्फत |
| ५. | अ) निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत | ११.०१.२०२१ |
| | ब) निविदा उघडण्याचा दिनांक | १३.०१.२०२१ |
| ६. | निविदा किती वेळेस मागविल्या? | दोन वेळेस |
| ७. | एकूण किती निविदा आल्या? | दोन |
| ८. | निविदा प्राप्त दर | रु.१०,४९५/-मे.टन (अं.प.दरापेक्षा ४.९८% जास्त दराने) |

त्यापैकी पात्र निविदाधारकाची माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव व पत्ता | दाखल निविदा रक्कम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| १. | सार्क केमिकल्स, औरंगाबाद | ९५,५०,४५०/- | ४.९८% जास्त |

दर पृथ्थ:करण व वाटाघाटी अंती सार्क केमिकल्स, औरंगाबाद यांनी रु.१०,४९५/- प्रति मे.टन ऐवजी रु.१०,३५०/- प्रति मे.टन अशा दरास सहमती दिली आहे.

| | | |
|---|---|---|
| ९. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय. |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय. |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमूद करावीत. | होय, जी.एस.टी.कर, मजिप्रा मंडळाची सन २०१९-२० ची दरसुची ज्यात वाहतूक खर्चाचा समावेश नाही. |
| १०. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते नमुद करावे. | पाणी पुरवठा रसायन सामग्री खरेदी सन २०२०-२१ |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जास्तीचा खर्च उपरोक्त लेखा शिर्षकात असलेल्या एकत्रित तरतुदीमधून केला जाईल. |
| ११. | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे काय? | नाही. |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर पान क्रमांक द्यावा) | लागू नाही. |

| | | |
|---|---|---|
| १२. | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |
| तरी विषयांकीत काम सार्क केमिकल्स, औरंगाबाद यांच्याकडून वाटाघाटी अंती मान्यतेनुसार र.रु.१०,३५०/- प्रति मे.टन या दराने अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.५३% जास्त दराने र.रु.९४,१८,५००/- करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. | | |

**ठराव क्रमांक १२१/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तावीत औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता तुरटी ग्रेड-१ चा पुरवठा घेणे या कामाची सार्क केमिकल्स, औरंगाबाद यांची र.रु.१०,३५०/- प्रति मे.टन या दराची निविदा र.रु.९४,१८,५००/- खर्चाची निविदा मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२२/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२८.०४.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत १०० दलली जल शुध्दीकरण केंद्र सन-१९९२ साली कार्यान्वयीत करण्यात आलेले आहे. केंद्राची उभारणी करताना गाळणी हौद स्वच्छ करण्यासाठी उंचावरील टाकीमधून पाणी घेण्यासाठी ६०० मीमी व्यासाच्या एम.एस. जलवाहिनीवर ६०० मीमी व्यासाचे बटर व्हॉल्व्ह बसविण्यात आलेले आहेत. त्यापैकी ६ बटर फ्लाय व्हॉल्व्ह सन २००४-०५ मध्ये बदलण्यात आलेल्या आहेत. बसवविण्यात आलेल्या व्हॉल्व्हचे आर्युमान २८ व १५ वर्ष झालेली आहेत. नियमीत वापर व क्लोरीनयुक्त पाण्यामुळे बहुतांश झडपांची झीज झालेली आहे. यामुळे या झडपांची नेहमीच दुरुस्ती करावी लागते. त्याचप्रमाणे झडपांच्या गेटमधून गळती सुरु झाल्याने जलवाहिनीच्या देखभाल दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहेत. सद्यस्थितीत गाळणी हौद क्र.१०,१२,६ व ४ यांच्या पाईपला गळती होऊन पाणी वाया जात आहे. यापुर्वी या पाईपची २ ते ३ वेळेस दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तथापि, पाईप जाडी अत्यंत कमी झालेली असल्याने व झडपांच्या गळतीमधून पाणी व्यय होत असल्याने वेल्डिंगद्वारे गळतीची दुरुस्ती करणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे या पाईपच्या दुरुस्ती करीता खंडणकाळ घेऊन संपुर्ण गाळणी हौद रिकामे करावे लागतात. त्याचप्रमाणे भविष्यात मोठ्या प्रमाणावर पाईपला भगदाड पडल्यास गाळणीगृहात पाणी साचून विद्युत मोटारींना हानी पोहचू शकते. यामुळे सर्वच झडपा नव्याने बसविणे गरजेचे आहे.

कामाचे अंदाजपत्रक उत्पादीत कंपन्यांच्या प्राप्त दरानुसार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१९-२०२० व सा.बां.विभागाच्या सन २०१८-१९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकीय र.रु.३३,५२,५१३/- इतकी आहे. सदरील कामाचा खर्च जायकवाडी जलवाहिनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकातून प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. करीता, अंदाजपत्रक र.रु.३३,५२,५१३/- चे मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १२२/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत १०० दलली जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथील गाळणी हौदाचे बटर फ्लाय व्हॉल्व्ह बदलण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.३३,५२,५१३/- मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२३/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२८.०४.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गाळयांसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. उक्त निविदामध्ये उच्च दराच्या निविदेचा तपशिल खालील प्रमाणे

१. जय टॉवर्स, पदमपुरा येथे असलेले महानगरपालिका व्यापारी संकुलातील गाळा क्र.०५ साठी दर रू.८०७३/- प्रती माह निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्रीमती मेघना संतोष कोरे यांचे निविदा दर प्रती माह र.रू.९०४१.७६/- आहे.**
२. जय टॉवर्स, पदमपुरा येथे असलेले महानगरपालिका व्यापारी संकुलातील गाळा क्र.१३ साठी दर रू.४८१८/- प्रती माह निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्री.स्वप्निल जे वाघचौरे यांचे निविदा दर प्रती माह र.रू.५०५८.९०/- आहे.**
३. कबाडीपुरा महानगरपालिका व्यापारी संकुल, गाळा क्र.४ साठी निविदा दर रू.६१८९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्री.इसरत कबीर खान यांचे निविदा दर रू.७७३६.२५ आहे.**
४. पिया मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुल, औरंगपुरा मधील तळ मजला गाळा क्र.११ साठी निविदा दर रू.२६३९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्री.नाना किसनराव म्हस्के यांचे निविदा दर रू.३५०९.८७ आहे.**
५. पिया मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुल, औरंगपुरा मधील तळ मजला गाळा क्र.०८ साठी निविदा दर रू.२६३९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **रोहिनी इन्टरप्रायजेस यांचे निविदा दर रू.३०३४.८५ आहे.**
६. पिया मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुल, औरंगपुरा मधील तळ मजला गाळा क्र.०२ साठी निविदा दर रू.२६३९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्री.संजय उत्तमराव जगताप यांचे निविदा वार्षिक दर रू.३१,९८४.६८ आहे.**
७. पिया मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुल, औरंगपुरा मधील पहिला मजला गाळा क्र.१८ साठी निविदा दर रू.२६३९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्री.शैलेश साळुराम बागुल यांचे निविदा वार्षिक दर रू.३१,९८४.६८ आहे.**
८. पिया मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुल, औरंगपुरा मधील पहिला मजला गाळा क्र.२० साठी निविदा दर रू.२६३९/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्रीमती अनुसया रामकिसन शिंदे यांचे निविदा दर रू.२७०४.९८ आहे.**
९. एकनाथ नगर, उस्मानपुरा येथील महानगरपालिका व्यापारी संकुलातील गाळा क्र.०५ साठी निविदा दर रू.१३९५/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **आनंद मल्टी सर्व्हिसेस यांचे निविदा दर रू.१५३४.५० आहे.**
१०. एकनाथ नगर, उस्मानपुरा येथील महानगरपालिका व्यापारी संकुलातील गाळा क्र.०६ साठी निविदा दर रू.१३९५/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **आयुष मल्टी सर्व्हिसेस यांचे निविदा दर रू.१५३४.५० आहे.**
११. एकनाथ नगर, उस्मानपुरा येथील महानगरपालिका व्यापारी संकुलातील गाळा क्र.२३ साठी निविदा दर रू.१३९५/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **अभिलाषा इन्टरप्रायजेस ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस यांचे निविदा दर रू.१४३४.५० आहे.**
१२. एकनाथ नगर, उस्मानपुरा येथील महानगरपालिका व्यापारी संकुलातील गाळा क्र.२५ साठी निविदा दर रू.१३९५/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्री.किरण मोतीलाल देवकर यांचे निविदा दर रू.१५३४.५० आहे.**

**१३.**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक मनपा व्यापारी संकुल, पैठणगेट गाळा क्र.ए-२८ साठी निविदा दर रू.३३२४/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्री.मोहम्मद जफर मोहम्मद वझीर यांचे निविदा दर रू.३३५७.२४ आहे.**

**१४.**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक मनपा व्यापारी संकुल, पैठणगेट गाळा क्र.ए-२० साठी निविदा दर रू.३२५७/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्री.खान शेहेरेझा खलील अहेमद खान यांचे निविदा दर रू.३२५७ आहे.**

**१५.** चिकलठाणा झोन कार्यालय, पहिला मजला उत्तर बाजुकडील हॉलसाठी निविदा दर रू.२२,८६३/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्री.राजेंद्र गंगाधर गवळी यांचे निविदा दर रू.२,७४,४९३.१८ आहे.**

**१६.**नाथ सुपर मार्केट महानगरपालिका व्यापारी संकुल, औरंगपुरा मधील तळ मजला गाळा क्र.१२ साठी निविदा दर रू.६८५३/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **राजेश्वर माधवराव चालिकवार यांचे निविदा दर रू.१,६३,६४९.६४ आहे.**

**१७.**न.भु.क्र.१५३०२/१२, नुपूर अपार्टमेंट लगत असलेले महानगरपालिका व्यापारी संकुल, तळ मजला, दक्षिण मध्य उत्तर बाजुसाठी (गाळा क्र.०३) निविदा दर रू.६३४५/- प्रती माह दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये **श्री.उमेश हिरालाल कुमावत यांचे निविदा दर रू.६५०३.६३ आहे.**

करिता वरील प्रमाणे, निविदेमध्ये प्राप्त उच्च दराचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका कलम ७९ (क) नुसार मा.स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक यांच्याकडे असल्याने मा.प्रशासक यांच्याकडे मंजुरीसतव सादर.

**ठराव क्रमांक १२३/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गाळयांसाठी निविदा मागविण्यात आल्या असून प्रस्तावात नमुद असलेल्या उक्त निविदामध्ये उच्च दराच्या निविदेच्या तपशिलासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२४/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२८.०४.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशात कोरोना विषाणुच्या संसर्गाने उद्‌भवलेल्या परिस्थितीत औरंगाबाद शहरातील नागरीकांना किमान मुलभूत गरजा विषयक चर्चा करण्यासाठी श्री.अस्तिक कुमार पांडेय (भा.प्र.से.) प्रशासक, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६.०४.२०२१ रोजी आपत्कालीन परिस्थितीच्या निवारणासाठी शहरात लसीकरण मोहिम कार्यान्वित करण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील बैठकीसाठी खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.प्रशासक | अध्यक्ष |
| २. | अतिरीक्त आयुक्त | सदस्य |
| ३. | शहर अभियंता | सदस्य |
| ४. | उपआयुक्त | सदस्य |
| ५. | कार्यकारी अभियंता | सदस्य |
| ६. | मुख्यलेखाधिकारी | सदस्य |
| ७. | आरोग्य वैद्यकीय अधिकारी | सदस्य |

ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हिड-१९) या विषाणूमूळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषित केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रातील शहरात वेगाने पसरत असल्याचे निर्दशनास आले आहे. राज्य शासनाने कोरोना

विषाणुचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदे १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागु करून त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणुच्या संसर्गात अधिक वाढ होऊ न देता तात्काळ उपाय योजना करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहरात कोव्हिड-१९ या साथीच्या नियंत्रणासाठी शहरात नागरीकांचा येणाऱ्या संपर्क ठिकाणाचा विचार करता बैठकीत झालेल्या खालील बाबींचा विचार करण्यात आला.

१. सनियंत्रण समिती औरंगाबाद शहरातील नागरीकांचे लसीकरण वाढविण्यासाठी खालील काही गोष्टींवर प्राधान्याने विचार करणे आवश्यक वाटते.
२. मोठ्या प्रमाणावर लसीकरण मोहिम राबविण्यासाठी आवश्यक जागा रुम्स् व सुविधा शहरातील खाजगी दवाखान्यामधून उपलब्ध करुन घेणे. जेणे करून तेथे लसीकरण केंद्राची स्थापना करण्यात येईल.
३. ज्या महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक सोयी सुविधा आहेत तेथे लसीकरण केंद्र स्थापन करणे.
४. सन्माननीय लोक प्रतिनिधी खासदार, आमदार व नगरसेवक यांच्या मागणीवरुन प्रत्येक वॉर्डामध्ये एक असे एकूण ११५ लसीकरण केंद्र स्थापित केले आहेत व दि.०५.०४.२०२१ पासून मेगा लसीकरण मोहिम सुरु केली आहे. यास बैठकीस मान्यता देण्यात येत आहे.
५. महानगरपालिका सनियंत्रण समितीच्या आदेशानुसार तसेच लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवून ठरावास मान्यत घेणे व लोकहितास्तव शहरामध्ये मेगा लसीकरण मोहिम राबविणे.
६. शहरातील विविध फार्मा कंपनी, एम.एस.ई.बी., मेडिकल शॉप कर्मचारी, बँक कर्मचारी, सर्व शासकीय संस्था, मा.हायकोर्ट, मा.जिल्हा न्यायालय स्टाफ, सर्व प्रकारचे प्रसिध्दी माध्यम, रेस्टॉरंट स्टाफ, डिलेव्हरी बॉईज, खाजगी शाळा कर्मचारी, फेरीवाले, भाजी विक्रेते, मांस, फळ दुध विक्रेते, सर्व प्रकारचे व्यापारी वर्ग यांचा दररोज येणारा लोक संपर्क पाहता, हे सुपर स्प्रेडर ठरु शकतात. त्यामुळे शहरातील नागरीकांचे हित पाहता उपरोक्त कर्मचाऱ्यांचे लसीकरण करणे आवश्यक आहे. “Break The Chain” या मोहिमे अंतर्गत जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांचे लसीकरण पुर्ण होणे आवश्यक आहे.
७. लसीकरण संचिकेतील मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार फार्मा स्टाफ, फस्टलाईन वर्कर या वर्गात बँक कर्मचारी व खाजगी शाळा कर्मचारी स्टाफ यांच्या फस्ट लाईन वर्कर या गटात समावेश केलेला आहे. यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.
८. उपरोक्त सर्व गट फ्रंट लाईन वर्कर या गटात समाविष्ट करणे आवश्यक आहे. सध्या ४५ वर्षेवरील व्यक्तींना लस देण्यात यावी. लसीच्या उपलब्धतेनुसार व कोविन ॲप वरील अपडेट नुसार ४५ वर्षाखालील (१८ ते ४५ वर्षे) व्यक्तींना कोव्हिड लस देण्यात यावी.
९. तसेच यापुर्वी मा.हायकोर्ट, मा.जिल्हा न्यायालय या आस्थापनामधील मा.न्यायमुर्तींना कोव्हिड लस देण्यात आली. विविध प्रसार माध्यमातील कर्मचारी यांना त्यांच्या मागणीनुसार लस देण्यात आली. या व्यक्तींच्या लसीकरणास कार्योत्तर मान्यता या बैठकीत देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १२४/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षी कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदे १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागु करून त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणुच्या संसर्गात अधिक

वाढ न होऊ देता तात्काळ उपाय योजना करणे आवश्यक आहे. औरंगाबाद शहरात कोव्हिड-१९ या साथीच्या नियंत्रणासाठी शहरात नागरीकांच्या येणाऱ्या संपर्क ठिकाणाचा विचार करता बैठकीत खालील बाबींचा विचार करण्यात आला.

१. सनियंत्रण समिती औरंगाबाद शहरातील नागरीकांचे लसीकरण वाढविण्यासाठी खालील काही गोष्टींवर प्राधान्याने विचार करणे आवश्यक वाटते.
२. मोठ्या प्रमाणावर लसीकरण मोहिम राबविण्यासाठी आवश्यक जागा, रुम्स् व सुविधा शहरातील खाजगी दवाखान्यामधून उपलब्ध करुन घेणे. जेणे करून तेथे लसीकरण केंद्राची स्थापना करण्यात येईल.
३. ज्या महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक सोयी सुविधा आहेत तेथे लसीकरण केंद्र स्थापन करणे.
४. सन्माननीय लोकप्रतिनिधी खासदार, आमदार व नगरसेवक यांच्या मागणीवरुन प्रत्येक वॉर्डामध्ये एक असे एकूण ११५ लसीकरण केंद्र स्थापित केले आहेत व दि.०५.०४.२०२१ पासून मेगा लसीकरण मोहिम सुरु केली आहे. यास बैठकीस मान्यता देण्यात येत आहे.
५. महानगरपालिका सनियंत्रण समितीच्या आदेशानुसार तसेच लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवून ठरावास मान्यत घेणे व लोकहितास्तव शहरामध्ये मेगा लसीकरण मोहिम राबविणे.
६. शहरातील विविध फार्मा कंपनी, एम.एस.ई.बी., मेडिकल शॉप कर्मचारी, बँक कर्मचारी, सर्व शासकीय संस्था, मा.हायकोर्ट, मा.जिल्हा न्यायालय स्टाफ, सर्व प्रकारचे प्रसिध्दी माध्यम, रेस्टॉरंट स्टाफ, डिलेव्हरी बॉईज, खाजगी शाळा कर्मचारी, फेरीवाले, भाजी विक्रेते, मांस, फळ, दुध विक्रेते, सर्व प्रकारचे व्यापारी वर्ग यांचा दररोज येणारा लोकसंपर्क पाहता, हे सुपर स्प्रेडर ठरु शकतात. त्यामुळे शहरातील नागरीकांचे हित पाहता, उपरोक्त कर्मचाऱ्यांचे लसीकरण करणे आवश्यक आहे. “Break The Chain” या मोहिमे अंतर्गत जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांचे लसीकरण पुर्ण होणे आवश्यक आहे.
७. लसीकरण संचिकेतील मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार फार्मा स्टाफ, हेल्थ केअर वर्कर या वर्गात बँक कर्मचारी व खाजगी शाळा कर्मचारी स्टाफ यांच्या फ्रन्ट लाईन वर्कर या गटात समावेश केलेला आहे. यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.
८. उपरोक्त सर्व गट फ्रंट लाईन वर्कर या गटात समाविष्ट करणे आवश्यक आहे. सध्या ४५ वर्षेवरील व्यक्तींना लस देण्यात यावी. लसीच्या उपलब्धतेनुसार व कोविन ॲप वरील अपडेट नुसार ४५ वर्षाखालील (१८ ते ४५ वर्षे) व्यक्तींना कोव्हिड लस देण्यात यावी.
९. तसेच यापुर्वी मा.हायकोर्ट, मा.जिल्हा न्यायालय या आस्थापनामधील मा.न्यायमुर्तींना कोव्हिड लस देण्यात आली. विविध प्रसार माध्यमातील कर्मचारी यांना त्यांच्या मागणीनुसार लस देण्यात आली. या व्यक्तींच्या लसीकरणास कार्योत्तर मान्यता या बैठकीत देण्यात येत आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करून मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२५/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.०४.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.०१ अंतर्गत पडेगाव येथील कत्तलखान्या जवळील जागेवर मृत प्राण्यांची विल्हेवाट लावण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१९-२० च्या SSR नुसार र.रु.६६,११,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा.प्रशासक

यांनी दि.२४.०१.२०२० अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच ठराव क्र.२७ दि.१२.०८.२०२० नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाची नियमानुसार रितसर निविदा मागविण्यात आली असता, ०१ निविदा प्राप्त झाली असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.०१ % कमी दराची निविदा मे.फाईव्ह स्टार कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. सदरील कामाच्या निविदेस मा.प्रशासक यांनी दि.०१.०२.२०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी, मे.फाईव्ह स्टार कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.०१% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १२५/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पडेगाव येथील कत्तलखान्या जवळील जागेवर मृत प्राण्यांची विल्हेवाट लावण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली निविदा मे.फाईव्ह स्टार कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.०१% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२६/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३०.०४.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.१८.०३.२०२१ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीच्या बैठकीमध्ये श्री.संजय कचरु पवार, 'लेखाधिकारी' यांना 'मुख्य लेखाधिकारी' या पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत सर्वानुमते शिफारस करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (१) नुसार सदर पदाची नियुक्ती प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे.

निवड समितीच्या अहवालानुसार श्री.संजय पवार, 'लेखाधिकारी' यांनी वेळोवेळी अर्ज देऊन 'मुख्य लेखाधिकारी' या पदावर पदोन्नती देण्याबाबत विनंती केल्याचे दिसून येते. दि.१२.०१.२०१५ रोजी निवड झालेल्या निवड समितीमध्ये मुख्य लेखाधिकारी पदावर पदोन्नती देण्यासाठी पद त्यावेळी रिक्त नसल्याने याबाबत निर्णय झालेला नव्हता. सद्यस्थितीत सदर पद रिक्त आहे व श्री.संजय पवार हे मॉडेल रिक्रुटमेंट रुल्समधील मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाची अर्हता धारण करीत आहेत.

या बाबींचा विचार करता, श्री.संजय कचरु पवार, 'लेखाधिकारी' यांना 'मुख्य लेखाधिकारी' या पदावर वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० (६ व्या वेतन आयोगानुसार) (एस-२३) ६७७००-२०८७०० (७ व्या वेतन आयोगानुसार) मध्ये रिट याचिका क्र.१०७२१/२०१९ मध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून व दि.२३.०५.२०१८ रोजीच्या अधिसुचनेनुसार भविष्यात शासनाने मुख्य लेखाधिकारी या पदावर शासनाकडील अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती केल्यास श्री.संजय पवार यांना लेखाधिकारी पदावर पदावनत करण्यात येईल व याबाबत त्यांना कुठल्याही प्रकारे न्यायालयात दाद मागता येणार नाही. या अटींवर तदर्थ पदोन्नती देण्याबाबत समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

करीता, निवड समितीने शिफारस केल्यानुसार श्री.संजय कचरु पवार, 'लेखाधिकारी' यांना 'मुख्य लेखाधिकारी' या पदावर वेतनश्रेणी (एस-२३) ६७७००-२०८७०० (७ व्या आयोगानुसार) मध्ये तदर्थ पदोन्नती देऊन त्यास मा.प्रशासक यांची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १२६/२०२१:-**

आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीनी शिफारस केल्यानुसार, श्री.संजय कचरु पवार, ‘लेखाधिकारी’ यांना ‘मुख्य लेखाधिकारी’ या पदावर वेतन श्रेणी (एस-२३) ६७७००-२०८७०० (७ व्या वेतन आयोगानुसार) मध्ये रिट याचिका क्र.१०७२१/२०१९ मध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून दि.२३.०५.२०१८ रोजीच्या अधिसुचनेनुसार भविष्यात शासनाने मुख्य लेखाधिकारी या पदावर शासना कडील अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती केल्यास श्री.संजय पवार यांना लेखाधिकारी पदावर पदावनत करण्यात येईल व याबाबत त्यांना कुठल्याही प्रकारे न्यायालयात दाद मागता येणार नाही. या अटींवर तद्‌र्थ पदोन्नती देऊन मान्यता देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२७/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०३.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे जुने व्यापारी संकुलावरील दक्षिण बाजुकडील जुने झोन कार्यालयाचा हॉल वरिष्ठ अधिक्षक, मुख्य पोस्ट ऑफीस, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांनी चिकलठाणा पोस्ट ऑफीससाठी मागितले आहे. सदरचा हॉल विना वापर पडून आहे.

करीता, त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार भाडे आकारणी करुन भाडेतत्वावर देणेसाठी संमती दर्शविलेली असल्याने उक्त हॉल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार भाडेतत्वावर देणेसाठी प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक १२७/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे जुने व्यापारी संकुलावरील दक्षिण बाजुकडील जुने झोन कार्यालयाचा हॉल वरिष्ठ अधिक्षक, मुख्य पोस्ट ऑफीस, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांनी चिकलठाणा पोस्ट ऑफीससाठी मागितले आहे. सदरचा हॉल विना वापर पडून आहे. करीता, त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार भाडे आकारणी करुन भाडेतत्वावर देणेसाठी संमती दर्शविलेली असल्याने उक्त हॉल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रा नुसार भाडेतत्वावर देणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२८/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. ०७.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन विभागास फायर कॉल व पंपिंग कॉल्ससाठी १५ ट्रेलर पंप व १५ पोर्टेबल पंपची तातडीने आवश्यकता असल्याने सदरील साहित्य खरेदी करण्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. राहुल इंजिनिअरिंग कंपनी दिल्ली | रुपये ९०,७५०००/- |
| २. | मे. श्री सर्व्हीसेस औरंगाबाद. | रुपये १९१,४९,०००/- |
| | अंदाजपत्रकीय दर | रुपये ९९,६९,१२०/- |

उपरोक्त प्रमाणे १५ ट्रेलर पंप व १५ पोर्टेबल पंप खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या दोन निविदाधारकांपैकी न्युनतम दर मे. राहुल इंजिनिअरिंग कंपनी दिल्ली यांचे असुन ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा रुपये ८.८७ ने कमी आहेत. प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. राहुल इंजिनिअरिंग कंपनी दिल्ली यांची न्युनतम दराची निविदा स्विकृत करणे योग्य होईल.

करीता १५ ट्रेलर पंप व १५ पोर्टेबल पंप खरेदी करण्यासाठी मे. राहुल इंजिनिअरिंग कंपनी दिल्ली यांची रुपये ९०,७५,०००/- दराची निविदा स्विकृत करण्यासाठी प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १२८/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन विभागासाठी १५ ट्रेलर पंप व १५ पोर्टेबल पंप खरेदी करण्यासाठी मे राहुल इंजिनिअरिंग कंपनी दिल्ली यांची रु.९०,७५०००/- दराची निविदा स्विकृत करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक १२९/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०७.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरासाठी रु.१६८०.५० कोटीच्या योजनेस शासनाने महाराष्ट्र सुवणे जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पास मंजुरी प्रदान केलेली आहे. सदर योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेला नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र.नगरो-२०१९/प्र.क्र.२५८/नवि-३३. दि.१३ सप्टेंबर २०१९ मधील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व औरंगाबाद महानगरपालिका यांच्या संसुक्त प्रकल्प व्यवस्थापन युनिट (PMU) स्थापन करण्यात आलेले आहे.

सदर युनिटमध्ये श्री.हेमंत आनंदा कोल्हे, कार्यकारी अभियंता यांची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांनी प्रशासक यांच्या नियंत्रणाखाली काम करण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. तथापि श्री.हेमंत आनंदा कोल्हे,कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) हे दि.३०/०४/२०२१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. सध्या कार्यरत तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असल्याने सदर प्रकल्पासाठी पूर्णवेळ अधिकारी उपलब्ध नसल्याने व सदर प्रकल्प नियोजित पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे.

करिता, श्री.हेमंत आनंदा कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेसाठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.१६८०.५० कोटीच्या योजनेस मंजुर केलेल्या योजनेकरिता प्रकल्प व्यवस्थापन युनिट (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणून काम करण्यासाठी या विवक्षीत कामासाठी सेवा करार पध्दतीने ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबात प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १२९/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरासाठी रु.१६८०.५० कोटीच्या योजनेस शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगररोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पास मंजुरी प्रदान कलेली आहे. सदर योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द शासनाने प्रसिध्द केलेला नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र.नगरो-२०१९/प्र.क्र.२५८/नवि-३३ दि.१३ सप्टेंबर २०१९ मधील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महराष्ट्र जीवन प्राधिकरण व औरंगाबाद यांच्या संयुक्त प्रकल्प व्यवस्थापन युनिट (PMU) स्थापन करण्यात आलेले आहे.

सदर युनिटमध्ये श्री.हेमंत आनंदा कोल्हे, कार्यकारी अभियंता यांची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांनी प्रशासक यांच्या नियंत्रणाखाली काम करण्या बाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. तथापि, श्री.हेमंत आनंदा कोल्हे, कार्यकारी अभिंता (पाणी पुरवठा) हे दि.३०.०४.२०२१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. सध्या कार्यरत तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी

असल्याने सदर प्रकल्पासाठी पुर्णवेळ अधिकारी उपलब्ध नसल्याने व सदर प्रकल्प नियोजित पुर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे.

करिता, श्री.हेमंत आनंदा कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेसाठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.१६.८०.५० कोटीच्या योजनेस मंजुर केलेल्या योजनेकरीता प्रकल्प व्यवस्थापन युनिट (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणुन काम करण्यासाठी या विवक्षीत कामासाठी सेवा करार पध्दतीने ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३०/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. १०.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.शेख शहानूर पटेल, मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा यशोधरा कॉलनी, के.प्रा.शा.किराडपुरा नं.१ यांनी आईच्या (शमीमबी शहानूर पटेल) आजारपणावर यूनायटेड सिग्मा हॉस्पिटल, औरंगाबाद, सहारा हॉस्पिटल, एशियन हॉस्पिटल येथे उपाचारासाठी खर्च केला असून सदर आजारपणावर केलेल्या वैद्यकिय देयकापैकी अनूज्ञेय र.रु.३,०३,३४४/- च्या ९०% र.रु.२,७३,००९/- होत असून संबंधितांनी धनादेश क्र.३६८६२२ दि.२४.०१.२०२० अन्वये र.रु.१,५०,०००/- चे अग्रिम घेतलेले आहे. एकुण र.रु.३,६२,३२३/- मधून पैकी ५% र.रु.१८,११६/- महानगरपालिका फंडात जमा करून व अनुज्ञेय र.रु.२,७३,००९९/- रक्कमेतून वजा करून येणारी र.रु.२,५४,८९३/- एवढी होत असून सदर रक्कमेतून अग्रिम र.रु.१,५०,०००/- वजा जाता र.रु.१,०४,८९३/- एवढा वैद्यकिय परतावा संबंधितास देय आहे.

करिता, श्री.शेख अहेमद शेख शहानूर पटेल, मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा यशोधरा कॉलनी, के.प्रा.शा.किराडपुरा, नं.१ यांनी त्यांच्या आईच्या आजारपणावर केलेल्या वैद्यकिय खर्चाची र.रु.१,०४,८९३/- (अक्षरी एक लक्ष चार हजार आठशे त्र्यान्नव रुपये मात्र) या वैद्यकिय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक १३०/२०२१:-</u>**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, श्री.शेख अहेमद शेख शहानूर पटेल, मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा यशोधरा कॉलनी, के.प्रा.शा किराडपूरा नं.१ यांनी आईच्या (शमीमबी शहानूर पटेल) आजारपणावर यूनायटेड सिग्मा हॉस्पिटल येथे केलेल्या वैद्यकिय देयकापैकी अनूज्ञेय र.रु.३,०३,३४४/- च्या ९०% र.रु.२,७३,००९/- होत असून संबंधितांनी धनादेश क्र.३६८२२ दि.२४.०१.२०२० अन्वये र.रु.१,५०,०००/- चे अग्रिम घेतलेले आहे. एकूण व अनूज्ञेय र.रु.३,६२,३२३/- मधून पैकी ५% र.रु.१८,११६/- महानगरपालिका फंडात जमा करून व अनुज्ञेय र.रु.२,७३,००९/- रक्कमेतून वजा करून येणारी र.रु.२,५४,८९३/- एवढी होत असून सदर रक्कमेतून अग्रिम र.रु.१,५०,०००/- वजा जाता र.रु.१,०४,८९३/- (अक्षरी एक लक्ष चार हजार आठशे त्र्यान्नव रुपये मात्र) एवढ्या वैद्यकिय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३१/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१०.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद कोरोना साथ रोगाचा प्रार्दुभाव वाढत आहे. त्यासाठी वेळोवेळी करावयाच्या उपाय योजनाच्या अनुषंगाने कार्यालयीन अधिकारी/कर्मचारी यांच्या बैठका घेतल्या जातात, यासाठी मध्ये सुयोग्य आसन व्यवस्था, प्रोजेक्टर लावुन पी.पी.पी.दर्शविणे/बघणे त्यासह इतर आवश्यक सुविधा असणे गरजेचे असते.

मात्र सद्यस्थितीत किमान संख्येने अधिकारी/कर्मचारी यांची बैठक घ्यावयाची झाल्यास मा.प्रशासक यांचे अस्तित्वातील दालन अपुरे पडते, कारण या ठिकाणी भेटीला येणारे अभ्यागत, इतर विभागाचे अधिकारी महानगरपालिकेत मा.प्रशासक यांच्या दालनात भेटीस येतात. तथापि, बैठक घेण्यासाठी स्वतंत्र बैठक कक्ष (मिटींग हॉल) नसल्याने ही बाब गैरसोयीची ठरते. या कारणाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, मौलाना अबुल कलाम संशोधन केंद्र या ठिकाणी किंवा इतर उपलबध ठिकाणी बैठकीचे आयोजन करण्यात येते. सदरची ठिकाणे मुख्यालयापासून दुर अंतरावर असल्याने बैठकीच्या कारणासाठी अधिकचा कार्यालयीन वेळेचा अपव्यय होतो. तसेच ऐनवेळी बैठक स्थळ बदलावे लागल्यास त्याची सूनना सर्व संबधीत अधिकारी/कर्मचारी यांना वेळोवेळी द्यावी लागते, याचा परिणाम कार्यालयाच्या कार्यक्षमतेवर होतो.

या कारणास्तव कार्यालयीन कामात सुसुत्रता आणणेसाठी महानगरपालिकेतील मुख्य इमारती मध्ये मा.प्रशासक यांच्या दालना लगत असलेली जागा बैठकीसाठी सभागृह बांधण्यासाठी योग्य असल्याचे आढळून आले आहे. त्यासाठी आवश्यक पाडकाम करून व आवश्यक ते फेरबदल करणे आवश्यक आहे. जे नियोजन विचारात घेण्यात आले आहे. त्यामध्ये उप आयुक्त (म), उप आयुक्त(प्र),व गटनेता भाजपा यांच्या दालनासाठी, सध्याची दक्षता कक्षाची जागा विचारात घेण्यात आली आहे. करमुल्य निर्धाकर व संकलक यांचे करिता नव्याने केलेल्या नियोजन अंतर्गत, नियोजित प्रशासकीय बैठक हॉल (मिटींग हॉल) च्या मागील बाजुच्या दालनाचे नियोजन करण्यात आले आहे. या शिवाय गटनेता इत्तेहाद आघाडी यांचेसाठी, सध्याचे अतिरिक्त आयुक्त यांचे दालनाच्या बाहेरील जागेतील खोली व त्यामागे नगर सचिव विभागातील छोट्या खोलीची जागा विचारात घेऊन नियोजन करण्यात आले आहे, त्यामुळे कोणतीही गैरसोय नाही.

सदर ठिकाणी अंतर्गत भिंतीचे आवश्यक तेवढे पाडकाम केल्यानंतर ती जागा उपलब्ध होणार आहे, त्याचे नियोजन करण्यात आले आहे. नियोजना नूसार त्यामध्ये बैठक दालन (मिटींग हॉल) क्षमता माणसी ४७ ची असून, याच हॉलमध्ये प्रोजेक्टर व साऊंड सिस्टीमची सूविधा, लगत भागात प्रतिक्षा कक्ष, स्वच्छतागृहाच्या सुविधेसह तयार करण्यात येणार आहे. तसेच शिल्लक राहणाऱ्या जागेत करमुल्य निर्धारक व संकलक यांचे दालन व लगत त्यांचे अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी आसन व्यवस्था निश्चित करण्यात आली आहे. या दोन्ही दालनासाठी स्वतंत्र प्रवेश मार्गाचे नियोजन करण्यात आलेले असल्याने दोन्ही विभागाची अडचण होणार नाही.

या कामासाठी उपलब्ध वास्तुविशारद श्री.अनिरुध्द नाईक स्थापती, प्लॅनर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि.यांचेकडून जे नकाशे तयार करून घेण्यात आले आहेत. सा.बा.विभागाच्या दरसुची सन २०१९-२० नुसार स्थापत्य विषयक बाबीसाठीचे अंदाजपत्रक र.रु.२९,३५०००/- चे तयार करण्यात आले असून, विद्युतीकरण व फर्निचरसाठी र.रु.६,००,०००/- चे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त कामासाठीचे नियुक्त वास्तुविशारद श्री.अनिरुध्द नाईक, स्थापती प्लॅनर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि औरंगाबाद यांची केवळ रु.२५०००+लागु कर (Lum sum payment) या रक्कमेत काम करून घेण्यासाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. सर्व आवश्यक दुरुस्तीसह या कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रु.३५,३५,०००/- एवढी होत आहे.

करीता, या कामाचे एकुण अंदाजपत्रकीय र.रु.३५,३५,०००/- यास प्रशासकीय मान्यतेचा व या कामासाठी नियुक्त वास्तुविशारद श्री.अनिरुध्द नाईक, स्थापती प्लॅनर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांची एकुण सेवामुल्य रु.२५,०००/- + लागु कर या मोबदल्यावर नियुक्ती करणे बाबतचा कार्योत्तर मान्यता देणेचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १३१/२०२१:-**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, मा.प्रशासक यांच्या दालना लगतची जागा बैठक दालन (मिटींग हॉल) तयार करणे लगत प्रतिक्षा कक्ष तयार करणे साठी योग्य असल्याचे आढळून आले आहे. या ठिकाणी असलेली उप आयुक्त(म),उप आयुक्त(प्र) व गटनेता भाजपा, यांची दालने, सध्याच्या दक्षता कक्षात जागेत करण्यात येणार असून, करनिर्धारक व संकलक यांचे साठी चे दालन या कामात निर्माण होणाऱ्या प्रशासकीय बैठक हॉलच्या मागील बाजुस होणार आहे. तसेच गटनेता इत्तेहाद आघाडी यांच्यासाठीच्या दालनासाठी, सध्या अतिरिक्त आयुक्त यांचे दालाना बाहेरील दोन खोल्यापैकी एक खोली वापरुन व याच खोलीच्या मागील बाजुस व नागर सचिव दालनाच्या दक्षिणेस असलेली छोटी खोली मिळून एकत्रित निर्माण होणाऱ्या जागेत केली जाणार आहे.

करीता या कामाचे एकुण अंदाजपत्रक र.रु.३५,३५,०००/- यास मंजुरी प्रदान करण्यात येते तसेच या कामासाठी नियुक्त करण्यात आलेले वास्तूविशारद श्री.अनिरूध्द नाईक,स्थापती प्लॅनर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांना एकत्रित व एकदाच सेवा मुल्य रु.२५०००/- + लागु कर या निश्चित केलेल्या एकुण सेवा मुल्यावर काम करण्याची अनुमती देण्याच्या बाबीस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३२/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.११.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील बुढ्ढीलेन परिसरात महानगरपालिकेची मिळकत असून सदर जागेचा न.भु.क्र ३२०८ असा आहे. सदर भुखंडाच्या उत्तर बाजुने १५ मीटर रुंदीचा विकास योजना रस्ता असुन इतर दोन्ही बाजुने अंतर्गत व मुख्य डांबरी रस्ते विकसीत झालेले आहेत. सदर जागेचे आकारमान सर्वसाधारणपणे त्रिकोणी स्वरुपाचे असून या जागेचे एकुण क्षेत्रफळ आखीव पत्रीके नूसार ४०५० चौ.मी.आहे. या भुखंडावर पूर्वीची नेहरु भवन या नावाची जुनी इमारत उभी असुन सदर इमारत नगर परिषदेच्या काळात शहरातील व शहरात येणाऱ्या नाटयकर्मीसाठी त्यांची कला सादर करण्याच्या दृष्टीने विकसीत करण्यात आली होती.

सद्यस्थितीत इमारत नादुरुस्त झालेली असल्याने या इमारती लगत याच भुखंडातील मोकळया जागेचा वापर लग्न इतर खाजगी समारंभा करीता महानगरपालिकेकडून भाडेतत्वावर देऊन करण्यात येत आहे. तथापी या इमारती पासुन महानगरपालिकेस अत्यल्प उत्पन्न होत असून, त्या मानाने या इमारतीचा देखभाल दुरुस्तीचा खर्च विज,पाणी इत्यादी बाबींचा खर्च व वॉचमन इत्यादीवर खर्च भागविणे शक्य होत नाही. त्याचा भार महानगरपालिकेच्या आर्थीक स्थितीवर होत आहे. याच अनुषंगाने सदर इमारतीचे पाडकाम करुन या जागेचा पुर्नविकास करण्याची मागणी शहरातील प्रतिष्ठीत नागरीक,नाटयकर्मी व स.नगरसेवक यांचेकडून करण्यात येत होती.

सदर बाब विचारात घेऊन या ठिकाणी नवीन इमारत विकसीत करणे या बाबीच्या अनुषंगाने कार्यवाही करणे बाबत मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक १२६० दिनांक १९.१२.२०१९ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. करिता प्रकरणात व मंजुरी नूसार या प्रकल्पाची उपयोगीता तपासून घेण्यात आली असून त्या नूसार या ठिकाणी करण्यात येणारे नवीन लागु विकास नियंत्रण नियमावली नूसार (Unified DCPR) करता येणे शक्य असल्याने या कामासाठी नकाशे तयार करणे, ड्रॉईंग डिझाईन करणे, अंदाजपत्रक तयार करणे, या कामासाठी निविदा पूर्व व निविदा पश्चात कामे करणेसाठी महानगरपालिकेस सहाय्य करणे तसेच बांधकाम पूर्ण होई पर्यंत या प्रकल्पावर निगराणी करणे,कंत्राटदाराने केलेल्या कामाची मोजमापे घेऊन निविदा तरतुदीनूसार वेळोवेळी देयके तपासणी करून ती देयके अदाईगीसाठी कार्यालयास सादर करणे इत्यादी बाबींसाठी प्रकल्प व्यवस्थापन

सल्लागार म्हणून RENAISSANCE ARCH CONSULTANT PVT NEW DELHI यांची एकुण प्रकल्प किंमतीच्या किंवा या प्रकल्पावर पडणारा अंतिम खर्च या पैकी जी रक्कम कमी असेल त्या रक्कमेच्या २% एवढा मोबदला रक्कमेवर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर नियुक्त प्रकल्प सल्लागार यांनी चालू बांधकाम दरसूची सन २०१९-२० नूसार अंदाजपत्रक सादर केले आहेत. नियोजना नूसार जे नकाशे सादर केले आहे त्यामध्ये अस्तित्वात असलेल्या इमारतीचे पाडकाम करणे,स्थापत्य विषयक स्ट्रक्चरल कामे करणे,भुमजल्यावर वाहनांसाठी वाहनतळ तयार करणे,तळमजल्यावर दुकाने तयार करणे, अँकरशॉप तयार करणे,सुमारे ४०० माणशी क्षमतेचा बॅक्वीट हॉल / समारंभ हॉल तयार करणे,पहिल्या मजल्यावर २० दुकाने तयार करणे, एक अँकर शॉप तयार करणे, प्रेक्षागृह (ऑडीटोरियम) तयार करणे, तर दुसऱ्या मजल्यावर ऑफीसेस तयार करणे, ऑडीटोरीयमचा मजला बांधकाम करणे,प्रत्येक मजल्यावर उदवाहन (Lift) बसविणे, प्रत्येक मजल्यावर स्त्री व पुरुषासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधणे, तसेच रेस्टॉरंट सुविधा तयार करणे व या कामाअंतर्गत संपूर्ण इमारतीमध्ये उर्जा बचतीच्या अनुषंगाने विद्युतीकरण करणे, वातानुकुलीत यंत्रणा (Air Condition) बसविणे, अग्निरोधक यंत्रणा उभारणे, प्लंबींग काम करणे, पावसाच्या पाण्याचा फेरवापर करणेसाठी यंत्रणा उभारणे, लॅण्डस्केपींग करणे,यासह ग्रीन बिल्डींगची संकल्पना राबविणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

नेहरु भवन हा प्रकल्प टी.व्ही.सेंटर एन-१० सिडको,संभाजी महाराज चौक येथे मुख्य रस्त्यालगत असलेल्या क्रीडांगणासाठी राखीव असलेल्या भुखंडावर आतल्या बाजुने स्टेडीयम च्या पायऱ्या (Stadium Steps for seating) बांधून व बाहेरील रस्त्याच्या बाजुने दुकाने/गाळे बांधून ते गाळे इच्छुक नागरिकांना निविदा पद्धतीने ३० वर्षाच्या भाडेतत्त्वावर देण्यात आली असून त्यातून मिळालेल्या उत्पन्नातून हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. याच धर्तीवर नेहरु भवन प्रकल्पात निर्माण होणारी उपांगे ज्यामध्ये दुकाने /गाळे, कार्यालये,समारंभ हॉल,प्रेक्षागृह व इतर निर्माण होणारी उपांगे ३० वर्षाच्या दिर्ध कालावधीसाठी किंवा महानगरपालिकेस त्यावेळची वस्तुस्थिती विचारात घेऊन आवश्यक कालावधीसाठी लिज पध्दतीने व ज्यांना यातील उपांगे या कालावधीसाठी वापरण्यास द्यावयाची आहेत. यासाठी ऑनलाईन पंध्दतीने ऑफर रक्कम मागवून, यात सर्वात जास्त रक्कम महानगरपालिकेस जो देईल त्यांचेकडून याद्वारे संकलीत होणाऱ्या महसुलातून या प्रकल्पाचा खर्च करण्यात येणार आहे. या प्रकल्पातुन प्राप्त महसुलासाठी या प्रकल्पाचे स्वतंत्र बँकखाते निर्माण करुन प्रकल्प बांधकामाचा खर्च तसेच या प्रकल्पा साठी नियुक्त करण्यात आलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांच्या एकुण सेवा मुल्याची रक्कमेचा खर्च करण्यात येईल.

या नव्याने निर्माण होणाऱ्या नेहरु भवन संकुलामध्ये जी दुकाने,कार्यालये,समारंभ हॉल,व इतर ३० वर्षीय करारावर दयावयाची सर्व उपांगे यासाठी टी.व्ही.सेंटर संकुलाच्या धर्तीवर विहीत अटी व शर्ती नमूद असलेली माहिती पुस्तीका ऑनलाईन पध्दतीने स्वारस्य असणा-यांसाठी डाऊनलोड करून घेता येईल. यासाठी व ज्यांना खरोखरच या प्रकल्पात स्वारस्य असेल त्यांनी भाग घ्यावा यासाठी शुल्क रु.५०००/- एवढे ठेवण्यात येईल. तसेच ऑनलाईन पध्दतीने लिलाव पध्दतीमध्ये भाग घेऊन व रू.२५००/- चा ऑनलाईन पध्दतीने भरणा करून माहिती पुस्तिका परस्पर डाऊनलोड करून घ्यावयाची असून मनपाने ठरविलेल्या किमान आधारभुत रक्कमेपेक्षा अधिकच्या रकमेचा प्रस्ताव देऊन प्रकल्पातील विशिष्ट उपांग भाडेतत्त्वावर घ्यावयाचा आहे. त्या करीता त्यांनी भरणा केलेल्या अर्जासोबत खुल्या वर्गासाठी रु.१०००००/- (रूपये एक लक्ष) अनामत रक्कम व मागासवर्गीय संवर्गासाठी रु.५००००/- अनामत रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणा करणे अनिवार्य राहील. अनामत रकमेशिवाय कोणतीही

ऑफर स्विकारली जाणार नाही. यासाठी त्यांनी त्यासाठी ई-टेंडर प्रणाली व्दारे www.mahatenders.com या वेबसाईटचा वापर करावा. ऑफर समवेत त्यांना बँक खात्याचे नजीकच्या सहा महिन्याच्या काळातील स्टेटमेंट देणे,पॅन कार्ड व आधार कार्ड ची छायांकित प्रत, पासपोर्ट साईजचा फोटो व इतर अनुषंगीक कागदपत्राच्या प्रती अपलोड करणे आवश्यक राहील.

सदरचा प्रकल्प निमशासकीय संस्थेचा असल्याने या प्रकल्पासाठी शासनाचे नियमानुसार शासन निर्णय व अस्तित्वातील व कायदे लागु असल्याने या संकुलात निर्माण होणाऱ्या उपांगासाठी,उपांगनिहाय अंध अपंग संवर्गासाठी २%, अनुसुचित जाती/अनुसुचीत जाती (SC/ST) संवर्गासाठी ५%, महिलांसाठी ३०% चे आरक्षण ठेवण्यात येईल. आहे. यामध्ये प्रथम १० गाळे / उच्चतम बोली धारकास वापरासाठी देण्यात येतील. या १० उच्चतम बोलीधारकास मधुन आरक्षित संवर्गाचा कोटा यशस्वी झाल्यास त्या त्या संख्ये नूसार त्यांचे आरक्षणाचा कोटा पूर्ण झाल्याचे गृहीत धरण्यात येईल. सदरचा नेहरु भवन प्रकल्प स्व-अर्जीत धर्तीवर राबविण्यात येणार असल्याने तशी जाहीर सुचना संक्षिप्त स्वरुपात सर्वाधिक खपाच्या सर्व स्थानिक दैनिकात प्रसिध्द करण्यात येईल.

सद्यस्थितीत जी गाळे/दुकाने व इतर या जुन्या नेहरू भवन संकुलाच्या जागेत अस्तित्त्वात / कार्यरत आहेत. त्याबाबत मालमत्ता अधिकारी यांचे विभागाकडून सदरची गाळे रिक्त करून घेणे, त्यांचे लिज डीड रद्द करणे, गाळयांचा रितसर ताबा महानगरपालिकेकडे घेणे इत्यादी अनुषंगिक बाबींची कार्यवाही करण्यात येईल.

वरील परिच्छेदात नमूद प्रमाणे व महाराष्ट्र शासनाने लागु केलेल्या नवीन विकास नियंत्रण नियमावली नूसार (UNIFIED DCPR) या भुखंडावर तळमजल्याचे २०३५चौ.मी., पहिल्या मजल्यावर १९२५ चौ.मी. व दुसऱ्या मजल्यावर १०२० चौ.मी. असे एकुण ४९८० चौ.मी. बांधकाम करण्यात येणार आहे. या मध्ये दुकाने व कार्यालयाचा विक्री योग्य असलेले क्षेत्र सुमारे ४६% असुन प्रेक्षागृह व समारंभ हॉल हे लिज पध्दतीवर दयावयाचे झाल्यास त्याचे क्षेत्र सुमारे २६% एवढे येते, तसेच सुमारे ५% क्षेत्रफळ हे प्रदर्शनासाठी उपलब्ध होईल. या व्यतिरिक्त सदर इमारतीमध्ये नियमानूसार दुचाकी व चार चाकी वाहनासाठी वाहनतळ भुमजल्यामध्ये तयार करण्याचे नियोजन आहे.

या प्रकल्पामध्ये जी उपांगे तयार होणार आहेत, त्यांची संक्षिप्त माहिती खालील नमूद प्रमाणे आहे.

| अ.क्र | उपांगाचे नाव | संख्या | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १ | भुखंडाचे आखीव पत्रिकेनूसार क्षेत्रफळ | ०१ | ४८०० चौ.मी. |
| २ | भुखंडावर बांधीव क्षेत्र | ०१ | ७९१४ चौ.मी. |
| | **तळमजला** | ०१ | २२८३ चौ.मी. |
| अ | दुकाने | २० | १७ ते ३१.१७ चौ.मी. |
| ब | ॲंकर शॉप | ०१ | ३०० चौ.मी. |
| क | प्रदर्शनी हॉल | ०१ | १७५ चौ.मी. |
| | **पहिला मजला** | | |
| | एकुण बांधीव क्षेत्र | ०१ | २०६३ चौ.मी. |
| अ | ऑडोटोरीअम (प्रेक्षागृह) क्षमता माणशी ५०० | ०१ | ५६० चौ.मी. |
| ब | स्टोअर रुम | ०१ | ८० चौ.मी. |
| क | दुकाने | २० | १२ ते २४ चौ.मी. |
| ड | ॲंकर शॉप | ०१ | ३०० चौ.मी. |

| | | | |
|---|---|---|---|
| इ | प्रदर्शनी गॅलरी | ०१ | १२५ चौ.मी. |
| **दुसरा मजला** | | | |
| अ | कार्यालये | १२ | ३३ ते ९० चौ.मी. |
| ब | विविध क्षेत्रफळाची कार्यालयाची जागा | - | १७ ते २८० चौ.मी. |
| क | ओपन टेरेस | ०१ | ७८० चौ.मी. |
| **भुमजला (Basement Floor)** | | | |
| अ | एकुण क्षेत्रफळ | ०१ | २५३१ चौ.मी. |
| ब | **वाहनतळ(दुचाकी/चारचाकी)** | ०१ | ९० चारचाकी अनुषंगाने |

सदर प्रकल्प स्व-अर्जीत धर्तीवर प्रस्तावीत असल्याने या प्रकल्पातील ३० वर्षाच्या कालावधीसाठी लिजवर दयावयाची दुकाने व कार्यालये तसेच प्रेक्षागृह व समारंभ हॉल हे वेळोवेळी त्यावेळची वस्तुस्थिती विचारात घेऊन व त्याचा कालावधी निश्चित करुन तीही लिजवर देता येईल. या इमारतीमधील विक्रीयोग्य लिजवर दयावयाचा भाग वगळता कोणते उपांग महानगरपालिकेकडे राखीव ठेवणे योग्य असेल त्या बाबत या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्रशासनाकडून निर्णय घेता येईल. तरी या कामाचे सादर करण्यात आलेले एकुण अंदाजपत्रक रक्कम रु. ३२,०१,९३,०००/- यास प्रस्तावात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहुन मान्यता प्रदान करण्यात यावी.

**ठराव क्रमांक १३२/२०२१:-**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, टी.व्ही.सेंटर एन-१० हडको येथे निर्माण करण्यात आलेल्या प्रकल्पाच्या धर्तीवर नेहरु भवन हा प्रकल्प स्व-अर्जीत निधीमधून करण्यास तसेच यातील निर्माण होणारी उपांगे ज्यामध्ये दुकाने,कार्यालये,समारंभ हॉल,प्रेक्षागृह,वाहनतळ व इतर पैकी प्रशासनास योग्य ती उपांगे, योग्य वाटेल त्या हद्दी पर्यत वा ३० वर्ष कालावधीसाठी किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी आवश्यकते नूसार करार पध्दतीवर स्वारस्य असणाऱ्याकडून ऑनलाईन पध्दतीने ऑफर मागवून देण्यास व संकलीत होणाऱ्या रक्कमेतून प्रकल्प उभारणे, त्यासाठीच्या बांधकामाचा खर्च व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे सेवा शुल्क व इतर किरकोळ अनुषंगीक खर्च करणे, या प्रकल्पासाठी स्वतंत्र बँक खाते काढणे, त्यामधून या कामासाठी रितसर निविदा मागवून संकुलाचे काम हाती घेणे. अपवादात्मक परिस्थितीत विचारात घेऊन प्रकल्पात आवश्यक फेरबदल करणे, ऑनलाईन यंत्रणा संगणक/ई-निविदा विभागाच्या समन्वयाने सज्ज करणे, प्राप्त होणाऱ्या ऑफर्स मधून पात्र गाळेधारकाची नियमानूसार निवड करणे, निवड झालेल्या गाळे धारकाकडून समान चार हप्त्यात व जास्तीत जास्त १८० दिवसाचे आत संपूर्ण रक्कमेचा भरणा करुन घेणे, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या संकुलासाठी केअरटेकरची नेमणूक करणे, विक्री योग्य उपांगासाठीची विविध अटी व शर्ती निश्चित करणे, आवश्यक असलेले उपांग महानगरपालिकेकडे राखुन ठेवणे ईत्यादी बाबींचे अधिकार व त्यानुसार अंमलबजावणी करणे, सद्यस्थितीत जी गाळे/दुकाने व इतर या जुन्या नेहरू भवन संकुलाच्या जागेत अस्तित्त्वात/कार्यरत आहेत. त्याबाबत मालमत्ता अधिकारी यांचे विभागाकडून सदरची गाळे रिक्त करून घेणे, त्यांचे लिज डीड रद्द करणे, गाळयांचा रितसर ताबा महानगरपालिकेकडे घेणे इत्यादी अनुषंगिक बाबींची कार्यवाही करण्यात येईल ईत्यादी मालमत्ता अधिकारी यांना प्राधिकृत करणे व अंदाजपत्रकीय रक्कम रु.३२,०१,९३,०००/- यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३३/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.११.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको कॅनॉट प्लेस येथील महानगरपालिकेच्या उद्यानात शुरवीर महाराणा प्रताप यांचा अश्वारुढ पुतळा उभारणी बाबत या पुर्वी औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.५१८ दि.२३.०६.२००९ व विषय क्र. १०५० दि.२८.०२.२०१९ अन्वये ठराव पारीत झालेला आहे.

तद्नुषंगाने सिडको कॅनॉट प्लेस उद्यानात शुरवीर महाराणा प्रताप यांचा सुमारे १६ फुट उंच ब्रॉन्झ धातुचा अश्वारुढ पुतळा उभारणे, पुतळ्यासाठी चौथरा बांधणे व पुतळ्या सभोवतालचा परीसर सुशोभिकरण करणे इत्यादी बाबींची तरतुद करण्यात आली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक बाजार भावानुसार दरपत्रके मागवुन त्या दरानुसार तयार करण्यात आले आहे व प्रस्तावित कामाची अंदाजत्रकीय र.रु.८७,००,०००/- इतकी आहे. तरी सिडको कॅनॉट प्लेस उद्यानात महाराणा प्रताप यांचा अश्वारुढ पुतळा उभारणे या कामाच्या र.रु.८७,००,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक १३३/२०२१:-</u>**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, सिडको कॅनॉट प्लेस येथील उद्यानात सुमारे १६ फुट उंच ब्रॉन्झ धातुचा शुरवीर महाराणा प्रताप यांचा अश्वारुढ पुतळा उभारणे, पुतळ्यासाठी चौथरा बांधणे व पुतळ्या सभोवतालचा परीसर सुशोभिकरण करणे इत्यादी कामाच्या अंदाजपत्रक र.रु.८७,००,०००/- यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३४/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१७.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१५, मिटमिटा अंतर्गत सनी ट्रेडिंग सेंटर पासून ते तूळजा भवानी मंदिरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१५-१६ च्या दरसुचीनुसार र.रु.६४,९९,६८१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. त्यास मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील कामास्तव नियमानुसार रितसर निविदा मागविण्यात आल्या असुन ०४ निविदा प्राप्त झाल्या होत्या, त्यापैकी सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.२१% कमी दराची निविदा मे.काकाजी बंडुजी पार्थीकर यांची प्राप्त झालेली होती. सदरील निविदा प्रस्तावास मा.स्थायी समितीने विषय ठराव क्र.२९ दि.१६.०९.२०१९ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार त्यांना सदर कामाचे करारनामा कार्यादेश देऊन काम सुरु करण्यात आलेले आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.६४,९९,६८१/- एवढी असून सदर काम अंदाजपत्रकीय दराच्या १३.२१% कमी दराने असल्यामुळे बचत र.रु.८,५८,६०८/- एवढी होत असून त्या बचत रक्कमे मधुन वाढीव रक्कमेचे काम करता येईल. सदर रस्त्याची रुंदी ३ मीटर ऐवजी ३.७५ घेऊन लांबी ११५५.०० मीटरच्या अनुषंगाने कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.७३,५८,२८९/- चे तयार करण्यात आले आहे. सदर काम हे तत्कालीन कंत्राटदार मे.काकाजी बंडुजी पार्थीकर यांच्याकडुन करुन घेण्यात येणार आहे. त्यास मा.प्रशासक महोदय यांची दि.२८.०१.२०२१ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार, सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.६४,९९,६८१/- व वाढीव लागणारी र.रु.८,५८,६०८/- असे एकुण सुधारित अंदाजपत्रक र.रु.७३,५८,२८९/- चे काम मे.काकाजी बंडुजी पार्थीकर यांच्या मार्फत करण्यात येणार आहे. तथापि सदर प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक १३४/२०२१:-</u>**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, सदर कामाचे एकुण अंदाजपत्रक र.रु.६४,९९,६८१/-व वाढीव लागणारी र.रु.८,५८,६०८/- असे एकुण सुधारित अंदाजपत्रक र.रु.७३,५८,२८९/-चे मे.काकाजी बंडुजी पार्थीकर यांच्या मार्फत काम करुन घेण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३५/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१७.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०२१-२२ या एका आर्थिक वर्षासाठी प्राणीसंग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे बीफ खाद्य खरेदी करण्यासाठी ई-टेंडर व्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. यासाठी एकुण सात कोरे निविदांची विक्री झाली असुन सात भरलेल्या विविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र | निविदाधारकांचे नांव | दर प्रतिकिलो |
|---|---|---|
| १ | मोईनुद्दिन चिश्ती बफेलो बिफ शॉप | रु.२४०-०० |
| २ | ए-वन बफेलो मिट शॉप | रु.२४३-०० |
| ३ | मुनलाईट बिफ शॉप | रु.२४५-०० |
| ४ | फ्रेश बिफ शॉप | रु.२५०-०० |
| ५ | एस.क्यु.कलेक्शन | रु.२५५-०० |
| ६ | मिस्बाह बिफ शॉप | रु.२६०-०० |
| ७ | उबेद बफेलो मिट शॉप | रु.२६०-०० |

तुलनात्मक दृष्टीने मोईनुद्दिन चिश्ती बफेलो बिफ शॉप यांचे बीफ खरेदीचे दर रु.२४०-०० प्रती किलो हे सर्वात कमी दर आहेत. दरासंबंधी करण्यात आलेल्या वाटाघाटी नंतर निविदा दर रु.२४०-०० प्रती किलो या दरामध्ये कमी करुन रु.२००-०० प्रति किलो दरानुसार बीफ खरेदी करण्यासाठी निविदा धारकाने मान्यता दिलेली आहे.

प्राणी संग्रहालयात असलेले हिंस्त्र प्राणी वाघ, पांढरेवाघ, बिबटे, कोल्हे, मगर, उदबिल्ला यांना केंद्रिय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवि दिल्ली यांचे मानकानुसार प्राण्यांना प्रतिदिनी एकुण १४० किलो बीफ खाद्य घेण्यात येत आहे. यामध्ये प्राण्यांची संख्या कमी-जास्त झाल्यास बीफ खरेदीची प्रमाण कमी जास्त करण्यात येते. त्यानुसार रु.२००/- प्रतिकिलो दरानुसार वार्षिक एकुण खर्च रु.८७,६४,०००-०० एवढा होणार आहे.

करीता, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांसाठी बीफ खरेदी प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक १३५/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०२१-२२ या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे बीफ खाद्य खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारक मोईनुद्दिन चिश्ती बफेलो बिफ शॉप यांच्याशी वाटाघाटी केल्यानंतर रु.२००/- प्रति किलो दराने बीफ खाद्य खरेदीस मान्यता देण्यात येते. या दरानुसार होणारा वार्षिक एकुण खर्च रु.८७,६४,०००-०० यास मंजुरी देण्यास येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३६/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१९.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-१२, सिडको भागातील मौलाना आझाद शिक्षण संस्थे लगत २.८६ हेक्टर खेळाचे मैदान वार्षिक भाडे र.रु.५०००/- प्रमाणे मौलाना आझाद संस्थेस मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.११६१/५, दि.२०.०९.२००७ अन्वये भाडेतत्वावर देण्यात आलेले होते.

त्याची मुदत संपलेली असल्याने संस्थेने दि.२५.०१.२०२१ रोजी पुढील मुदतवाढ मिळणे बाबत विनंती केलेली असल्याने करारनाम्यातील अटी शर्तीनुसार वार्षिक भाडे रक्कमेत १०० टक्के भाडेवाढ करून म्हणजेच वार्षिक भाडे रु.१०,०००/- त्यावर १८ टक्के जी.एस.टी. व इतर कर वेगळे आकारणी करून दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२४ पर्यंत या तीन वर्षाच्या कालावधी करीता मुदतवाढ देणेसाठी मान्यता झालेली आहे. त्यानुषंगाने २.८६ हेक्टर खेळाचे मैदान मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेस मुदतवाढ देणेसाठी प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक १३६/२०२१:-</u>**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, एन-१२, सिडको भागातील मौलाना आझाद शिक्षण संस्थेलगत २.८६ हेक्टर खेळाचे मैदान वार्षिक भाडे रु.५०००/- प्रमाणे मौलाना आझाद संस्थेस मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.११६१/५, दि.२०.०९.२००७ अन्वये भाडेतत्वावर देण्यात आलेले होते. त्याची मुदत संपलेली असल्याने संस्थेने दि.२५.०१.२०२१ रोजी पुढील मुदतवाढ मिळणे बाबत विनंती केलेली असल्याने करारनाम्यातील अटी शर्तीनुसार वार्षिक भाडे रक्कमेत १०० टक्के भाडेवाढ करून म्हणजेच वार्षिक भाडे रु.१०,०००/- त्यावर १८ टक्के जी.एस.टी. व इतर कर वेगळे आकारणी करून दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२४ पर्यंत या तीन वर्षाच्या कालावधी करीता मुदतवाढ देणेसाठी मान्यता झालेली आहे. त्यानुषंगाने २.८६ हेक्टर खेळाचे मैदान मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेस मुदतवाढ देण्यासाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३७/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१९.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचा शासन निर्णय एमसीओ २०१४/प्र.क्र.२१८/नवि-१४, दि.०६.०१.२०१५ अन्वये महानगरपालिकेमध्ये अतिरीक्त आयुक्तांची पदे निर्माण करणे व सदर पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार क वर्ग महानगरपालिकांमध्ये अतिरिक्त आयुक्तांची दोन पदे असून एक पद राज्य शासनाच्या सेवेतील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात येईल. तसेच उर्वरित एक पद हे त्या त्या महानगरपालिकेच्या सेवेतील अधिकाऱ्यांमधून शासन स्तरावरील निवड समितीच्या शिफारशीअंती शासना मार्फत निवडीने भरण्यात येणार आहे.

दि.१८.०३.२०२१ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार श्री.रविंद्र प्रभाकरराव निकम, उपआयुक्त यांच्या सेवाविषयक बाबी व गोपनीय अहवाल इ.ची तापासणी केल्यानंतर निवड समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार अतिरिक्त आयुक्त या रिक्त असलेल्या पदावर निवड करण्यासाठी श्री.रविंद्र प्रभाकरराव निकम, उपआयुक्त यांचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करण्याबाबत समितीने मान्यता दिली आहे.

करीता, निवड समितीने प्रस्तावित केल्यानुसार श्री.रविंद्र प्रभागरराव निकम, उपआयुक्त (प्रशासन) यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या अतिरीक्त आयुक्त या पदावर निवड करणेबाबत वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करणेबाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १३७/२०२१:-</u>**

आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलक ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने प्रस्तावित केल्यानुसार, श्री.रविंद्र प्रभाकरराव निकम, उपआयुक्त (प्रशासन) यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त या पदावर निवड

करणेबाबत वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास पाठविणेसाठी शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३८/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२०.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खामनदी शहरातून वाहणारी नदी असून तिचा उगम जटवाडा डोंगरदऱ्यातून सुरू झालेला असून ती पुढे नाथसागर गोदावरी नदीला जाऊन मिळते. नदीची शहरातील लांबी सुमारे ३० कि.मी. असून यामध्ये शहराचा सुमारे ७.७३ कि.मी.भागाचा समावेश आहे. या नदीपात्रातून उन्हाळ्यामध्ये सुमारे ३८ ते ४० एम.एल.डी.पाणी वाहते. तथापि, पावसाळ्यामध्ये या नदीतील पाण्याचे वाहण्याचे प्रमाण सुमारे ११० ते १२० एम.एल.डी.एवढे असते. सदर नदी मनपा क्षेत्रातील ३० वॉर्ड कार्यालयाच्या क्षेत्रातून वाहत राहते.

सद्यस्थितीत या खामनदी पात्राचे रुंदीकरण, नदीत येऊन मिळणारे सिवेज वॉटर, सांडपाणी व टाकण्यात येणारा कचरा, अतिक्रमण इ.बाबींबमुळे नदीचे पाणी दुषित होते. या कारणाने स्वच्छ पाण्याअभावी जमिनीची पथ खालावते (Fertility) तसेच जमिनीतील पाण्याची पातळी कमी होते. या शिवाय नागरीकांच्या शेतात असलेल्या विहीरीमध्ये पर्यावरणीय दृष्ट्या अयोग्य स्वरुपाचे पाणी प्राप्त होते. याचा परिणाम शेतीवर, उद्याने व वने यावर अयोग्य स्वरुपाने होतो. शहरात पावसाळ्यातील पावसाचे प्रमाण कमी असल्याने नदीतील पाण्याची गुणवत्ता वाढल्यास प्रदिर्घ कालावधीत नदी पुनर्जीवन प्रकल्पाचा चांगला फायदा होऊन शकतो. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे निकषांची पुर्तता होऊ शकते. त्यासाठी खामनदीचे पुर्ण लांबी मध्ये पुनर्जीवन करण्याच्या दृष्टिने विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे आवश्यक आहे.

या विस्तृत प्रकल्प अहवालामध्ये (DPR) खामनदी पात्राचे विस्तृत सर्व्हेक्षण करणे, नदीच्या प्रदुषणास कारणीभुत ठरलेले घटक निश्चित करणे, यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, औरंगाबाद क्षेत्रात पडणारा पाऊस लक्षात घेऊन पाण्याचा योग्य वापर पुन्हा होणेसाठी लाभदायक उपाययोजना सुचविणे, स्थानिक अडचणीवर उपाय सुचविणे, नदीचे शहरातील पावसाळा विचारात घेऊन आवश्यक ठिकाणी नदीचे पात्राची रुंदी निश्चित करणे, खोली वाढविणे, नदी पात्राच्या कडेने झाडे लावणे, आवश्यक ठिकाणी Stone Pitching वगैरे करून नागरीकांना या क्षेत्राचा लाभ घेता येईल. यासाठी सुयोग्य वातावरण निर्मिती तयार करणे तसेच संपुर्ण खामनदीचे सौंदर्यीकरण करण्यासाठी नियोजन करणे, नदीपात्र, पाण्याची गुणवत्ता सुधारणेसाठी उपाय सुचविणे यासाठी Detail Plan व Estimate तयार करणे, नदी पात्रात मिसळणारे Plastic, Thermocol Polythin bag इ.संकलन करणेसाठी नियोजन करणे, पर्यटकांच्या दृष्टिने स्थळ विकसीत करणे.

त्यास्तव पर्यावर क्षेत्रात कामे केलेल्या एजन्सीची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) म्हणुन नेमणुक करणे आहे. त्यासाठी प्रकल्प सल्लागाराने निविदा सुचनेचा मसुदा तयार करणे, निविदा काढणे, निविदा पुर्व व नंतरच्या कामास मनपास सहाय्य करणे, कामाची निगराणी करणे, केलेल्या कामाचे मोजमाप घेऊन देयके सादर करणे इ. अनुषंगीक बाबी आवश्यक राहील.

या पक्रल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) नेमणुक झाल्यानंतर जो विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार होईल. त्यामधील सर्व अनुषंगीक कामांचा, उपाय योजनांचा समावेश राहील. तसेच या कामासाठी किती निधी लागू शकेल. हे ही कळून येईल. विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार झाल्यानंतर अंदाजपत्रकीय रक्कम कळून येईल. त्यासाठी व लागणाऱ्या निधीची मागणी पर्यावरण खाते, महाराष्ट्र राज्य यांचेकडे करता येईल. याकामी (PMC) ची ही मदत मनपास घेता येईल.

करीता, सदरील प्रकल्पासाठी व्यस्थापन सल्लागार (PMC) ची नेमणुक करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक १३८/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खामनदीच्या पात्राचे पुनर्जीवन करणे व सौंदर्यीकरण करणे, हा प्रकल्प राबविण्यासाठी नदीच्या पात्राची रुंदी निश्चित करणे, खोली वाढविणे, नदी पात्राच्या कडेने झाडे लावणे आवश्यक ठिकाणी Stone Pitching करणे, पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाय सुचविणे, सविस्तर नकाशे व अंदाजपत्रक तयार करणे, नदी पात्रात मिसळणारे कचरा संकलन करण्यासाठी नियोजन करणे, तसेच निविदा पुर्व व निविदा पश्चात सर्व कामे करणे, कामाची निगराणी करणे, केलेल्या कामाचे मोजमाप घेऊन देयके सादर करणे इ. व इतर अनुषंगीक कामे करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ची नेमणुक करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३९/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२१.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यापुर्वी कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-२/ २०२१/७१६, दि.१६.०३.२०२१ रोजीच्या आदेशान्वये दि.०३.११.२०२० ते दि.०१.०५.२०२१ पर्यंत सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा. आस्थापनेवरील वर्ग-४ संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव (सर्व श्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | चंद्रमणी समाधान गवई | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| २. | अय्युब खाँ सांडू खाँ | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३. | विजय पंडीतराव गायकवाड | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ४. | शेख इम्रान शेख फजलोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ५. | विजय लक्ष्मणराव देशपांडे | दै.वे.वॉचमन | भारत माता मंदिर (सांस्कृतिक विभाग) | रु.४२४/- |
| ६. | राजु चंद्रभान बढे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.६ | रु.४२४/- |
| ७. | रमेश चंद्रय्या परके | दै.वे.वि.लाईनमन | विद्युत विभाग | रु.५२५/- |
| ८. | कांताबाई अंबादास पटेकर | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |

तसेच सातारा देवळाई ग्राम पंचायत येथून औरंगाबाद महापालिकेत समाविष्ठ करण्यात आलेले दैनिक वेतनावरील कर्मचारी

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव (सर्व श्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | शेख सिराज शेख रसूल | पाणी पुरवठा मजूर | उपअभियंता, पा.पु.६,७,८ | रु.४२४/- |
| २. | सुरेश कैलास काळे | सफाई मजूर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ३. | प्रकाश श्रीरंग चितळकर | सफाई मजूर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ४. | बाबासाहेब कारभारी सोनवणे | सफाई मजूर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ५. | नरेंद्र ओमप्रकाश घुसर | सफाई मजूर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ६. | रामभाऊ शंकर मामडे | स्मशानभुमी रक्षक | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ७. | राहुल दादाराव शिनगारे | मजूर (आवक-जावक विभाग) | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ८. | भास्कर दादाभाऊ जाधव | सफाई मजूर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |

करीता उपरोक्त प्रमाणे एकुण (१६) दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.०४/०५/२०२१ ते ३०/१०/२०२१ पर्यंत ०६ (सहा) महिन्याकरीता (म्हणजेच १८० दिवसांकरीता) मुदतवाढ देण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १३९/२०२१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यापुर्वी कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-२/२०२१/७१६, दि.१६.०३.२०२१ रोजीच्या आदेशान्वये दि.०३.११.२०२० ते दि.०१.०५.२०२१ पर्यंत सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा. आस्थापनेवरील वर्ग-४ संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव (सर्व श्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | चंद्रमणी समाधान गवई | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| २. | अय्युब खाँ सांडू खाँ | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ३. | विजय पंडीतराव गायकवाड | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.४२४/- |
| ४. | शेख इम्रान शेख फजलोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु.४२४/- |
| ५. | विजय लक्ष्मणराव देशपांडे | दै.वे.वॉचमन | भारत माता मंदिर (सांस्कृतिक विभाग) | रु.४२४/- |
| ६. | राजु चंद्रभान बढे | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.६ | रु.४२४/- |
| ७. | रमेश चंद्रय्या परके | दै.वे.वि.लाईनमन | विद्युत विभाग | रु.५२५/- |
| ८. | कांताबाई अंबादास पटेकर | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |

तसेच सातारा देवळाई ग्राम पंचायत येथून औरंगाबाद महापालिकेत समाविष्ठ करण्यात आलेले दैनिक वेतनावरील कर्मचारी

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव (सर्व श्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | शेख सिराज शेख रसूल | पाणी पुरवठा मजूर | उपअभियंता, पा.पु.६,७,८ | रु.४२४/- |
| २. | सुरेश कैलास काळे | सफाई मजूर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ३. | प्रकाश श्रीरंग चितळकर | सफाई मजूर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ४. | बाबासाहेब कारभारी सोनवणे | सफाई मजूर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ५. | नरेंद्र ओमप्रकाश घुसर | सफाई मजूर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ६. | रामभाऊ शंकर मामडे | स्मशानभुमी रक्षक | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ७. | राहुल दादाराव शिनगारे | मजूर (आवक-जावक विभाग) | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |
| ८. | भास्कर दादाभाऊ जाधव | सफाई मजूर | प्रभाग क्र.८ | रु.४२४/- |

करीता उपरोक्त प्रमाणे एकुण (१६) दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.०४/०५/२०२१ ते ३०/१०/२०२१ पर्यंत ०६ (सहा) महिन्याकरीता (म्हणजेच १८० दिवसांकरीता) मुदतवाढ देण्यासाठीचा विषयास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १४०/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३१.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अतिक्रमण विभागातील कामात सुसूत्रता येण्याच्या दृष्टिकोनातून जा.क्र.मनपा/पनिअ/२०१५/१०८४ दि.३१.१०.२०१५ अन्वये पदनिर्देशीत अधिकारी आणि सर्व इमारत निरीक्षक यांनी अतिकमण विषयक प्रकरणांमध्ये कार्यवाही करतांना खालील नमुद मुद्यांच्या

अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदरील आदेशात अंशतः दुरूस्तीसह काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

१) प्रथम प्राधान्याने महानगरपालिकेच्या जागा, रस्ते, विकास योजना रस्ते व पार्किंग वरील अतिक्रमणे काढणे व त्यावर अतिक्रमण होऊ न देणे.

२) खाजगी जागेवरील अतिक्रमणाबाबत किंवा अनधिकृत बांधकामाबाबत तक्रार दाखल करतांना तक्रार धारकांकडून पुढील कागदपत्र मागविण्यात यावे.

अ) तक्रारधारकाचे स्वतःचे घर Legal (अधिकृत परवानगी) असल्याबाबचा पुरावा.

ब) तक्रारधारक भाडेकरु असल्यास त्यांचे घरमालकासोबत करारनामा व घरमालकाची इमारत Legal (अधिकृत परवानगी) असल्याबाबचा पुरावा.

क) तक्रारधारक महानगरपालिका हद्दीच्या बाहेरील रहिवाशी असल्यास ते राहत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे बेबाकी प्रमाणपत्र अथवा वरील (ब) मधील पुरावा.

ड) चालु आर्थिक वर्षाअखेर पर्यंतचा कर भरणा व नळपट्टी भरणा पावती.

ई) चालु वर्षाचे मालकी हक्काचे कागदपत्रे (पी.आर.कार्ड,टोच नकाशा, सातबारा) किंवा नोंदणीकृत खरेदी खत.

फ) तक्रारदाराचा मोबाईल क्रमांक, पुर्ण पत्ता नमुद करणे व फोटो ओळखपत्र (निवडणुक ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड इ.) आवश्यक राहील.

३) तक्रारदाराच्या स्वतःच्या जागेवर अतिक्रमण झाले असल्यास व तसे पुराव्यासह अर्जदाराने सिध्द करून दिल्यास सदरील अतिक्रमण काढण्यापुर्वी अर्जदारांकडून कार्यवाहीची रक्कम भरुन घेऊन नंतर कार्यवाही करण्यात यावी.

४) वक्फ बोर्डाच्या जागेवरील अतिक्रण विषयक वाद असल्यास अगोदर वक्फ बोर्डामार्फत अर्ज व त्यावर वक्फ बोर्डाचा अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर अर्जदार अथवा वक्फ बोर्डाकडून अतिक्रमण निष्काशीत करण्याचा खर्च भरुन घेऊन तद्नंतर अतिक्रमण काढण्यात यावे.

५) हरितट्ट्यावरील अतिक्रमण निष्काशीत करतांना नोटीस देऊन निष्काशीत करण्यात येईल. या बाबत जनजागृतीसाठी स्थानिक वर्तमानपत्रात हरितपट्टयातील भुखंड खरेदी न करण्याचे जाहिर आवाहन करण्यात यावे.

६) विकास योजना आराखड्यानुसार आरक्षीत खाजगी भुखंडावर संबंधीत जागा मालक किंवा त्रयस्थ व्यक्ती (भुसंपादन होई पर्यंत) अनधिकृत बांधकाम करत असल्यास नोटीस देऊन निष्काशीत करावे.

७) अनधिकृत प्लॉटिंग (२०X३०) नोटीस देऊन निष्काशीत करण्यात यावी.

८) प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यास मा.न्यायालयाचे अंतरिम/अंतिम आदेश तपासून तसेच कोणतेही स्थगन आदेश नसल्यास पुढील कार्यवाही करण्यात यावी.

वरील सर्व प्रकरणात अतिक्रमण विभागामार्फत कार्यवाही करण्यासाठी धोरणत्मक बाबी व बहुमजली इमारती वरील निष्कासनाची कार्यवाही वगळता उर्वरित सर्व कार्यवाहीचे अधिकार उपायुक्त प्रशासन तथा अतिरीक्त आयुक्त-२ यांना प्रदान करण्यात येत आहे. तसेच कार्यवाही करतांना संचिकेत विभाग प्रमुख/अतिरीक्त आयुक्तांची मान्यता झाल्याशिवाय संबंधीत तक्रारधारक आणि अतिक्रमण धारक यांच्याशी कोणतीही नोटीस अथवा पत्र व्यवहार करु नये. तसेच कुठलीही संचिका इतर विभागाकडे पाठवितांना विभाग प्रमुखांच्या मान्यतेने पाठविण्यात यावी. अतः प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने कार्यवाही करताना वस्तुस्थिती तसेच परिस्थितीजन्य पुरावे सत्यता तक्रारी बाबतचे कागदपत्रे तपासून त्याबाबतची खात्री करून प्रशासकीय मान्यतेनंतर कार्यवाही करण्यात यावी.

प्रकरणांचा निपटारा करतांना मा.न्यायालयीन प्रकरणे, मा.लोकआयुक्त यांच्याकडील पत्रे, शासकीय पत्र, तारांकीत प्रश्न, स.मंत्री, खासदार, आमदार यांच्याकडून प्राप्त तक्रारी, लोकशाही दिन प्रश्न, नागरीकांच्या सार्वजनिक जागेवरील अतिक्रमणाच्या तक्रारी, वैयक्तिक जागेवरील अतिक्रमणाच्या तक्रारी याक्रमाणे प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा. तसेच विहित कालावधीत प्रकरणात केलेली कार्यवाही तातडीने संबंधीतांना कळविण्यात यावी.

सद्यस्थितीत अतिक्रमण विभागात प्राप्त तक्रारींचे अवलोकन केले असता, बहुतांश तक्रारी ह्या खाजगी जागेवरील अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांच्याशी संबंधीत असून त्या अर्जदार व गैरअर्जदार यांच्या आपसातील वादाच्या असतात. सदरील तक्रारींचा निपटारा करण्यासाठी महानगरपालिकेची प्रशासकीय यंत्रणा वापरण्यात येते.

तथापि, वरील आदेशानुसार अर्ज स्विकारतांना खाजगी जागेवरील अनधिकृत बांधकामाबाबत काही नागरीक आवक-जावक विभागात आवश्यक सहपत्र न जोडल्याच्या कारणावरुन वाद घालतात. काही तक्रारधारक टपालाने तक्रारी दाखल करतात. काही तक्रारदार मा.मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, मा.विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय येथे तक्रारी दाखल करतात. संबंधीत कार्यालयाकडून महानगरपालिकेच्या संबंधीत तक्रारी वर्ग केल्यानंतर संबंधीत तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने पाठपुरावा करतात. अशा परिस्थितीत वर नमुद केल्या नुसार अभिलेखे/ सहपत्रे दाखल करण्याबाबत प्रथमत: तक्रारदार यांना कळवावे. संबंधीतांनी कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर तक्रारींच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाही बाबत अर्जदारास अवगत करावे.

महानगरपालिकेच्या जागेच्या व्यतिरिक्त इतर प्राधिकरणांच्या/खाजगी जागेवरील अतिक्रमण/ अनधिकृत बांधकामाची कार्यवाही करतांना अर्जदार अथवा गैरअर्जदार यापैकी जो दोषी असेल त्यांच्याकडून कार्यवाहीचा खर्च भरुन घेतल्यानंतरच कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे, अतिक्रमण विभागातील प्राप्त तक्रारींचा निपटारा करण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १४०/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अतिक्रमण विभागातील कामांत सुसूत्रता येण्याच्या दृष्टिकोनातून पदनिर्देशीत अधिकारी आणि सर्व इमारत निरीक्षक यांनी अतिक्रमण विषयक प्रकरणांमध्ये कार्यवाही करतांना प्रस्तावातील नमुद अ.क्र.१ ते ८ मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यास व प्रस्तावात नमुद सर्व प्रकरणात अतिक्रमण विभागामार्फत कार्यवाही करण्यासाठी धोरणात्मक बाबी व बहुमजली इमारतीवरील निष्कासनाची कार्यवाही वगळता उर्वरित सर्व कार्यवाहीचे अधिकार उपायुक्त प्रशासन तथा अतिरीक्त आयुक्त-२ यांना प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार विभाग प्रमुख/अतिरीक्त आयुक्तांची मान्यता झाल्याशिवाय संबंधीत तक्रारधारक आणि अतिक्रमणधारक यांच्याशी कोणतीही नोटीस अथवा पत्रव्यवहार न करणे, संचिका विभाग प्रमुखांचे मान्यतेने पाठविणे, अत: प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने कार्यवाही करतांना वस्तुस्थिती तसेच परिस्थितीजन्य पुरावे सत्यता तक्रारी बाबतचे कागदपत्रे तपासून त्याबाबतची खात्री करून प्रशासकीय मान्यतेनंतर कार्यवाही करण्यात यावी.

प्रकरणांचा निपटारा करतांना मा.न्यायालयीन प्रकरणे, मा.लोकआयुक्त यांच्याकडील पत्र, शासकीय पत्र, तारांकीत प्रश्न, स.मंत्री, खासदार, आमदार यांच्याकडून प्राप्त तक्रारी, लोकशाही दिन प्रश्न, नारीकांच्या सार्वजनिक जागेवरील अतिक्रमणाच्या तक्रारी वैयक्तिक जागेवरील अतिक्रमणाच्या तक्रारी या क्रमाने प्राधान्यक्रम ठरविणे तसेच विविध कालावधीत प्रकरणात केलेली कार्यवाही तातडीने संबंधीतांना कळविण्यात यावी.

अर्ज स्विकारतांना खाजगी जागेवरील अनधिकृत बांधकामाबाबत काही नागरीक विविध कारणांवरून वाद घालतात. काही तक्रारधारक टपालाने तक्रारी दाखल करतात. काही तक्रारदार मा.मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, मा.विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय येथे तक्रारी दाखल करतात. संबंधीत कार्यालयाकडून महानगरपालिकेच्या संबंधीत तक्रारी वर्ग केल्यानंतर संबंधीत तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने पाठपुरावा करतात. अशा परिस्थितीत वर नमुद केल्यानुसार अभिलेखे/सहपत्रे दाखल करण्याबाबत प्रथमतः तक्रारदार यांना कळविणे व संबंधीतांना कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास अवगत करणे.

तसेच महानगरपालिकेच्या जागेच्या व्यतिरिक्त खाजगी जागेवरील अतिक्रमण/अनधिकृत बांधकामाची कार्यवाही करतांना अर्जदार अथवा गैरअर्जदार यापैकी जो दोषी असेल त्यांच्याकडून कार्यवाहीचा खर्च भरुन घेतल्यानंतरच कार्यवाही करण्यात यावी. उपरोक्त प्रमाणे अतिक्रमण विभागातील प्राप्त तक्रारींचा निपटारा करण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करण्याच्या कार्यवाहीस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १४१/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३१.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजना (अजाउयो) अनुसूचित जाती नाविण्य पुर्ण उपाय योजना अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नाविण्यपुर्ण उपाय योजना अंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय विद्ययो/२०१६/प्र.क्र.२३०/विद्ययो मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२ या शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या अनुसूचित स्लम/भागातील शालेय इमारती मधील अंगणवाडी खोलीचे संपुर्ण नुतनीकरण करून त्या वर्गातील लहान मुलांना शैक्षणिक ज्ञान मिळण्याच्या अनुषंगाने भिंतीवरील पोस्टर्स लावणे, लहान मुलांना फायबर खेळणी पुरविणे आवश्यक आहे.

उक्त नमुद शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यातील योजनेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देणे, निधी अर्थसंकल्पात करणे या बाबतचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. या अनुषंगाने मनपाच्या अनुसूचित वसाहतीतील खालील नमुद २० शालेय इमारतीमध्ये अंगणवाड्यांचे नुतनीकरण करून मुलांना शैक्षणिक ज्ञानांची माहिती, १९ प्रकारच्या फायबर खेळण्या व इतर संलग्न बाबीसाठी बांधकाम खात्याची दरसुची सन २०१७-१८ व खेळणीसाठी कोटेशन दर विचारात घेऊन प्रस्तावाचे अंदाजपत्रक र.रु.१,३८,२२,९०५.०० चे तयार करून जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती औरंगाबाद यांच्याकडे सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग औरंगाबाद यांच्या मार्फत तांत्रिक मंजुरीने विवरणपत्रासह प्रस्ताव सादर केला होता.

सदरील प्रस्तावास दि.०७.०३.२०१९ रोजी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी प्रशासकीय मान्यता दिली. या मान्यतेनुसार र.रु.१,३८,२२,९०५.०० (अक्षरी र.रु.एक कोटी अडोतीस लक्ष बावीस हजार नऊशे पाच) इतका निधी औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त होता, ही रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून जमा झाली आहे.

प्रस्तावात खालील महानगरपालिकेच्या शालेय इमारतीतील अंगणवाड्यांचे स्थापत्य विषयक नुतनीकरण करुन फायबर खेळण्या इ.वितरीत करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | मनपा शालेय इमारतीचे नाव | झोन क्रमांक |
|---|---|---|
| १. | मनपा प्रा.शा.ज्युब्ली पार्क | ०१ |
| २. | मनपा प्रा.शा.बेगमपुरा | ०१ |
| ३. | मनपा प्रा.शा.भावसिंगपुरा | ०१ |

| | | |
|---|---|---|
| ४. | मनपा प्रा.शा.किराडपुरा नं.१ | ०३ |
| ५. | मनपा प्रा.शा.किराडपुरा नं.३ | ०३ |
| ६. | मनपा प्रा.शा.बायजीपुरा | ०३ |
| ७. | मनपा प्रा.शा.शहाबाजार | ०३ |
| ८. | मनपा प्रा.शा.यशोधरा कॉलनी | ०३ |
| ९. | मनपा प्रा.शा.हर्सुल गाव | ०४ |
| १०. | मनपा प्रा.शा.हर्सुल वसाहत | ०४ |
| ११. | मनपा प्रा.शा.ब्रिजवाडी | ०६ |
| १२. | मनपा प्रा.शा.नारेगाव | ०६ |
| १३. | मनपा प्रा.शा.मसनतपुर | ०६ |
| १४. | मनपा प्रा.शा.मुकूंदवाडी | ०६ |
| १५. | मनपा प्रा.शा.संजयनगर, मुकूंदवाऊी | ०६ |
| १६. | मनपा प्रा.शा.शास्त्रीनगर | ०८ |
| १७. | मनपा प्रा.शा.प्रियदर्शनी, इंदिरानगर, गारखेडा | ०८ |
| १८. | मनपा प्रा.शा.एकनाथनगर | ०९ |
| १९. | मनपा प्रा.शा.बनेवाडी | ०९ |
| २०. | मनपा प्रा.शा.एकनाथनगर | ०९ |

एकूण २० शाळेतील २० अंगणवाडी खोल्या एकूण अंदाजपत्रक रु.१.३८.२२.९०५.००.

सदरील कामास जिल्हा वार्षिक योजना (अजाउयो) मधून १००% निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला असून तो राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खात्यात जमा आहे. सदरील कामाची रितसर निविदा एजन्सी निश्चित झाली असून या योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत.

करीता, मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १४१/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा वार्षिक योजना (अजाउयो) मधुन उक्त नमुद यादीनुसार मनपाच्या २० शालेय इमारती मधील अंगणवाड्याचे स्थापत्य विषयक नुतनीकरण करून शैक्षणिक ज्ञानांच्या माहितीचे तक्ते, फायबर खेळण्या इ.पुरवठा करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसुची सन २०१७-१८ व कोटेशन आधारे प्रस्तावाच्या अंदाजपत्रकीय र.रु.१,३८,२२,९०५.०० च्या अंदाजपत्रकास व एजन्सीला कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४२/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.३१.०५.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजना (अजाउयो) अनुसूचित जाती नावीन्यपुर्ण उपाययोजने अंतर्गत अनुसूचित भागातील २० मनपा शाळेतील अंगणवाड्यांचे नुतनीकरण करून प्रत्येक शाळेस लहान मुलांना शैक्षणिक नामफलक १९ प्रकारच्या फायबर खेळण्या पुरविणे या कामास मा.जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रशासकीय मान्यता झालेली आहे. या कामाचे ठेकेदार मे.एम.एस.कन्स्ट्रक्शन कंपनी अंदाजपत्रक दरापेक्षा २२.०३% कमी दराने करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेणे बाबत.

संदर्भ:- टेंडर ID 2019-AMCA-4863-03-1

| | | |
|---|---|---|
| १. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (उद्यान विभाग) |
| २. | कामाचे स्वरुप | अनुसूचित जाती उपाय योजना अंतर्गत मनपाच्या अनुसूचित भागातील शालेय इमारतीत अंगणवाड्याचे नुतनीकरण करुन फायबर खेळण्या पुरविणे. |
| ३. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | जिल्हा वार्षिक योजने अंतर्गतचा प्रस्ताव आहे. त्यास मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांनी दि.०७.०३.२०१९ रोजी र.रु.१,३८,२२,९०५/- अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिल्यानुसार ई-निविदेद्वारे कार्यवाही झाली आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले | मा.आयुक्तांच्या मान्यतेने र.रु.१,३१,६४,६७४/- इतक्या रक्कमेची निविदा मागविण्यात आली. |
| ४. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती. त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दि.३१.०८.२०१९ रोजी ई-निविदा विभागाद्वारे प्रसिध्द झाली. |
| ५. | अ) टेंडर्स स्विकारण्याची दिनांक | ३१.०८.२०१९ |
| | ब) टेंडर्स उघडण्याचा दिनांक | २७.०९.२०१९ |
| ६. | एकूण किती टेंडर्स आले? | या कामास एकूण दोन टेंडर प्राप्त त्याचा तपशिल खालीलप्रमाणे<br>१. मे.एम.एस.कन्स्ट्रक्शन कंपनी अ.प.दरापेक्षा २२.०३% कमी दराने<br>२. श्री.सिद्दीकी मो.लईक अं.प.दरापेक्षा १३.२५% कमी दराने.<br>उक्त नमुद नुसार स्पर्धात्मक रित्या अ.क्र.१ चे निविदाधारक मे.एम.एस.कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.०३% कमी दराची निविदा मा.आयुक्त महोदय यांनी मान्य केली आहे. |
| ७. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | सदरील कामाचा खर्च अनुसूचित जाती नाविन्यपुर्ण जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्रस्तावीत आहे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय. |
| ८. | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे काय? | जिल्हा वार्षिक योजना (अजाउयो) सन २०१८-१९ |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर पान क्रमांक | औरंगाबाद महानगरपालिकेस (सन २०१८-१९) जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत १०० टक्के निधी प्राप्त असून सदरील निधी बँक ऑफ महाराष्ट्र, खडकेश्वर शाखा, |

| | | |
|---|---|---|
| | द्यावा). | खाते क्र.२००७८१०६५३२ या स्वतंत्र खात्यात जमा आहे. |
| ९. | सोबत मान्य पुर्वणगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | लागू नाही. |
| या विषयांकीत कामासाठी ठेकेदार मे.एम.एस.कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.०३% कमी दराने करून घेणेस्तव व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत प्रस्ताव सादर. | | |

**ठराव क्रमांक १४२/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा वार्षिक योजना (अजाउयो) मधुन उक्त नमुद यादीनुसार मनपाच्या २० शालेय इमारती मधील अंगणवाड्यांचे स्थापत्य विषयक नुतनीकरण करून शैक्षणिक ज्ञानांच्या माहितीचे तक्ते, फायबर खेळण्या, इ.पुरवठा करण्यासाठी प्राप्त निविदाधारक मे.एम.एस. कन्स्ट्रक्शन कंपनी अं.प.दरापेक्षा २२.०३% कमी दराने काम करून घेण्यास व करार करण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४३/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०१.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती सरोज नरेश लाहोट (सफाई मजुर), वॉर्ड कार्यालय-२ (जी) महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या ACS with CAG (Angioplasty) या गंभीर आजारावार शासन मान्य खाजगी रुग्णालय कमलनयन बजाज हॉस्पीटल, बीड बायपास रोड, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून र.रु.२,०१,१२०/- (रु.दोन लाख एक हजार एकशे वीस फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक ती कागदपत्रांची पुर्तता केलेली असून त्यांना ह्रदयाचे आजार ACS with CAG (Angioplasty) उपचारार्थ एकूण केलेला खर्च र.रु.२,०१,१२०/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.२,४१४/- वजा जाता र.रु.१,९८,७०६/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या ९०% र.रु.१,७८,८३५/- इतकी होते. एकूण खर्चाचा ५% र.रु.१०,०५६/- ही मनपा फंडात जमा करून मंजुर देय र.रु.१,६८,७७९/- मधून अग्रिम र.रु.१,५०,०००/- वजा करून र.रु.१८,७७९/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार कमलनयन बजाज हॉस्पीटल, बीड बायपास रोड, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.२०११/प्र.क्र./३३३/११/राकावि-२/मंत्रालय, मुंबई-३२ दि.१६.११.२०११ अन्वये व शासन परिपत्रक क्र.वैखप्र-२०१३/प्र.क्र.२९१/१३/राकावि-२ दि.११.१०.२०१३ मधील रुग्णालयाच्या यादीत जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रुग्णालयाचे नाव समाविष्ट आहे. सदरचा प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्रीमती सरोज नरेश लाहोट, (सफाई मजुर), वॉर्ड कार्यालय-२(जी) यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.१,६८,७७९/- मधून र.रु.१,५०,०००/- वजा करून उर्वरित र.रु.१८,७७९/- ही रक्कम संबंधीतांना अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

करीता, प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १४३/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती सरोज नरेश लाहोट (सफाई मजुर), वॉर्ड कार्यालय-२(जी) , महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या ACS with CAG (Angioplasty) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रुग्णालय कमलनयन बजाज हॉस्पीटल बीडबायपास रोड, औरंगाबाद येथे शस्त्रक्रिया झालेली आहे. नियमाप्रमाणे एकूण र.रु.१,६८,७७९/- खर्च अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. अग्रिम र.रु.१,५०,०००/- वजा करून उर्वरित र.रु.१८,७७९/- ही रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४४/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०१.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे नियम ७९ (ब) अन्वये रिलायन्स मॉल लगतअसलेले महानगरपालिकेस ७५/२५ टक्के विकास योजना आरक्षणातून मिळालेल्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील तीन हॉल प्रत्येकी हॉलचे क्षेत्रफळ १५३.०० चौ.मी. एवढे असून असे एकत्रित ४५९.०० चौ.मी. पार्किंगच्या व्यवस्थेसह दुसरा मजला, हॉल क्र.पुर्व मध्य, पश्चिम मध्य व पश्चिम बाजु हे तीन हॉल मिळण्यासाठी भारतीय अन्न महामंडळ, भारतीय खाद्य विभाग, मनमाड ता.नांदगाव, जि.नाशिक यांनी त्यांच्या कार्यालयासाठी भाडेतत्वावर मागितले आहे. ज्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार प्रती हॉल मासिक भाडे रु.३९,०९३/- प्रमाणे तीन हॉलसाठी मासिक भाडे रु.१,१७,२७९/- प्रमाणे वार्षिक भाडे रु.१४,०७,३४८/- टक्के जी.एस.टी. व इतर वेगळे आकारणी करून भाडेतत्वावर देणेसाठी संमती दर्शविलेली आहे. करिता उक्त इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील तीन हॉल १० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्तावर देणेसाठी प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक १४४/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे नियम ७९ (ब) अन्वये रिलायन्स मॉल लगत असलेले महानगरपालिकेस ७५/२५ टक्के विकास योजना आरक्षणातुन मिळालेल्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील तीन हॉल प्रत्येकी हॉलचे क्षेत्रफळ १५३.०० चौ.मी. ऐवढे असून एकत्रित ४५९.०० चौ.मी. पार्किगच्या व्यवस्थेसह दुसरा मजला, हॉल क्र.पुर्व मध्य, पश्चिम मध्य व पश्चिम बाजु हे तीन हॉल मिळणेसाठी भारतीय अन्न महामंडळ, भारतीय खाद्य विभाग, मनमाड, ता.नांदगांव, जि.नाशिक यांनी त्यांच्या कार्यालयासाठी भाडेतत्वावर मागितले आहे. ज्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे प्रमाणपत्रानुसार प्रती हॉल मासिक भाडे रु.३९,०९३/- प्रमाणे तीन हॉलसाठी मासिक भाडे रु.१,१७,२७९/- प्रमाणे वार्षिक भाडे रु.१४,०७,३४८/- १८ टक्के जी.एस.टी. व इतर वेगळे आकारणी करून भाडेतत्वावर देणेसाठी संमती दर्शविलेली आहे. करिता उक्त इमारतीमधील मधील दुसऱ्या मजल्यावरील तीन हॉल १० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेसाठी संमती दर्शविलेली आहे. करिता उक्त इमारतीमधील मधील दुसऱ्या मजल्यावरील तीन हॉल १० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्रमांक १४५/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०२.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर कोरोना (कोविड-१९) काळातुन जात आहे. जेव्हापासुन कोरोनाचा संसर्ग शहरामध्ये वाढला आहे. तेव्हापासून प्रशासन चितींत होते की, जर कोरोना रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली तर काय उपाय योजना करता येतील? ही समस्या/चिंता मा.ना.श्री सुभाष देसाई, मंत्री, उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा तथा पालकमंत्री, औरंगाबाद यांचे समोर

माडंली मा.पालकमंत्री यांनी आपण नवीन पायाभुत सुविधाचे रुग्णालय उभारु आणि जिल्हाधिकारी, औरंगाबाद व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी यांचे मार्फत मेल्ट्रॉन इमारतीचे नुतनीकरण करून रुग्णालयामध्ये रुपांतरीत करून औरंगाबाद महानगरपालिकेस हस्तांतरीत करू असा निर्णय अगदी काही दिवसातच घेतला.

मा.श्री.अनबलगन, मुख्य कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) आणि मा.श्री.उदय चौधरी, तत्कालीन जिल्हाधिकारी औरंगाबाद, मा.श्री.संजय काटकर आणि इतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली मेल्ट्रॉन इमारतीचे रुपांतर केवळ २० दिवसांमध्ये रुग्णालयात झाले आणि मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र शासन व मा.पालकमंत्री महोदय, औरंगाबाद यांचे हस्ते कोव्हिड केअर सेंटर (CCC) मेल्ट्रॉन रुग्णालयाचे उद्‌घाटन झाले.

आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी दि.१०.०३.२०२१ रोजी कोव्हिड केअर सेंटर (CCC) मेल्ट्रॉन हॉस्पीटल, चिकलठाणा येथे भेट दिली. मेल्ट्रॉन हॉस्पीटल येथे कार्यरत वैद्यकीय अधिकारी, परिचारीका व इतर वैद्यकीय यांच्या उत्कृष्ट कामगिरी, हॉस्पीटलचे व्यवस्थापन तसेच रुग्ण सेवेसाठी सुयोग्य पध्दतीने सुरु ठेवलेल्या सुविधांबद्दल उपस्थित रुग्णांनी समाधान व्यक्त केले आहे. सध्या मेल्ट्रॉन हॉस्पीटल हे औरंगा ाबाद महानगरपालिकेतर्फे सदर डेडीकेटड कोव्हिड केयर हॉस्पीटल (DCHC) म्हणून कर्यान्वित आहे.

कोरोनाची साथ संपल्यानंतर मेल्ट्रॉन हॉस्पीटल, चिकलठाणा या इमारतीचा वापर महानगरपालिकेचे संसर्गजन्य आजार रुग्णालय म्हणून प्रस्तावित आहे. याकरीता प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करून सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. संपुर्ण मराठवाड्याकरिता संसर्गजन्य आजार रुग्णालय म्हणून मराठवाडा पातळीवर संदर्भ रूग्णालय उभारण्यात येईल. तेथे आधुनिक तपासणी, चिकीत्सा व सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील. या अंतर्गत खालील प्रमाणे कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येते.

१. मेल्ट्रॉन रुग्णालय भविष्यात कार्यान्वित राहण्याकरीता महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मुख्य कार्यकारी अधिकारी, मेल्ट्रॉन रुग्णालय अशा नावाचे एक नविन पद निर्मित करणे.
२. प्रभारी वैद्यकीय अधिकारी, मेल्ट्रॉन रुग्णालय नावाचे एक पद निर्मित केले जाईल सामान्यत: अतिशय उत्कृष्ठ व कामास समर्पित वैद्यकीय अधिकारी यांचे पथक सदर रुग्णालयास योग्य रित्या चालवतील. त्यांच्यातील अग्रेसर अधिकाऱ्यास प्रभारी वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येईल.
३. रुग्णालयाच्या साफसफाईच्या कामासाठी आवश्यक मन्युष्यबळ पुरविणे या कामाची निविदा मागविणे.
४. महानगरपालिकेतर्फे मेल्ट्रॉन रुग्णालयाकरीता एक स्वतंत्र्य बँक खाते उघडणे.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रभारी वैद्यकीय अधिकारी, मेल्ट्रॉन हॉस्पीटल यांना रक्कम रुपये ३.०० लक्ष आणि आरोग्य व प्रभारी वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांना रुपये ५.०० लक्ष मर्यादेत खर्चाचे अधिकार प्रदान करणे.
६. औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत कोविड केअर सेंन्टर, मेल्ट्रॉन रुग्णालयाच्या सुरळीत परिचालना करीता प्रत्येक आर्थीक वर्षात दोन वेळा स्वत:चे आर्थिक योगदान व आवश्यक निधी सदर खात्यात जमा करण्यात येईल.
७. भविष्यात इतर पायाभुत सुविधा संबंधीची स्थापत्य कामे शहर अभियंता विभागामार्फत पार पाडण्यात येतील.

८. पुढील काही महिन्यात मेल्ट्रॉन रुग्णालय, कोव्हिड केअर सेंटर (CCC) आणि डेडिकेटेड कोव्हिड हेल्थ सेंटर म्हणुन कार्यन्वीत होईल आणि त्यासाठी लागणारा खर्च शासकीय निधी, राज्य आपत्ती व्यवस्थापन निधी, जिल्हा नियोजन समिती मार्फत प्राप्त निधी, मा.खासदार निधी व मा.आमदार निधी यातुन भागविणे आणि आश्यकतेनुसार औरंगाबाद महानगरपालिका निधीची व्यवस्था करणे.
९. कोरोनाची साथ संपल्यानंतर या इमारतीचा वापर मनपाचे संसर्गजन्य आजार रुग्णालय म्हणून प्रस्तावित आहे. याकरीता प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करून सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करणे. तसेच या ठिकाणी आधुनिक तपासणी, चिकीत्सा व सेवा सुविधा उपलब्ध करुन देणे.

करिता कोरोनाची साथ संपल्यानंतर मेल्ट्रॉन हॉस्पीटल, चिकलठाणा या इमारतीचा वापर महानगरपालिकेचे संसर्गजन्य आजार रुग्णालय करणे आणि या कामी उक्त अ.क्र.१ ते ९ प्रमाणे कार्यवाही करणे करीता मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक १४५/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मेल्ट्रॉन हॉस्पीटल, चिकलठाणा येथील महानगरपालिकेचे डेडीकेटेड कोव्हिड केयर हॉस्पीटल (DCHC) कोरोना साथ रोग असे पर्यत कार्यन्वित ठेवणे आणि कोरोनाची साथ संपल्या नतंर मेल्ट्रॉन हॉस्पीटल, चिकलठाणा या इमारतीचा वापर महानगरपालिकेचे संसर्गजन्य आजार रुग्णालय म्हणुन स्थापन करण्यास मान्यता देण्यात येते. या कामी प्रकल्प सल्लागाराची नेमणुक करून सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करणे आणि प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे अ.क्र.१ ते ९ प्रमाणे कार्यवाही करण्यास देखील मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाहि व्हावी.

**विषय क्रमांक १४६/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०२.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी रु.२०० लक्ष निधी शासनाकडुन महानगरपालिकेला प्राप्त झाला आहे. या शासकीय निधीतुन ०८ रुग्णवाहिका व रुग्ण्वाहिकेतील उपकरणे खरेदी करण्यासाठी रुपये १५४.०० लक्ष खर्च झाला आहे. उर्वरीत रु.४६.०० लक्ष निधीतुन रेफ्रिजरेटर्स, आईसलाईन रेफ्रिजरेटर्स व डीपफ्रिजर्स ही वैद्यकिय उपकरणे खरेदी करावयाची आहेत. त्यासाठी ठराव क्र.११९ दि.२४.०४.२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. तथापी या उपकरणांपैकी डीपफ्रिजर हे उपकरण कोरोना व्हॅक्सीन व इतर औषधी साठविण्यासाठी वापरण्यात येणार असल्यामुळे त्याच्या स्पेसिफीकेशन मध्ये बदल करावे लागत आहेत. डीपफ्रिजरचे तापमान-१५ ते-२५ डिग्री सेल्सीयस असणे आवश्यक आहे. तसेच इनबिल्ट पॉवर बॅकअपची सुविधा असणे देखील आवश्यक आहे. स्पेसिफीकेशन बदलल्यामुळे डीपफिजरच्या अपेक्षीत किंमतीत फरक पडत आहे. त्यामुळे खरेदी करावयाच्या उपकरणांच्या संख्येत खालील प्रमाणे बदल करावा लागत आहे.

१) आईसलाईन रेफ्रिजेरेटर्स : १५ ऐवजी १० नग
२) डीपफ्रिजर : १५ ऐवजी ०५ नग

वैद्यकिय उपकरणे खरेदीसाठी सुधारीत अंदाजपत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्य | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | रेफ्रिजेरेटर २०० लिटर | ५० | २०४८९.८६ | १०,२४,४९३.०० |
| २ | आईसलाईन रेफ्रिजेरेटर ३०० लिटर | १० | २०००००/- | २०,००,०००.०० |
| ३ | डिप फ्रिजर ५०० लिटर | ०५ | ३१५०००/- | १५,७५,०००.०० |
| | | | **एकुण रुपये** | **४५,९९,४९३.००** |

उपरोक्त प्रमाणे शासकीय निधीतुन वैद्यकिय उपकरणे खरेदी करण्यासाठी र.रु.४५,९९,४९३/- रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. मान्यता मिळाल्यास जीईएम पोर्टलव्दारे हे साहित्य खरेदी करण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १४६/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वैद्यकिय साहित्य खरेदी करण्यासाठी र.रु.४५,९९,४९३/- रक्कमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. प्रस्तावित साहित्य खरेदी करण्यासाठी वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक १४७/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०२.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विद्युत विभागाच्या देखभाल दुरुस्ती या विवक्षीत कामासाठी कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०२०/९०० दि.०३.०९.२०२० अन्वये, श्री.किसन दत्ताराव देशमुख, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांची ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतना सह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा र.रु.४०,०००/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादेत राहील. या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.०२.०३.२०२१ रोजी संपलेली असून विभाग प्रमुख (विद्युत) यांनी सद्यस्थितीत विद्युत विभागातील कामाचा व्याप बघता श्री.के.डी.देशमुख यांना पुढील ०६ महिन्यांकरीता मुदतवाढ देण्याबाबत कळविले आहे.

करीता, श्री.किसन दत्ताराव देशमुख, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.०५.०३.२०२१ पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.०३.०९.२०२१ च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १४७/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विद्युत विभागाच्या देखभाल दुरुस्ती या विवक्षीत कामासाठी कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०२०/९०० दि.०३.०९.२०२० अन्वये, श्री.किसन दत्ताराव देशमुख, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांची ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा र.रु.४०,०००/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादेत राहील. या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.०२.०३.२०२१ रोजी संपलेली असून विभाग प्रमुख (विद्युत) यांनी सद्यस्थितीत विद्युत विभागातील कामाचा व्याप बघता श्री.के.डी.देशमुख यांना पुढील ०६ महिन्यांकरीता मुदतवाढ देण्याबाबत कळविले आहे.

करीता, श्री.किसन दत्ताराव देशमुख, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.०५.०३.२०२१ पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.०३.०९.२०२१ च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४८/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.०३.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद संचलित टाऊनहॉल कलादालन येथे दैनंदिन देखभाल व कलादालनाची कामे पार पाडण्याकरीता मानद क्युरेटर (काळजीवाहक) म्हणुन श्री.हंसराज नारायण बन्सवाल यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या निवड समीने गुणवत्तेनुसार दि.०४.१२.२००७ रोजी नियुक्ती केलेली आहे. सदरील नियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर मा.स्थायी समितीच्या मान्यतेने त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यांना दि.०३.०८.२०२० रोजी प्रशासकीय ठराव क्रमांक २३/२०२० च्या मान्यतेने व कार्यालयीन आदेश क्र.जा.क्र./मनपा/सांस्कृतिक/२०२०/५६ दि.०३.०९.२०२० च्या आदेशान्वये रु.१०,०००/- दरमहा मानधन देऊन कार्यरत आहे. दि.१८.०२.२०१४ पासून त्यांच्या मानधनात वाढ करण्यात आलेली नाही. त्यांचे काम समाधानकारक असून ते मागील चौदा वर्षापासून मनपाच्या सेवेत आहे.

सद्यस्थितीत संबंधीताची मुदत दि.३०.०८.२०२० रोजी संपलेली असून त्यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.०२.०९.२०२० ते दि.०१.०८.२०२१ पर्यंत अकरा महिन्यांकरीता दरमहा र.रु.१२,०००/- मानधनात वाढ करून देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १४८/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद संचलित टाऊनहॉल, कलादालन येथे दैनंदिन देखभाल व कलादालनाची कामे पार पाडण्याकरीता मानद क्युरेटर (काळजी वाहक) म्हणुन श्री.हंसराज नारायण बन्सवाल यांची मुदत दि.३०.०८.२०२० रोजी संपलेली असल्याने त्यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.०२.०९.२०२० ते ०१.०८.२०२१ पर्यंत अकरा महिन्यांकरीता दरमहा रु.१२,०००/- मानधनात वाढ करून मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १४९/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. .०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रशासकीय ठराव क्र.७७ दि.१३.०१.२०२१ अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-३ संवर्गातील कर्मचा-यांना कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-१/२०२१/६३ दि.१३.०१.२०२१ रोजीच्या आदेशान्वये दि.०१.१२.२०२० ते दि.२९.०५.२०२१ पर्यंत तात्पुरती नियुक्ती देण्यात आली होती.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | कार्यरत विभाग | दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती जयश्री जयंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकुल कक्ष | रु.५२५/- |
| २. | श्री.अरुण रावजी बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ३. | श्री.सय्यद फरीदोद्दीन सय्यद गौस | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४. | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५. | श्री.रविंद्र कौतीकराव पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |

त्यामुळे उक्त कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) च्या परंतुकान्वये ०२ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुढील सहा महिन्याकरीता दि.०१.०६.२०२१ ते दि.२७.११.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक १४९/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रशासकीय ठराव क्र.७७ दि.१३.०१.२०२१ अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-३ संवर्गातील कर्मचा-यांना कार्यालयीन आदेश

जा.क्र./मनपा/आस्था-१/२०२१/६३ दि.१३.०१.२०२१ रोजीच्या आदेशान्वये दि.०१.१२.२०२० ते दि.२९.०५.२०२१ पर्यंत तात्पुरती नियुक्ती देण्यात आली होती.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | कार्यरत विभाग | दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती जयश्री जयंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकुल कक्ष | रु.५२५/- |
| २. | श्री.अरुण रावजी बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ३. | श्री.सय्यद फरीदोद्दीन सय्यद गौस | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ४. | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |
| ५. | श्री.रविंद्र कौतीकराव पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.५२५/- |

करीता, उक्त कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) च्या परंतुकान्वये ०२ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुढील सहा महिन्याकरीता दि.०१.०६.२०२१ ते दि.२७.११.२०२१ पर्यंत तात्पुरती नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावाच्या विषयास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५०/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१८.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२७ नुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांना मालमत्ता कर आकारणी करण्यात येते. याच अधिनियमाचे अनुसुची 'ड' मधील प्रकरण ८ (करधान नियम) चे कलम १५ व १६ नुसार अशा कर आकारणीवर आक्षेप नोंदवण्याची तरतुद आहे. कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/मआ/स्वीस/३४८/२०२० दि.१३.१०.२०२० नुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांच्या करावर दाखल आक्षेपांवर नियमानुसार सुनावणी घेऊन प्रकरणे निकाली काढण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समिती त्यांचेसमोर सादर होणाऱ्या प्रत्येक आक्षेपीत प्रकरणात स्वतंत्र सुनावणी घेऊन निर्णय घेत आहे. त्यापैकी काही प्रकरणात मालमत्तेस चुकीचा/दुहेरी (डबल)/जास्तीचा कर लागला असल्याचे व वसुल होण्याजोगा नसल्याचे निदर्शनास येत असते. अशा प्रकरणात अशी कराची रक्कम आयुक्तांच्या मान्यतेने संगणकीय लेख्यातुन निर्लेखीत करणे आवश्यक असते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ नुसार आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसुल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम वसुल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखीत करण्याचे अधिकार आहेत.

करीता, प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १५०/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उपरोक्त समिती समोर सादर मालमत्ता कर आक्षेप प्रकरणात चुकीच्या/दुहेरी (डबल)/जास्तीच्या कराची रक्कम जी वसुल होण्याजोगी नाही असा समितीचा निर्णय झाला आहे. अशी रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ नुसार आयुक्तांच्या मान्यतेने औरंगाबाद महानगरपालिकेच्या संगणकीय लेख्यातुन निर्लेखीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५१/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१८.०६.२०२१)**

प्रशासकीय प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एप्रिल-२०२० मध्ये कोरोना वैश्विक महामारीच्या प्रतिबंधासाठी औरंगाबाद शहरात महानगरपालिकेमार्फत विविध ठिकाणी कोव्हिड केअर सेंटर व सुरुवातीच्या काळात क्वारेन्टाईन सेंटर सुरु करण्यात आलेली आहेत. सदरील ठिकाणी रुग्ण व

कार्यरत कर्मचारी यांना महानगरपालिकेमार्फत भोजन पुरवठा सुरु करण्यात आला होता. तो अद्यापही सुरु आहे.

मा.सर्वसाधारण सभेसमोर महानगरपालिकेमार्फत स्थापित कोव्हिड केअर सेंटर, अलगीकरण/ विलगीकरण कक्ष इत्यादी ठिकाणी (०१) भोजन पुरवठासाठी झालेला खर्च व संभाव्य दुसऱ्या लाटेचा अंदाज गृहित धरुन भोजन पुरवठ्यासाठी अपेक्षित निधी असा एकूण र.रु.०७.०० कोटीच्या खर्चास मान्यता देणे (०२) उपलब्ध भोजन पुरवठाधारकांकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलक ६७ (३) (सी) अंतर्गत संबंधितांना देण्यात आलेल्या कार्यादेशास व कार्यादेशात नमूद दरास मान्यता प्रदान करणे (३) करण्यात आलेल्या खर्चास मान्यता प्रदान करणे (०४) व पुढील कालावधीत याच भोजन पुरवठा धारकांकडून भोजन पुरवठा करून घेण्यास मान्यता देणे (०५) भोजन पुरवठा करण्यासाठी काढण्यात आलेली निविदा रद्द करणे याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला होता. त्यास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.७९ दि.१४.०१.२०२१ अन्वये कार्योत्तर मान्यता प्रदान केलेली आहे.

मार्च-२०२० ते माहे-मे च्या अखेरपर्यंत वरीलप्रमाणे विविध कोव्हिड केअर सेंटर येथे भोजन पुरवठ्यापोटी एकूण रक्कम रुपये एकूण खर्च र.रु.६.९९ कोटी इतका खर्च झालेला आहे. मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेल्या एकत्रित रक्कम रुपये ०७.०० कोटीच्या रक्कमेच्या जवळपास खर्च पोहचलेला आहे.

पहिली लाट ऑक्टोबर/नोव्हेंबर मध्ये ओसरल्या नंतर दि.१६ फेब्रुवारी २०२१ पासून हळुहळु रुग्णसंख्या वाढत गेली व मार्च/एप्रिल या महिन्यात पहिल्या लाटेपेक्षाही जास्त रुग्णसंख्या शहरात आढळून आली. त्यामुळे दुसऱ्या लाटेचा अंदाज घेऊन महानगरपालिकेस पुन्हा एकदा बंद करण्यात आलेले कोव्हिड केअर सेंटर सुरु करावे लागले आहेत. दुसत्या लाटेत रुग्णसंख्या ही पहिल्या लाटेच्या तुलनेत अपेक्षेपेक्षा बरीच जास्त आढळून आलेली आहे. राज्यात व देशात अद्याप दुसरी लाट ओसरलेली नाही. मा.मुख्यमंत्री ना.श्री उध्दवजी ठाकरे साहेब यांनी महाराष्ट्रतील नागरिकांना तिसऱ्या लाटेसाठी तयार राहण्यास व त्यासाठी योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन केलेले आहे. तसेच देशातील व जागतिक स्तरावरील साथरोग तज्ज्ञ व जागतिक आरोग्य संघटना यांनी ऑगस्ट-सप्टेंबर मध्ये भारतात तिसरी लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे असे विविध वृत्तपत्र, न्युज चॅनल वरुन समजते. तसेच पहिल्या लाटेपेक्षा ही लाट वेगळी असण्याची व यात लहान मुलांनाही संसर्ग होण्याची भिती व्यक्त केलेली आहे`. सध्या दुसऱ्या लाटेत लहान मुले व तरुणांची संख्या पहिल्या लाटेच्या तुलनेने वाढल्याचे वृत्तपत्रांच्या बातम्यावरुन लक्षात येते. या सर्व बाबींचा विचार करता औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रशासना मार्फत संभाव्य तिसऱ्या लाटेचा व सध्या चालु असलेल्या दुसऱ्या लाटेचा प्रतिबंधासाठी मोठ्या प्रमाणावर कोव्हिड केअर सेंटर सुरु करण्याची गरज भविष्यात भासण्याची शक्यता नाकारता येत नाही. पहिल्या लाटेच्या मध्यापासून ते दुसऱ्या लाटेच्या दि.१० मे २०२१ अखेरपर्यंत रुग्णांच्या भोजनावर, आयुष काढा, तुलसी चहा व जारव्दारे पाणीपुरवठा यासाठी जवळपास ६.९९ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. यापुढील टप्यात ते तिसरी लाट या कालावधीसाठी म्हणजे साधाणत: १० मे २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीसाठी केवळ कोव्हिड केअर सेंटर येथील रुग्ण व कार्यरत कर्मचारी यांच्या भोजनापपोटी अंदाजे रक्कम रुपये ६ कोटीची गरज भासण्याची शक्यता आहे.

तसेच भविष्यात अचानक रुग्णसंख्या वाढल्यास, तिसरी लाट आल्यास तातडीने कोविड केअर सेंटर सुरु करावे लागले; व रुग्णांना व कार्यरत कर्मचाऱ्यांना भोजन पुरवठ करावा लागला. तर सर्वसाधारण सभेच्या ठराव क्रं ७९ दि.१४/०१/२०२१ अन्वये मंजुर करण्यात आलेल्या व सध्या भोजन

पुरवठा करत असलेल्या उपलब्ध भोजन पुरवठाधारकांकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलक ६७ (३) (सी) अंतर्गत संबंधितांना देण्यात आलेल्या खालील कार्यादेशास व कार्यादेशात नमूद दरानुसार भोजन पुरवठा भविष्यातील संभाव्य परिस्थितीत सुरु ठेवण्यासही सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे.

| अ. क्र | पुरवठाधारकाचे नाव | मान्य केलेला दर प्रति व्यक्ती प्रति दिन सर्व करांसह | कार्यादेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | के.एन.के. हॉस्पिट्यालिटी, | रु.१८०.०० | जा.क्रं/मनपा/श.अ./२०२०/३५ दिनांक:- ०१/०७/२०२० |
| ०२ | नम्रता केटरर्स | रु.१७९.०० | जा.क्रं/मनपा/श.अ./२०२०/३४ दिनांक:- ०१/०७/२०२० |
| ०३ | जैन केटरर्स | रु.१७२.०० | जा.क्रं/मनपा/श.अ./२०२०/३६ दिनांक:- ०१/०७/२०२० |
| ०४ | अन्नामृत फाउंडेशन | रु.१७८.५० | जा.क्रं/मनपा/श.अ./२०२०/४० दिनांक:- ०९/०७/२०२० |
| ०५ | कर्तव्य केटरर्स | रु.१७७.५० | जा.क्रं/मनपा/श.अ./२०२०/३९ दिनांक:- ०१/०७/२०२० |
| ०६ | तुषार मंगल केंद्र ॲण्ड केटरर्स | रु.१५७.५० | जा.क्रं/मनपा/श.अ./२०२०/३८ दिनांक:- ०१/०७/२०२० |
| ०७ | हॉटेल लालाजी एक्झीक्युटीव्ह | रु.१७९.०० | जा.क्रं/मनपा/श.अ./२०२०/४६ दिनांक:- ११/०७/२०२० |
| ०८ | इनरिच इंडस्ट्रीयल सर्व्हीस फुड सप्लायर्स ॲण्ड | रु.१७५.०० | जा.क्रं/मनपा/श.अ./२०२०/४७ दिनांक:- १५/०७/२०२० |
| ०९ | श्री साई कृपा भोजनालय | रु.१६०.०० | जा.क्रं/मनपा/श.अ./२०२०/३७ दिनांक:- ०१/०७/२०२० |

दि.०७/०५/२०२१ रोजीच्या सनियंत्रण समितीच्या बैठकीत निधी उपलब्धततेच्या संदर्भाने चर्चा होऊन सर्व बाबींचा विचार करता साधाणत: १० मे २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीसाठी कोव्हिड केअर सेंटर येथील रुग्ण व कार्यरत कर्मचारी यांच्य भोजनापोटी अंदाजे रक्कम रुपये ६.०० कोटी खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणे व सदर रक्कम राज्य आपत्ती व्यावस्थापन निधी (एस.डी.आर.एफ) मधुन औरंगाबाद महागरपालिकेस उपलब्ध करुन देण्याबाबत मा. राज्य सरकार व मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी/प्रस्ताव पाठविण्यासाठी तसेच सध्यास्थितत पुरवठा करत असलेल्या भोजन पुरवठाधारकांकडून त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशात नमुद दरानूसार भविष्यातील संभाव्य परिस्थितीत भोजन पुरवठा करून घेणे या दोन बाबींसाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**<u>ठराव क्रमांक १५१/२०२१:-</u>**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, एप्रिल-२०२० मध्ये कोरोना वैश्विक महामारीच्या प्रतिबंधासाठी औरंगाबाद शहरात महानगरपालिकेमार्फत विविध ठिकाणी कोव्हिड केअर सेंटर व सुरुवातीच्या काळात

क्वारेन्टाईन सेंटर सुरु करण्यात आलेली आहेत. सदरील ठिकाणी रुग्ण व कार्यरत कर्मचारी यांना महानगरपालिकेमार्फत भोजन पुरवठा सुरु करण्यात आला होता. तो अद्यापही सुरु आहे.

मा.सर्वसाधारण सभेसमोर दि.१४ जानेवारी २०२१ रोजी प्रस्ताव ठेवण्यात आला होता की, महानगरपालिकेमार्फत स्थापित कोव्हिड केअर सेंटर, अलगीकरण/विलगीकरण कक्ष इत्यादी ठिकाणी भोजन पुरवठ्यासाठी झलेला खर्च व संभव्य दुसऱ्या लाटेचा अंदाज गृहित धरुन भोजन पुरवठ्यासाठी अपेक्षित निधी असा एकूण र.रु.०७.०० कोटीचा खर्चास व प्रस्तावात नमूद इतर बाबीस मान्यता देण्यात यावी मा.सर्वसाधरण सभेने विषय क्र.७९ दि.१४/०१/२०२१ अन्वये त्यास कार्योत्तर मान्यता प्रदान केलेली आहे.

मार्च-२०२० ते माहे-मे-२१ च्या अखेरपर्यंत वरीलप्रमाणे विविध कोव्हिड केअर सेंटर येथे भोजन पुरवठ्यापोटी एकुण रक्कम रुपये एकुण खर्च र.रु.६.९९ कोटी इतका खर्च झालेला आहे. मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेल्या एकत्रित र.रु.०७.०० कोटीच्या रक्कमेच्या जवळपास खर्च पोहचलेला आहे.

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्रतील नागरिकांना तिसऱ्या लाटेसाठी तयार राहण्यास व त्यासाठी योग्य ती काळजी घेण्याची आवाहन केलेले आहे. तसेच देशातील व जागतिक स्तरावरील साथरोग तज्ज्ञ व जागतिक आरोग्य संघटना यांनी ऑगस्ट-सप्टेंबर मध्ये भारतात तिसरी लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे असे विविध वृत्तपत्र, न्युज चॅनल वरुन समजते.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रशासना मार्फत संभाव्य तिसऱ्या लाटेचा व सध्या चालु असलेल्या दुसऱ्या लाटेचा प्रतिबंधासाठी मोठ्या प्रमाणावर कोव्हिड केअर सेंटर सुरु करण्याची गरज भविष्यातभासण्याची शक्यता नाकारता येत नाही. पहिल्या लाटेच्या मध्यापासून ते दुसऱ्या लाटेच्या दि.१० मे २०२१ अखेरपर्यंत रुग्णांच्या भोजनावर, आयुष काढा, तुलसी चहा व जारव्दारे पाणीपुरवठा यासाठी जवळपास रर.रु.६.९९ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. यापुढील टप्यात ते तिसरी लाठ या कालावधीसाठी म्हणजे साधाणतः १० मे २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीसाठी केवळ कोव्हिड केअर सेंटर येथील रुग्ण व कार्यरत कर्मचारी यांच्या भोजनापोटी अंदाजे र.रु.६ कोटीची गरज भासण्याची शक्यता आहे.

दि.०७.०५.२०२१ रोजीच्या सनियंत्रण समितीच्या बैठकीत निधी उपलब्धतेच्या संदर्भाने चर्चा होऊन सर्व बाबींचा विचार करता साधाणतः १० मे २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीसाठी कोव्हिड केअर सेंटर येथील रुग्ण व कार्यरत कर्मचारी यांच्य भोजनापोटी अंदाजे र.रु.६.०० कोटी खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणे व सदर रक्कम राज्य आपत्ती व्यावस्थापन निधी (एस.डी.आर.एफ) मधुन औरंगाबाद महागरपालिकेस उपलब्ध करुन देण्याबाबत मा. राज्य सरकार व मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी/प्रस्ताव पाठविण्यासाठी तसेच सध्यास्थितीत पुरवठा करत असलेल्या भोजन पुरवठाधारकांकडून त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशात नमुद दरानुसार भविष्यातील संभाव्य परिस्थितीत भोजन पुरवठा करून घेणे या दोन बाबींसाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यास मान्यता दिली आहे.

करिता, साधाणतः १० मे २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीसाठी कोव्हिड केअर सेंटर येथील रुग्ण व कार्यरत कर्मचारी यांच्या भोजनापोटी अंदाजे र.रु.६.०० कोटी खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणे व सदर रक्कम राज्य आपत्ती व्यवस्थापन निधी (एस.डी.आर.एफ) मधुन औरंगाबाद महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्याबाबत मा.राज्य सरकार व मा.जिल्हाधिकारी यांच्या कडे मागणी/प्रस्ताव पाठविण्यासाठी तसेच ठराव क्र.७९ नुसार सध्यस्थितीत महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियमाचे कलम ६७ (३) (सी) अंतर्गत मान्यता प्रदान केलेल्या दरानुसार पुरवठा करत असलेल्या भोजन पुरवठाधारककांकडून त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशा नुसार भविष्यातील संभाव्य परिस्थितीत भोजन पुरवठा करुन घेणे या बाबींसाठी मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १५२/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.१८.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरामध्ये ज्या भागात जलवाहिन्या नाहीत अशा भागात महानगरपालिकेतर्फे ड्रम पध्दतीने टँकरव्दारे सशुल्क पाणी पुरवठा करण्यात येतो. सद्यस्थितीत शहरा ामध्ये एन-५, एन-७ व कोटला जलकुंभ या तिन टँकर फिलींग पॉइट वरुन टँकर भरण्यात येतात. तसेच सातारा देवळाई भागामध्ये महानगरपालिकेच्या जलवाहिन्या नसल्याने या भागात सुध्दा नक्षत्रवाडी पंप हाऊस येथुन ड्रम पध्दतीने टँकरव्दारे सशुल्क पाणी पुरवठा करण्यात येतो. महानगरपालिकेच्या मालकीचे टँकर नसल्याने कंत्राटदाराकडुन भाडे तत्वावर टँकर लावण्यात येतात.

भाडे तत्वावरील टँकरची संख्या नागरीकांच्या मागणी नुसार कमी जास्त होते. शहरासाठी साधारणत: ५००० लिटर क्षमतेचे ८० टँकर व १०००० लिटर क्षमतेचे ८ टँकर असे एकुण ८८ टँकर आणि सातारा देवळाई भागासाठी ५००० लिटर क्षमतेचे १० टँकर, १२००० लिटर क्षमतेचे ५ टँकर व २४००० लिटर क्षमतेचे ५ टँकर असे एकुण २० लागतील असा अंदाज गृहीत धरुन रुपये ११,९१,१०,४५०/- खर्चाच्या अंदाजपत्रकास मा. सर्वसाधरण सभेने ठरात क्र.२/२०२० दि.२७.०४.२०२० अन्वये मान्यता दिलेली आहे.

करीता, शहर व सातारा-देवळाई परिसरातील नागरीकांना मागणी नुसार भाडे तत्वावर टँकर लावून ड्रम पध्दतीने स:शुल्क पाणी पुरवठा करण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आली. या कामासाठी दुसऱ्या वेळेस ई-निविदा मागविली असता तिन निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | तपशील |
|---|---|---|
| १ | मे.शेख कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद. | प्राप्त दस्तावेज आर.टी.ओ. औरंगाबाद यांच्याकडुन तपासली असता निविदा अटी व शर्तीची पुर्तता होत नसल्याने निविदा अपात्र. |
| २ | मे. गोल्ड कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | प्राप्त दस्तावेज आर.टी.ओ. औरंगाबाद यांच्याकडुन तपासली असता निविदा अटी व शर्तीची पुर्तता होत नसल्याने निविदा अपात्र. |
| ३ | मे. राम इंफ्रास्ट्रक्चर, औरंगाबाद. | निविदा अटी व शर्ती नुसार पात्र. |

उपरोक्त प्रमाणे मे.राम इंफ्रास्ट्रक्चर, औरंगाबाद यांची निविदा उघडली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| अ.क्र. | टँकर क्षमता | १ मे.टन करीता | |
|---|---|---|---|
| | | प्रति दिन भाडे | प्रति किलोमिटर भाडे |
| १ | ५००० लिटर | रु.२९०/- | रु.३.८५ |
| २ | १०००० लिटर व त्यापेक्षा मोठ्या टँकरव्दारे | रु.२५१/- | रु.३.२१ |

उपरोक्त प्रमाणे मे.राम इंफ्रास्ट्रक्चर यांनी भरलेल्या निविदा दराने येणारी किमत व अंदाजपत्रक किमत यांची तुलना केली असता निविदेचे दर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ३४.३२ टक्के जास्त येतात. त्यामुळे संबंधित कंत्राटदारासोबत दि.१८.०५.२०२१ रोजी दराबाबत वाटाघाटी करण्यात आल्या. सद्या

महानगरपालिकेमध्ये सातारा देवळाई परिसरासाठी व शहरासाठी असलेल्या दोन वेगवेगळ्या निविदां मधील टँकर पुरवठ्याच्या चालू दरांनी काम करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. वाटाघाटी नंतर दोन्ही पक्षांनी निविदेनुसार बारा महिन्यांच्या कालावधीसाठी खालील दरांनी काम करण्यास सहमती दर्शवली व दर अंतिम करण्यात आले.

| **अ.क्र** | **भाग** | **टँकर क्षमता** | **१ मे.टन करीता** | |
|---|---|---|---|---|
| | | | **प्रति दिन भाडे** | **प्रति किलोमिटर भाडे** |
| १ | सातारा देवळाई परिसरासाठी | सर्व क्षमतेचे टँकर | रु. १७५/- | रु. २.३० |
| २ | औरंगाबाद शहर | ५००० लिटर | रु.२०५/- | रु.३.०० |
| | | १००० लिटर व त्यापेक्षा मोठ्या टँकरव्दारे | रु.१९०/- | रु.२.३० |

उपरोक्त दरांनी निविदेनुसार बारा महिन्यांच्या कालावधीसाठी उपरोक्त दराने काम करावे व जर आणीबाणी परिस्थितीमध्ये या निविदेस मुदतवाढ द्यावी लागली तर सद्याच्या दरांमध्ये १० टक्के (जास्तीत जास्त) वाढ करुन मुदतवाढ देता येईल याबाबत दोन्ही पक्षांनी सहमती दर्शवली आहे.

करीता मे. राम इंफ्रास्ट्रक्चर, औरंगाबाद यांचेकडुन उपरोक्त दराने काम करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

संदर्भ :- टेंडर क्र.2020_AMCA_588662_2

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा |
| २ | कामाचे स्वरुप | औरंगाबाद शहर व सातारा देवळाई परिसरातील विविध भागात भाडे तत्वावरील टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे बाबत. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे?मान्यतेचा ठराव? | रु. ११,९१,१०,४५०/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रु. ११,९१,१०,४५०/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-निविदा विभाग महानगरपालिका औरंगाबाद |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि. ०६.१०.२०२० ते २०.१०.२०२० |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि. २२.१०.२०२० |
| ६ | एकुण किती टेंडर्स आली? | दुसरी वेळ - तिन निविदा |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी).

| **अ. क्र** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|

<table>
<tr>
<td>१</td>
<td>मे.राम इंफ्रास्ट्रक्चर, औरंगाबाद</td>
<td>११,९१,१०,४५०/-</td>
<td>अंदाजपत्रक रकमेपेक्षा ३४.३२ टक्के जास्त दर दाराच्या वाटाघाटी अंती खालील दरांनी काम करण्यास सहमती
<table>
<tr><th rowspan="2">भाग</th><th rowspan="2">टँकर क्षमता</th><th colspan="2">१ मे.टन करीता</th></tr>
<tr><th>प्रति दिन भाडे</th><th>प्रति किलोमिटर भाडे</th></tr>
<tr><td>सातारा देवळाई परिसरासाठी</td><td>सर्व क्षमतेचे टँकर</td><td>रु. १७५/-</td><td>रु. २.३०</td></tr>
<tr><td rowspan="2">औरंगाबाद शहर</td><td>५००० लिटर</td><td>रु. २०५/-</td><td>रु. ३.००</td></tr>
<tr><td>१००० लिटर व त्यापेक्षा मोठ्या टँकरव्दारे</td><td>रु. १९०/-</td><td>रु. २.३०</td></tr>
</table>
</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यास आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | पाणी पुरवठा टँकर |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही. |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | ---- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमुना जोडला आहे? | लागू नाही |

तरी विषयांकीत प्रकरणी कंत्राटदार मे. राम इंफ्रास्ट्रक्चर, औरंगाबाद यांचे सोबत वाटाघाटी नंतर अंतिम झालेल्या दरांनी निविदेनुसार बारा महिन्यांच्या कालावधीसाठी काम करुन घेणे व जर आणीबाणी परिस्थितीमध्ये या निविदेस मुदतवाढ द्यावी लागली तर सद्याच्या दरांमध्ये १० टक्के (जास्तीत जास्त) वाढ करुन मुदतवाढ देण्याबाबत व करार करण्यास मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक १५२/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे औरंगाबाद शहर व सातारा-देवळाई परिसरामध्ये ड्रम पध्दतीने सशुल्क पाणी पुरवठा करण्याच्या कामासाठी ई-निविदा मागविण्यात आली असता तिन निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी पात्र एक निविदा मे.राम इंफ्रास्ट्रक्चर औरंगाबाद यांची उघडण्यात आली. निविदेच्या प्राप्त दरांनी येणारी किमत ही अंदाजपत्रक रकमेपेक्षा ३४.३२ जास्त असल्याने दराच्या वाटाघाटीनंतर खालील प्रमाणे दर अंतिम करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | भाग | टँकर क्षमता | १ मे.टन करीता | |
|---|---|---|---|---|
| | | | **प्रति दिन भाडे** | **प्रति किलोमिटर भाडे** |
| १ | सातारा देवळाई | सर्व क्षमतेचे टँकर | रु. १७५/- | रु. २.३० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | परिसरासाठी | | | |
| २ | औरंगाबाद शहर | ५००० लिटर | रु.२०५/- | रु.३.०० |
| | | १००० लिटर व त्यापेक्षा मोठ्या टँकरव्दारे | रु.१९०/- | रु.२.३० |

तरी कंत्राटदार मे.राम इंफ्रास्ट्रक्चर, औरंगाबाद यांचे सोबत वाटाघाटी नंतर अंतिम झालेल्या दरांनी निविदेनुसार बारा महिन्यांच्या कालावधीसाठी काम करुन घेण्यास व जर आणीबाणी परिस्थितीमध्ये या निविदेस मुदतवाढ द्यावी लागली तर सद्याच्या दरांध्ये १० टक्के (जास्तीत जास्त) वाढ करुन मुदतवाढ देण्यास व करार करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १५३/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२१.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०२०/४२६ दि.०४.०५.२०२० अन्वये “मालमत्ता/पाणीपट्टी कर वसुली व घनकचरा व्यवस्थापन” या विवक्षित कामासाठी श्री.शिवाजी बाबुराव झनझन यांची सेवा करार पध्दतीने ०६ महिन्याच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा रु.४०,०००/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादेत राहील, या अटीवर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सदर मुदत ही दि.१०.०९.२०२० रोजी संपलेली आहे. तथापि, त्यांनी काम केलेले असून त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याबाबत कर निर्धारक व संकलक यांनी अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार “मालमत्ता/पाणीपट्टी कर वसुली व घनकचरा व्यवस्थापन” या विवक्षित कामासाठी श्री.शिवाजी बाबुराव झनझन यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.१३.०९.२०२० ते दि.१२.०३.२०२१ या कालावधी साठी विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्याबाबत तसेच “झोन क्र.३ मधील मालमत्ता कर तसेचझोन क्र.१ ते ९ साठी पाणीपट्टी वसुली मोहिम विशेष वसुली अधिकारी” या विवक्षित कामासाठी दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.१६.०३.२०२१ ते दि.१५.०९.२०२१ या कालावधीसाठी कर निर्धारक व संकलक हे विहित करतील त्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १५३/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०२०/४२६ दि.०४.०५.२०२० अन्वये “मालमत्ता/पाणीपट्टी कर वसुली व घनकचरा व्यवस्थापन” या विवक्षित कामासाठी श्री.शिवाजी बाबुराव झनझन यांना करार पध्दतीने ०६ महिन्याच्या कालावधीसाठी विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सदर मुदत ही दि.१०.०९.२०२० रोजी संपलेली असून “मालमत्ता/पाणीपट्टी कर वसुली व घनकचरा व्यवस्थापन” या विवक्षित कामासाठी श्री.शिवाजी बाबुराव झनझन यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.१३.०९.२०२० ते दि.१२.०३.२०२१ या कालावधी साठी विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्याबाबत तसेच “झोन क्र.३ मधील मालमत्ता कर तसेच झोन क्र.१ ते ९ साठी पाणीपट्टी वसुली मोहिम विशेष वसुली अधिकारी” या विवक्षित कामासाठी दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.१६.०३.२०२१ ते दि.१५.०९.२०२१ या कालावधीसाठी कर निर्धारक व

संकलक हे विहित करतील त्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५४/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२३.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका कार्यालय, प्रादेशिक परिवहन कार्यालय व पोलीस आयुक्त यांच्या संयुक्त मोहिमेद्वारे दि.०१.१२.२०१८ ते दि.०३.१२.२०१८ या कालावधीत शहरातील रस्त्याच्या कडेला उभी असलेली बेवारस भंगार वाहने उचलून एकूण २६५ विविध वाहने जप्त करून गरवारे स्टेडियम येथे उभी करण्यात आली आहेत. त्यापैकी १३२ वाहने संबंधीत वाहन मालकांनी द्रव्यदंड भरणा करून आपली वाहने सोडवून नेली आहेत. द्रव्यदंडाची र.रु.५,४३,०००/- मनपा फंडात जमा करण्यात आली आहे. उर्वरित १३३ वाहने सोडवून नेण्यासाठी तीन वेळेस स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन प्रसिध्द करूनही संबंधीत वाहनांच्या मालकांनी या कार्यालयास संपर्क केलेला नाही. त्यामुळे १३३ वाहने भंगार स्थितीत गरवारे स्टेडियम येथे उभी असून या वाहनांचा भंगार म्हणुन ई-लिलाव करणे आहे. यासाठी अतिरिक्त आयुक्त-१ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गटीत करण्यात आलेली आहे. सदर गठीत समितीची दि.२५.०५.२०२१ रोजी बैठक संपन्न होऊन सर्व संमतीने ई-लिलाव करणे बाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आलेला आहे.

तत्पुर्वी प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून १३३ वाहनांचे भंगार मुल्यांकन करण्यात आलेले असून गठीत समितीने सदरील मुल्यांकनास सहमती दर्शविली आहे.

| लॉट क्र. | वाहनांचा प्रकार/संख्या | एकूण मुल्यांकन रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | दुचाकी वाहने-२८ | रु.१४,६५,०००/- |
| | तीनचाकी वाहने-३० | |
| | चारचाकी वाहने-७५ | |
| | एकूण वाहने-१३३ | |

सदरील वाहनांच्या बाबतीत पोलीस विभागाकडून पोलीस केसेस/अपघात केसेस इ.असल्यास त्या संबंधी माहिती मागितली असता, माहिती निरंक आहे. मात्र न्यायालयीन प्रक्रिया पुर्ण करून संबंधीत विभागाची परवानगी घेऊन ई-लिलाव करण्यासाठी पोलीस विभागाने ना-हरकत दिली आहे. या प्रकरणी शासनमान्य ऑक्शनरची नियुक्ती करण्यास व आरटीओ कार्यालयाने दिलेल्या मुल्यांकनास मान्यता मिळाल्यास जाही ई-लिलावाची कार्यवाही करण्यात येईल. तत्पुर्वी पुन:श्च एकवेळ सात दिवस मुदतीचे जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रसिध्द करून त्या बाबत आक्षेप/हरकती मागविण्यात येतील. तद्नंतर हरकती/आक्षेपांचा निपटारा करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४३८ नुसार अधिकृतपणे भंगार वाहनांचा (स्क्रॅप) ई-लिलाव करण्यात येईल. करीता, भंगार वाहनांचे आरटीओने काढून दिलेले मुल्यांकन निश्चित करण्यास व लिलाव प्रक्रिया करण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १५४/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका कार्यालय, प्रादेशिक परिवहन कार्यालय व पोलीस आयुक्त कार्यालय यांच्या संयुक्तद्वारे दि.०१.१२.२०१८ ते दि.०३.१२.२०१८ या कालावधीत शहरातील रस्त्यांच्या कडेला उभी असलेली भंगार वाहने एकूण २६५ जप्त करण्यात आली. यापैकी उर्वरीत १३३ वाहनांचा भंगार म्हणुन महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४३८ नुसार जाहीर ई-लिलाव करण्यास व आरटीओच्या मुल्यांकनाप्रमाणे मुल्यांकन निश्चिती करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५५/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२३.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत १०० दललीजलशुध्दीकरण केंद्र सन-१९९२ साली कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. केंद्राची उभारणी करतांना गाळणी हौद स्वच्छ करण्यासाठी दाबयुक्त हवा घेणेकरीता २५० मीमी व्यासाचे व गाळण झालेले पाणी घेण्याकरीता ३५० मीमी व्यासाचे स्लूस व्हॉल्व्ह बसविण्यात आलेले आहेत. बसविण्यात आलेल्या व्हॉल्व्ह आयुर्मान २८ वर्षे झालेले आहे. नियमित वापर व क्लोरीनयुक्त पाण्यामुळे बहुतांश झडपांची झिज झालेली आहे. यामुळे या झडपांची नेहमीच दुरुस्ती करावी लागते. त्याचप्रमाणे झडपांच्या गेटमधुन गळती सुरु झाल्याने जलवाहीनीच्या देखभाली दुरुस्तीच्या कामात मोठया प्रमाणावर अडचणी येत आहेत. सद्यस्थितीत गाळणी हौद क्र.१०,१२,६ व ४ यांच्या पाईपला गळती होऊन पाणी वाया जात आहे. यापुर्वी या पाईपची २ ते ३ वेळेस दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तथापि, पाईप जाडी अत्यंत कमी झालेली असल्याने व झडपांच्या गळतीमधून पाणी व्यय होत असल्याने वेल्डिंगद्वारे गळतीची दुरुस्ती करणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे या पाईपच्या दुरुस्ती करीता खंडणकाळ घेऊन गाळणी हौद रिकामे करावे लागतात. त्याचप्रमाणे भविष्यात मोठ्या प्रमाणावर पाईपला भगदाड पडल्यास गाळणीगृहात पाणी साचून विद्युत मोटारींना हानी पोहचू शकते. त्यामुळे सर्वच झडपा नव्याने बसविणे गरजेचे आहे.

कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१९-२०२० व सा.बां. विभागाच्या सन २०१८-२०१९ दरसुचितनुसार व प्राप्त मंजुर दरपत्रकानुसार तयार करण्यात आलेले असून अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेने प्रस्ताव क्र.१२१/२०२१ दि.२८.०४.२०२१ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

संदर्भ:-टेंडर आय.डी.क्र.2021-AMCA-674966-1

| | | |
|---|---|---|
| १. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
| २. | कामाचे स्वरुप/कामाचे नाव | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-१०० दललीजलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथील गाळणी हौदाचे स्लुस व्हॉल्व्ह बदलणे. |
| ३. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव | होय.रु.३३,३९,६८३/- |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स/निविदा मागविण्यात आली? | रु.३२,७८,८१०/- |
| ४. | ज्या वृत्तपत्रात निविदेची जाहिरात देण्यात आली होती. त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-निविदा मार्फत |
| ५. | अ) निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत | २३.०४.२०२१ |
| | ब) निविदा उघडण्याचा दिनांक | २६.०४.२०२१ |
| ६. | निविदा किती वेळेस मागविल्या? | एक वेळेस |
| ७. | एकुण किती निविदा आल्या? | दोन |
| ८. | निविदा प्राप्त दर | अं.प.दरापेक्षा ०.०५% कमी दराने |

त्यापैकी पात्र निविदाधारकांची माहिती खालील प्रमाणे.

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव | दाखल निविदा रक्कम | अंजदापत्रकीय दरापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | ३२,७७,३६९/- | ०.०५% कमी |

| | | |
|---|---|---|
| ९. | सर्वात कमी रक्कमेच्या निविदेची शिफारस सुसंगत आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| १०. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते नमुद करावे | जायकवाडी देखभाल दुरुस्ती |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ११. | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर पान क्रमांक द्यावा) | लागू नाही |
| १२. | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी, विषयांकीत काम नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांच्याकडून मान्यतेनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराने र.रु.३२,७७,१६९/- करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक १५५/२०२१:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत औरंगाबाद पाणी पुरवठा योजना १०० दलली जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथील गाळणी हौदाचे स्लुस व्हॉल्व्ह बदलणे या कामाची नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ०.०५% कमी दराची व र.रु.३२,७७,१६९/- खर्चाची निविदा मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १५६/२०२१:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२३.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.चुन्नीलाल मोतीलाल उदणे, क्षेत्र कर्मचारी, मलेरिया विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांच्या ह्रदयाचे आजार (Apost PTCA with DM with HT with unstable angina) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रुग्णालय, युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून र.रु.२,२६,५०९/- (दोन लाख सव्वीस जार पाचशे नऊ रुपये फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून त्यांना त्यांच्या ह्रदयाचे आजार (Apost PTCA with DM with HT with unstable angina) (Angioplasty) उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.२,२६,५०९/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.३८,३७९/- वजा जाता रु.१,८८,१३०/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या ९०% रु.१,६९,३१७/- इतकी होते. एकूण खर्चाचा ५% र.रु.१३,३२५/- ही मनपा फंडात जमा करून मंजुर देय र.रु.२,२६,५०९/- मधून अग्रिम र.रु.१,५०,०००/- वजा करून उर्वरित र.रु.७,९९२/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, बीड बायपास रोड, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.२०११/प्र.क्र./३३३/११/राकावि-२/मंत्रालय, मुंबई-३२ दि.१६.११.२०११ अन्वये व शासन परिपत्रक क्र.वैखप्र-२०१३/प्र.क.२९१/१३/राकावि-२ दि.११.१०.२०१३ मधील रुग्णालयाच्या यादीत जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी

खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रुग्णालयाचे नाव समाविष्ट आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.चुन्नीलाल मोतीलाल उदणे, क्षेत्र कर्मचारी, मलेरिया विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.२,२६,५०९/- मधून अग्रिम र.रु.१,५०,०००/- वजा करून उर्वरित र.रु.७,९९२/- ही रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक १५६/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.चुन्नीलाल मोतीलाल उदणे, क्षेत्र कर्मचारी, मलेरिया विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांच्या ह्रदयाचे आजार (Apost PTCA with DM with HT with unstable angina) या गंभीर आजारावर शासनमान्य खाजगी रुग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद येथे शस्त्रक्रिया झालेली आहे. नियमाप्रमाणे एकूण रु.२,२६,५०९/- खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. अग्रिम र.रु.१,५०,०००/- वजा करून उर्वरित र.रु.७,९९२/- ही रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५७/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.२४.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.कांतीलाल गणपत थोरात, कनिष्ठ लिपीक, लेखा विभाग, मनपा औरंगाबाद यांनी त्यांचा मुलगा नामे स्वप्नील कांतीलाल थोरात यांच्या प्रमस्तिष्क रक्त वाहिन्यांचे आजार (Acute Ischemic Stroke Left Hemiplegia) या आजारावर जे.जे.हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून यासाठी र.रु.२,०६,३६५/- च्या ५% प्रमाणे (अक्षरी रुपये दोन लक्ष सहा हजार तीनशे पासष्ट फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.१,८४,१४०/- एवढी असून सदरील रक्कमेच्या ९० टक्के र.रु.१,६५,७२६/- (अक्षरी रुपये एक लक्ष पासष्ट हजार सातशे सव्वीस) मधुन ५ टक्के र.रु.१०,३१८/- (अक्षरी रुपये दहा हजार तीनशे अठरा फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.२,०६,३६५/- च्या ५ टक्के प्रमाणे मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रु.१,५५,४०८/- (अक्षरी रुपये एक लक्ष पंचावन्न हजार चारशे आठ फक्त) रक्कम देय आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये प्रमस्तिष्क रक्तवाहिन्यांचे आजार या आजाराचा शासन मान्य आकस्मिक आजारामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय दि.१६.११.२०११ मध्ये परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कूटुंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट स्वरुपाच्या आजारावर घेतलेल्या उपचारासाठीचा खर्चाच्या प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची यादीमध्ये सदरील रुग्णालयाचा समावेश नसल्याकारणाने त्यांना परतावा अनुज्ञेय नव्हता. तथापि, सदरील कर्मचात्याची आर्थिक स्थिती विचारात घेता त्यास हा खर्च झेपावणारा नसल्यामुळे तसेच त्याने प्रत्यक्षात खर्च केलेला असल्यामुळे मा.महासभेस असलेल्या विशेषधिकारात मान्यता मा.प्रशासक यांनी दिलेली असून वैद्यकीय खर्च रु.२.०० लक्ष पेक्षा जास्त असल्यामुळे सदरील परतावा मान्य करण्याचे अधिकार मा.स्थायी समिती यांचे अधिन असल्यामुळे परतावा खर्चास विशेष बाब म्हणुन मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक १५७/२०२१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.कांतीलाल गणपत थोरात, कनिष्ठ लिपीक, लेखा विभाग, मनपा औरंगाबाद यांनी त्यांचा मुलगा नामे स्वप्नील कांतीलाल थोरात यांच्या प्रमस्तिष्क रक्त वाहिन्यांचे आजार (Acute Ischemic Stroke Left Hemiplegia) या आजारावर जे.जे.हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून यासाठी र.रु.२,०६,३६५/- (अक्षरी रुपये दोन लक्ष सहा हजार तीनशे पासष्ट फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.१,८४,१४०/- एवढी असून सदरील रक्कमेच्या ९० टक्के र.रु.१,६५,७२६/- (अक्षरी रुपये एक लक्ष पासष्ट हजार सातशे सव्वीस) मधुन ५ टक्के र.रु.१०,३१८/- (अक्षरी रुपये दहा हजार तीनशे अठरा फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.२,०६,३६५/- च्या ५ टक्के प्रमाणे मनपा फंडात जमा करून उर्वरित र.रु.१,५५,४०८/- (अक्षरी रुपये एक लक्ष पंचावन्न हजार चारशे आठ फक्त) रक्कम देय आहे.

सदरील कर्मचाऱ्याची आर्थिक स्थिती विचारात घेता, त्यास हा खर्च झेपावणारा नसल्यामुळे तसेच त्याने प्रत्यक्षात खर्च केलेला असल्यामुळे मा.महासभेस असलेल्या विशेषाधिकारात सदरील परतावा खर्च र.रु.१,५५,४०८/- ला विशेष बाब म्हणुन मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १५८/२०२१:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. २८.०६.२०२१)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबद पाणी पुरवठा योजने अंतर्गत १०० दलली जलशुध्दीकरण केंद्र सन १९९२ साली कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. केंद्राची उभारणी करताना गाळणी हौद स्वच्छ करण्यासाठी उंचावरील टाकीमधून पाणी घेण्यासाठी ६०० मीमी व्यासाच्या एम.एस. जलवाहीनीवर ६०० मीमी व्यासाचे बटर व्हॉल्व बसविण्यात आलेले आहेत. यापैकी ६ बटर फ्लाय व्हॉल्व सन २००४-०५ मध्ये बदलण्यात आलेले आहेत. बसविण्यात आलेल्या व्हॉल्वचे आयुर्मान २८ व १५ वर्ष झालेले आहे. नियमीत वापर व क्लोरिनयुक्त पाण्यामुळे बहुतांश झडपांची झिज झालेली आहे. यामुळे या झडपाची नेहमीच दुरूस्ती करावी लागते. त्याचप्रमाणे झडपांच्या गेटमधुन गळती सुरु झाल्याने जलवाहीनीच्या देखभाल दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहेत. सद्यस्थितीत गाळणी हौद क्र १०,१२,६ व ४ यांच्या पाईपला गळती होऊन पाणी वाया जात आहे. यापुर्वी या पाईपची २ ते ३ वेळेस दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तथापि, पाईप जाडी अत्यंत कमी झालेली असल्याने व झडपांच्या गळतीमधून पाणी व्यय होत असल्याने वेल्डिंगद्वारे गळतीची दुरुस्ती करणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे या पाईपच्या दुरुस्ती करीता खंडणकाळ घेवून संपुर्ण गाळणी हौद रिकामे करावे लागतात. त्याचप्रमाणे भविष्यात मोठ्या प्रमाणावार पाईपला भगदाड पडल्यास गाळणीगृहात पाणी साचून विद्युत मोटारींना हानी पोहचू शकते यामुळे सर्वच झडपा नव्याने बर्सावणे गरजेचे आहे.

